# स्वप्न-रञ्जन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १९२६
१९८७

REFBK-C016286
REFBK-0016286

२५१

—माधव जूलियन्

# स्वप्न-रञ्जन

REFBK-0016286

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमात.
अनुक्रम ७३४८८ ...... वि. काव्य
१९२८ ...... नों. दि. २६।२।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२८६
संग्रह शाखा

मराठी ग्रंथालय संमृद्ध योजना
१९७०

माधव जूलियन

मूल्य रु. ६·००

व्हीनस प्रकाशन : पुणे २

आवृत्ती पहिली : डिसेंबर १९३२
आवृत्ती दुसरी : डिसेंबर १९४९
पुनर्मुद्रण : जुलै १९६७

© स. कृ. पाध्ये

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ : पुणे २

माझ्या जन्मस्थानातील
म्हणजे
बडोदे नगरातील
संस्मरणीय व्यक्तींना
आणि
घटनांना

# प्रस्तावना

'स्वप्न-रञ्जन' हे रविकिरणमण्डळाचे २३ वे पुस्तक आहे. यात 'गज्जलांजलि' व सुनीतांजलि वगळून उरलेल्या बहुतेक स्फुट कविता सङ्कलित केल्या आहेत. क्रमांक २२, २३ व ११२ ही गोल्डन् ट्रेझरीतील क्र. २१९, २१८ व २८० यांची भाषांतरे आहेत. क्र. २८० चें मीच पूर्वी केलेले भाषान्तर, भाषान्तरप्रक्रियादृष्ट्या ताडून पहाण्यासाठीच पुढे दिले आहे.

पाहिलें अनीला प्रथम तिच्या बालवयीं
ती हसरी सालस गमली मज त्या समयीं.
जणु उषाच होती स्मित अपुलें उधळीत
वासन्त हिमाची सुन्दरता दावीत.
गुल्छबु–गुलाबादि तिंचे तैं खेळगडी,
ती तरल–चित्त, अव्याज तयांसम अगदी. १

पाहिली पुन्हा मी ती सुकुमार कुमारी,
वर्षांची–अठरा काही अजब खुमारी!
सौन्दर्य आणि मन विकासतां युवतीचे
विलसती मुखावर रंग नवे नवतीचे,
चन्द्रिकाच शोभे, भाषण म्हणजे गाणें –
बहु करिती हेवा, एक धन्य प्रेमानें. २

लोटली यावरी वर्षांमागुनि वर्षे,
पायाशी तिचिया उभा राहुनी हर्षे
देखिलें कळीचें फूल, फुलाचें फळ तें –
मातेच्या जवळी बाळ एक कोमल तें.
तो रुबाब, तें सौन्दर्य आणि पोक्तपणा
वाटला योग तो अपूर्व माझ्या नयनां
मी तिला पाहिलें पुन्हा एकदा देवा!

त्यागिलें जग तिने शान्तपणाने जेव्हा.
स्वर्गीय भोवती विहरत होतीं तेजें,
सान्निध्य प्रभुचें तीस दिलासा दे जें,
न विकार-भीति-वासना तिच्या जीवास
– ती सौन्दर्याची सीमा होती खास !

ता. २३ जुलै १९२० ) (काव्यरत्नावलि ३३-१ )

क्र. ३४ हे Hardy च्या The Rival चे व क्र. २६ हे कलापीच्या ‘ एक घा ’ चे भाषान्तर आहे. क्र. १२ भाषान्तरित नाही. मूळ कल्पना अप्रकाशित गुजराथी कवितेवरून सुचली असावी, परन्तु ताडून पहायला ती आता उपलब्ध नाही.

गेल्या २३ वर्षांतील या कविता, मागाहून सुधारल्या असल्या तरी मूळलेखनकालानुक्रमे दिल्या आहेत. या वाचून माझ्या मनात ज्या स्मृती उभ्या रहातात त्यांच्या या पडछाया नव्हत. प्रत्येक कलात्मक कृतीत अनुभूतींची निवड-जुळणी असली तरी अधिक उणी कल्पनेची भर असतेच. प्रतिभेकडून त्यांचें संयोजन होऊन त्यांत एक प्रकारचें रासायनिक नावीन्य प्रतीत होतें. कवितेवरून प्रतीत होणारी कल्पना ही मूळ सत्याहून अगदी निराळी असू शकते. ‘ प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहुं दे ’ ही कविता मूलतः एका सार्वजनिक संस्थेस उद्देशून आहे. हे मूळ सत्य तर काव्याची रमणीयताही नष्ट करणारे आहे. रसिकाला मूळ सत्याशी काही कर्तव्य नाही, त्याला हृदयङ्गम सत्याभास पुरे असतो. म्हणून रसिकहो, कवित्व हे तुमच्यासाठी आहे. आत्मरंजनासाठी आरम्भ केला तरी काव्याची समाप्ती ही रसिकरंजनासाठीच असते. या रंजित स्वप्नचित्रांनी तुमचे मनोरंजन होईल अशी आशा आहे.

ता. २६ नोव्हेंबर १९३४, पुणे. —माधव जूलियन्

# माधवरावांची स्वप्नभूमी

माझे मित्र प्रो. डॉ. माधवराव पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन् यांचे चरित्र, चारित्र्य व काव्य ही गेली पंचवीस वर्षे चर्चेचा विषय झालेली आहेत. निरनिराळ्या गटांत ते ते विषय पुनः पुन्हा निघतात व त्यांवर कडकोकडकी चर्चा होते. चर्चा करणारे सर्वच माधवरावांचे मित्र वा चहातेच असतात असे नाही. त्यांत मित्रांबरोबरच काही उघड शत्रू, काही प्रच्छन्न शत्रू, काही जुन्या पिढीचे, काही नव्या पिढीचे– असे अनेक प्रकारचे व अनेक वृत्तींचे लोक असलेले आढळतात. माधवरावांना अनेक प्रकारचे अन्याय करून ज्यांनी त्यांना हे जीवन अक्षरशः असहाय करून सोडले त्यांच्या कर्तृत्वाची (!) पिशाच्चे अजूनही तरुण पिढीतील काही मंडळींच्या मानगुटीला बसतात, व मग तरुण पिढीतील कित्येक तरुण-तरुणी, त्यांच्या जीवनातील खऱ्या-खोटया गोष्टी माहीत नसल्यामुळे, त्यांच्याविषयी भलभलते तर्कदुष्ट प्रश्न विचारतात; आणि त्यांना समर्पक उत्तरे दिली तरी त्यांचे गढूळलेले मत निवळण्यास वेळ लागतो. या दृष्टीने पाहिले असता माधवरावांना काळाने किंवा परिस्थितीने फारच मोठा जोराचा तडाखा दिला आहे. त्यांच्या पत्नी कै. श्री. लीलाबाई यांनी 'आमची अकरा वर्षे' हे पुस्तक लिहूनही अजून या त्रस्त समंधांचे शान्तवन झालेले नाही. याबाबत माधवरावांचे अधिकृत समग्र चरित्र व पत्रव्यवहार ही ज्या वेळी प्रसिद्ध होतील त्या वेळीच काही झाले तर होईल. परंतु सध्या तरी वाइटातून चांगलेच घ्यावयाचे, तर याचा अर्थ असा की, माधवरावांचे व्यक्तिमत्त्वच इतके श्रेष्ठ, उदात्त व ठसठशीत होते व आहे की, ते रसिकांच्या डोळ्यांत भरगच भरते, व दुबळ्यांच्या डोळ्यांत भेदकपणे घुसते; आणि मग ज्याच्या त्याच्या मनोधर्माला अनुसरून साधक-बाधक चर्चा होऊ लागते. काहीही असले तरी या संघर्षाने

माधवरावांच्या कीर्तीत भर पडून व ती दिवसेंदिवस उज्ज्वल होऊन वाढत आहे ही विशेष समाधानाची गोष्ट आहे.

श्री. माधवरावांचा जन्म दि. २१ जानेवारी १८९४ रोजी बडोद्यास झाला. त्यांचे बाळपण बडोदे व मुळशी पेट्यातील आवळस या त्यांच्या मूळगावी गेले व व्रतबंध आणि प्राथमिक शिक्षण तेथेच होऊन ते १९०३ साली बडोद्यास पुढील शिक्षणासाठी आले. या वेळी ते आपल्या मामांकडे राहात. वयाच्या तेराव्या वर्षी घरात काही मतभेद होऊन त्यांनी घर सोडले व बडोद्यातच स्वतंत्रपणे एकटेच राहू लागले. १९०९ साली मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर त्यांनी बडोदे कॉलेजमध्ये प्रवेश केला व तेथून १९१६ साली ते बी. ए. ची परीक्षा पास झाले. या अवधीत त्यांना श्री. काशीबाई हेरलेकर व कविवर्य चंद्रशेखर यांचे अनेक बाबतींत मार्गदर्शन होऊन त्यांची मनोभूमिका पुष्कळशी तयार झाली. याच महाविद्यालयीन जीवनात त्यांना श्री. नामदेव भाटे, चंदू गोगटे, रामभाऊ मराठे, बापूराव शिंदे व विठ्ठलराव घाटे हे काव्यात्म प्रवृत्तीचे सहृदय मित्र मिळाले. या सर्वांच्या स्नेहाचे दृढ संस्कार बरोबर घेऊन माधवराव मुंबईस आले व १९१८ साली एल्फिन्स्टन कॉलेजमधून एम्. ए.ची परीक्षा पास होऊन पुण्याच्या डे. ए. सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेज-मध्ये ते फारसी भाषेचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले. लवकरच तेथे ते आजीव सेवक म्हणून घेतले गेले. नंतर पुणे येथे १९२२ मध्ये स्थापन झालेल्या 'रविकिरणमंडळा'चे ते सदस्य झाले व त्यांची वाङ्मयीन कामगिरी जोरात सुरू झाली. सुमारे सात-आठ वर्षे फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापकाचे काम केल्यानंतर काही मतभेद होऊन आपल्या आजीव सदस्यत्वाचा त्यांनी राजीनामा दिला. मध्यंतरीच्या काळात काही दिवस अमळनेर व पुणे या ठिकाणी शिक्षकाची नोकरी करून १९२८ मध्ये ते कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये इंग्रजी व फारसी भाषेचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले व पुढे शेवटपर्यंत (१९३९) ते तेथेच होते. १९२८ मध्ये त्यांचा कु. गंगूबाई गरुड (पुढे लीलाबाई पटवर्धन) यांच्याशी विवाह झाला व वैवाहिक जीवनाची अकरा वर्षे त्यांनी कोल्हापुरास मोठ्या सुखाने काढली. या अवधीत त्यांना

दिनू व सुधा ही दोन मुले झाली; त्यांनी अनेक गद्य-पद्य ग्रंथ लिहिले; नाशिकचे ‘कविसंमेलन’ व जळगावचे ‘साहित्यसंमेलन’ यांचे ते अध्यक्ष झाले. त्यांचा सुप्रसिद्ध ‘छंदोरचना’ हा ग्रंथ तयार होऊन त्यांना मुंबई विद्यापीठाची ‘डी. लिट्.’ ही बहुमानाची पदवी मिळाली; देवास, बडोदे व फलटण दरबारकडून त्यांचा सत्कार झाला. आणि अशा रीतीने कीर्तीच्या शिखरावर पोचले असतानाच पुणे मुक्कामी दि. २९ नोव्हेंबर १९३९ रोजी त्यांच्या स्वतःच्या ‘निवान्त’ बंगल्यात त्यांचा शोचनीय अंत झाला! त्यांच्या अकाली मृत्यूने शेकडो लोकांना हळहळ लागून राहिली! विद्वान साहित्यिक, प्रतिभाशाली कवी, मार्मिक टीकाकार, व्यासंगी प्राध्यापक, व प्रभावी वक्ते म्हणून माधवरावांची योग्यता फार मोठी होती. पण ते असे दुर्दैवी होते की, यापैकी प्रत्येक बाबतीतले यश त्यांनी स्वपराक्रमाने मिळविलेले असूनही त्यांच्या हयातीत ते त्यांच्या पदरात भरपूर प्रमाणात कुणी टाकले नाही. ‘कीर्तिचा स्वर्ग कोणाला रे मेल्याविण लाभला’ हे त्यांच्या बाबतीत फार खरे झाले! मृत्यूनंतर त्यांना जी कीर्ती व मराठी वाङ्मयात जे श्रेष्ठ स्थान मिळाले ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने, काव्याने व इतर ग्रंथांनी खेचून आणले; आणि तिथे मात्र त्यांचे टीकाकार व शत्रू यांचे हात लुळे पडले. काळाने माधवरावांना दिलेला हा न्याय व त्यांच्या शत्रूवर घेतलेला हा सूड योग्य तितकाच सात्त्विक व स्पृहणीय होता.

माधवरावांच्या काव्याच्या अभ्यासकांनी त्यांची काव्यविषयक कलेची कल्पना लक्षात घेऊन त्यांचे काव्य अभ्यासल्यास ते सुस्पष्ट होईल, इतकेच नव्हे तर त्यातील सौंदर्यही त्यांना दिसून खऱ्या काव्यानंदाचा लाभ होईल असे वाटते. त्यांच्या हयातीत अनेक वाचकांनी त्यांच्या काव्यातील घटना, प्रसंग किंवा व्यक्ती यांचे संबंध प्रत्यक्ष त्यांच्या जीवनाशी जोडले व त्या दृष्टीने ते त्याचे स्पष्टीकरण व त्यावर टीका करू लागले. त्यामुळे मूळ सत्य बाजूला राहून, त्यांना काव्यानंदाचा लाभ तर झालाच नाही, उलट गैरसमज मात्र पसरले. असे होऊ नये म्हणून माधवरावांनी १९२६ साली प्रसिद्ध केलेल्या

'विरहतरङ्ग'च्या प्रस्तावनेत एक इशारा देऊन ठेवला. ते म्हणतात– "नायक व नायिका ही राधा–कृष्णाप्रमाणे पौराणिक वा रूपमती-बाजबहादुराप्रमाणे ऐतिहासिक नाहीत. त्यांची जात कोणती हा प्रश्न महत्त्वाचा नाही व वाङ्मयात निघूही नये. कदाचित ती भिन्नजातीय असतील; परंतु ती आधुनिक पुढारलेल्या वर्गातील आहेत. ती कल्पना-सृष्टीतील आहेत; याचा अर्थ ती असंभाव्य कोटीतील आहेत असा नव्हे. ती काल्पनिक आहेत याचा अर्थ इतकाच की, ही शब्दचित्रे, डोळ्यांपुढे विद्यमान दिसणाऱ्या वा ऐकून माहीत झालेल्या व्यक्तींच्या पुन:संस्कृत पण हुबेहूब पडछाया नव्हत. प्रतिभा अथवा कलेतील कल्पकता ही नाना ठिकाणी व भिन्न भिन्न समयी मिळविलेली निवडक दृश्ये, अनुभव, ऐकीव माहिती, तर्क, इत्यादिकांचा एक रस करून एक नवीनच ओतीव मूर्ती निर्माण करते; व प्रथमपुरुषी लेखनाचा लेखक या व्यक्तीशी बहुधा संबंध नसून ती एक लेखनाची तऱ्हा असते, याचा कित्येकदा जबाबदार, सहृदय व वाङ्मयप्रेमी टीकाकारांनासुद्धा विसर पडतो, आणि लिखितातील प्रसंगाचा लेखकाच्या चारित्र्यावर आरोप करण्यात येऊन कला विपर्यस्त होते."

त्याचप्रमाणे 'स्वप्न-रञ्जन'मधील 'कलारहस्य' (पा. ८९) या कवितेत ते म्हणतात—

"कवि कोण ? गूढ तच्चरित कळू द्या जरा
अन् कोण अहो व्यक्ती जी वाहवी स्फूर्तिचा झरा.
कवि कुणी असो, तो मला वाटतो सखा
फाडुनी हृदय बघण्याचा पाहिजे क्रूर सोस का ?

* * *

रेखीव अमुक ती असो कुणी कामिनी,
ही शाश्वत मम हृदयींची मोहिनी कामरूपिणी.
हृत्पटावरिल भरकामचित्र टाकुनी,
बघण्याला मागिल टाके ठाकेल रसिक का कुणी ?"

यामध्ये कलेसंबंधीची आपली कल्पना त्यांनी स्पष्ट केली आहे.

'नकुलालङ्कार'चे हस्तलिखित पाहिल्यावर माधवरावांनी मला विचारले, " यातील चित्रे तुम्हांला कशी वाटतात ? " त्यावर मी म्हटले, " त्यांत काही ठिकाणी अजून चित्रामागील व्यक्ती कोण हे स्पष्ट दिसते; तुमची तेवढी चित्रे पारदर्शक झाली आहेत. ती Personal वाटतात." माधवरावांनी हे ध्यानात धरले असले पाहिजे. कारण शेवटच्या दुखण्यात त्यांनी एक दिवस मला जवळ बोलावून माझ्या हाती 'नकुलालङ्कार'-ची छापील प्रत भेट म्हणून दिली व म्हटले, " आता हे वाचा. यातील सर्व चित्रे घासून पुसून मी Impersonal केली आहेत ! " आणि खरेच त्यांनी तसे केले होते. आपल्या कलाकृतीवर कमालीचा रंधा मारून अत्यंत संयमित मनाने त्यांनी 'आपली चित्रे म्हणजे काही व्यक्ती' असे न करता, 'काही मनुष्यस्वभावाचे नमुने' तयार केले होते. कलेच्या बाबत ते किती कसोशी करीत याची ही उदाहरणे आहेत. असे आणखी किती तरी प्रसंग सांगता येतील, पण त्याचे हे स्थळ नव्हे. केवळ बडोदे कॉलेजच्या त्रैमासिकात 'वाग्यत मोहिनी' ही कविता प्रथम प्रसिद्ध झाली म्हणून 'त्याच कॉलेजातील एका विशिष्ट विद्यार्थिनीवर ही कविता लिहिली' असा ज्यांनी त्यांच्यावर आरोप केला व पुरावा म्हणून ज्यांनी—

" जणुं चिंतांचा समूह सारुनि मागें त्वां बांधिला
भव्य हा तव अंबाडा ढिला."

या दोनच ओळी पुढे केल्या, अशा वृत्तीच्या लोकांसाठी 'कलारहस्या'-वरील हे अभिप्राय पुढे करावे लागले. असे म्हणणे म्हणजे 'हंस प्रयच्छ मे कान्तां गतिरस्यास्त्वया हृता' असे म्हणण्यासारखेच हास्यास्पद आहे. याबाबत आणखी एकच सूचना करून हा विषय संपवितो. ज्यांना अशा प्रकारच्या व्यक्तिशोधनाचे वा प्रसंगशोधनाचे वेड असते अशांनी एखाद्या चित्रकाराचे खाजगी 'स्केच बुक' पाहावे. त्यामध्ये त्यांना माणसे, जनावरे, इमारती, किंबहुना निसर्गातील अनेक दृश्ये यांतील काही अर्धवट भाग 'नमुने' म्हणून त्यांनी रेखाटून ठेवलेले आढळतील. यामध्ये कोणतेही चित्र पुरे नसते. कुठे एखाद्या स्त्रीचा

केशकलाप असेल, तर कुठे नुसता दंडाचा भाग असेल, कुठे एखाद्या पुरुषाचे डोळे असतील तर कुठे नुसते नाकच किंवा पावलेच असतील, कुठे नेसण्याच्या नुसत्या चुण्या किंवा त्याचे घोळ असतील तर कुठे एखाद्या करांगुलीचा नुसता डौलदार बाकच असेल. या त्रुटित चित्रांना खात्रीने कुणी 'व्यक्ती' किंवा 'पुरे चित्र' म्हणणार नाही. या त्रुटित भागांचा उपयोग खरा कलावंत पुढे एखादे आपले मनोमय चित्र पुरे उभवताना निश्चितपणे करतो व म्हणून त्याचे चित्र हे वास्तवाचा प्रत्यय आणून देणारे, पण 'कल्पनीय'च ( ideal ) असते. माधवराव या दृष्टीने सौंदर्यजीवी कल्पनीय-वादी होते. माधवरावांचे बालमित्र श्री. विठ्ठलराव घाटे आपल्या लेखात ('सह्याद्री', जानेवारी १९४० ) म्हणतात—"या काव्याला आत्मवृत्तपर न म्हणता ती माधवरावांच्या आत्म्याची कहाणी आहे असे मी म्हणेन. चारचौघांसमोर घडणाऱ्या जीवनाव्यतिरिक्त प्रत्येक माणसाचे एक अंतर्जीवन असते. बाहेरच्या जीवनात राहिलेल्या उणीवा तो या अंतर्जीवनात भरून काढीत असतो. भावनाप्रधान कवीचे अंतर्जीवन तर किती तरी अद्‌भुत, कल्पनामय व ध्येयनिष्ठ असते!" या उताऱ्यावरून सर्व उलगडा होण्यासारखा आहे. माधवरावांची कविता कोणत्या कलाभूमिकेवरून वाचली पाहिजे याचे यावरून दिग्दर्शन होईल, असे वाटते.

कलारहस्याप्रमाणेच माधवरावांचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व यांसंबंधीही काही गोष्टी लक्षात ठेवावयास पाहिजेत. त्यांचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व ही थोर व पृथगात्म होती. अगदी कोवळ्या वयात घरातून बाहेर पडल्या-मुळे त्यांनी आपल्या जीवनाची सर्व जबाबदारी स्वतः उचलली होती. शरीर व मन ही खंबीर ठेवण्याकडे मूळचीच प्रवृत्ती असल्या-मुळे आपल्याविषयी ते फार दक्ष असत. परंतु त्यांना मार्गदर्शक वडील-धाऱ्यांची प्रेमळ मायापाखर फारशी न लाभल्यामुळे कित्येक वेळा त्यांच्या हातून काही व्यावहारिक चुका झाल्या. मूळचा बाणा स्वतंत्र असल्यामुळे ते विलक्षण स्वाभिमानी वृत्तीचे होते. आपण दुसऱ्याला अन्याय करता कामा नये हे त्यांचे जीवनसूत्र होते; इतकेच नव्हे तर कुणाला अन्याय झालेलाही त्यांना सोसत नसे. सत्यान्वेषणासाठी

त्यांचा जीव तडफडत असे. आपले मन विकृत होत आहे असे त्यांना वाटले की ते 'टॉड्स मॅन्युअल' पुनः पुन्हा वाचीत, व 'दुर्बुद्धी ते मना कदा नुपजो नारायणा' हा तुकारामांचा अभंग मनाशी म्हणत किंवा सारखा लिहून काढीत. चूक झालेली कोणी दाखविली तर ते ती तत्काळ कबूल करीत, इतकेच काय पण ती फार घोर आहे असे दिसले तर स्वतःला काही तरी आठवण राहील अशी शिक्षाही करून घेत. आपल्या मनाला जे मत पटले त्याचे आचरण करण्यास किंवा ते बोलून दाखविण्यास लागणारे बेडर धैर्य त्यांच्या अंगी होते. ते लोकशाहीचे निष्ठावंत भोक्ते, स्वातंत्र्याचे शूर अभिमानी व आत्मविकासाचे एक सक्रिय अभ्यासू होते. ते जितके निर्भीड व बाणेदार तितकेच सरळ व भोळे होते. आणि याच वृत्तीतून त्यांची अनेक सुखदुःखे व त्यांच्या अनेक कविता निर्माण झाल्या आहेत. उदाहरणे देण्याचे हे स्थळ नव्हे, नाही तर या प्रत्येक गुणदोषाबद्दलची अनेक मनोरंजक उदाहरणे देता येतील. या त्यांच्या ठळकदार वैशिष्ट्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक व थोर झाले होते. श्री. विठ्ठलराव घाटे यांनी "माझा प्रेमळ पण लहरी, बुद्धिमान पण थोडा भाबडा, झुंजार पण लहानग्या मुलांशी खेळणारा-बागडणारा आणि हसतमुख पण दुःखाकष्टांत राबणारा-" असे जे त्यांचे वर्णन केले आहे, ते अगदी यथार्थ आहे. माधवरावांची कविता वाचताना त्यांचे हे व्यक्तिविशेष व त्यांच्या आवडीनिवडी याही लक्षात ठेवणे अत्यंत अगत्याचे आहे.

माधवरावांच्या प्रतिभेने अनेक कलात्मक काव्यकृतींची निर्मिती करून निरनिराळ्या विषयांतून स्वच्छंदाने विहार केला आहे. त्यांच्या काव्यकृतींत हृदयंगम खंडकाव्ये, विनोदगर्भ कथाकाव्ये, उपरोधपूर्ण समाजदृश्ये, टंच सुनीते, मोहोळाप्रमाणे मधुरसाने भरलेल्या गज्जलरुबाया, द्राक्षाप्रमाणे रसाळ भाषान्तरे व वृत्तजातिछंदांत नटलेली अनेक भावनोत्कट भावगीते आहेत.

'स्वप्नरञ्जन'मध्ये त्यांनी आपली वृत्तजातिछंदांतील सर्व स्फुट कविता एकत्र संग्रहित केली आहे. यात अनेक विषय आले आहेत. यांपैकी प्रेम', 'लहान मुले', 'राष्ट्रीय वृत्ती', 'सामाजिक आचारविचार',

'कवी आणि कला', 'सौंदर्यजीवन' आणि 'आध्यात्मिक जीवन' हे विषय प्रामुख्याने आले असून त्यांवरील भावगीतांची संख्या मोठी आहे. यांखेरीज काही विडंबन, आत्मनिवेदने व भाषान्तरेही आली आहेत; पण ती अल्पसंख्य आहेत.

'स्वप्न-रञ्जना'मधील एक-तृतीयांशापेक्षाही अधिक भाग शुद्ध प्रेम-गीतांनी व्यापलेला आहे. 'प्रेम' हा माधवरावांच्या जीवनाचा एक विशेष महत्त्वाचा भाग होता, व त्याचे स्वरूप आमूलाग्र काव्यात्म (Romantic) होते. त्यांचे प्रेम सर्वस्वी अपार्थिव, ध्येयवादी, शाश्वत, त्यागी, शरीरभोगनिरपेक्ष व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे होते. विरहाच्या वा वियोगाच्या झळींने ते भाजून निघाले तरी जसे ते चिवट होते, तसे ते निराशेतही समाधानी राहणारे होते. त्यांच्या प्रेमिकाला आपली प्रेयसी ही तिलोत्तमेप्रमाणे सुंदर वाटते, व त्याला हीन भावना शिवताना कधीच दिसत नाहीत; ते 'अभिसारिके'प्रमाणे आपल्या ध्येयाचा व प्रेयाचा शोध घेत पुढे पुढे जाणारे आहे, 'रागिणी विधवे'-प्रमाणे आपल्या मनात दडलेले कळवून घेऊन त्याच्याशी ते हितगुज करणारे आहे, प्रवासात पाहिलेल्या दृश्यामध्ये आपले ईप्सित हुडकणारे आहे, प्रेयसीच्या दर्शनाने उन्नती होणारी असल्याने ते स्वर्ग नको म्हणणारे आहे; 'दग्धपक्ष' होऊन जीवन्मृती आली तरी ते आपल्या भक्तीच्या पूर्ण कसोटीस उतरणारे आहे, आणि या जीवनात वा या जगात त्याला आपले ध्येय मिळत नाहीसे दिसल्यास जिथे स्वातंत्र्य, शान्ती व इमानी प्रेम आहे तिथे आपल्या राणीसह निघून जाण्यास न भिणारे असे ते आहे. आपल्या प्रेयाशी आज जरी वियोग झाला तरी दूरान्तरावर कृष्णाकोयनांच्या संगमाप्रमाणे प्रीतिसंगमाची इच्छा करणारे ते संगमोत्सुक आहे; बकुळीच्या मालेतील सुगंधाप्रमाणे त्याचा गंध कायम टिकतो, तारुण्यातील वासंतिक आल्हादाची त्याला पुनः पुन्हा स्वप्ने पडतात, आणि तेच जीवन त्याला सार्थ व चिरंजीव वाटते; इतकेच नव्हे तर त्याला आपल्या प्रेय जीवनात अनन्यत्व वाटते, 'खुलेना दोनदां हृत्पुष्प हें जन्मीं' अशी ग्वाही देऊन त्या प्रेमाच्या प्राप्तीवाचून ही हुरहूर थांबणार नाही असे ते म्हणते; 'त्याग ही त्याची

कसोटी आहे ' असे म्हणून ते ' सर्वस्वाचा यज्ञयाग ' करण्यास तयार असते; त्याचप्रमाणे कर्तव्याचरण करीत असता त्याचे लक्ष ध्येयावर जाते, त्याच्याशी ते एकरूप होते व त्याचे रूपान्तर पराभक्तीत होते; कारण मुळातच ते शरीरभोगनिरपेक्ष आहे; म्हणूनच ते ' स्वातंत्र्य तुला कुठेंहि जा तू ' असे पुनः पुन्हा म्हणते. माधवरावांच्या प्रेमिकांचे हे प्रेम डोळस पण स्वप्नाळू, विरही पण निराशेतील समाधान मानणारे व संगमोत्सुक पण ' पुरे दुरुन जरि असेल आश्रय ' असे म्हणणारे आहे. त्यामुळे त्याची अभिनवता विशेष आणि त्याचे सौंदर्यजीवित्व आकर्षक आहे. ' माधवरावांचे प्रेमिक ज्या प्रकारच्या स्त्रीवर प्रेम करतात त्यांचे आकर्षण काही एका वैशिष्ट्यामुळे त्यांच्या प्रेमिकांना वाटले तरी त्या स्त्रिया त्या योग्यतेच्या नाहीत ', असे काही टीकाकार म्हणताना दिसतात; पण माधवरावांच्या प्रेमिकांना त्या त्या स्त्रियांमधील वैशिष्ट्य दिसल्यावर त्यांच्या ध्येयवादाला पंख फुटतात व ते आपल्याच कल्पनेने प्रेरित होऊन भराऱ्या मारीत उंचावर जातात, आपली कल्पनाचित्रे रंगवितात, व तिथे त्यांच्याशी ते एकरूप होतात. त्यामुळे त्यांच्या चित्रांचे शरीर पृथ्वीवरले पण मन स्वर्गातले, अशी स्थिती झाली आहे. त्यांच्या प्रेमिकांचे मन नेहमीच स्वर्गात किंवा सौंदर्यजीवनात वावरणारे आहे; त्याच्याशी ते तन्मय झाले आहे, त्यामुळे त्या श्रेयाची साक्ष जिथे अल्पकणातही पटते, तिथे त्याला आपल्या सौंदर्यशाली संपूर्ण जीवनाचे स्वरूप आकलून घेण्याची प्रेरणा मिळते व ते वर उच्च वातावरणात भरारी घेते. आणि मग त्याच्यामागे धावण्याची ज्यांना शक्ती नसते किंवा जे केवळ पार्थिव नीरस व्यवहार पाहणारे असतात त्यांना त्यात अनेक प्रकारच्या उणीवा दिसू लागतात. हा दोष लिहिणाराचा नसून बघणारांचा आहे. या प्रेमभावनेला अनुभूतीचा आधार आहे, असे म्हणावेसे वाटते; पण यावरही क्षुद्र भाष्य करणारे टीकाकार आहेत. पण साहित्यात अनुभूती व ती घेण्याचे मार्ग याची ज्यांना उत्तम ओळख असते ते याबाबत कधीही आक्षेप घेणार नाहीत. माधवरावांनी जीवन डोळसपणे पाहिले, रसिकतेने अनुभविले, जीवनासंबंधी गाढ वाचले व मनाने सखोल कल्पिले असे जेव्हा आपण म्हणतो त्या वेळीं आपण त्यांच्या वैयक्तिक,

व्यावहारिक जीवनासंबंधी बोलत नसून, त्यांच्या व्यापक मनाने अनुभवलेल्या अलौकिक जीवनासंबंधी आपण बोलतो असाच त्याचा अर्थ होतो. माधवरावांची ही जीवनदृष्टी आपण डोळ्यांसमोर ठेवली की त्यांनी रेखाटलेल्या प्रेमगीतांचा व त्यांतील भावनांचा आपणांस उलगडा होऊ लागतो. मग 'अन् स्फुरण कुठें प्रणयाचें?' यातील रहस्य कळते, 'पुरे दुरुनि जरि असेल आश्रय' याचा अर्थ समजतो, व 'प्रेमाची परीक्षा कां नको' किंवा 'निराशेंतील समाधान' हा दुबळा भाव नसून तो सकस मनाचा संयमशील भाव कसा आहे ते कळते. 'संगमोत्सुक डोहा'सारखी सर्वोत्कृष्ट कविता लिहिणाऱ्या कवीचे मन किती ध्येयवादी व सौंदर्यजीवी होते याची वाचकांनी कल्पनाच करावयास हवी. ही भूमिका ज्यांना प्राप्त होईल त्यांना 'विरहतरङ्ग'तील सरस विहारांचा काव्यानंद लाभेल, 'सुधारका'तील तरला-सरलांचे खरे दर्शन होईल, 'तुटलेल्या दुव्यां'तील दुवे सांधता येतील, 'नकुलालङ्कारा'-तील बोचकपणा कशामुळे आहे ते समजेल, 'द्राक्षकन्ये'तील रसाळ सत्त्व मिळेल, 'गज्जलाञ्जली'तील आर्ततेचा साक्षात्कार होईल, 'मधुलहरी' व 'रुबाया' वाचताना इराणी बागांतील गुलाबपुष्पे मिळतील व 'स्वप्न-रञ्जना'तील स्वप्नांबरोबर वर तरंगत जाता येईल. आणि हे सर्व करताना माधवरावांनी आपल्या जीवनयज्ञात स्वतांची आहुती दिली आहे, व त्यांच्या आत्म्याने हे काव्याचे मंत्र म्हटले आहेत—हा साक्षात्कार घडेल. माधवरावांची प्रेमगीते अशी स्वयंभू, प्रभावी व रम्योदात्त आहेत.

प्रेमभावनेनंतर ज्या भावनेने माधवरावांच्या मनाला विशेष वेधून घेतले अशी भावना म्हणजे 'वात्सल्य' ही होय. माधवरावांचे वात्सल्य हे कधी कधी पितृतुल्य, तर कधी कधी साक्षात पित्याचेच आहे; आणि पिता व माता यांच्या भावनेतील सूक्ष्म फरक लक्षात घेतल्यास ते मातृतुल्य किंवा प्रत्यक्ष मातेचेच वात्सल्य आहे असा अनुभव येतो. 'पुणे न्यू इं. स्कूल होस्टेल'मध्ये माधवरावांचा 'जानू' नावाचा एक नोकर होता. त्याला एक तीन वर्षांचा मुलगा होता. बायको मेल्यामुळे तो नोकर त्या मुलाचे फार प्रेमाने संगोपन करी, आणि तो मुलगा जानूला 'आई'

म्हणून हाक मारी. ते ऐकल्यावर माधवराव विनोदाने म्हणत, "आई म्हणून कोणी **बापास** हाक मारी." माधवरावांचे अंतःकरणही असेच आईचे होते. ज्या बालसृष्टीने त्यांचे मन वेधले जाते तीत जशी लहान मुले आहेत तशी एका काळी लहान असून त्यांच्या अंगाखांद्यावर खेळलेली पण पुढे मोठी झालेली मुलेही आहेत. पण माधवराव त्यांचे व आपले वय विसरून त्या पूर्वीच्याच वत्सलतेने त्यांच्याशी बोलताना दिसतात. यातील एक भाग असा आहे की, त्यांच्यासंबंधी ज्या वेळी माधवरावांनी लिहिले त्या वेळी त्यांना साक्षात आपल्या मुलांचे जीवन दृष्टीस पडले नव्हते. पण मित्रांच्या मुलांनी त्यांचे मन पहिल्यापासून आकर्षित केले आहे. याचा अर्थ हाच की, वात्सल्य हा त्यांच्या जीवन-रसाचा एक प्रमुख जन्मजात भाग होता. साक्षात आपली मुले दिसेपर्यंत त्यांची ही भावना मित्रांच्या मुलांच्या कोडकौतुकावर जगली व पुढे प्रत्यक्ष आपली मुले दिसल्यावर आपल्या व मित्रांच्या मुलांचे ती कोड-कौतुक करू लागली. याबरोबरच आणखी एक त्यांच्या मनाचा विशेष आहे तो पाहावयास हवा. माधवराव कधी कधी म्हणत– "मला दिनू व सुधा यांना पाहिल्यावर माझे बालपण आठवते व त्यातील अनेक आठ-वणी होतात." म्हणून माधवरावांच्या बालसृष्टीत या त्रिविध सृष्टीचे दर्शन घडते. कुमारी पिरोजाचे शब्दचित्र रेखाटताना त्यांना मुंबईच्या चौपाटीवरील पारशी बालकन्या दिसते, तर 'अङ्गाई' गाताना त्यांच्यात एका मैत्रिणीचे मातृप्रेम पुढे उभे राहते; 'कौमार्य स्मिता'चे दर्शन घडविताना हाडामांसाने आपल्याच कुलात जन्मलेली बहीण दिसते तर 'कशासाठीं पोटासाठीं!' असे म्हणताना त्यांचेच बालपण पुढे तरंगते; 'नाना बाहुली माझी' असे म्हणताना मित्रकन्ये-विषयीचे वात्सल्य उमलते तर 'निर्झरास' उद्देशून बोलताना साक्षात दिनूसारखी मुले डोळ्यांपुढे नाचतात; क्वचित एखाद्या कवितेचा उगम स्वतांच्या दिवंगत बालकाच्या दुर्दश्यामुळे ओघळलेल्या अश्रूंतून झाला आहे, तर कधी मुंबईच्या चाळीत अचानक भेटलेल्या व 'सुप्रभात' असे म्हणून सुरंगाडीवरून सुरंकन निघून जाणाऱ्या एका अनोळखी मुलीच्या वृत्तीतूनही झाला आहे. आणि 'बघें प्रथम

मी बालवयीं' या कवितेचा जन्म पॅल्ग्रेव्हच्या 'सुवर्णनिधी'-तील "I saw her in childhood" ही 'लाइट'ची कविता वाचून उमळलेल्या वत्सल भावनेतून झाला आहे. मुलांच्या-संबंधी लिहिताना ती मुले मोठी झाली तरी माधवरावांना ती लहानच दिसतात. त्यांच्या अंतःकरणातून त्यांच्याविषयीचे शुद्ध, सात्त्विक व निर्मळ वात्सल्य कसे पाझरते याचे प्रत्यंतर आपणास 'खुळी लाजरी पोर' व 'बघें प्रथम मी बालवयीं' या कवितांत येते. त्यांच्या बालसृष्टीत रानझऱ्याप्रमाणे झुळझुळणारी 'चिमुकली शान्ता' आहे, आईच्या पुढ्यात बिलगून पडणारा जिज्ञासू मुलगा आहे, सासरी जाताना मागे वळून पाहणारी कन्या आहे, भातुकलीचे गाणे गाऊन लटुपटीची विहीण होणारी शहाणी पोर आहे, लुटुलुटू चालून बुद्कन पडणारे व आईने थोपटताच रडे थांबून तिच्या मांडीवर स्वाभाविकपणे झोपी जाणारे बाळ आहे, आपल्या 'घरा'ची लहानपणीची आठवण काढणारा मुलगा आहे, थंडीच्या दिवसांत चुलीशी दाटी कर-णारी मुले आहेत, बाळंतीण आईच्या खोलीत हळूच चोर पावलांनी शिरून आपला 'लहान भाऊ' पाहणारा बाळदादाही आहे. सारांश, बालसृष्टीत दिसणारी विविध स्वभावांची व विविध परिस्थितीतील मुले आहेत. या सर्वांचे चित्रण माधवरावांनी विलक्षण आत्मीयतेने केले आहे. बाल्यासंबंधी त्यांना तीव्र ओढ आहे. त्यातील 'न्यारी आर्तता', त्यातील 'शोकच्छाया', त्या वेळीं मनात वावरणारी 'काल्ची खंत ती नाहीं! चिंता न उद्यांची कांहीं' ही वृत्ती आणि 'प्राप्तस्थिति व वांच्छा यांतील कलह' या सर्वांचेच माधवरावांना वेड आहे. त्यांनी माधवरावांचे जीवन व्यापलेले आहे. इतकेच नव्हे तर जीवनात जेव्हा जेव्हा त्यांना हरएक प्रकारच्या निराशेचे तडाखे बसले, त्या त्या वेळीं ही बालसृष्टी हाच त्यांचा दिलासा झाला आहे, व त्यातच त्यांना निर्भेळ आनंद लाभलेला आहे. एखादे लहान मूल गाढ झोपी गेलेले पाहिले की माधवरावांच्या डोळ्यांत आनंदाश्रू येत व ते म्हणत, "अशी झोप मला का येत नाही?" कधी कधी नेणत्या मुलाला हातात खाली-वर जोजवीत ते त्याच्याशी बोबडे बोबडे बोलत आणि म्हणत—

" काय, माझा हात वाईट आहे ? तू तरी निदान हे म्हणू नकोस; माझ्या-सारखा दुर्दैवी होऊ नकोस ! असाच बाळ राहा ! " आणि एखाद्या मोठ्या माणसाशी बोलल्याप्रमाणे ते त्याच्याशी पाच पाच दहा दहा मिनिटे बोलत; त्यांच्या या एकांगी संभाषणाने– म्हणजे नाट्यछटेसारख्या एक-मुखी भाषणाने– भोवतालच्या लोकांना खूप हसू लोटे, पण त्यातून माधवरावांची नितान्त प्रेमळ वात्सल्यवृत्तीच त्यांना दिसून येत होती. त्यांच्या या वात्सल्यवृत्तीचे सर्वांनाच कौतुक वाटे.

राष्ट्रीय वृत्तीच्या बाबतीत माधवराव फार चोखंदळ असत. त्यांचा स्वदेशाभिमान फार जाज्वल्य होता. स्वदेशीचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. स्वावलंबी विद्यार्थीदशेतदेखील ते आपल्या स्वार्जित वेतनापैकी काही अंश स्वदेशी धंद्यांना नित्य देत असत; पण या बाबतीतील त्यांची विचारप्रणाली ज्वलंत असली तरी ती अमुक एका पक्षाला कधीही चिकटून बसणारी नव्हती. तिचा कल मात्र ' गोखले संप्रदाया 'कडे म्हणजे ' प्रागतिक पक्षा 'कडे होता. मराठी बाणा, मराठी राज्य व मराठी भाषा यांसंबंधी त्यांना काय वाटत होते हे " भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा । मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा " या ओळींत स्पष्ट झाले आहे. मराठी भाषा व महाराष्ट्र यासंबंधी त्यांना काय वाटत होते, हे ' आमुची मायबोली ' (क. ३२), मराठ बाणा (क. ४६) व महाराष्ट्रगीत (क. ५३) यांमध्ये त्यांनी स्पष्ट केले आहे. जे जे मराठी त्याचा त्यांना अभिमान असला तरी त्यांची वृत्ती संकुचित नव्हती. त्यांचा देशाभिमान व मानवधर्म व्यापक होता. त्यांच्या आत्मविस्तारात सर्व देश व सर्व मानवजात होती. ' केमालपाशा 'ने स्वातंत्र्य मिळविले म्हणून त्यांनी ' नमोस्तुते जयोऽस्तुते ' या शब्दांनी त्याचे जयगीत गाइले; तर ' रासतफारी 'चे राज्य गेले म्हणून त्यांना दुःख होऊन त्यांनी ' पश्चिमेच्या मारुता 'स ही कविता लिहिली. देशा-साठी ज्यांनी काही केले वा न केले त्यासंबंधी लिहिताना त्यांनी ' कुणी काय बांधिले ' यामध्ये योग्य परामर्श घेतला आहे. तसेच आम्ही भिन्न-धर्मानुयायी असलो तरी मराठीच्या एका ताटात (संस्कृतीचे) भोजन करू व तिचे म्हणजे या ' ज्ञानदेवी 'चे पांग फेडू असे त्यांनी प्रकटपणे

सांगितले आहे. मराठीला जगातील भाषा खंडणी देतील अशी त्यांची भविष्यवाणी आहे. मराठ्याने अल्पसंतुष्ट न राहता थोर आवाका ठेवला पाहिजे, अशी त्यांची सांगी आहे. त्यांचा मराठा 'दास-दीक्षा' स्वीकारीत नाही. तो 'कुळ प्रेमाहून थोर। देश कुळाहुनी थोर। धर्म देशाहुनी थोर' असे सांगतो.

प्रथमतः प्रागतिक पक्षाकडे झुकलेला माधवरावांच्या मनाचा काटा पुढे महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाकडे वळला, व त्यांनी जिकडे तिकडे खोटे देशभक्त पसरले व स्वार्थ बोकाळला तर, 'महात्मा काय करिल एकला' अशी घोषणा केली व भोंदू देशभक्तांचा त्यांनी अधिक्षेप केला. महात्माजींच्या तत्त्वज्ञानाने व पराक्रमाने त्यांचे मन वेधले; पण पुढे पुढे तोच काटा त्यापासून परावृत्त होऊन दुसऱ्या दिशेकडे झुकू लागला. ही दिशा विचित्र होती. त्यांना कदाचित धर्मातीत राज्य आवडले असते; पण त्यात मराठबाणा पाहिजे असे त्यांनी म्हटले असते. त्यांना सामाजिक व धार्मिक क्रान्ती हवी होती; समता हवी होती; न्याय हवा होता. पण त्यात मराठ्यांचे मराठपण ठायी ठायी ठिचून भरलेले हवे होते. त्यांना लोकशाही हवी होती, पण तीत दुसऱ्यासाठी प्राणही धोक्यात घालणारा 'खरा शूर' (क. ४७) हवा होता. 'अनामक वीराची समाधि' पाहून त्यांचे मन तडफडत असे. 'नागपंचमी'-सारखे सण वा 'लेझीम'सारखे खेळ यांबद्दल त्यांना आपुल्की वाटत असे; आणि 'प्रभाकर सुळे' यांच्यासारख्या शूर तरुणाने दरोडेखोरांना वेताच्या छडीने चोपून पिटाळून लावले व एका स्त्रीचा प्राण वाचविला– हे कळले की त्यांची 'पुरुषाची छाती' मराठी बाण्याच्या अभिमानाने फुगून येत असे. पुढे पुढे त्यांचे विचार मुसलमानी संस्कृतीचा प्रतिकार करण्याच्या वळणावर गेले असावेत असा तर्क आहे. कारण त्यांनी 'इस्लामाचें धोरण व संस्कृती काय आहे' ते लक्षात घ्या, असा इशारा 'इन्शाल्ला' (क. ४५) कवितेत देऊन तीत मराठबाण्याने स्वत्वरक्षणासाठी काय केले पाहिजे हे पर्यायाने सुचविले आहे. परंतु हा मनाचा लंबक जरी एका टोकाहून दुसऱ्या टोकाकडे गेला, तरी त्यात संकुचितपणा खास नव्हता. कदाचित माधवरावांच्या व्यापक सहानु-

भूतीमुळे व देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे तो धर्मातीत राज्याच्या व समतेच्या बिंदूवर स्थिर झाला असता. पण हे तर्कच आहेत. कसेही असले तरी त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीत जिवंतपणा, रसरशीतपणा व सत्याची आवड हे गुण खास होते यात संशय नाही.

माधवरावांची समाजसुधारणेची आवड व त्यासंबंधीची पोटतिडिक महशूर आहे. 'स्वप्न-रञ्जना'त प्रत्यक्ष समाजसुधारणेसंबंधी अशा तीनच कविता आहेत, पण त्या तिन्ही उत्तम आहेत. त्या म्हणजे 'कञ्चनी' (क. ३९), 'पापाची चलती' (क. ८८), व 'भ्रष्टा' (क. ९८) या होत. बाकीच्यांपैकी कित्येक कवितांत आनुषंगिक रीतीने उल्लेख आले आहेत. या तीन कवितांपैकी 'कञ्चनी' व 'भ्रष्टा' या सहानुभूतीच्या व्यापकतेमुळे व सखोलतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण उतरल्या आहेत. 'कञ्चनी'तील जे शेवटचे कडवे त्यांनी गाळले (टीप पाहा) त्यावरून या विषयाचे महत्त्व कळेल. या कवितेत त्यांनी भावनोत्कट भाषेत नर्तिकेच्या गुणांचे सुंदर वर्णन करून समाजाच्या एका सडलेल्या भागातील हृदयस्पर्शी दुःखावर बोट ठेवले आहे. दुसऱ्या दोन कविता म्हणजे पापी वृत्तीच्या माणसाचे शब्दचित्र आहे; पण एका ठिकाणी ('पापाची चलती') पापाचा अधिक्षेप व दुसऱ्या ठिकाणी चुकून पाप झाल्यामुळे 'सहानुभूती' पण पापाला जबाबदार असणाऱ्या भीरू पुरुषाचा अधिक्षेप अशी स्थिती आहे. 'भ्रष्टे'चे चित्र रेखाटताना माधवरावांनी आपल्याकडे म्हणजे समाजातील पुरुषवर्गाकडे जो दोष घेतला आहे तो त्यांची स्त्रियांविषयीची सहानुभूती दर्शविणारा आहेच, पण कलात्मकही आहे. पण माधवरावांचा कट्टर सुधारकपणा 'स्वप्न-रञ्जना'त तितकासा आढळून येत नाही. ती चित्रे आपणास 'विरहतरङ्ग', 'सुधारक' व 'तुटलेले दुवे' यांमध्येच दिसून येतात. या समाजसुधारणेत मिश्रविवाह, परित्यक्तेचा प्रश्न, पतिता, वेश्याकन्येचे जीवन, वगैरे अनेक प्रमुख प्रश्न व त्यांची अंगोपांगे यांचे चित्रण आले आहे. माधवरावांना स्त्रीजातीसंबंधी विलक्षण जिव्हाळा वाटत होता; आणि म्हणून आई, पत्नी व कन्या या तिन्ही भूमिकांवरून त्यांनी त्यांची चित्रे रेखाटून आपल्या मनातील ध्येयसृष्टीला वाट करून दिली

आहे. या दृष्टीने त्यांच्या माता, कुमारिका, विधवा, पतिता व परित्यक्ता आदर्श असून स्त्रीसृष्टीला उन्नत करणाऱ्या आहेत. माधवरावांचा उदारमतवाद व अन्यायाबद्दलचा सात्विक संताप पाहावयाचा असल्यास तो याच सृष्टीत दृष्टीस पडतो. त्यांचे नायक हे जसे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गाभे आहेत तशाच त्यांच्या नायिका या आदर्श सृष्टीतील मनोमय देवता आहेत.

स्त्रीभावनेशी अत्यंत सुसंगत व संवादी असलेला माधवरावांचा सौंदर्यवाद तितकाच आकर्षक आहे. त्यांच्या सौंदर्यवादात परंपरेची मळलेली वाट नाही. प्रत्येक वेळीं जेव्हा त्यांना सौंदर्यदर्शन घडले तेव्हा त्याच्या अभिव्यक्तीसाठी भाषा, वृत्त, रचनापद्धती व कल्पना याबाबत त्यांनी नवीन मार्ग शोधून काढले. ‘ सङ्गमोत्सुक डोह, तेथे चल राणी, कञ्चनी, अभिसारिका, सर्वस्वाचा यज्ञयाग ’ व गज्जल–सुनीते यांतून त्याचे उत्कृष्ट दर्शन घडते. ‘ सर्वस्वाचा यज्ञयाग ’ या सुंदर कवितेत म्हटल्याप्रमाणे खरोखरीच माधवराव “ स्वैरालापी, प्रेमपरायण, पुष्पविलासी व कविताचारण होते.” पहिल्या विशेषणात त्यांचा बाणा, दुसऱ्यात त्यांना आवडणारी दिव्य भावना, तिसऱ्यात त्यांची काव्यात्मवृत्ती, व चवथ्यात त्यांची काव्याची आवड व त्यांच्या अभिव्यक्तीचे साधन यांचे वर्णन अभिप्रेत आहे. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे ‘ जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे ’ ही त्यांची वृत्ती होती व मग साहजिकच त्यांच्या मनात ‘ गाणें जागें होई ’. श्री. भास्करराव ताम्वे मधूनमधून त्यांना प्रेरक शब्दांनी म्हणत, “ माधवराव, ध्येयवादी व्हा बुवा ! ” याचाही परिणाम त्यांचा जात्याच ध्येयवादी व सौंदर्यजीवी मनाला पोषक असा झाला, आणि त्यातूनच त्यांची सौंदर्यसृष्टी जन्मास आली. या सृष्टीत ध्येयवाद आहे, नवीन वाट आहे, काव्यात्मवृत्ती आहे, अद्‌भुताची भुलावण आहे, रमणीय स्त्री-पुरुषजीवन आहे, नवीन कल्पना आहेत, नवीन वृत्ते आहेत, व नवीन भाषाप्रयोग आहेत. सारांश, नवीन जीवनाला लागणारे साहित्य तीत भरपूर आहे; म्हणूनच माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे व काव्याचे रसिकांना जबरदस्त आकर्षण वाटेल. आपल्या सौंदर्यदर्शी ध्येयासंबंधी लिहिताना ‘ मेलों तरी मेलों ’

( क. ७४ ) या अभंगामध्ये ते म्हणतात— " मेलों तरी मेलों मरण न चुके । मन माझें भुके ध्येयासाठीं । " आणि यातूनही काहीच निष्पन्न झाले नाही तर निदान " ध्येया, तुझ्यापायीं देह पडो " अशी त्यांची मागणी आहे. ' चांदण्यांतील हुरहुरी 'त त्यांना ' आपले ध्येय जवळ आले व हवेवर तरंगत तरंगत दूर गेले ' असे वाटते; ' अभिसारिके 'त तिळा ' पुढे रम्यायति ओढतांना ' त्यांना दिसते, व ' सर्वस्वाचा यज्ञयाग ' यामध्ये ' ध्येय जवळ तो बघे चरफडे ' अशी त्यांची अवस्था होते. " कोकिळाची आळवणी । याया हवी ती लागणी । " ते जे असे म्हणतात ती या ध्येयासाठी लागलेली आर्त लागणी होती; म्हणूनच त्यांची ही ध्येय-सृष्टी म्हणजेच एक सुंदर स्वप्नभूमी असून तीतच त्यांच्या मनाचे स्वप्न-रञ्जन आहे.

कवितेच्या बैठकीस जी उदात्तता हवी असते ती त्यांच्या ठिकाणी सदैव वास करीत होती; आणि ती त्यांच्या मनाची आध्यात्मिकता दर्शविणारी आहे. माधवरावांचे मन जसे अलौकिक सौंदर्याने वेडे होत असे तसे ते भावभक्तीने व्याकुळ होऊन जात असे. ते भक्त होते; पण अंधःश्रद्ध नव्हते. आध्यात्मिकता हा त्यांचा आन्तरिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होता. त्यांचे अभंग हे संख्येने जरी अल्प असले तरी गुणांनी बहुमोल आहेत. त्यांच्या या जीवनाची आर्त प्रत्यंतरे ' पोरक्या पोराचा धावा ' ( क. २८ ), ' पोचवणूक ' ( क. ५२ ), ' मेलों तरी मेलों ( क. ७४ ), ' प्रार्थना ' ( क. ८३ ), व ' माझा व्याकुळता जीव ' ( क. ८४ ) यांमध्ये दिसून येतात. ' मधुलहरीं 'तील ' फटकळ अभङ्गां 'त थोडा स्पष्टवक्तेपणा असला तरी विठ्ठलाचे रूप जनतेत कसे पाहावे यासंबंधीची त्यांची कल्पना भव्योदात्त आहे. त्यांच्या अंतर्मुखतेमुळे त्यांना जे वेळोवेळी चिंतन–मनन घडले त्याचे निर्मळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगांत पडले. अर्थात हे म्हणताना माधव-रावांना मला संत बनवायचे नाही; तसे ते नव्हतेही, व त्यांना असे म्हटलेले आवडलेही नसते. परंतु " वाटे तुझ्यावीण मज नाहीं बळ । अंतरीं विव्हळ सदैव मी । " ही त्यांची आतली तळमळ खास होती.

भाषान्तर करणे हा माधवरावांच्या प्रतिभेचा आणखी एक विशेष आहे. मराठी वाङ्मय समृद्ध व्हावयाचे असल्यास जगातील इतर वाङ्मयातील उत्कृष्ट विचार आपल्या भाषेत आणून सोडले पाहिजेत, असा त्यांचा दृढ विश्वास होता. याच कल्पनेने त्यांनी मूळ फारसीवरून 'उमरखय्यामच्या रुबाया', फिट्झेरल्डच्या जुन्या इंग्रजी ग्रंथावरून 'द्राक्षकन्या', व नवीन आवृत्तीवरून 'मधुलहरी' ही भाषान्तरे केली. फारसी गज्जलांतील अनेक विचार व कल्पना त्यांनी मराठीत आणल्या व या पुस्तकात चार इंग्रजी कवितांची भाषान्तरे प्रसिद्ध केली. या संग्रहातील भाषान्तरे मूळ इंग्रजीशी ताडून पाहण्यासारखी आहेत. यापैकी शेवटची म्हणजे 'बघें प्रथम मी बालवयीं' (क. ११२) ही कविता वाचून दाखविताना ते अस्खलित इंग्रजीत 'लाइट'च्या कवितेतील एक एक श्लोक प्रथम म्हणत व लगेच आपले भाषान्तर म्हणून दाखवीत. त्या वेळचे ते त्यांचे ठसकेदार आघातपूर्ण इंग्रजी वाचन व त्यांच्या अनुरूप भाषान्तराचे लयदार वाचन अजून कानात घुमते आहे. वाचकांनी परिशिष्टातील मूळ इंग्रजी व हे मराठी तुलनेने पाहावे म्हणजे त्यांची भाषान्तर कौशल्यातील खरी लज्जत कळेल.

स्वप्न-रञ्जनात याखेरीज काही कविकाव्यविषयक व काही कलाविषयक कविता आहेत (क. ९२, ९५, १०० व क. ४२, ४९ व ५०), तशीच यात काही विडंबने व आत्मनिवेदनेही (क. ९१, १०१ व क. १०२, १०४ व १११) आहेत. टीपांतील भूमिकांवरून त्यांचे संदर्भ समजतील. 'विडंबन' किंवा उपरोध ही माधवरावांच्या मनोधर्मापैकी एक महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी त्यांनी 'सुधारक' व 'नकुलालङ्कार' ही दोन प्रदीर्घ काव्ये खर्ची घातली आहेत. तेव्हा त्यांचे खरे स्वरूप त्या काव्यांतच दिसेल. 'सेवाधर्म' व 'राजभक्ति' (क. १०२, १११) या कविता कोल्हापुरातील सेवावृत्तीचा उबग आल्यामुळेच त्यांनी लिहिल्या आहेत, एवढे लिहिले म्हणजे त्यांतील तथ्यांश ध्यानी येईल.

जीवनात जशी माधवरावांना बरीवाईट माणसे भेटली तसे साहित्यक्षेत्रातही त्यांना बरेवाईट टीकाकार भेटले. त्या सर्वांत पहिले मानाचे

स्थान मराठीचे टीकापंडित कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांनाच आहे. ते व 'रविकिरणमंडळा'चे सदस्य यांत दोन पिढ्यांचे अंतर होते. त्यामुळे दोघांच्या मतांत काय फरक झाला तेवढाच. एरवी त्यांची विरोधी पण गुणग्राहक व सडेतोड पण वात्सल्यपूर्ण टीका मंडळाने शिरोधार्य मानली. श्री. भिडे यांची मते मंडळाला कधीच पटली नाहीत व दृष्टिकोणही पटला नाही; पण त्यांची टीका करण्याची मर्मग्राही पद्धती मंडळाला फार आवडली. त्यांनी माधवरावांवर टीका करून मंडळाला मार्गदर्शन केले. मंडळाच्या काही पुस्तकांवर त्यांनी एकूण आठ लेख लिहिले. त्यांपैकी निम्म्याअधिक लेखांत 'माधवराव' हे त्यांचे लक्ष्य आहे. त्यांचा वेध त्यांनी परोपरींनी घेऊन त्यावर आपल्या वाग्बाणांचा वर्षाव केला. पुढे एकदा मंडळाचे सदस्य व ते यांची मुंबईस श्री. विरकुड यांच्या 'महाराष्ट्र साहित्य' कचेरीत खाजगी बैठक होऊन चांगलाच वादविवाद झाला. साडेतीन तास रंगलेल्या या बैठकीत त्यांनी मंडळाविषयी एकही वेडावाकडा शब्द उच्चारला नाही. उलट मंडळाचा वात्सल्यपूर्ण गौरव करून आपण सनातनी मताचे आहो, ही त्यांनी प्रांजळपणे कबुली दिली; त्यानंतर लिहिलेल्या टीकेत सडेतोडपणा असला तरी मंडळावरील प्रेमाचे दर्शन घडे. त्यामुळे त्यांची टीका विरोधी असूनही कधी बोचक वाटली नाही. माधवरावांना तर श्री. भिडे हे एक आदर्श टीकाकार वाटत; आणि मंडळाने ठरविल्याप्रमाणे मंडळाचे एक पुस्तक त्यांच्या चरणी अर्पण करून आदर दाखविण्याचा योग आला नाही म्हणून त्यांना फार वाईट वाटे. यावरून माधवरावांची किंवा मंडळाची 'टीकाकार व टीका' यांसंबंधी बघण्याची दृष्टी काय होती ते लक्षात येईल. कै. भिडे यांचे मंडळाला विस्मरण होणे शक्य तर नाहीच, उलट सर्वांच्याच मनांत त्यांच्याविषयी कृतज्ञभावच आहे.

माधवरावांना भेटलेल्या टीकाकारांत अत्यंत क्षुद्र बुद्धीने लिहिलेली टीका म्हणजे डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांची 'स्वप्न-रञ्जन'वरील ('लोकशिक्षण', डिसेंबर १९२५) टीका होय. माधवरावांनी त्यांना कितीही 'कठोर परीक्षण' करण्यास सांगितले तरी 'अरसिकपणाचे प्रदर्शन

करा ' असे खास सांगितले नव्हते. परंतु डॉ. श्रीखंडे यांनी आपली सर्व विद्वत्ता दोषदर्शनाच्या कामास जुंपली व टीकाक्षेत्रात आपले हसे करून घेतले ! ' स्वप्न-रञ्जन ' हे माधवरावांच्या काव्यग्रंथांत अगदी अव्वल दर्जाचे पुस्तक आहे असे मलाही वाटत नाही; पण त्यात काही अव्वल दर्जाच्या कविता नाहीत असे मात्र मला मुळीच वाटत नाही. साक्षात ' संगमोत्सुक डोहा 'सारखी सर्वोत्कृष्ट व निर्दोष कविता पुढे असताना तिचेही गुणग्रहण करण्याऐवजी ' हंत ' या सुंदर संस्कृत शब्दाबद्दल ' मंथ 'सारखा इंग्रजी विदूषकी पाठ जिथे सुचविला गेला तिथे टीकाकाराचा दृष्टिकोण गुणग्रहणाचा होता की दोषसंशोधनाचा होता, हे स्पष्टच दिसते. पण अशा टीकांबद्दल वाईटही वाटून घेण्याचे कारण नाही; कारण अशा वेळी, ' टीका मरते पण काव्य जगते ' हे वाङ्मयातील सत्य अनुभवाने पटते. कित्येक वेळा असे मात्र वाटते की, डॉ. श्रीखंडे यांनी ' स्वप्न-रंजना 'तील ' वृत्तभंग व दोष ' यावर लिहिण्याऐवजी त्यातील ' शुद्धलेखन व विरामचिन्हे ' यांवर लिहिले असते, तर शुद्धलेखन-शास्त्रात एक मोलाची ( ? ) भर पडली असती ! या विषयावर अधिक भाष्य करणे नको. माधवरावांना याबाबत झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनार्थ त्यांच्या ' मधुलहरीं 'तील—

" मत्सरी मनुष्या, तूं कांहींही लिही,
हे व्यर्थ शब्द तव, कोण तयांना भिई;
वाटते परि मला तुझीच ही काळजी--
गणितील रसिक तुज हीन शारदागुणें,
मत्सरक्लेश तरि तव होती का उणे ? " ( पा. ५३ )

या सुंदर कणिकेचा परत अहेर करून हे पवित्र मित्रकार्य संपवितो.

माधवरावांची भाषा खडबडीत आहे. पण त्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोणच वेगळा होता. भाषेचे लालित्य त्यांना माहीत नव्हते असे नाही. ते त्यांना पूर्ण अवगत होते हे त्यांच्या ' विरहतरङ्ग ' व ' गज्जलाञ्जलि ' या नितान्तसुंदर काव्यांवरून स्पष्ट दिसून येते. परंतु स्वभावतः त्यांच्या मनोधर्मांत भाषेतील गोलाईबद्दल इतकी पोटतिडिक नव्हती; आणि

शिवाय मनामध्ये ठिचून भरलेले विचार भाषेत मांडताना त्यांचे सर्व लक्ष ती अर्थवती करण्याकडे लागलेले असे. त्यांच्या मनात भावना उचंबळली की ती समर्पक शब्दाचे साधन वा वाहन हुडकीत असे. ते सापडले नाही की ती नवीन शब्द बनवी व आपला कार्यभाग झाला की नाही ते पाही. त्या वेळी तिचे लक्ष लालित्य, नादमाधुर्य यांकडे नसे. सहजासहजी गोड शब्द आला तर ठीकच, नाही तर ती 'ताशीव, रम्यायटी, डाकघर' यांसारख्या शब्दांनी निर्वाह करी. मात्र मनातील अर्थ व्यक्त झाला नाही असा शब्द ते सहसा वापरीत नसत. प्रतिभावंत कवीचे हे वागर्थलक्षण लक्षात घेण्यासारखे आहे. केशवसुतांनी हेच केले म्हणून त्यांचीही भाषा थोडी खडबडीत राहिली. त्यांची भाषा म्हणजे खडकाळीतून खळखळत वाहणाऱ्या ओहळासारखी आहे.

सर्वांचे आवडते व प्रिय सुहृद माधवराव अनेकांच्या जिवाला चटका लावून गेले. त्याला बोलता बोलता दहा वर्षे लोटली! आता लीलाबाईही गेल्या!! त्यांच्यामागे चिरंजीव दिनू व सुधा यांना पोरकेपण आले! त्यांचे प्रेमाने संगोपन करणारे आजोबा व आजी– म्हणजे श्री. बाबासाहेब गरुड व सौ. माई डोळयांच्या पाण्याने दिवस ढकलीत आहेत हे पाहिले की पोटात कालवू लागते! अत्यंत विषम परिस्थितीत माधवरावांना त्यांनी मोठ्या धैर्याने आपली कन्या देऊन त्यांचे जीवन सुखी केले, व त्यांना पुण्यात एक मायेचे घर निर्माण करून दिले. माधवरावांच्या वैवाहिक जीवनाविषयी कुणी काहीही म्हटले तरी ते अत्यंत सुखाचे जीवन होते, याची साक्ष श्री. बाबासाहेब व सौ. माई यांना पटली होती. आज त्यांना समाधानाची जागा म्हणजे चिरंजीव दिनू, सुधा, व माधवरावांचे ग्रंथ हीच होय. त्यांचा वाढता उत्कर्ष व कीर्ती पाहून त्यांना खात्रीने समाधान होईल.

माधवरावांनी हे पुस्तक आपल्या जन्मस्थानातील म्हणजे 'बडोदे शहरातील संस्मरणीय व्यक्तींना व घटनांना' अर्पण केले आहे. या 'व्यक्ती व घटना' यांची ओळख करून देण्याचे हे स्थळ नव्हे. पण त्यांना माधवरावांची उज्ज्वल व निर्मळ कीर्ती पाहून आता तरी खात्रीने समाधान वाटेल.

आज ' ३१ डिसेंबर ! ' हा दिवस मला माधवरावांची तीव्रतेने आठवण करून देतो. दरसाल या दिवशी रात्री एकत्र येऊन मध्यरात्रीच्या सुमारास वर्ष पालटताना कॉफी-पान करावयाचे असा आमचा नित्यक्रम होता. हा क्रम १२ वर्षे अखंड चालला. पुढे आम्ही दूरावलो;–आणि आता कायमचेच दूरावलो ! अशा वेळी मला त्यांच्या ' मधुलहरी 'तील खालील रुबाया आठवतात--

" हा चंद्र नवोदित ये तुज मज भेटाया,
लागेल कितिकदा वृद्धिक्षय शशिला या,
यापुढे कितिकदा उगवुन या उद्यानीं
हुडकील आपणां--**पण एकाला वाया !**
( जइं रसिक खगगणीं शशिसुंदर मधुराणी !
येऊन शाद्वलांबरीं गौर पायांनीं, )
निज मधुक्रमीं तू बघशिल मत्स्थल शून्य
**तइं तर्पणार्थ कर चषक रिता त्या स्थानीं !** "

आणि मग मी विमनस्कतेने हा स्मृतीचा चषक त्या शून्य स्थली तर्पणार्थ ओतून रिकामा करतो !

३१ डिसेंबर १९४९
विश्रामबाग, सांगली

**शङ्कर केशव कानेटकर**
( गिरीश )

# अ नु क्र म णि का


| अनुक्रम | | पृष्ठ |
|---|---|---|
| | माधवरावांची स्वप्नभूमी | पाच |
| १ | मुरली | १ |
| २ | पतङ्गाची आशा | ४ |
| ३ | चिमुकली शान्ता | ५ |
| ४ | आत्म-निवेदन | ६ |
| ५ | निसर्ग आणि मी | ७ |
| ६ | श्यामा-रजनी | ८ |
| ७ | स्वप्नयोग | १० |
| ८ | मुलाचा प्रश्न | ११ |
| ९ | प्रेमाची परीक्षा नको | १४ |
| १० | स्वप्नांतील स्वप्न | १५ |
| ११ | निशिगंधाचीं फुलें | १७ |
| १२ | प्रेम कशावर ? | १८ |
| १३ | कुमारी पिरोजा | १९ |
| १४ | वाग्यत मोहिनी | २२ |
| १५ | निराशेंतील समाधान | २५ |
| १६ | चुकामूक | २७ |
| १७ | गोड शेवट | २९ |
| १८ | माझी अिन्दुबाला | ३१ |
| १९ | मधु-मोहनी | ३२ |
| २० | कुणी काय बान्धिलें | ३७ |
| २१ | असो स्थिर तुझा हक्संदेश | ३९ |
| २२ | भितों मी तुझ्या चुम्बनातें | ४२ |
| २३ | दिसण्यांत सुंदर ती नसे | ४२ |

२४ अज्ञाअी ४३
२५ तो क्षण ४७
२६ एक घाव ४८
२७ कौमार्यस्मित ४९
२८ पोरक्या पोराचा धावा ५०
२९ हास बालिके ! ५३
३० महात्मा काय करिल अेकला ! ५४
३१ खुळी लाजरी पोर ५७
३२ आमुची मायबोली ५८
३३ कवितेचें देणें ५९
३४ सवत ६१
३५ राजकन्येस जोहार ६२
३६ रागिणी विधवा ६३
३७ प्रेमळे, जाशिल का सोडून ७०
३८ चांदण्यांतील हुरहूर ७०
३९ कञ्चनी ७२
४० हाकाटी ७४
४१ माझी ताअी ७६
४२ रसिकास ७७
४३ सङ्गमोत्सुक डोह ७९
४४ माझें माहेर-सासर ८१
४५ अिन्शाल्ला ८२
४६ मराठबाणा ८४
४७ खरा शूर ८४
४८ अैकव तव मधुबोल ८६
४९ वृद्ध कवि ८७
५० कलारहस्य ८९
५१ वादळाची रीत ९०
५२ पोचवणूक ९१

| | | |
|---|---|---|
| ५३ | महाराष्ट्र गीत | ९२ |
| ५४ | पाहुं कुठें तुज राया ? | ९४ |
| ५५ | अजुनि किती छळतोस् | ९४ |
| ५६ | अभिसारिका | ९५ |
| ५७ | तूंच निर्वाणीचा सखा | ९६ |
| ५८ | भुकेलें हृदय | ९७ |
| ५९ | बुल्बुलास | ९७ |
| ६० | अनामक वीराची समाधि | ९८ |
| ६१ | अन्धारून आलें | ९९ |
| ६२ | चन्द्रिका आणि प्रिया | १०० |
| ६३ | केवढा अन्याय ! | १०१ |
| ६४ | फेराचें गाणें | १०२ |
| ६५ | तुझ्यावाचून | १०३ |
| ६६ | कीर्ती आणि कान्ता | १०४ |
| ६७ | कशासाठी ? पोटासाठी ! | १०६ |
| ६८ | संवाद | १०७ |
| ६९ | भातुकलीचें गाणें | १०८ |
| ७० | माझी बाहुली | १०८ |
| ७१ | अक्काअी | १०९ |
| ७२ | आमचें घर | ११० |
| ७३ | आगगाडी | १११ |
| ७४ | मेलों तरी मेलों | ११३ |
| ७५ | माळ-वारा | ११४ |
| ७६ | अुठा रे ! | ११५ |
| ७७ | नवीन भाअू | ११६ |
| ७८ | देवळांत जाअूं | ११८ |
| ७९ | बाप्पा मोरया ! | ११८ |
| ८० | काअू काअू गे ! | ११९ |
| ८१ | स्वप्नांची माळा ! | ११९ |

| | | |
|---|---|---|
| ८२ | लेजीम | १२० |
| ८३ | प्रार्थना | १२२ |
| ८४ | माझा व्याकुळता जीव | १२३ |
| ८५ | सृष्टीचें ध्यान | १२४ |
| ८६ | मुलांचा साङ्गाती | १२६ |
| ८७ | सर्वस्वाचा यज्ञयाग | १२७ |
| ८८ | पापाची चल्ती | १२८ |
| ८९ | नावेंतील गाणें | १२९ |
| ९० | काय अवेळीं साद ! | १३० |
| ९१ | वृद्ध भटजी | १३१ |
| ९२ | सर्वां खल्विदं माया ! | १३३ |
| ९३ | मधुसुन्दरीस | १३४ |
| ९४ | श्रान्त पान्थास | १३५ |
| ९५ | कवि भास्करास | १३६ |
| ९६ | पुरुषाची छाती | १३७ |
| ९७ | जा स्वतन्त्रतेची मौज चाख ! | १४० |
| ९८ | भ्रष्टा | १४० |
| ९९ | दग्धपक्ष पतङ्ग | १४२ |
| १०० | बरा सुटला बिचारा ! | १४३ |
| १०१ | आत्मप्रतीति | १४५ |
| १०२ | सेवा–धर्म | १४६ |
| १०३ | निर्झरास | १४८ |
| १०४ | अेक कणिका | १४९ |
| १०५ | पापशङ्की | १४९ |
| १०६ | हरिताम्बरा | १५० |
| १०७ | चल अुडुनि पाखरा ! | १५१ |
| १०८ | चन्द्राराणी | १५१ |
| १०९ | गोड बाल्य | १५३ |
| ११० | डोळा बाअी, डोळा ! | १५४ |

| | | |
|---|---|---|
| १११ | राजभक्ति | १५५ |
| ११२ | बघें प्रथम मी बालवयीं | १५६ |
| ११३ | सुप्रभात | १५७ |
| | कठिण शब्दांचे अर्थ | १६० |
| | टीपा | १६१ |
| | परिशिष्ट-१ | २२० |
| | परिशिष्ट-२ | २२३ |
| | प्रथम चरणांची सूची | २२४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १९८२९

# स्वप्न-रंजन

---

## १ मुरली

[ जाति अक्रूर ]

श्रीकृष्णा रे, आस न दुसरी उरली,
ये घुमव मधुर तव मुरली. ध्रु०
क्षण दीपवुनी होशी दृष्टीआड
अन् वरिशि मूकता द्वाड.
स्वरसङ्गम तो, तगमगतो हा जीव,
वाजीव गडे वाजीव !
ये वरस पुन्हा तो रम्याद्भुत राग,
ये फुलव झुलव दिल्बाग.
हृदयाच्या सखयावीण
संसार सदाचा शीण !
दे जीवन हृद्य नवीन,
किति वर्षांची हौस अजूनि न पुरली,
ये घुमव मधुर तव मुरली. १

सौभाग्य कुठे विधिसम्मित अनयाचें,
अन् स्फुरण कुठे प्रणयाचें ?
हें हक्काचें चुम्बन काल्यावाणी
बधिरता अन्तरीं आणी.
मज तूच हवा सौन्दर्याचा कन्द !
तुजवरच जडे स्वच्छन्द.

ही मिणमिणणारी ज्योत
क्षण फुलव, सोड तव झोत !
– कुणि सुखें नित्य धुमसोत !

ही वेडी त्या निर्वाणास्तव झुरली,
ये घुमव मधुर तव मुरली. २

कुणि म्हणती की "ही लोकांतुनि अुठली,
ववचाल चाल ही कुठली ?
ते रङ्ग कुठे कौमारस्वप्नाचे ?
ते ढङ्ग स्वैरपणाचे !"
पण या हृदयीं प्रेम झऱ्यापरि वाहे,
पाटाचें पाणी का हें ?

तू कुमार, मी न कुमारी !
परि हृदय हाक तुज मारी,
वैषम्य दुरीच झुगारी.

मज तू दिसतां अुणीव कळली, स्फुरली—
ये घुमव मधुर तव मुरली. ३

अन् त्या समयीं पडदा अपुल्यामधला
क्षणभरच खालती पडला.

तव रूपाचें स्वप्नहि पडलें नव्हतें,
पण वेडच जडलें तंव तें.
मज या लोकीं तूच एक अभिराम,
तुजमधेच कामविराम.

  कां मारा हृदय अुपाशी
  परलोककल्पनापाशीं ?
  या हिमकण कां मधुपाशी ?

हीं भोक्तृत्वें तुझ्याचसाठी उरलीं –
ये घुमव मधुर तव मुरली. ४

मज देव नको, माझा तू अधिदेव;
दे जुळ्या जिवाची खेंव.
ज्या मित्राच्या भवती हे ग्रहगोल
नाचती सावरुनि तोल,
अन् अवकाशीं अेकच घुमुनी नाद
अुमटवी मनीं पडसाद,

  रङ्गूनि विश्व रासांत
  जडतेवर होअी मात,
  तो तूच चहुकडे नाथ !

दे शान्ति मला रासभ्रमणीं मुरली,
ये घुमव मधुर तव मुरली. ५

तू पूर्वयुगीं मुरलीच्याच सुराने
भारिलीं खिलारें, रानें.
त्या नादाने साध्या भोळ्या गोपी
हरि-हृदयीं गेल्या झोपीं.

मज अैकव तो, कुठवर राहूं जागी
संशयत्रस्त हतभागी ?
हें अन्तर डहुळे शोकें,
झोक्यावर बसती झोके;
नाडीचे वाढति ठोके —
ये हृद्दैया, वेडी बघ आतुरली
ये घुमव मधुर तव मुरली. ६

प्रथम लेखन ऑगस्ट १९११ ]

## २ पतङ्गाची आशा

[ सुनीत, वृत्त हरिणी ]

हृदय मम हें कोणीं नाही अजूनिहि जाणिलें,
भटकत कुणाच्या छन्दें मी असा भ्रमतों पिसा —
सकल बघती आहे माझा किती भरला खिसा,
कुणिहि न बघे हृद्रत्नाचें अुपायन आणिलें.
चतुर दयिते, तूतेंही हें नये कधि पाहतां —
कृश मम तनू, ओले डोळे, विशीर्ण दशा पहा;
सहन करितों कोणासाठी अलौकिक ताप हा ?
वळ, बघ जरा मी प्रेमाने तुझा छळ साहतां.
मधुर रुचिरे, अन्धारीं या प्रकाश तुझा हवा,
मग बघ पतङ्गाची क्रीडा — नको पण आस ती !
विफलच मनोराज्यें सारीं अिथे नित भासतीं,
मज न रुचते शिष्टाचारी स्मितांतिल वाहवा.

सरस रमणीयार्थांचें गे सुवर्ण अकिञ्चन
कवि पिकवितो होतां रामादृगमृतसिञ्चन.

ता. २१ जानेवारी १९१२ ]

## ३ चिमुकली शान्ता

[ जाति अञ्जनी ]

सोड अकालिक लाज सोनुले, सोड अकालिक लाज् ध्रु०
हृदयकवाडें झालीं उघडीं,
हाक मारिते प्रीति हरघडी,
खेळ हिशी चल झिम्मा-फुगडी;
खेळ-वय तुझें, खुल्या अङ्गणीं नाच, खिद‌ळ तू आज्. १
केस मोकळे- छे, घन काळे
बालरवीवर टाकिति जाळें,
मागे सारित ते लडिवाळे,
उजळ दश दिशा दृष्टि फेकुनी बेडर कुर्रेबाज्. २
नेत्र न, शाळिग्राम साजिरे
हिमस्नात किति निर्मळ गहिरे !
कटाक्ष नच, हे तर शुचिरुचिरे,
द्रवबिन्दुच, मोदाश्रु अुषेचे रम्य तरल अव्याज्. ३
रानझरा लहरी झुळझुळतो,
विजनाशीं तो कलरव जुळतो,
बोल तसा तव या हृदिं खुलतो,
चोरुं नको, गा ! तुझा कोवळा लाडिक हा आवाज्. ४

असती बहुविध पक्षी रानीं,
गाती, अुडती नभोवितानीं,
त्या सर्वांची परि तू राणी !
प्रसाद तव हा सहज विहङ्गम भावांचा अधिराज्. ५
स्वभाव लहरी तव आनन्दी
जणू वसन्तश्वास सुगन्धी,
करी बागडुनि मजला बन्दी;
दावी साधा रुचिर चिरसुखी प्रेमळतेचा साज्. ६
अुद्बोधक ही प्रभातलाली
विहरे तुझिया फुगीर गालीं,
गुलाब जणु हा बघुनि अकालीं,
पाण्डुर होअी यमुनाकाठीं शिल्पगुच्छ तो ताज्. ७
घेरी जंव मज ढगाळ रजनी
तंव तू हो मम अढळ चान्दणी,
स्मित अुद्धारक तुझिया वदनीं
न्याहाळित हें तडीस लागो माझें जीर्ण जहाज्. ८
प्रथम लेखन ता. २ फेब्रुवारी १९१३ ]

## ४ आत्म-निवेदन

[ जाति साकी ]

सखे, बरें जर नसती झाली ओळख अपुली दाट,
नसती भरली मग काट्यांनी संसाराची वाट,

प्रेम तुझ्यावरचें हें माझें मधुरच नित्य रहातें,
अजुनिहि आहे, परन्तु झालें कटुतम सत्वर हा! तें,
दूर राहुनी नकळत तुजला तुझीच करितां सेवा
भाग्याचा तो कुणिहि निघेना? मला न शिवता हेवा.
मला कल्पनास्वर्गांतिल तू तिलोत्तमा गमतीस,
कधी न शिवती हीन भावना पार्थिव दुर्दम जीस.
स्मित आधी, मग खुलें बोलणें, नन्तर तें हितगूज,
मागुनि आठी, तुटक बोलणें, मौन रुचे नित तूज.
आण घेतली तू, मीं केलें अभिनन्दन कवनांही;
आज साङ्गशी "कीव वाटली, प्रीति कधी लव नाही."
भलें जाहलें आत्मनिवेदन! – दिव्यच मम भक्तीचें!
कशास घालूं ओझें तुजवर नवीन विज्ञप्तीचें?
प्रीतिपरीक्षा नको, कीव तव नको, नको भिक्षाही!
प्रेमापायी पुरे मिळाली जन्मठेप शिक्षा ही.
जीवित म्हणजे स्वप्न मनोहर, विलसित विश्वासाचें!
नको प्रबोधन असलें नीरस सन्तत निःश्वासाचें!

ता. ११ मे १९१३ ]

## ५ निसर्ग आणि मी

[ सुनीत, वृत्त पृथ्वी ]

निशा दश दिशांत या भरुनि शान्तता राहिली,
भरे शिशिर अन्तरीं, ढग न अम्बरीं, कम्बल.
न वायुहि फिरूं शके, स्थिति अशी न मी पाहिली,
निशेस बिलगूनि हें जग निजे, पडे निश्चल.

निसर्गहृदयक्रिया जणु गमे पडे बन्द ती,
        असे अमर तो परी, परम योग-निद्राच ही !
मनुष्यहृदयें किती अशिं सुखामधे स्पन्दती ?
        नकोच दुरि जावया, मजसि जागवी आच ही.
प्रिया कधि धरील हें शिर उरावरी दाबुनी,
        म्हणेल मज, रे नको विरहभीति ती दारुण ?
कितीक दमलास तू फिरुनि येउनी लाम्बुनी !
        जरा पड, नसे दुरी मधुर मङ्गलाशारुण.
निसर्ग, तुजला नसे मम सहानुभूती मनीं,
अशान्त विरहार्त मी, सुखित शान्त तू मीलनीं.

सप्टेम्बर १९१३ ]

## ६ श्यामा – रजनी

[ वृत्त वियोगिनी ]

सखये, रजनी तुझ्यापरी
        दिसते श्यामल आणि सुन्दर;
किति ही सुखशान्त रागिणी !
        परि तू – हाय कितीक अन्तर ! १

करिती गगनांत तारका
        नयनांचा तव मूक मत्सर;
दुरुनी मज या खुणाविती,
        परि कोडेंच तुझ्या मुखावर. २

मिणमीण करी दुरी दिवा,
मज तो फक्त दिशाच दाखवी,
न अुजेड कुठे पडे पथीं,
भवती किर्र करी घनाटवी. ३

निजलीं तरुकोटरांमधें
अथवा चञ्चल डाहळीवरी,
अपुल्या घरट्यांत पाखरें –
मज अेकासच जाग ही वरी. ४

विसरूनि दिनास लोटल्या
गवती टोळ अिथेच झोपतो,
अितका जरि नीच हा किडा,
मजहूनीहि सुखी निकोप तो. ५

निजली असशील तू प्रिये,
मृदु शय्येवर आपुल्या गृहीं,
कुठलें तुज शीत त्या स्थलीं ?
कुठली गे मनिं काळजी, दुही ? ६

परि मी फिरतों भिरीभिरी,
मज दे सङ्गत रात्रिकीटक;
फुलबाग दुरी फुले, फुलो;
सलतो सन्तत येथ कण्टक. ७

ता. २० सप्टेम्बर १९१३ ]

## ७ स्वप्नयोग

[ जाति अुद्धव ]

झोपेंत कधी असतां मी
　　त्या शान्त तमोमय कालीं
प्रियदर्शन माझा येअी,
　　अुमटवी टवटवी गालीं.

माझिया टिपें नेत्रींचीं
　　घे टिपुनि अुष्ण ओठांनी,
दे अरुण शान्ति हृदयाला
　　वचनामृत ओतुनि कानीं.

जणु अर्धोत्फुल्ल गुलाब
　　मृदु सरस ओठ ते गमती,
तो सुखस्पर्श होअी तों
　　जीवींच्या तृष्णा शमती.

झोपेंतुनि हलक्या हातीं
　　अुठवूनि धरी हृदयाशी
तों लागुनि जाय समाधी
　　त्या प्रेमळ करयुगपाशीं !

या जगीं न माझें कोणी
　　झोपेंत कोण मग येअी
अन् नित्य वियोगीं माझ्या
　　तें स्वप्नयोगसुख देअी ?

का ध्येय दूर गेलेलें
परत ये गाढ झोपेंत ?
मग राहिन अपुली आता
मी झोप सदाची घेत !

पण झोपहि गाढ न येअी
जरि मरतें कामाखालीं,
ये प्रभो, झाक हे डोळे,
गाडून टाक पाताळीं !

ऑक्टोबर १९१३ ]

## ८ मुलाचा प्रश्न

[ जाति अुद्धव ]

" बघ बाळ, चन्द्र वर येअी
रात्रिचा सोनुला खासा--"
तों " कुठून मी मग आअी ? "
बोलली बाल-जिज्ञासा.

. . .

अङ्गणीं लाडका खेळे
आअीचें बोट धरूनी,
दुडदुडा कोकरावाणी
बागडे मधूनि मधूनी;
पाहूनि मुखींचीं मोत्यें
हो चान्दण्यांस आनन्द,

बोबडे बोल लाडिक ते
झेलितो गन्धवह मन्द.
सौवर्ण चन्द्र ये गगनीं,
हो तेणें प्रमुदित रजनी,
परि खोचुनि शिशुच्या प्रश्नीं
घे माय अुचलुनी, चुम्बी
त्या बालरूप अुल्हासा. १

त्या ग्रीष्मसरित्कृश तनुला
शरपाण्डुर पातळ शोभे,
आजानु पदर जरकाठी
फेनवत् बघुनि विधु लोभे;
ती सैल गाठ केसाची
मानेवर गोऱ्या लोळे,
अनू विषण्ण वात्सल्याने.
येतात भरुनि ते डोळे.
त्या सुन्दर भव्य कपाळीं
नच सौभाग्याची लाली:--
अवकळा गृहीं जंव आली
त्या निशीं कुणी आंतुनि दे
हृदयाला मूक दिलासा. २

" साङ्ग ना, साङ्ग ना आओ ! "
जिज्ञासा आतुर झाली,
ती पोरमाय गोन्धळली,
जाहला जीव वरखाली.

कापशी ढगीं विधु धावे
त्याकडे दृष्टि वर जाअी,
तों बाळ अधीर म्हणे की
" का तेथुनि आलों आअी ?
चल बोलव त्याला पाहूं,
नाही तर आपण जाअूं,
चान्दण्यांशि खेळत राहूं ! "
तो वरच बघे, ही सोडी
थाम्बूनी लाम्ब अुसासा. ३

" चल बाळ जाअुं झोपाया,
निजण्याची झाली वेळ.
चान्दण्यांसङ्गती खेळूं
सारेच कधी तरि खेळ."
अैकूनि बाळ आणि जाअी
सोडूनि शान्त फुलबाग
माडीवर शयनमहालीं
आअीच्या मागोमाग.
तो पुढ्यांत बिलगुनि पडला,
झोपेंत तत्क्षणीं गढला;
मातृजीव बन्धीं अडला;
परि बसुनी स्वप्नविमानीं
ये जाअुनि आत्मनिवासा. ४

ता. ८ फेब्रुवारी १९१४ ]

# ९ प्रेमाची परीक्षा नको

[ वृत्त वियोगिनी ]

सखये, तुजपासुनी दुरी
असतों मी, परि हें न वावगें.
दुरुनी दिसतेस देवता,
जवळूनी दिसशील काय गे ? १

पुढती जरि वाळवण्ट हें,
तळपे अुग्र रवी शिरावरी,
परि दूर दिसे सरोवर,
पडछाया तरुंची अुरीं धरी. २

नयनास सुरम्य ही दिसे,
परि ही घात करी मरीचिका;
तुज भास म्हणूं ? चुकेन मी,
दिसशी सुन्दर पुण्य बालिका. ३

फुलवीत गुलाबगुच्छ हे
तव गालीं जणु हृद्वसन्त ये,
सुमनांतुनि या तुझ्या परी
वचनोद्गन्ध अतीव मन्द ये. ४

तुझिया नयनीं चकाकती
हिमबिन्दूच मनोज्ञ चारु की –
जणुशादतरङ्गिणीवरी
कवळें अून तशी छटा मुखीं ! ५

जळ खोल, ढगाळ अम्बर,
अुठवी चञ्चल वायु त्या जळीं
तनु वीचि तसाच भङ्गुर
तव हा केशकलाप काजळी. ६

तव भावुक, मन्द, मोजकें,
मधु, निष्पाप, सलज्ज भाषण —
भरल्या जणु मोहळांतुनी
मध खाली ठिबके क्षणक्षण. ७

हृदयांतिल माधुरी तुझ्या
बहिरङ्गावरुनी कळूनि ये,
दुरुनी सुख हो जरी अुणें
न परीक्षा बघणार मी प्रिये. ८

ता. ६ ऑगस्ट १९१४ ]

## १० स्वप्नांतील स्वप्न

[ जाति साकी ]

भलत्या वेळीं कोण वाजवुनि पाही टिचकी दारीं ?
चोर ? हृदयही नाही जवळी; का ये कुणि कैवारी ?
दार लोटुनी चन्द्राचा का प्रकाश हा मधि झुकला ?
पण ही छायामूर्ति कुणाची ?–“ वाट कुणि कडे चुकला ? ”

. . . .

प्रिये निष्ठुरे, हृदय अगोदर तू आशामय केलें,
आणिक नेलें ताट ओढुनी जंव तें प्रेमभुकेलें.
पुन्हा कल्पनाम्बरीं अुडवुनी कातरिले मम पङ्ख,
खाली पडतां, ‘ अधःपात हा ! ’ म्हणूनि केला डङ्ख.

गेली श्रद्धा पार ढासळुनि, पडे हृदय ओसाड,
वृत्ति काव्यमय निजली येअुनि तीस मूर्च्छना गाढ.
सकाळ गेली, दुपार गेली, गेली मागुनि सन्ध्या,
तिमिरजाल ही विणीत बैसे ढगाळ रजनी वन्ध्या.
आणि अचानक मध्यनिशा जों वाटे अुलटुनि गेली
तों शुद्धीसह त्रासभीति कां अुभ्या कराया केली?

. . . .

हृदयद्रावक किति ही चर्या! प्रेमोद्दीपक का ही!
प्रेम जाय परि गुदमरुनी हें किती विविध शङ्कांही!
दृष्टि हाय ही करूनि सोडी मम हृदयाचें पाणी,
स्मृति मागिल ती परन्तु पुनरपि तयास घनता आणी.
"पायधूळ ही दुर्मिळ अिकडे झडली कैशी आज?
कवण निकडिचें या दीनाचें पडे अेवढें काज?
आंत या बसा. क्षमा करा पण. भिकार घरटें माझें
श्रीमन्तीच्या मानित्वाला कसें बरें हें साजे?"

. . . .

असें नको गे पाहूं! माझ्या आंत काय कालवतें!
परी अचल मुख माझें काही तुज दाविल का लव तें?
नको पेटवूं पुन्हा, कृपा कर, ही प्रेमाची ज्वाला!
राख करी ही, थट्टा समजूं नकोस जीवित्वाला.

. . . .

"नका नका अभिमानी डोकें टेवूं पायावरती!
वादळ होतां प्रेमपुराच्या लाटा मग नावरती —
वेडे पोरी, वाफ जाहली तरि पाणी तें पाणी,
नीट पहा हिमशिलाहि पाणी! तू का दासी? राणी!

रोष निमाला, पूर्वीची ती गेली दुष्ट असूया,
नव नव जीवित ! पहाटतारा अुगवे, अूठ हसूं या ! ”

. . . .

हाय ! परी स्वर्गीय तरी तें होतें स्वप्नच सारें !
फसवुनि छळिशी असा नववयीं, दैवा दुष्ट कसा रे !
ता. २६ ऑक्टोबर १९१४ ]

## ११ निशिगन्धाचीं फुलें

[ जाति केशवकरणी ]

ज्या निशिगन्धीं जीव लोभती दोघांचे आपुले
सहज हीं देशी त्याचीं फुलें ध्रु०
लावितात या रौप्य कुटिलमुख सनया वायुस पिसें,
रागरव काढुनि सौरभ-मिषें.
जिवन्तपणिं मी समाधि घेअीं बन्द करुनि चहुकडे,
बुजवुनी हृदयाचेही तडे.
हेर तुझे पण कोठुनि शिरले न कळे त्यांनी परी
पाडिलें महाद्वार अन्तरीं.
आडवूं केवि मी ? विजयी तव लोचनें !
लक्ष्मीस यावया ‘ नको ’ कोण हो म्हणे ?
देअूळ भग्न हें तुझेंच गे शोभने !
पण तू येशी जाशी, आजहि अशाच लहरीमुळे
अर्पिशी प्रसाद म्हणुनी फुलें. १
मी कान्तारीं कण्टकशयनीं पडें अेकलेपणीं,
न लागे पापणीस पापणी.

संशयाभ्र येअूनि अकालीं शिशिराकाशावरी
लपवी सर्व अमरसुन्दरी.
वहूनि गेल्या भावतरूंच्या ढोलीमधुनी कुठे
मधूनिच पिङ्गलध्वनी अुठे.
तों मन्द गन्धवह ये, मग मधुदेवता,
नवयौवनरस पुनरपि वाहूं लागतां
सृष्टीस रङ्गवी अरुण राग हा अता —
हृत्स्वामिनि, तू अता न जाअीं, गृह हें कर आपुलें,
जंवर तू तंवरच मधु हा फुले ! २

ता. २१ जुलै १९१५ ]

## १२ प्रेम कशावर ?

[ वृत्त तोटक ]

मणिकाञ्चनयोग बरा म्हणुनी
प्रिय मी तुजला तर हें कथितें;
बहु लाभ तुला न मला वरुनी
खनि देख रुचेल तुझ्या मतिते.
तनु राजस, पाटल कान्ति मम
म्हणुनी जर मानसचुम्बक मी,
तर ती बघ बाग, तिच्यांत रम
मिळतील तिथे न गुलाब कमी.
हृदयांतिल रत्न अनर्घ्य परी
गुण देतिल तेज असे अितर —
जडलें तव यांवर चित्त तरी
प्रिय तूच सदा हृदयीं विहर.

ता. २९ सप्टेम्बर १९१५ ]

# १३ कुमारी पिरोजा

[ जाति पादाकुलक ]

सुशुभ्र पाठीवरुनी लोम्बे
  सैल तिपेडी वेणी धूसर,
लाल फितीच्या आगवळाची
  गाठ रुन्द किति चमके सुन्दर ! १

तलम मलमली तगरशुभ्र तो
  तङ्ग झगा आजानु तनूवर,
अुठाव अपुला त्यांतुनि दावी
  गोण्डस बान्धा प्रमाणसुन्दर. २

दिसे कसा सुकुमार अुन्च हा !
  हालचाल रमणीय पहा की--
पवनें लवुनिहि सरूतरू जणु
  अूर्ध्वसरलगति सन्तत राखी. ३

तुरळक तुरळक झग्यास झालर,
  ती साधेपण अधिकचि खुलवी;
श्रीमन्तीचें हें साधेपण
  सदभिरुचीला केवि न झुलवी ? ४

काळ्या जाळीच्या मोज्यांतुनि
  विलसति हिमसित जङ्घा सुन्दर,
येतां मौक्तिकधवल मत्स्य ते
  जसे गहनजलिं जवळ जवळ वर. ५

अुन्च निमुळत्या टाचेचे ते
  बूट घालुनी शाद्वल-भूवर

डौलाने किति फेऱ्या घेते,
गिरेबाज गुल्छबू कबूतर ! ६

फिरत गुणगुणे चाल विदेशी
नाचवील ती जिवास अैशी,
किती हळू की शान्तता दिसे,
कान देति तरु हे पुष्पमिषें. ७

गुलाब टवटवले अुद्यानीं
त्यांत विराजे ही फुलराणी,
जाय हळू फुलझाडाजवळी
फुलास हुङ्गी, चुम्बी, कवळी. ८

अहा परी हे निर्भय डोळे,
किति विश्वासी साधे भोळे !
दृग्शर येथे नसे प्राणहर,
विद्ध जरी हो मृदु रसिकान्तर. ९

तरतरीत ही अुन्नत नासा
आर्यत्वाची बोले भाषा,
मुखीं वागडे अल्लड आशा
अजुनि न ठाअुक जिला अुलासा. १०

लाजवीत अुत्फुल्ल सरोजां
फिरे प्रभातीं पहा पिरोजा,
या अर्धोन्नत वक्षीं ताजें
फूल गुलाबी सपर्ण साजें; ११

परी फूल हें नामी कसलें ?
जरा वर पहा किती विकसले--

किती विकसले गुलाब गालीं ?
अिरमबाग जणु बाला झाली ! १२

छटा फुलोरी जरी ही हिची,
तरी अजुनि ती लज्जालाली
मूक सङ्कुचित मधु प्रीतिची
नाही शिवली हिला अकालीं. १३

खेळाडूपण मुक्त मनाचें
चमके नयनीं, विहरे वदनीं;
मोकळिकीच्या आनन्दाचें
लास्य विशद हें मौक्तिकरदनीं. १४

सतेज मुक्ता रम्य हुमुंजी,
का ही गाथेमधली कविता ?
ज्ञान मधुर जें हिच्या हितगुजीं
गाथेसहि ये काय शिववितां ? १५

रस्त्यानें मी जातां जातां
थबकुनि बघतां ती मधुमूर्ती
सहज भेटले डोळे चारी,
हृदिं अवतरली काव्यस्फूर्ती. १६

दृष्टि काढुनी परि मजवरुनी
फिरे कुमारी ती निजतन्त्रें,
अुभा जेथल्या तिथें परी मी
भारियलेला अनुक्तमन्त्रें. १७

ता. २८ ऑक्टोबर १९१५ ]

# १४ वाग्यत मोहिनी

[ जाति केशवकरणी ]

जणु चिन्तांचा समूह सारुनि मागे तू बान्धिला,
भव्य हा तव अम्बाडा ढिला.
पुढे विराजे शारद साधा प्रसादपूर्णेन्दु हा,
न या जणु कुणि मित्राची स्पृहा.
परि हा दिसतां भावसिन्धु मम हेलावूं लागतो,
तयावर मी वाहत राहतों.

हा अुचलुनि मज कधि आस्वर्गात् चढवितो,
गर्तेत तर कधी खोल खोल दडवितो,
तट पार दिसेना, हा न पुरा बुडवितो,

सागर न कधी आटायाचा, असह्य माझी स्थिती --
कुणाला परन्तु याची क्षिती ? १

दृष्टि मना, तव या नवयुवतीहृदयोद्यानावर —
अरे, पण अतिकाङ्क्षा आवर.
हनूवरिल खन्दकापलिकडे पद्मराग-गोपुरीं
कवाडें बन्द पहा हीं पुरीं.
अुत्सुकता वाढवी बन्द हें गोपुर चेतोहर,
दिसे वर मौनाची मोहर.

असतील अन्तरीं भावसारिका किती,
मज गमे न ज्यांच्या अुत्कटतेला मिती,
जणु वाणिविलासास्तव झेपा टाकिती,

थरके सरके अधर गमे हा दाविल करुणा जिती -
विलसते मुकुलदन्तराजि ती. २

हीं नयनें का चन्द्रकान्तरसपूर्ण शान्त हीं तळीं
जयांच्या यशोधवल हिमजळीं
शामी झेनोबियासारख्या दोन श्यामसुन्दरी
विलसती डोली बदकापरी!
नर्मद्युतिची लकेर करितां नर्तन येथे क्षण
चमकती कसे हिऱ्याचे कण? —

लावण्ययुक्त थडकतां नर्मदाजळ
निशिं घाटीं अुतरे जणु तारा-मण्डळ!
हे कटाक्ष देअुनि सुख करिती विव्हळ,

नेत्र बड्डामाकार कधि असा चमत्कार दाविती
यांस पण जन सालस भाविती. ३

तप्त रूक्ष पण संस्कारक्षम कोमल भूमीवरी
मृगाच्या पडतां काही सरी
अन्तर्वैभव वरती ये नव सतेज जणु पाचुचें —
पुनरपि नव वय न कुणा रुचे?
तें झालें या हृदीं जंव तुझे मृगलोचन वर्षले,
हुरळलें हृदय खुळें हर्षलें!

परि मग आर्द्रांना कां नच आला द्रव?
नित दिसे दृगांचें शुष्करङ्गलाघव,
न स्वातिहि वळली, होय न तिज आठव,

न हो जिवाचें सोनें जरि ती दसऱ्याची ये मिती,
नेत्र हे तव मुख अन्वेक्षिती. ४

आणिक कोजागरी अहा ती पवित्र सुखशीतळ!
सुधा तंव न्हाणी अवनीतळ,

विश्व लावुनी समाधि बैसे आत्मतत्त्वचिन्तनीं
प्राण तो ब्रह्माण्डीं चढवुनी,
प्राण तोच हा पूर्ण चन्द्रमा, तपस्तेज चान्दणें,
चहुकडे शान्तीचें नान्दणें,

मधुतरङ्ग अुठती त्या समयीं हृत्सरीं,
अुमलतीं ध्येयकुमुदें मग नव हासरीं,
काव्यात्म गूढ तरलता हले अन्तरीं --

मधु मुद्रा तव शान्त चन्द्रिरी समुद्रापरी किती !
चकोरें व्यर्थ ती सुधा पितीं ! ५

ताप शमेना, अर्थ जमेना काही तुझिया मुखीं,
दृष्टि मम जरि सौष्ठव-कौतुकी.
पाहत राही बाळ कौतुकें काळ्यावर पाण्ढरें,
क्षणच परि ती जिज्ञासा ठरे;
रत्नजडित परि लेख या निळ्या घुमटावरचे निशीं
कौतुकें किति निरखी ज्योतिषी !

वेडावुनि त्यापरि मी तव वदनाकडे
पाहतों, झटूनहि अर्थ न कां सापडे ?
कधि औदास्याची त्यावर छाया पडे,

शरदभ्रासम धवल रम्य अुपजवी परी भीति ती,
लुप्त हो पुढे तरलवीचि ती. ६

काही तरि गुणगुणुनि निर्मिशी स्वरसङ्गम सुन्दरी,
पहा वर तारा स्थिर अम्बरीं !
अवकाशीं अतिदूर मण्डलीं नाचत त्या हासती,
प्रमोदें का कम्पित भासती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ...८३४८८... वि: ...काव्य...
क्रमांक ...१८२५... नोंद दि ...२५।१२।६७



मुरलीरव ऐकुनी मधुवनीं प्रीतियोगसाधिका
हो जशी कम्पित ती राधिका !
या दिव्य देहिनींना येओ ऐकुं का
तव गान चित्तहर ? का भ्रम मज हो फुका ?
प्रेमाकुल मानस सहज करी या चुका —
क्षुल्लक परिमळ हरी तशी हृद्भाव गीतलहरि ती —
मोहिनी परि तू वाग्यत किती ! ७

ता. २३ ऑक्टोबर १९१० ]

## १५ निराशेंतील समाधान

प्रेम कुणाचें मजवर नाही हें खडतर दैव,
असे हा तथापि आनन्द;
असती कोणी ज्यावर माझें प्रेम सर्वथैव,
न त्याला काही निर्बन्ध.
मी न भिकारी, हृदयीं माझ्या प्रेमाचा साठा
लुटा हो लुटा सन्धि हीच !
पळूं नका मोकळ्या तुम्हाला जरी दहा वाटा,
नसे हा कोठवळा नीच.
प्रेम करीं मी, दगड नसें हें नसें काय काही ?
लोटली ही अमृतगङ्गा,
शोण कुठे, यमुनाहि कुठे या भलत्या शङ्कांही
कां करूं हिच्या वृत्तिभङ्गा ?
हृदयजे, वहा खोल सन्थ
नसो तुज कसलीही खन्त;

प्रयाग येतां होअिल सङ्गम, आक्रम निजपन्थ,
अडुं नको, नको म्हणूं ' हन्त !' १

रत्न निपजलें तें भूगर्भी पडे अन्धकारीं,
येअी वरी गारगोटी;
रविकिरणें चुम्बितीं तिशीं, कुतुकतीं मुलें भारी,
प्रतिष्ठा परि ती का मोठी ?
साधी वाङ्मोहिनी सहज जो असा रसाळ कवी
स्वस्थळीं राही अज्ञात;
चन्द्रशेखरा, तव कविता–रति परी मला झुकवी
फुलाला जसा अुषावात.
रसिक नसेना कुणी ? जन्म ये मला गुलाबाचा,
स्वतःला कां लेखूं तुच्छ ?
खिस्तशिरीं बैसला म्हणुनि का कण्टकमुकुटाचा
होअिल कधी सुमनगुच्छ ?
विहङ्गम होअुनि गाअीन,
साद जरि दे वनराअी न,
अिन्द्रधनूस न बघे अभागी कुणी दृष्टिहीन
म्हणुनि का वैभव तें दीन ? २

मजवर नाही प्रेम तुझें हें सखे, जाणतों मी,
नको तू पुनःपुन्हा साङ्गूं.
पडली आहुति या जीवाची प्रेमाच्या होमीं
आणखी काय दुजें मागूं ?
म्हणती प्रभुने निम्रूदाच्या भव्य अग्निकुण्डीं
निर्मिली बाग थण्डगार,

अदाह्य अिब्राहीम मधोमध, देवदूतझुण्डी
भोवती करीत सञ्चार.
न मी प्रभुप्रिय, मी प्रेमपिसा अणू अणू जळतों !
यांतही समाधान वाटे;
अेकतानता परी भङ्गतां आत्मा कळवळतो,
फुलांचे मग बनती काटे,
तथापि न माझा आक्रोश,
जरी तू देशि मला दोष.
वायुरूप होअूनि करिन मी नित्य तुझा घोष,
मला की त्यांतच सन्तोष ! ३

ता. १० ऑगस्ट १९१७ ]

## १६ चुकामूक

[ जाति अुद्धव ]

ध्यानाचा भङ्ग न व्हावा
लाविलें म्हणुनि मी दार,
मग अिष्टदेवताप्रतिमा
पूजिली घालुनी हार,
वाजतां कुठे पाचोळा
शापिली खोडकर वार !
ये ध्येयमूर्ति सुखदायी,
मम दार लाविलें पाही,
अन् तशीच परतुनि जाअी —

अन् सान्ज टळूनी आता
चहुकडे भरे अन्धार. १

स्तुतिकाव्य रचाया बसलों
यमकास यमक जुळवीत;
स्वरभावयोग साधाया
हृदयाची तार पिळीत;
गुरफटलों, रस्ता चुकलों
परि शब्दांच्या अटवींत –
परि अवतारी ती कविता
स्वरतरङ्गिणी मधुललिता
हा योगच — तिज भाळवितां
निश्शब्द येउनी गेली –
विनसलें हृदयसङ्गीत. २

सजविलें सखे, सुमनीं या
निर्जीव तुझ्या प्रतिमेस,
सजविले तयांनी असते
तव मादक काळे केस.
का फुलांस आशा नसती ?
भलतेंच काय केलेंस ?
दारावर टिचकी नुसती
अन् हीं वेणीवर हसतीं –
करि दार हानि ही नसती,
भङ्गिलें दार, ये आता
वा धाड मधुर सन्देश. ३

ता. २५ सप्टेम्बर १९१७ ]

## १७ गोड शेवट

[ जाति दिण्डी ]

अजुनि युवती-गालास लाजवील
असा पाटल तव रङ्ग हे गुलाबा !
स्वार्थसाधू परिवार कठिण काळीं
तशा बघती त्यजुं पाकळ्या तुला बा ! १

गड्या, कोठुनि आलास पहा कोठे,
हाय दबुनी चुरलास पुस्तकांत !
सूक्ष्म उरला तव गन्ध परी माझ्या
शान्ति वितरी या श्रान्त मस्तकांत. २

स्नान करुनी ठेवुनी अङ्ग ओलें
खात झोके होतास मन्दवातीं,
भाव अपुला वाटीत विनामोलें
सृष्टिभक्तांना मधुर सुप्रभातीं. ३

नेत्र-सम्भाषण गोड तुझें माझें
थाम्बवूनी मज मित्र मम म्हणाला;
व्यर्थ झुडुपावर सुमन हें विराजे,
पहा खुडिलें मी, साङ्ग तर कशाला ? ४

ओळखेना छे, रसिकता न तूज,
केशपाशीं कुसुमच्या खोवणार
स्फूर्ति पावुनि ती स्वीय हृदयगूज
काव्यमालेमधि सरस ओवणार. ५

उत्तमाङ्गीं तुज ठेविलें असेल,
तिने त्याचें ऋण फेडिलें स्मितांनी;

आणि नर्मशृङ्गारभाषणाची
लाट चढली असणार त्या ठिकाणीं. ६

तिच्या केशीं परि दिसे अता अन्तीं
गुल्छबूची ती दन्तशुभ्र वेणी,
आणि अवचित तू सापडशी ग्रन्थीं,
भग्नहृदयावलि ज्यांत कविश्रेणी ! ७

तोडुनी ना तुज आणिलें सख्याने ?
वृत्ति घायाळ न कशी तुझी झाली ?
दिसे भावि स्थिति पुढे कवण रम्य
जिच्या आशेने जखम भरुनि आली ? ८

केशगुच्छावर बसुनि साभिमान
श्रेष्ठसङ्गतिची स्तुतिच जागजागीं
घेत जीवित-दिन सुखें घालवावा –
सद्‌गुणांची स्तुति हीच कां बिदागी ? ९

प्रीतिकवनीं तरी नांव हें निदान
अमर व्हावें म्हणुनि तू अुल्लसूनी
सज्ज का रे झालास दूर जाया ?
कीर्ति लाभे का घरीं कधि बसूनी ? १०

परी कां तें ? प्रेतास वहायाला
जरी असतें तोडूनि तूज नेलें,
हवें तेंही हसुनीच सहायाला,–
कीर्तिसौख्याचें सुमन नच भुकेलें. ११

जवळ आहे तें कुठे कुणिहि न्यावें,
काय होअिल पुढती न विचारावें,

हसुनि हसवावें, रञ्जनीं रमावें,
काळ येतां धूळीस मिळुनि जावें. १२

बरें सुमना ! मज कळे तुझा हेतू,
कविश्रेष्ठांची सङ्गतिहि न नीच;
अशा सुहृदांसह दिव्य शान्ति घे तू,
ग्रथित करितों तुज काव्यसरीं मीच. १३

मुक्त सुमना, तुज शेवटीं पहा ही
युयुक्षूंची लाभली जशी जोड
तशी लाभो मज, नको अन्य काही,
गोड शेवट, मागील सर्व गोड. १४

ता. २९ ऑगस्ट १९१८ ]

## १८ माझी अिन्दुबाला

[ जाति केशवकरणी ]

पहा वर नभीं स्वयम्प्रकाशी निश्चळ तारा किती
खुणेचे दग्शर मधु टाकिती.
अगणित या पळबिन्दु उग्रापरी कालमहासागरीं,
वा जसे भानुकिरण अम्बरीं,
अथवा जैसे किरणामधुनी तरङ्गणारे अणू,
अणूपरि मज या तारा जणू !
मजवर सत्ता गाजवायला मजला नलगे कुणी,
चित्त घे अिन्दु अेक वेधुनी.
कलाधीन ही असो, क्रमणपर असो, नसो निर्मल
–सुधा ही दे परि मज शीतळ.

म्हणो ज्योतिषी अुसनें सारें हिचें रूप्य वैभव
अशाश्वत जसें चमकतें दव,
त्यांचा न दोष अनुमान जरी वाकडें,
रूरूची दृष्टि न त्यांस कुठे सापडे
की कसें बघावें प्रमद्वरेच्या कडे.
पहा अिन्दुसौन्दर्यापुढती फिक्या तारका किती !
अहा प्रिय अिन्दु अेक जीवितीं !

ता. २४ ऑक्टोबर १९१८ ]

## १९ मधु-मोहनी

[ जाति उद्धव ]

कां नको मधुक्रम आज ?
कां सुरभी करिशी दूर ?
कां कान झाकुनी घेशी
पाहूनि चङ्ग-तम्बूर ?
संहिता गज्जलांची ही
श्रुतिमधुर न लागे आता ?
वाटती आज का तुज या
अळशाच्या बाष्कळ बाता ?
कां देशी आज निरोप
मायेचा करुनी लोप ?
काय हा मधूवर कोप ?
सोडिशी सनातन धर्म ?
काय हें भयावह कर्म !

बग्दाद अिङ्ग्रजी झालें,
रे प्रभूचीच घटना ही !
देवाज्ञा शीर्षीं धरणें
अिस्लाम अन्य बघ नाही.
पाचवा मुहम्मद तुर्की,
नृप जॉर्ज पाचवा पाही !
अेकाची सरली शाही
दुसऱ्याची फिरली द्वाही.
क्रान्तीचें फिरतें जातें,
राष्ट्रपीठ होअुनि जातें,
काळतोण्ड खातें त्यातें;
तू परी मुक्त अविनाशी !
कां भिअूनि वहकुनि जाशी ? २

हा सदा पवित्रच आत्मा,
शारीरिक किल्बिष सारें !
अल्लाचे आपण अवघे
त्यालाच मिळूं माघारे,
तो करीम कनवाळू तो
तो क्षमाशील गफ्फार,
तत्क्षमेस कार्य असावें
म्हणुनि हा पाप-करभार.
या विरोधिनी भक्तीस
प्रेरिता तोच जगदीश !
नर जणू वायुवर पीस.

हो अुमजुनि अन्तर्यामीं
निज भवितव्याचा स्वामी. ३

हें अैहिक जीवित म्हणजे
करमणूक, केवळ खेळ.

अज्ञेय कठिण नियतीचें
हें असें दास्य निर्भेळ.

कवण ती युक्ति मुक्तीची
साधाया आत्मविकास?

मधुसमाधि अेकच साधी;
कां साङ्गूं अनुभविकास?
घे पद्मराग-रस घुटका
हटकूनि पळांतच सुटका!
खोटीच मनीं चुटपुट कां?

भूतलीं मधुच अमृत रे!
मधुरूपें ब्रह्मचि अुतरे! ४

येवोत धर्म, जावोत
जणु सिन्धूवरिल तरङ्ग,

वाढोत जन्मुनी राष्ट्रें
वा पडोत पावुनि भङ्ग.

बेफिकीर पीर फकीर
जे तेच मुक्त निस्सङ्ग!

तारेने चढती स्वर्गीं
रागरङ्ग जेथ सवङ्ग.

हो अुमजुनि अन्तर्यामीं
निज भवितव्याचा स्वामी. ३

हें अैहिक जीवित म्हणजे
करमणूक, केवळ खेळ.
अज्ञेय कठिण नियतीचें
हें असें दास्य निर्भेळ.
कवण ती युक्ति मुक्तीची
साधाया आत्मविकास ?
मधुसमाधि अेकच साधी;
कां साङ्गूं अनुभविकास ?
घे पद्मराग-रस घुटका
हटकूनि पळांतच सुटका !
खोटीच मनीं चुटपुट कां ?
भूतलीं मधुच अमृत रे !
मधुरूपें ब्रह्मचि अुतरे ! ४

येवोत धर्म, जावोत
जणु सिन्धूवरिल तरङ्ग,
वाढोत जन्मुनी राष्ट्रं
वा पडोत पावुनि भङ्ग.
बेफिकीर पीर फकीर
जे तेच मुक्त निस्सङ्ग !
तारेने चढती स्वर्गीं
रागरङ्ग जेथ सवङ्ग.

जरि फिरवी काळ रहाट
दर्वेशी एकच थाट,
हे चिदानन्दसम्राट !

दिसण्यांत कलन्दर दीन
त्यापुढे शिकन्दर हीन ! ५

या द्रवीभूत अग्नीला
प्राशुनी पवित्र बनावें,
तें मदिर नयनिंचें पाणी
दृग्शरीं ओढुनी प्यावें,
प्रेमवायु शिरतां अङ्गीं
अद्वैत गूढ साधावें,
जननयनिं धूळ फेकाया
मधुगीत व्यर्थी गावें;

मग गुरुप्रसादावीण
प्रेमपन्थ फार कठीण;
बसुं नको परि अुदासीन.

[illegible]ल वक्षें ठेव गहाण
पण मधुची शमव तहान. ६

ही पहा कला सृष्टीची —
मधुवात फुलवि ओसाडी;
भाळुनी प्रफुल्ल गुलाबीं
बुल्बुलहि मधुस्वर काढी.
जाणीव नेणिवेची घे,
मधुविद्या शिक आनन्दी,

तनु दों दिवसाची साची –
    मधुच्याच गढुनि जा छन्दीं
        बुडबुडे तरङ्गति काठीं
        छे ! नको कपाळीं आठी —
        अुलटली, अुलटुं दे साठी ! !
हें जिवन्त पावक पाणी
यौवनश्री पुन्हा आणी.

विधिनिषेध पाळुनि लाभे
    स्वर्गीं तरि काय विशेष ?
जें अिथे दिसें कधि काळीं
    तें तिथे असेच हमेश.
हारीत-गमा त्या हूरी
    प्रोन्नतस्तनी, रजताङ्गी,
मदिराक्षी, ललना, त्यांच्या
    तारांची चमक अपाङ्गीं;
        पाचुच्या पाण-थळ बागा
        प्रणयानुकूल त्या जागा !
        ये रङ्ग अधिक अनुरागा
चुम्बितां द्राक्षकन्येला –
चल घे रे ! – अेकच पेला ! ८

ता. ९ फेब्रुवारी १९१९ ]

## २० कुणी काय बान्धिलें

तेज पाहतां याचें दिपते, होउनि जाते मूक गिरा,
कोहिनूर जणु ! अद्वितीय हा कला-किरीटांतील हिरा.
रवितापाने वितळेना जर हिममन्दिर मी यास म्हणूं,
कर्पूराचें कसें ? गन्ध नच, न जाय उडुनी अणू अणू.
उदात्त जणु मन्दार-मण्डपीं बघे स्वप्न मधु वास्तुकला,
कुराणवचनाक्षरी हार हा जिच्या गळां न पहा सुकला.

पुण्य कुणाचें असें रूप घे हृदयङ्गम सङ्गमरवरी ?
शान्ति मनाला पावे येथे, मृत्युहि शोभा अमर वरी.

यमुनातीरीं कीर्तिकुञ्ज हा बघतां साक्षात् काळ म्हणे,
" धर्म नको मज माझा, नलगे यापुढती अथवा जगणें."
काय नवल जर आले सोडुनि यक्ष सौधमय निज नगरी
जीतें बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिका धौत करी ?
स्मारक धन्य ! प्रीति धन्य ही ! धन्यच राणी मुम्ताज !
चिरनिद्रेचें स्थान तिच्या हो मन्दिरराज असा ताज !

यवनीप्रिय-कवि-रसगङ्गेचा पडे फिकाच इथे नखरा !
दिल्लीवल्लभ शहाजहान् ! तू जगन्नाथ दयितेन्द्र खरा !

भस्म चर्चुनी कृष्णमूर्ति हे कोण उभे जागोजागीं ?
बैरागी का सुकाळले जे हिन्दुस्थानीं हतभागी ?
गाम्भीर्याचे वा स्थैर्याचे पुतळे भव्य, सदैव खडे,
यांच्या डोळ्यासमोर झाले कितीक तख्तांचे तुकडे !
हतबल यांच्या पुढे जाहले सृष्टींतिल राक्षस सगळे —
गाठ पडे निःस्पृह शूराशी तंव सत्वर बलि-गर्व गळे.

भुन्या काजळी जटासङ्गती वायु करी खेळुनि दङ्गा,
भीति कुणाची त्याला जाचे, नाचे जो जगभर नङ्गा ?
सह्यसुतांना सह्य सदोदित अुष्णशीतवायुवृष्टी –
करी प्रतीक्षा कालाज्ञेची अुदासीन मिटली दृष्टी.

कुणी यांजला प्रसन्न केलें महत्त्व यांचें ओळखुनी ?
शिरीं घातले किरीट नूतन, भग्न तरी दिसती अजुनी.
दुर्गस्तम्भीं याच अुभविला कुणी घुमट शिव-राजीचा ?
शिङ्ग वाजतां ध्वनि दुमदुमला हिन्दुपदाच्या द्वाहीचा.

असे किती गड ज्यांवर आता फडकेना झेण्डा भगवा –
हालवूनि जो हृदय मराठी म्हणे " स्वत्व मरुनी जगवा " !

त्यांत रायगड, राय गडांचा, राज्यारोहण तेथ घडे,
स्वामिनिष्ठ शिवरक्षारक्षक ! आज अ-नाथ कडेस पडे.

धन्य महत्त्वाकाङ्क्षा, धर्मप्रीति, राज्यकारण नव तें !
धन्य शिवाजी राष्ट्रब्रह्मा ! चरित्र अुद्बोधक तव तें !

स्थळें शोधुनी निसर्ग-सुन्दर रम्य मन्दिरें, घाट कुणी
वा पडशाळा बान्धुनि केले येते जाते लोक ऋणी ?
पुनरुद्धारें नवीं पाहतां किती मन्दिरें भग्न जुनीं
धन्यवाद आसेतुहिमाचल मिळती कोणाला अजुनी ?
अन्नछत्रही विद्याभिक्षुक, यान्त्रिक यांस्तव करुनि सुरू
संसृतिचिन्तेंतुनि सोडविले विद्याध्यापक धर्मगुरू ?
जिच्या व्यक्तिगत अुत्पन्नांतुनि वाहे दानाची सरिता
ती गङ्गाजलनिर्मल राणी कोण जिचा नच कोश रिता ?
भोगपराङ्मुख होय परि न घे कर्तव्याचा संन्यास,
निदिध्यास घे सदा शिवाचा— योग कठिण हा अभ्यास.

राजयोग जनकाचा नाही भाकड गोष्ट पुराणींची
रहस्य दावी अितिहासींची कथा अहल्याराणीची.
काञ्चनगङ्गा वाहवूनि जी अुभवि यशाचा धवलगिरी
होळकरकुलप्रभा, कोण हो तत्स्मृतिला न धरील शिरीं ?

प्रेक्षणीय हे हौद पर्वतीवरि कुणि गर्वें दाखवितो,
आणि कशाचे आणुनि चित्तीं भोजनपर्वें आठविती.
पक्वान्नांचे म्हणतां येअी अजुनिहि तद्गन्ध त्वरित —
या दुष्काळीं महाभोजनस्मरणहि होअी रसभरित !
थू थू त्याच्या राजवटीवर ज्याचें स्मारक हेंच असे !
बघुनि मराठी हृदय भग्न हो, अुपहासें जग बघुनि हसे.
१ लाडुबहादुर, कामान्धातुर, वाक्चतुर परी जो बाजी
भेकड पाजी, महाल-गाजी– करी पुण्याची शोभा जी !

कुणी काय बान्धिलें पाहतां दिसतो क्रम अितिहासाचा,
अन्ध सदा नर, विमार्ग दिसला स्पष्ट जरी किति र्‍हासाचा !

ता. ६ अेप्रिल १९१९ ]

## २१ असो स्थिर तुझा दृक्सन्देश

तुजपासुनि मी असतां दूर्
लागे हृदयीं नित हुरहूर्
नयनीं अुत्कण्ठेचा पूर्,
क्षणोक्षणीं ज्या अुठती शाङ्का त्यांनी होअी अन्तर चूर्. १

स्मरण तुझी काढी तस्वीर्
चुम्बाया मी होय अधीर्
भीति वदे तों मागे फीर्,
आता मागे जाअुं कुठे मी टाळुनि ही नैराश्यविहीर्? २

प्रीतीच्या सुन्दर बागांत्,
सुमकञ्चुक घालुनि अङ्गांत्,
आशा बसली गाणीं गात्,
वसन्तरागांतले आळवित मोहक मधुरस्वर रङ्गांत्. ३

अितक्यांत दिसे भीति कुरूप्,
आशा होअुनि जाअी चूप्,
जाअी गाण्यांतील हुरूप्,
गप्प बसावें लागे कष्टें तळमळ असुनी आंत अमूप्. ४

मागे टाकुनि कितिक मुलुख्
आलों गणुनि न तहानभूक्,
गवसेना तुज बघुनिहि सूख्
काय करूं मी? साङ्ग सखे मज, यामध्ये कवणाची चूक्? ५

आत्मनिवेदन हा का दोष्
की तू धरिशी मौन सरोष्?
अेक प्रेमाचा जयघोष्
तुला साङ्गतों, पर्वकाळ हा, सखे लूट ये हा हृत्कोष्! ६

मेघासम कान्तीने श्याम्,
त्याचपरी तू जीवनधाम्
चातकास या दे विश्राम्,
तव हृदयङ्गम वाग्वर्षावें टाक फुलवुनी जगदाराम्! ७

वर बघ अुघडुनि नेत्र विशाल्,
बघुं दे मज हृद्रङ्गमहाल्
भ्रमवी मज किति मोहनजाल्,
प्रेमभिक्षु मी, भ्रमुनी थकलों, थोडी तरि मज भिक्षा घाल् ८

असला पुण्यप्रीतिनिवास्
सदा मिळावा या जीवास्;
व्हावा याचा येथ विकास् —
प्रिय रमणीच्या पुढे कोणती गे दुसरी पुरुषाची आस् ? ९

मुखकुड्मल तव हें का बन्द् ?
लपवायाचा तुज कां छन्द् ?
सोड प्रणयोद्गारसुगन्ध्,
कण्ठ सोकला, दे मज चाखूं निदान शब्दाचा आनन्द ! १०

सोड सोड नयनांतुनि बाण्,
विद्ध हृदय कर, घेओं प्राण्,
शङ्कांचें बघ हें थैमान् --
सोडुनि आश्वासनास्त्र अपुलें कर गे यांची दाणादाण्. ११

प्रियकर तव हा बघ निष्काम् !
नाम तुझें घे, न पुसे दाम्
माझ्या हातुनि तू घे काम्,
पुरुष भिओना कष्ट कराया, निथळो निढळाचा या घाम्. १२

सहानुभूतीचा तव वात्.
भरो फिरो मम हृदयशिडांत्;
हेलावत जावो दिनरात्,
अिष्ट तडीला परी शेवटीं लागो तारूं धक्के खात्. १३

ध्रुवासनीं तू अपुल्या बैस्,
आत्मानन्दीं विलसत अैस्
भलें दावुं दे सिन्धु त्वेष्,
मी न गणीं या प्रचण्ड लाटा, असो स्थिर तुझा दृक्सन्देश्! १५

ता. २१ मे १९११]

## २२ भितों मी तुझ्या चुम्बनातें

भितों मी तुझ्या चुम्बनातें सुशीले, परी भ्यावयाला नको तूज गे,
असे जीव आक्रान्त हा शोक-भारें, न तूझ्यावरी भार लोटूं बघे;
तुझी चाल, चर्या, तुझा शब्द, यांना भितों मी, मला तू न भ्यावें परी
असे शान्त अव्याज भक्ती कुमारी, जिने पूजितों मी तुला अन्तरीं.

ता. २९ जून १९१९]

## २३ दिसण्यांत सुन्दर ती नसे

दिसण्यांत सुन्दर ती नसे बाला जशा बहु बाह्यता,
स्मित ती करीपर्यन्त ती न कळे तिची रमणीयता;
मग मी बघें डोळे किती गहिरे सतेज अहा तिचे!
जणु ते जिव्हाळे प्रीतिचे, अुन्मेष किंवा कान्तिचे.
संवाद न करी दृष्टिने आता सलज्ज विरक्त ती,
नयनीं तिच्या अजुनी परी बघतोंच मी प्रणयद्युती;
दुसऱ्या कुमारींचीं स्मितें असलीं किती जरि सुन्दर
भ्रूभङ्गही गमती हिचे मज त्यांहुनी चेतोहर.

ता. २ जुलै १९१९]

## २४ अङ्गाअी

[ जाति अक्रूर ]

निज नीज अता आनन्दा लडिवाळा,
अङ्गाअी माझ्या बाळा. ध्रुं०

बघ रस्त्याला ओस करी ही रात्र,
जागती दिवे हे मात्र.
या बाजूला कुठुनि अता मोटार
पों कुर्र शब्द करणार ?
तो विलायती कुठुनी आणूं बाजा ?
माझेंच अेक पद राजा.
मी हेंहि हळुहळू म्हणतें,
जणु अपुल्याशीं गुणगुणतें,
शेजारीं कोणी कण्हतें
त्या झोपूं दे, तूहि झोप ये बाळा,
ये मलाहि बघ कण्टाळा. १

परि जाशी तू झोपीं गाढ दुपारीं,
अन् छळिशी आता भारी.
किति माझे हे डोळे चुरचुर करिती,
तुज कोठे ओळख परि ती ?
अन् त्यांचाही खाअुनि साधा गोळा
नुक्ताच लागला डोळा.
तों तुला अुजाडे, छान !
अगदीच खुळें हें ध्यान !
बघतां मम हरपे भान,

परि झोप कशी भालेना तुज बाळा ?
रुम् झुम् छुम् वाजे वाळा. २

दुर जाशी का ? तुला काय रे वाटे ?
माण्डीवर रुतती काटे ?
बघ वाळ, तुझा निजला रे मोत्याही,
कर तूहि अता अङ्गाई.
चल नीज कसा, करूं नको पुण्डावा;
छळ किती बरें माण्डावा ?
देवाची येअिल फेरी,
कोवळें ऊन सोनेरी
पसरेल आंत बाहेरीं;
मग खेळ अुद्या, नीज अता पण बाळा,
बघ येअिल बोवा काळा. ३

तुज थोपटतें, माण्डीवर मी घेतें
झोकेहि हळुहळू देतें.
जर आअीची माण्डी शिर टेकाया,
तर अिन्द्रपदहि तें वाया !
मज दुर्मिळ ती, जीवर ठेवुनि डोकें
विसरूनि भोवतिल धोके,
वाटतें यथेच्छ रडावें,
अन् पदराखालि दडावें,
झोपेंत अथाङ्ग पडावें —
ही प्राप्त तुला — नीज ! नसे जरि बाळा
पाळणा आणि झोपाळा. ४

आकाशाच्या चाळणींतुनी खालीं
जो प्रकाश शारद गाळी
वर येअी तो मिरवित अपुली शोभा
हा बालमित्र चान्दोबा.
हा मामाच्या वाड्याकडुनी आला,
चल जोड हात तू याला.
        सोन्याचा चेण्डु पहात
        चिमुकले करिशि वर हात,
        किति कौतुक हें डोळयांत !
जरि धडपडशी यास धराया बाळा,
शिवशील केवि आभाळा ? ५

मज आअीने हेंच नभाचें लेणें
दाविलें असेल मजेने,
भरवित अिवले काअुचिअूचे घास —
रुचि काय तिच्या प्रेमास !
त्या प्रेमाची गोड गहन अुत्कटता
या हृदयीं आता पटतां,
        हा स्मारक बाल्यसुखाचा
        हा स्मारक मातृमुखाचा
        हा साक्षी मधुकुतुकाचा,
नभिं बघतां मी परिचित या चन्द्राला
ये हृदयीं भाव-अुमाळा. ६

कां आअी, गे होय असें पुनवेला ?
अुलङ्घी स्मृति हृद्वेला;

का देवाच्या घरुनि तेधवा येशी
भेटाया प्रिय तनयेशीं ?
मधु बाल्याच्या आठवणींचा पेला
कितिकदां रिकामा केला !
    तो तरी पुन्हा भरलेला,
    जीवही पुन्हा तान्हेला,
    ये पूर दुग्धगङ्गेला !
तव ममतेची होतां वृष्टि जिवाला
भासणार कुठुनि अुन्हाळा ?

जंव बघतें मी सुधारनात आकाश
तंव अचूक हो मज भास –
प्रतिबिम्ब तुझ्या वदनाचें तर नाही ?
खुणगाठ पटे मजला ही –
ये प्रेमाच्या स्वार्थत्यागें शान्ती,
ती पसरे सकल दिशान्तीं.
    सूर्याचें तेज गिळूनी
    त्यांतील ताप वगळूनी
    दे थण्ड तेज अुलटूनी
त्या चन्द्राचें साम्य तुझ्या चरिताला,
मन माझें दे निर्वाळा.

तू प्रभुपाशीं दूर असुनि मजजवळी,
तव माया मजला कवळी.
जगीं खेळाया, पडो कसाही डाव,
आश्वासी मज तव भाव.

बात्सल्य तुझें निःस्पृह अक्षय आओी,
मी होअुं कशी उतराओी ?

दायांश तुझ्या हृदयाचा
जो मला मिळाला त्याचा
मधु लुटो जीव हा माझा !

गेला झोपीं, जडता ये पायाला,
अुचलूनि ठेवितें बाळा. २

ता. ८ सप्टेम्बर १९२० ]

## २५ तो क्षण

क्षण आहे का तो तव हृदयीं ? ध्रु०

बसलों होतों बोलत गोष्टी अन्धुक ताम्बुस त्या समयीं; १
अैकत होतिस तू ' हूं ' बोलत, चित्त न लव परि त्या विषयीं. २
अुठलिस वेगें खुर्चीमागे जाअुनि लवलिस सहज तअीं. ३
तुझ्या निरर्थक शब्दीं तों किति सुरस अुचम्बळला प्रणयी ! ४
मग कां झडकरि दूर जहालिस शङ्कित, भयकम्पित विनयी ? ५
भिडले चारी डोळे रमणी क्षणच अहा त्या प्रीत्युदयीं ! ६
धन्य करी मज अजुनिहि ती स्मृति, तारी प्रेमाच्या प्रलयीं. ७

ता. ३० जानेवारी १९२१ ]

## २६ अेक घाव

रे त्या पक्ष्यावर दगड मी फेकितां फेकिला की !
झालें हातांतुनि निसटतां चर्र या काळजांत !
घोण्डा वक्षावरच बसला, श्वास कोण्डूनि जातां
खाली वृक्षावरुनि पडला पक्ष्ु होतांच जाया.

मी पाळी तो तडफडुनि का याच हातें मरावा ?
पाणी टाकीं, अुर धडधडे– हा अुठाया शकेना.
कैसें व्हावें ? जखम हृदयीं होय या क्रूर हस्तें
अन् अत्यन्त मृदु हृदय हें, हाय ! कैसा अुठावा ?

झाली आता पण कळ कमी, नेत्र की अूघडी हा !
मृत्यू किंवा अजुनिहि पुनर्जन्म हो तें कळेना;
गाणीं गाया मृदुमधु पुन्हा वाचला हा अहाहा !
अुद्यानींचीं रुचिकर फळें चाखण्याला अुठे हा.

माझ्यापाशी परि फिरुनि हा ये न पूर्वीप्रमाणे,
येतां केव्हा तरि भिअुनि हा दूर पाही अुडाया,
गेली श्रद्धा पुनरपि न ये ती करूनीहि शर्थ,
झाल्या घावा विसरुं शकण्या कोण आहे समर्थ ?

ता. २० मे १९२१]

## २७ कौमार्यस्मित

[ जाति केशवकरणी ]

पुलाजवळ वळणावर चमकुनि चपलेपरि सुन्दरी,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. ध्रु०

पुढले आखुड केस काजळी कुरळ क्रीडातुर
तरङ्गति वाऱ्यावर भुरभुर;
टवटवीत या वदनीं खेळे वृत्ति सरळ मोकळी,
चिमुकली डाव्या गालीं खळी.
विशाल डोळ्यामधे विनोदी चमक खोडकर भली,
खुले मुखिं बारिक मुक्तावली.
तव बुद्धितेज अुपजवी भयादर अुरीं,
सङ्कोच घालवी लाडिक जिवणी दुरी,
लोचनांत सन्ध्याग्रहकौतुकमाधुरी !
दृष्टिक्षेपें करिशी पावन आणि शान्त अन्तरीं,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. १

चार दिसांची ओळख, कधि तरि चार शब्द बोललों,
क्वचित् कधि डाव दोन खेळलों.
मी न सगासोयरा, न मी विख्यात कुणी मोहरा —
जुअी तू, मी न परी मोगरा !
ओळखीस जागशी, माधुरी भरली हृदयामधी,
सहज ही वाहे जेवी नदी.
धिटुकले, हासुनी बघशी माझ्याकडे,
कुणि बघेल हें भय न तुज, परि मला पडे.
मज कळे जनमनीं अेकच ये -- वाकडें !

तोंच अिकडुनी तिकडे जाशी हसऱ्या अुल्केपरी,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. २

पाअुल पडलें अेक तुझें हें जरि यौवनवैभवीं,
दुजें पण घोटाळे शैशवीं.
अनुभूतीच्या रणाअलिकडे आशेच्या नन्दनीं
तरल तू झुलुक भावचन्दनी !
लटूपटीच्या संसाराची अुरली घटिका निमी
साजरी करुं या का तू नि मी ?
धाकुटी बहिण तू अन् मी भाअू तुझा,
पडदा न आड, नहि भेदभाव हा दुजा,
बसुं, हसूं, रुसूं, कुजबुजूं जिव्हींच्या गुजां—
हाय विसरतों गे कोठे तू कोठे मी सुन्दरी,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. ३

ता. २५ जुलै १९२१ ]

## २८ पोरक्या पोराचा धावा

[ जाति भूपति ]

[ १ ]

कोणत्या स्वरूपीं प्रभो, तुला मी पाहूं ?
ये धाव, आसवें पूस, पसर तव बाहू.
तू विश्वात्मक, तू गूढ, तुझी किति सत्ता !
मी क्षुद्र जीव मज चोहीकडुनि अियत्ता.

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...५३८६६... वि: ...८१०४...
क्रमांक ...१९२६... नों: दि ...२८/२/५१...



संसार जगाचा चालविशी तू बापा,
मी स्वत:चसाठी खपुनि टाकितों धापा.
तू सर्वशक्तिमान् सिन्धु तुला भेटाया
मी बिन्दु धडपडे, शोषी मज ही माया.
जें प्रेम अनिर्वचनीय तेंच तू देवा,
मी कुठे अनुभवूं? कशी करूं तव सेवा?

[२]

प्रेमाची गङ्गा क्षमाशील जी आअी.
तन्नेत्रीं, ओष्ठीं, स्तनीं तुझी नवलाअी,
अनसूया माता पदवी किति ही मोठी!
साकार अीश्वरी त्रिपुटी येअी पोटीं.
पोरकें पोर मी रडतों धाअी धाअी,
मी करूं कुणाच्या माण्डीवर अङ्गाअी?
खेळूनि गुदगुल्या करूं कवण जीवाला?
गाळूनि अश्रु मी आणुं कुणास अुमाळा?
सम्पली चढण ही, वृथा अता ती आस—
परि व्हावें बालक, रुचे हेंच जीवास.

[३]

ती प्रेमळ करडी दृष्टि गुरूची शान्त
हो व्यक्त तुझें परिपालन योग्य तिच्यांत.
दिनरात्र दोन परि काळ अेक, त्या रीती
कधि बने क्षमा, कधि शिक्षा त्याची प्रीती.
अुपजवी भीति लव, अत्यादर, विश्वास,
आपुल्या सारिखें करूं झटे शिष्यास.

ठाणे ग्रंथ संग्रहालय ग्रं. क्र. १९२६ (स्थळ प्रत)

कोणाच्या प्रेमळ करड्या दृष्टीखाली
वागुनी पराक्रम दावुं कुणा या काळीं ?
अुपमन्यु कुणाचा होअुं गुरुपद त्यजुनी ?
यश हवें वाटतें सेवाधर्मी अजुनी.

[ ४ ]

भावडी भक्ति कां नष्ट जाहली माझी
वाटते तर्क-निष्ठास जी अफूबाजी ?
ही जन्मवेळ तव बद्धदेवकी-बाळा,
भक्तिने न कां मी हलवावा झोपाळा ?
अन् गात मिरेचीं साधींभोळीं गाणीं
सिञ्चीत कृष्णमय डोळ्यांमधुनी पाणी,
नरसीपरि घेअुनि तूझा अेकच चाळा
कां लाज सोडुनि न नाचावें गोपाळा ?
विसरेन कधी मी स्वतःस तुझिया भजनीं ?
हो लाभ जनीं वा न हो, अभय दिनरजनीं !

[ ५ ]

मी डोळस असुनी अन्धच हाय करण्टा !
अैकूं न ये जरी गंभीर वाजे घण्टा.
खोलींतच रडतों बिलगुनि या विधेला,
देवेश तो कुठे भक्तसखा अजि गेला ?
बाहेर काजळी मेघावृत आकाश,
अन्तरहि तमोमय होअुनि जाय निराश.
ध्वनि सर्व निमाले गमती या अेकान्तीं,
हा टकटकणारा काळ मात्र साङ्गाती !

दिनकरा, अुगव ये, ओळख दे तव देवा,
घे सेवा अन् दे साम्निध्याचा टेवा.

ता. २१ ऑगस्ट १९२१ ]

## २९ हास बालिके!

हास बालिके, गडे, अुधळ सुख निकें! ध्रु०

काहि नको कारण तुज
फुलवाया वदनाम्बुज—
बोल मुकें तव हितगुज, अुघड माणिकें. १

तव नयनीं सुख-कौतुक,
जिवणी कशि अर्धोत्सुक,
मुग्धपणांतिल दे सुख, अुजळ मौक्तिकें. २

खेळगडी तूज पवन,
चिमणीही गाअि कवन,
घर हें तुज नन्दनवन, मुक्त सारिके! ३

करुनी दिनभरहि कष्ट,
तुज बघतां शीण नष्ट;
पडतें मम दैव दुष्ट तुजपुढे फिकें! ४

स्मारक तू प्रीतीचें,
चित्र हुबेहूब तिचें,
जीवन गतकालींचें तुजमधे टिकें. ५

ता. १४ नोबेम्बर १९२१ ]

## ३० महात्मा काय करिल अेकला ?

[ जाति केशवकरणी ]

जिकडे तिकडे देशभक्त हे आणि पुढारी किती !
युक्तिने महात्म्यास जिङ्किती.
पैका, पदवी, राजमान्यता यांना मुकल्यावर
थोर ये देशभक्तिला भर.
मानपत्र, मिरवणूक, टाळ्या, नांवाचा घोष तो
पुढारी यावरती पोसतो.
    या कुटिलगतींचा द्विजिव्हता सद्‌गुण,
    ठेविती तृणतळीं विस्तव विस्तारुन,
    मग अजाण दीनांवर सङ्कट दारुण !
आट्यापाट्या विवेकासवें खेळे यांची कला –
महात्मा काय करिल अेकला ? १

प्रिय अेकहि नच तत्त्व, जीवही द्यावा ज्या कारणें,
नित्य परि पडती शाब्दिक रणें;
मर्द भिती सम्मर्द –मताला म्हणुनि सनातन किती
गताचे देव्हारे माण्डिती !
तत्त्व मान्य, तपशील न माने म्हणती हे धोरणी;
नको तप –शील राज्यकारणीं.
    सौराज्यशत्रु हे स्वराज्येच्छु फाकडे,
    हे लोकसङ्ग्रही समतेशीं वाकडे,
    हे स्वार्थापुरते बघती धर्माकडे,
काळच घरच्या म्हातारीचा शूर वीर येथला –
महात्मा काय करिल अेकला ? २

व्यक्तीचें माहात्म्य घालवी असा नियम कां हवा
कुणाला लोकवटीं ? वाहवा !
नीतिकटाक्षहि फक्त लैङ्गिक क्षेत्रापुरता असे,
धर्मेही भेदच शोधित बसे.
भिन्न मतांच्या स्वकीयांस या स्वतन्त्रता कासया
हवी ती जैशी परक्यांस या ?

विद्यार्थिदशेमधि जहाल जे ते किती !
तोण्डांतुनि कुलपी गोळे जे फेकिती,
होअूनि थण्ड मग राजदास्य सेविती,

स्वस्थ होअुनी शिळोप्यास परि म्हणति, 'देश पेटला !'
महात्मा काय करिल अेकला ? ३

घेअुनि सत्यप्रीतिअहिंसा यांचा झेण्डा करीं
सञ्चरे गान्धी देशावरी.
खादी पटका, त्यावर चरका; अर्धा अुघडा गडी
तोण्ड दे जुलुमाला हरघडी.
सान थोर रञ्जले गाञ्जले यांना हृदयीं धरी,
योग हा अनासक्तिचा वरी.

हा क्रान्ति कराया झटे राज्यधोरणीं,
हा पुढे सरे की प्रथम मी पडो रणीं;
हा हिरा न फुटणें, हाणा घण अैरणीं !

भूतदयेचा सागर अथवा म्हणा दिसे चेवला –
महात्मा काय करिल अेकला ? ४

न लगे शिष्यप्रपञ्च, होणें गुरु वा पैगम्बर,
मानवी किती थोर अन्तर !

धर्मवेड कधिं मनास न शिवे, धन्य खरा वैष्णव,
वाढवी सत्याचें वैभव;
कृपण भ्याड ती क्रियाशून्यता तो न अहिंसा गणी,
पाहिजे धैर्य आणि लागणी.

अुद्योगी भिक्षू, शेतकरी, विणकर,
दुबळ्यांचा प्रतिनिधि, कैवारी, चाकर,
दे बलाढ्य साम्राज्याशींही टक्कर,

राजमान्यता, लोकमान्यता यांस न भाळे भला –
महात्मा काय करिल अेकला ? ५

कटू पथ्यकर सत्य बोलतां भीति न ज्या वाटते,
अन्तरीं प्रीति गाढ दाटते.
राजनीतिचा रामबाण हा शिकवी – सत्याग्रह –
नवीनच परन्तु न भयावह.
परि अनुयायी तोण्डदेखले भ्याड बोलघेवडे –
सङ्कट ओढविती केवढें !

हे प्रगतिद्रोही फण्डगुण्ड मातले,
हे पोटपुजारी, गुलाम-वंशांतले,
श्रद्धाळु यांहुनी अशिक्षितच चाङ्गले !

हुल्लडहौशी मित्र दाविती अत्याचारें गळा —
महात्मा काय करिळ अेकला ? ६

ता. १८ नोवेम्बर १९२१ ]

# ३१ खुळी लाजरी पोर

[ जाति अञ्जनी ]

काय लाजरी पोर ! खरोखर खुळी लाजरी पोर् ! ध्रु०

चिमण्या तोण्डीं घास भरविले,
अङ्गाखान्द्यावर खेळविलें,
गाउनि गाणीं तुज जोजविलें,
मागे सरशी ती तू लाजत अन् माझ्याच समोर् ! १

आणि नेसुनी चोळी परकर
खेळ खेळलिस मजसह सुन्दर,
तऱ्हेतऱ्हेच्या फुगड्या गरगर —
शिकविलेंस तू, होतिस तेव्हा कैशी दङ्गेखोर् ! २

तोंच कळीचें फूल विकसलें,
हृद्य वसन्तोद्यानच हसलें,
लाजुनि लाजुनि का परि असलें
हें मधुवैभव चोरायाचा राहिल मधुकर चोर् ? ३

पढित लाज चल टाकुनि दे ही,
अुषःप्रभा तू पसरी गेहीं,
दाव चपलता जी तव देहीं,
नाच रेशमी पातळांत या जेवी प्रमुदित मोर्. ४

पोटाशीं तुज बळें आवळुनि
केसांतुनि तव अङ्गुलि फिरवुनि,
गालींचे हे गुलाब खुलवुनि
म्हणतों नेवो रसिक तुज कुणी, प्रेमळ पण शिरजोर्. ५

ता. १८ डिसेम्बर १९२१ )

# ३२ आमुची मायबोली

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे,
नसो आज अैश्वर्य या माउलीला, यशाची पुढे दिव्य आशा असे;
जरी पञ्चखण्डांतही मान्यता घे स्वसत्ताबळें श्रीमती अिङ्ग्रजी,
मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी ? १

जरी मान्यता आज हिन्दीस देअी अुदेलें नवें राष्ट्र हें हिन्दवी,
मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणुनी योग्यता, थोरवी;
असूं दूर पेशावरीं अुत्तरीं वा असूं दक्षिणीं दूर तन्जावरीं,
मराठी असे आमुची मायबोली, अहो ज्ञानदेवीच देखा खरी. २

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं,
पुरी बाणली बन्धुता अन्तरङ्गीं, हिच्या अेक ताटांत आम्ही बसूं;
हिचे पुत्र आम्ही हिचे पाङ्ग फेडूं, वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं,
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं. ३

हिच्या लक्तरांची असे लाज आम्हां, नका फक्त पाहूं हिच्या लक्तरां –
प्रभावी हिचें रूपचापल्य देखा पडावी फिकी ज्यापुढे अप्सरा;
न घालूं जरी वाङ्मयांतील अुञ्ची हिरेमोतियांचे हिला दागिने,
' मराठी असे आमुची मायबोली ' वृथा ही बढाअी सुकार्यांविणें. ४

मराठी असे आमुची मायबोली, अहो, पारतन्त्र्यांत ही खङ्गली,
हिची थोर सम्पत्ति गेली अुपक्षेमुळे खोल कालार्णवाच्या तळीं,
तरी सिन्धु मन्थूनि काढूनि रत्नें नियोजूं तयांना हिच्या मण्डनीं –
नको रीण ! देवोत देतील तेव्हा जगांतील भाषा हिला खण्डणी. ५

ता. १७ मे १९२२ ]

# ३३ कवितेचें देणें

[ जाति चन्द्रकान्त ]

मला अेकदा चित्र काढुनी दिलें कल्पनेने
दरिद्र्यास या दुसरें कुठलें प्रेमाचें देणें ?
दश वर्षें कण्ठिलीं चित्र तें हृदयाशीं धरुनी,
गजबजलेली जगती गमली न मग अुजाड सुनी.
प्रतिमा ठेवुनि ती हृदयाच्या गाभाऱ्यामाजीं
ध्येयाला त्या किती वाहिलीं काव्यफुलें ताजीं !
भास दिव्य तो प्रसन्न होअी मज पुढती मूर्त,
नभास माझे हात पोचती, राजा मी तूर्त ! १

स्वप्नांतिल अुर्वशी कशी ती आज अिथे आली ?
मादकतेची ललित छटा ती कुठे हिच्या गालीं ?
अुषा म्हणूं तर झगमग कोठे ? ती रङ्गे प्राची,
हिचिया नयनीं शुक्राची द्युति, वदनीं चन्द्राची.
शरच्चन्द्रिका चन्द्रावाचुनि ही रमते कोठे ?
बावरलों, मुखचन्द्र न कळला आश्चर्यच मोठें !
तगरशुभ्र नेसुनी मलमली पातळ चन्देरी
अुषेस लज्जित करी, क्षौम जी नेसे सोनेरी. २

डौलदार सुकुमार देखणा शेलाटा बान्धा,
मोल न करवे त्या वेषाचें अितका तो साधा.
पोलकेंहि बेतीव रेशमी कटथुत्तर अङ्गीं
खुलवुनि दावी तनुसौष्ठव तें फिकट पीतरङ्गी.

सोन्याची अेकेक बाङ्गडी चमके मणिबन्धीं,
अेकाकी, तिज हाय मिळेना सम्भाषणसन्धी.
कर्णफुलांच्या हिरकण्यामधे पद्मराग लाल,
स्फटिकीं जणु हृद्रक्त, त्यापरी लज्जारुण गाल. ३

हिला हिमाने दिधला अपुला नितळ विमल रङ्ग.
करी पाटलच्छटेसवें तो येथे मधुरङ्ग.
वसन्त गेले वीस ठेवुनी श्रीस हिच्या वदनीं,
नयनीं लाडिक कुतूहल, स्मित अर्धस्फुट रदनीं.
ओष्ठसम्पुटाभवती पडती चिमुकल्याच परिखा,
खोडसाळपण लपे हसे हें कसें पहा हरिखा !
सौभाग्याची केवळ पुतळी, अल्लड जरि शिकली,
सौभाग्याची लटकी टिकली नसे नसो टिकली ! ४

बघणाऱ्याचें मन चरके, ही नच केविलवाणी;
उषःसखी ही भाद्रपदींची वसुन्धरा राणी !
झरा वाढत्या रक्ताचा हा अजुनि नसे निवला,
पोक्तपणा जीवास अकालीं अजुनि नसे शिवला.
नैराश्याचें वारें गेलें हृदयावरुनी न,
अजुनि न वाटे, सारें गेलें ! ही मी तरुणी न !
लाजलाजणें अथवा निश्चल अुदासीन बसणें
हिला न ठाअुक, भावुक हीचें पहा खुलें हसणें. ५

जरी निघाल्या इतर सर्वांच्या लग्नाच्या गोष्टी
ताळें न बसे हिच्या मोकळ्या वावदूक ओष्टीं;
आणि विचारस्वातन्त्र्याचे फेकी ही गोल,
फोल हिचें सन्धान हो कधी जाय हिचा तोल.

होय निरुत्तर तर गोन्धळुनी किति सुन्दर हासे,
मुरका मारुनि रोखी दृष्टी अुत्कट अुल्लासें.
घाऱ्या भोळया डोळयांतुनि या मग गम्मत चमके,
प्रतिपक्षीही स्वपक्ष विसरे, क्षणभर तरि थबके. ६

वाट निराळी फुटे जिथे तें येअी कल्याण,
नमस्कार मग ते घाअीचे हलवित सामान.
कोण कुणाचे कुठले ? हो पण अन्तर कोन्दट कां ?
औट घडीची सङ्गति सोडी लावुनि ही चटका.
नांवहि न कुणी कुणास पुशिलें—घोर किती चूक !
स्वप्नसुखाच्या स्मरणें जीवा, शान्तव ती भूक.
दिधलें तों स्मृतिचित्र काढुनी प्रेमळ कवितेने —
अभाग्यास या दुसरें कुठलें लाभावें देणें ! ७

ता. २ ऑक्टोबर १९२२ ]

## ३४ सवत

केला निश्चय की बघेनच छबी आहे कुणाची अशी
की न्याहाळित तीस नित्य बसती निःश्वास सोडीत ते;
ते गेल्यावर मागलें स्मरुनि तें पस्तावतें मी कशी !
माझ्या नीचपणास निन्दित अता तप्ताश्रु मी ढाळितें ! १

मेजाचे खण शोधिले बघुनिया नाहीत की ते घरीं,
होती ती प्रतिमा तिथेच —— परि ती माझीच होती बरें !
प्रेमें काढविली यदा चमकलें वासन्तिका सुन्दरी !
काळाने नव्हते तदा खरडिले माझ्या कपाळीं चरे. २

मी माझीच छबी बघूनि हसलें गालीं; पुन्हा ठेविली
ती जेथील तिथे, नि ते नित तिच्या आराधनीं रङ्गत.
आला राग परी अखेर, न रुचे जीवन्त मी आजची;
मेली मागिल ती – तिच्यावर पिसे ? भावे तिची सङ्गत ? ३

पाहूनी सवतीस मत्सर असा पोटामधे पेटला
कीं माझीच छबी, परन्तु सटवी मी नष्ट केली त्वरें !
येअी का कधि कल्पना चुकुनिही कोणाचिया मानसीं
कीं स्त्री वर्तन हें करील असलें वेडावुनी मत्सरें ? ४

ता. ११ डिसेंबर १९२२ ]

## ३५ राजकन्येस जोहार

लावण्यमञ्जरी, दिव्य परी,
तुजवरी धीट मी प्रेम करीं. ध्रु०
मोर कुठे तो, कुठे पारवा ?
व्याध कुठे तो कुठे काजवा ?
भलतिकडे जरि झुके ताजवा, समता न बघे प्रीति तरी ! १

परिवार झुले तुझ्यासभोती,
अुपायनें किति रत्नें – मोतीं ! —
पायरीवरी मम हृज्ज्योती, नमन तुझ्या कळसास वरी. २

दृष्टि क्षणभर तुझी सुधामय
वरसुनि मजला करो निरामय,
पुरे दुरुनि जरि असेल आश्रय, सुखें अुन्हीं मी काम करीं. ३

ता. ९ फेब्रुवारी १९२३ ]

## ३६ रागिणी विधवा

[ जाति दिण्डी ]

जीव तळमळतो, कुठे खरी प्रीती ?
जीव तगमगतो, काय लोकरीती ?
जिवा, तुजविण का ओस मर्त्य-लोक ?
जिवा, जातां तू कोण करिल शोक ? १

जों न कळलें सौभाग्य तों निमालें,
अितर रडती बघुनीच रडूं आलें;
खुल्या वातावरणांत शिक्षणाच्या
क्वचित् छाया आल्यास त्या क्षणाच्या. २

दिवस थिल्लर खिदळण्या-खेळण्याचे,
निरनिराळीं पुस्तकें घोकण्याचे,
कल्पनेचे प्रासाद अुभविण्याचे
खुळ्या कर्मठ पोरींस हासण्याचे. ३

फिरत असतां टेकड्यांवरी आम्ही
पुढे धावत कल्पना स्वैर नामी;
आणि विद्यार्जनदशा जणु अुषा ती
अहो सन्ध्या वाटते अता रातीं. ४

तदा म्हटलें होअीन रमाबाअी,
समाजाच्या सेवेंत किति नवाअी !
दुष्ट रूढींची आणि कायद्यांची
शृङ्खला ही अबलांस हाय जाची ! ५

“ नव्या खण्डाची वाजवा तुतारी
पुरुषजातीशी व्हाच असहकारी ”
असें म्हटलें शाळेंत सभास्थानीं—
वृत्ति नाही राहिली ती ठिकाणीं ! ६

हौस शिकण्याची, नटुनि मुरडण्याची,
पुढे येण्याची, ललित लेखनाची
होय दुबळी, जाणवे नव अुणीव,
आणि येअी माझीच मला कीव. ७

अघनतेची मज वाटली न खन्त,
कीर्ति वाटे अुजळील मम दिगन्त,
कष्ट हौसेने मी करीं सलील,
आणि मानीं मी किती भाग्यशील ! ८

अेक दिवशीं परि होय चमत्कार,
स्पष्ट अजुनी ती आठवे दुपार,
दृश्य होतें कितिकदा पाहिलें तें,
अर्थ कळला त्या क्षणीं परी तेथे. ९

करित होतें जोडपें चिमणियांचें
काम घरटें वळचणित बान्धण्याचें;
जाय अुडुनी तें भुरं मग परन्तू
येअि घेअुनि चोचींत गवततन्तू. १०

जाय दारावरुनि तों मिरवणूक,
घोष मङ्गल दाखवी मला चूक —

खोल हृदयीं चळवळे मग निराशा,
पडे हातांतुनि गळुनि ‘ तर्कभाषा.’ ११

क्षणापासुनि त्या राहिलें न हूड,
कोण हुरहुर मम जाणणार गूढ ?
मान करुनी वर पाहवें न लोकीं.
मग्न झालें मी काहि तरी शोकीं. १२

पुस्तकांचा जरि पसरला प्रपञ्च
अर्थ न दिसे परि मला परमिदञ्च;
आणि दिमतां अवलाच मी अनाथ
नको जाणें वाटलें समाजांत. १३

न्यूनतेची जाणीव सदा जाची
मीहि दैवाचें साह्य तदा याचीं;
दीन दुबळी जाहलें आणि भ्याड,
दिसे आशा ती मृत्युच्या पल्याड ! १४

गमे नाही सुख पुढे जर कपाळीं
रसिक नवतीची फुकट ही नवाळी !
गुप्त झुरणीचे, बेगडी स्मिताचे,
दीर्घसूत्री हे दिवस जीविताचे ! १५

दुक्ख पोरीचें जाणणार माय
दृष्टि ठेवी ती पगारींच हाय !
चोरटें हें मग दुक्ख कथुं कुणाला ?
काय वाऱ्याला ? काय पुस्तकाला ? १६

अुसाशांची ही पत्रिका कुणाला ?
कुणासाठी ओघळे अश्रुमाला ?
माळ घालूं ? आणखी ही कुणाला ?
ज्ञात नाही त्या गूढ निर्गुणाला ? १७

शून्यसंशोधन नको मला सभ्य,
रागिणीला त्यामधे काय लभ्य ?
शून्यसंशोधन नको मज अगम्य,
कसें भेटे तें ब्रह्म सगुण रम्य ? १८

वरुनि वशिल्याला आणखी धनाला,
शोकलोलुप परदेशशिक्षणाला,
माल्यपाशीं निर्माल्यवत् पडावें,
दास्यपङ्कीं सौभाग्य तेंच ठावें ! १९

जीविताची पङ्गुता कशी जाय ?
अुडी घ्यावी गर्तेत- वा अुपाय ?
भरे धडकी पोटांत या विचारें
मन स्वप्नावर तरङ्गे बिचारें. २०

हृदीं प्रीतीची गोड चाड साची,
भीति वाटे परि अन्ध धाडसाची—
कशा अबला आमुच्या हिन्दुबाला
मिटुनि डोळे गोविती निज जिवांला ? २१

कुठे पापाची, कुठे कुचेष्टेची,
कुठे कुतुकाची, कुठे रसिकतेची,

कुठे भित्री दृष्टि ती जरि किंवेची—
कुठे प्रीतीच्या शान्त जाणिवेची ? २२

निराशेच्या अुठतात मनीं लाटा,
सले पूर्वस्मृतिचा न जरी काटा,
प्रश्न पुढती परि सदा—कुणासाठी ?
ध्येय कोठे तें मूर्त ? कधी गाठी ? २३

अन्तरांतुनि वर फुटे रसोद्रेक,
करूं कोणावर तयें सदभिषेक ?
आर्यपुत्राला कवण आत्मदान
करुनि साधूं अिसहख्यसुखनिधान ? २४

धर्मकामार्थी सप्तपदी साची
समत्वाने सहकारिता द्वयाची;
कुठे पुरुषोत्तम हाय परी माझा,
सखा प्रेमळ, गुरु, दास आणि राजा ? २५

ज्ञात नाही का कोण, काय नांव ?
मना किति रे तू भ्याड आणि साव !
म्हणूं तुजला मी खुळा वा शहाणा ?
नांव घ्याया का हवा तुज अुखाणा ? २६

वाममार्गें केव्हा न जावयाचा
मन प्रेमळ अन् चतुर जो वयाचा,
नवाअीने घे जनीं अग्रमान,
आद्य पङ्क्तीं तो, कोण त्यासमान ? २७

शान्त चर्या, हासरी, अुन्च यष्टि,
परीक्षांच्यासाठी न कधी कष्टी;
होय त्यांतुनि अुत्तीर्ण तो सलील
वृत्ति खेळाडू विनोदी सुशील. २८

मूर्ति मैदानीं चपळ जंव विराजे
किर्ति तेव्हा चौफेर तिची गाजे;
चेण्डु सीमा कितिकदा मग विलङ्घी,
घेत टाळ्यांचा कडकडाट जङ्गी ! २९

स्वच्छ कपडे बेतीव सभ्य साधे,
छचोरीची ती भैट लव न बाधे,
पायगाडीवर बसुनि सरळ ताठ
चतुर गर्दींतुनि काढण्यांत वाट. ३०

आणि करितां झुन्जारवर्गवेष
शान्त वीरश्री खुले ती विशेष !
शिस्त आज्ञेची लोचनीं दिसे जी
कुठे सैनिक जो तिज मनीं न मेजी ? ३१

नर्म भाषण तें मधुर खोचदार,
लीनतेचा अभिजात तो विहार;
केस कुरळे लोचनीं तर बहार !
जणू अवतारी अश्विनीकुमार ! ३२

क्वचित्काळीं बोललें चार शब्द
तीच होअीं मी घाबरुनी स्तब्ध;

कशी बोलूं ? मज कल न तो कळेना;
सभ्य विनयी ते, करिति परी दैना. ३३

वायु लहरी तर मुका सोनचाफा,
मेघ रडवा दवडील तोण्डवाफा !
आणुं कोठुनि मी सखी चित्रलेखा ?
जगीं अबलांची गतिच कठिण देखा ! ३४

असुनि सन्निध आहोंत दूर दूर,
अशा विरहाचा मूक रागसूर;
करुनि हिय्या हुकल्यास हृदयभङ्ग !
आणि म्हणतिल जन, ' नवे काय ढङ्ग ! ' ३५

लौकिकाची परि लाज कशाला ती,
प्रेमसौख्याची जरी होय माती ?
नसे संशयसिन्धूस तळ, न तीर —
जरि न अश्रूविण त्यांत अन्य नीर. ३६

होय म्हणतां ते स्वर्गलाभ येथे;
परी जर का क्षण सोडुनी दयेते
स्पष्ट हासुनि म्हणतील ' शक्य नाही ' —
तूच वेडी पण तुज न कळे काही. ३७

ता. २४ ऑगस्ट १९२३ ]

## ३७ प्रेमळे, जाशिल का सोडून् ?

[ जाति अञ्जनी ]

प्रेमळे, जाशिल का सोडून् ? ध्रु०
पत्त्यांचा बङ्गला अुभविला,
हलक्या हातें खपुनि सजविला,
जों न अजुनि वर कळस चढविला तोंच तया मोडून् – १

अेक फुलाचें रोप लाविलें,
पाणी दोघांनीहि शिम्पिलें,
परी अवेळीं येतीं न फुलें म्हणुनि रोप झोडून् – २

करूं समस्या म्हणुनी पहिला
चरण तुवां, मी दुसरा लिहिला,
तिसरा न सुचे तुजला वहिला म्हणुनि लिखित फाडून् – ३

स्वैर वावडी हवेमधे ही
ताण विलक्षण सड्यास देअी,
ओढुनि कसची जवळी येअी ? सूत्र तसें तोडून् – ४

ता. १० नोवेम्बर १९२३ ]

## ३८ चान्दण्यांतील हुरहूर

[ जाति मनमोहन ]

या वेड्या तेढ्या मनीं माझिया कहर करी हुरहूर् ध्रु०
शान्त किति या अुन्च जागीं,
तगमगें मी परि अभागी —
का व्यर्थ पडावें असें चान्दणें सुन्दर गार टिपूर् ? १

अमृताने सृष्टि न्हाली,
चन्द्रिकेचें क्षौम ल्याली,
हा हिजवर अुधळे चूर रुप्याचा का हिम का कापूर् ? २

अिन्दु आनन्दाश्रु गाळी,
श्यामलेच्या चारुभाळीं
मधु खिन्न फाकतो नव नवरीच्या आनन्दाचा नूर्. ३

दुग्धगङ्गा गुप्त गगनीं,
अुत्सवीं या येअि भुवनीं—
ये अधान्तरीं हा सिरितेवरुनी लोटत पाण्डुर पूर्. ४

शैलशिखरीं शुक्र न लपे,
कृत्तिकांचा पुञ्ज हरपे,
हो ब्रह्महृदय तो फिकट, होअुनी जाअी व्याध चुकूर्. ५

अन्धुके ती गर्द झाडी,
जींत नगरी झोप काढी,
परि दिवे फिकट ते, खडा पहारा करणें त्यांस जरूर्. ६

शुक्र टाकी नजर मागे,
अस्तगिरि अन् अुतरुं लागे,
हिण्डतों टेकडीवर रेङ्गाळत मीच चिन्तनी चूर्. ७

सृष्टि अगदी शान्त होअी,
जाय झोपीं वायु तोही,
वेताळ मनींचा न निजे – छे, पण रात्रिचाच हा शूर् ! ८

कातळाच्या वर पडावें,
चान्दणें हें पाङ्घरावें,
आणखी करावें काय हराया हृदयींचें काहूर् ? ९

सूर तों हे कुठुनि येती ?
अन्तरींचा ठाव घेती —
छेडितें कोण हे सारङ्गीवर वागीश्वरिचे सूर ? १०

जवळ आले, स्पष्ट झाले,
दूर गेले, लुप्त झाले,
जीवास लावुनी अधिकच चटका गेले-गेले दूर ! ११

हाय ! माझें ध्येय का तें
गूढ दुरुनी गीत गातें ?
निर्भरालिङ्गनाविण न भरे पण माझें मन दुष्पूर ! १२

ता. २० जानेवारी १९२४ ]

## ३९ कञ्चनी

कञ्चनी रसरङ्गाची खाणी,
शेकडों हृदयांची ही राणी
लागली गावया सहज पाखरावाणी. १

आधिच गोड जनानी गळा
कोवळा खुले, चढे मोकळा,
त्यांतून वश हिला सङ्गीताच्या कळा. २

साधें गीत किती हृत्सङ्गी !
साथ करि चुरशीने सारङ्गी,
घे तान भिङ्गरीपरी झरें तन्वङ्गी. ३

पायीं पैंजण रुमझुम् छुमती,
बोलहि थकुथय थक्थय अुठती,
ध्वनि रम्य अभिनयें विशद करी ही सुदती. ४

तनू ही सडपातळ गुल्छडी,
घवघवे सुरत पाक फाकडी,
नादांत तरङ्गे जशी नभीं वावडी. ५

दावी किति नाचांत चलाखी!
झगमग खेळे मग पोशाखीं,
गिर्कीस विकासे घोळ, झळकती वाकी. ६

कान्ति तर सोनें बावनकशी,
कन्चुकी नील, साज गुल्बशी,
—अुल्काच अवतरे ही किंवा अुर्वशी! ७

धीटच परि भलती भ्रूलीला
न रुचे अशा नृत्यवल्लीला;
या विशाल नयनीं दिसे कलाच सुशीला. ८

दिव्यांचा लखलखाट माण्डवीं,
वायुही गीतगन्ध साठवी;
रङ्गली किति सभा नृत्यगानलाघवीं! ९

हृदयें अेकवटुनि या काळीं
हलतीं शान्तपणे वरखालीं,
पण लाट अुसळुनी पडे समेवर टाळी. १०

वाहवा ! ऐकुनि किञ्चित् लाजे,
गालीं स्मित मधु पुसट विराजे,
किति ऋजू कुरङ्गी नजरफेक ही साजे ! ११

वदनीं मुग्ध मधुरता राही,
दावी काय कलाचतुराभी
भाबडी साबडी सरळ पोरसवदा ही ! १२

अभिनव अविट सुखाची झरी
गुणी तू सुगर रूपसुन्दरी,
कञ्चनी, खचित तू श्रेष्ठ काव्यमञ्जरी ! १३

लोटला शान्त रसाचा मजा,
चन्द्रिका गमशी कीं सारजा !
फुलवूनि झुलविशी कोळपल्या काळजां. १४

कष्टशी अशी हृदयरञ्जनीं,
हीन तव कला, जात कां जनीं ?
या कृतज्ञास तू वन्द्य सदा कञ्चनी ! १५

ता. ९ एप्रिल १९२४ ]

## ४० हाकाटी

[ अभङ्ग ]

१ कशासाठी ? कोणासाठी ?
चाले अन्तरीं हाकाटी.
हृदयींची आस आस
चूर झाली सावकाश.

प्रीतिकीर्तीचे डोलारे
गेले कोसळून सारे.
जनतेचा जो भुकेला
तिने केला अर्धा मेला.

झाली जिवाची चाळण,
धीर चालला गळून
बण्डखोर तारुण्याचें
रक्त नसोनसीं नाचें;
परी क्षीण माझ्या मनीं
श्वास कोठे सञ्जीवनी ?

२ पुस्तकींच्या माणकांच्या
व्यवहारीं होती काचा
व्योमचुम्बी कल्पवृक्ष
होती कोळपून रूक्ष
कल्पनेच्या स्वर्गातून
खाली आदळे तरूण
पूज्य येथे अेक माया
तिच्यावीण सारी माया !
कृपा तिची होअी तर
पङ्गु अुलङ्घी डोङ्गर !
मुका होअी बृहस्पति,
मिळे पाप्याला सद्गति !
सर्व शक्तींची जननी
हीच भवींची तरुणी.

३ मर्दें अन्हेरिलें हिला,
आता प्रभाव पाहिला
आता पाहिला प्रभाव
काही लागेना निभाव
सत्ता करी तेंच सत्य
मान वाकविणें पथ्य
जरी पीडा दे कायदा
न्याय त्याला प्रेमें वदा
लोक-रावी येथे ओठीं
हाव सुल्तानीची पोटीं.
प्रेम सुवर्णाच्या मागे,
धन जोडी जीवधागे.
धूळ झाली येथे ध्येयें
आणि वेदान्तप्रमेयें.

४ विकूनिया स्वत्वमणी
नको साम्राज्यरमणी !
राहो शुद्ध अन्तरङ्ग,
होवो आकाङ्क्षांचा भङ्ग,
बन्द होअूं द्या वाजणें
थोरवीचीं शहाजणें
विस्मृतीच्या गङ्गेमाजी
नामदीप लोटा आजी.
दोन दीस करमाया
नको मुलाम्याची माया
मग काय हवें तरी
हेंच कळेना अन्तरीं.
आंत बाहेर हें सुनें
वाटे नको नको जिणें !

५ तुकोबाच्या पाण्डुरङ्गा,
भावनेच्या अन्तरङ्गा!
ओरी हीच चन्द्रभागा,
हीच पण्ढरीची जागा!
तुम्ही त्रैलोक्याचे राजे
तुम्ही मायबाप माझे.
झाला अुशीरां आठव
तरी येअूं द्याहो द्रव.
अुचलून घ्या हो मला
घट्ट अुराशी आवळा.
तेंच माझें परन्धाम
सुखी जेथे आत्माराम.
मग थाम्बेल हाकाटी
कशासाठी? कोणासाठी?

ता. २२ जुलै १९२४]

# ४१ माझी ताअी

[अभङ्ग]

१ माझी ताअी, हिरकणी
भूमीवरील चान्दणी
प्राप्त यौवनवैभव
पाय काढीना शैशव
गौर लाडिक या मुखीं
खेळे बाळपण सुखी
आज्ञा प्रेमळ पाळणें
आणि निश्चिन्त खेळणें
चाले वसन्तविलास
खेळे प्रसादाशीं आस
पोटीं धरी निशा शान्त
अुषा रङ्गवी दिक्प्रान्त
गेली काल स्मृतीपार
नाही अुद्याचा विचार
आजच्या या लाटेवरी
बाललक्ष्मी तू हासरी!
खेळे नेत्रीं कौतूहल
आणि भावना कोमल
स्वामी कैवल्याचा तुला
बघतांच व्हावा खुला!
२ माझी ताअी तू छकुली
चल खेळूं भातुकली
दृष्टी कशाला स्तिमित?
कां हें आश्चर्याचें स्मित?

भस्म माझ्या केसावरी
काय त्याची चिन्ता परी ?
माझ्या जीवीं खोल भूक
शमवाया तूच अेक
तुझ्या बोलाचाच भात
करी शान्त जगतांत
शान्तिहीन दिसन्दीस
जीव होअी कासावीस

ताअी माझी तू धाकुली
माझी अुरली माअुली
नको थोर स्वतन्त्रता
दे ग बाळपण अता
दूर करो जग मला
म्हण परी तू आपला
हात धरून ने झणी
मज वैकुण्ठभुवनीं !

ता. २३ जुलै १९२४

## ४२ रसिकास

[ जाति मुद्रिका ]

हें साधें भोळें गीत आवडे तुला,
सङ्कोच, भीति कां येथे ?
घे पुरवुनि तव हेतुला. १

ये आंत, बैसुनी जवळ हृदय कर खुलें,
नच अुपचाराची बाधा,
सर्व हें समज आपुलें. २

ही गड्या, न माझी मुळी काव्यसम्पदा,
ही कृपा गूढ शक्तीची,
म्हण तीस “ धन्य शारदा ! ” ३

सहकम्प पावतां हृदय तुझें पारखी
मज जोड पावली सारी,
देणगी न या सारखी. ४

अनुभूति, कल्पना क्षणिक तरल वायवी,
गुङ्गवून तिजला नादीं
अडकवून ठेवी कवी. ५

शब्दाच्या अवगुण्ठनीं हसे सुन्दरी
ही तिचीच बघ पडछाया,
जी वसे तुझ्या अन्तरीं. ६

म्हणुनीच अैकशी गीत गुङ्ग होअुनी,
ठेविशी अुलट करुनी तू
मज तुझाच रसिका, ऋणी. ७

हें तन्मयतेचें मौन असें बोलतां
स्तुतिशब्द कशाला वाया
हृदयास हृदय बोलतां ? ८

माजला स्तुतीचा तरी क्षणिक गल्बला !
कीर्तिचा स्वर्ग कोणाला
रे मेल्याविण लाभला ? ९

मी माझ्यास्तव गायनें जरि गुम्फलीं
भेटतां रसिक तुज अैसा
स्नेहाळ तुला वाहिलीं, १०

ता. २६ सप्टेम्बर १९२४ ]

## ४३ सङ्गमोत्सुक डोह

[ छन्द ]

अेकत्र गुम्फून जीवित-धागे
प्रीतीचें नर्तन नाचलों मागे
अेकटा अुभा मी तेथे
भोवती शोधीं प्रियेतें;
न दिसे कोठे; का सोडून गेली?
लोपते का कधी प्रीति अुदेली! १

दृष्टीस पडे हें " भयाण मात्र
रेताड कोरडें अुथळ पात्र!
प्रिया न जर सङ्गतीं
तर हो कुण्ठित गति.
प्रीति या हृदयीं अथाङ्ग खोल
तुडुम्ब भरली परन्तु फोल. २

कोणी ये, हिणवी, " भावना मेली
हासेना बोलेना करीना केलि!"
खट्याळ वादळी वारा
दौडत येतां भरारा
अुठती चञ्चल बाह्य तरङ्ग,
अन्तरीं जडता न पावे भङ्ग. ३

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून हें कृष्ण वसन देहीं;

सहकम्प पावतां हृदय तुझें पारखी
मज जोड पावली सारी,
देणगी न या सारखी. ४

अनुभूति, कल्पना क्षणिक तरल वायवी,
गुङ्गवून तिजला नादीं
अडकवून ठेवी कवी. ५

शब्दाच्या अवगुण्ठनीं हसे सुन्दरी
ही तिचीच बघ पडछाया,
जी वसे तुझ्या अन्तरीं. ६

म्हणुनीच अैकशी गीत गुङ्ग होअुनी,
ठेविशी अुलट करुनी तू
मज तुझाच रसिका, ऋणी. ७

हें तन्मयतेचें मौन असें बोलतां
स्तुतिशब्द कशाला वाया
हृदयास हृदय बोलतां ? ८

माजला स्तुतीचा तरी क्षणिक गलबला !
कीर्तिचा स्वर्ग कोणाला
रे मेल्याविण लाभला ? ९

मी माझ्यास्तव गायनें जरि गुम्फिलीं
भेटतां रसिक तुज अैसा
स्नेहाळ तुला वाहिलीं, १०

ता. २६ सप्टेम्बर १९२४ ]

# ४३ सङ्गमोत्सुक डोह

[ छन्द ]

अेकत्र गुम्फून जीवित-धागे
प्रीतीचें नर्तन नाचलों मागे
अेकटा अुभा मी तेथे
भोवती शोधीं प्रियेतें;
न दिसे कोठे; का सोडून गेली ?
लोपते का कधी प्रीति अुदेली ! १

दृष्टीस पडे हें " भयाण मात्र
रेताड कोरडें अुथळ पात्र !
प्रिया न जर सङ्गतीं
तर हो कुण्ठित गति.
प्रीति या हृदयीं अथाङ्ग खोल
तुडुम्ब भरली परन्तु फोल. २

कोणी ये, हिणवी, " भावना मेली
हासेना बोलेना करीना केलि ! "
खट्याळ वादळी वारा
दौडत येतां भरारा
अुठती चञ्चल बाह्य तरङ्ग,
अन्तरीं जडता न पावे भङ्ग. ३

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून हें कृष्ण वसन देहीं;

अेकली कौमुदी हासे,
ढगांत खिन्नच भासे.

स्तिमित नजर लाविती तारा;
मावळे अुत्साह नाचाचा सारा. ४

खाअून रवीचा प्रखर ताप,
कष्टून, लागून जीवास धाप,
प्रदोषसमयीं येतीं
क्षणैक विसावा घेतीं,

घरास वळतीं माणसें गुरें;
अन् माझें अन्तर निःशब्द झुरें. ५

अम्बरीं अिन्द्राची दुन्दुभि वाजे,
भीषण सुवर्ण-सुन्दरी साजे,
मेघांत हासत खेळे,
लवत नाचे ते वेळे

देवांचा भरून येअून अूर,
सहस्रनयनीं ओसण्डे पूर ! ६

नाचेल मयूर अवनीतलीं,
मण्डूक ते द्विज गातील जलीं,
होअून धुन्द त्या क्षणीं
धावून प्रिय साजणी

देशील ना मज कसून खेंव ?
बान्धितील वर तोरण देव. ७

म्हणत मङ्गल जङ्गलगान,
कडयाहून खाली लोटून प्राण,
होऊन काषायरङ्ग,
सङ्गांत पूर्ण निस्सङ्ग,
पावूं गे समाधिसागरी अन्त !
— अजून सम्पेना वैशाख हन्त ! ८

ता. ११ ऑक्टोबर १९२४ ]

## ४४ माझें माहेर-सासर

[ अभङ्ग ]

कन्या सासऱ्यास जाअी
मागे परतून पाही
डोळे वळोत बापुडे
पाय जातातच पुढे
आसवांच्या भिङ्गांतून
पुढे रम्य ध्येयखूण
सय मागील ती गोड
गोड पुढीलाची ओढ
पोटीं नवलाअी, आस
आणि भावडा विश्वास
दिला करून नवरा
जाय हौसेने त्या घरा
पाणी अुलङ्घी शेवटीं—
आअीबापें अैल तटीं ! १

कां न होअी अैसें मला ?
कां न ओढिशी प्रेमला ?
सङ्कटींच सय व्हावी
—कां न गूढ हौस ठावी ?
लागून तो गोड छन्द
व्हावा मङ्गल आनन्द
शिर तुझ्या वक्षावरी
हेलकावे ते संसारी
व्हावी मायेसवें गोड
तुझ्या सान्निध्याची जोड
अङ्गीं नाही आता त्राण
सोसायला ओढाताण
कां न होशी विश्वम्भर,
तूच माहेर-सासर ? २

ता. १५ जून १९२५ ]

# ४५ अिन्शाल्ला

धर्मवेड्या मुसलमानांच्या वृत्ति आणि महत्त्वाकाङ्क्षा कोणत्या आहेत हें साङ्गायला नको; परन्तु मुसलमानांचें सामर्थ्य कशांत आहे हें समजून घेणें कोणालाहि अुद्बोधक व हितकारकच होअील.

[ वृत्त शार्दूलविक्रीडित ]

अल्लाच्या मुलखांत अेकच करा अिस्लाम भूमीवर !
वाटे ती तर युद्धभूमिच तुम्हां जेथे न तो अीश्वर;
' अिल्लल्लाहु अिलाह ला ! ' गरजुनी ' अल्लाहु अक्बर् ! ' तुम्ही
' सारे भाविक बन्धु ! ' अैक्य-समतायोगें करा मर्दुमी १

आहे अेकच तो मुहम्मद तुम्हां तो अन्तिम प्रेषित,
सर्वांना प्रभुवाक्य अेकच असे, साधें कुराणें हित;
युष्मद् दृष्टि वळे निमाजसमयीं त्या अेक ' काब्या 'कडे,
मक्का अेकच पूण्यभूमि तुमची, तेथेच यात्रा घडे. २

साधा धर्म मुहम्मदी, अुगिच तो घालीच ना बन्धनें,
दावा साहस आणि घ्या यश; पुनर्जन्मीं न आशा म्हणे.
हा अूर्जस्वल धर्म वन्द्य तुमचा बेलाग किल्ला सदा,
अिन्शाल्ला तुडवीत काफिर जगीं ' अल्हम्दु लिल्लाह् ! ' वदा. ३

कां व्हावा परधर्म सह्यच ? नका त्या शान्तिवादा भुलं –
लोकीं अेकच सत्य, काफिर जिथे त्याला तिथे ' अुक्तुल ' –
जो जो काफिर त्यास दुर्गति सदा ! त्याला न द्या आसरा,
जो जो मुस्लिम त्यास सद्गति सदा ! अुत्कर्ष त्याचा करा. ४

ताम्बारे न तिळें कधीच तुमचें या दास-देशामधे,
गाजी होअुनि बुत्शिकन् धन लुटा सामर्थ्यसत्तामदें;

मृत्यूची न तुम्हांस भीति, तुमची श्रद्धा असे ठाम ही —
अैश्वर्यैंच, हुतात्म होअुनि जगा या येथ भोगा मही. ५

भोगैश्वर्य नसे निषिद्ध अिथलें, सेवूनि ही माधुरी
बेहेस्तांत पहा बहात्तर पुन्हा नेत्राभिरामा हुरी —
रौप्याङ्गी, चिरयौवना, विधुमुखी, कस्तूरिकाकुन्तला,
मत्ताक्षी, सरुयष्टि, हारितगती, पीनस्तनी पेशला. ६

अौत्सुक्यें बघतात वाट वर त्या स्वर्गीय पाटस्थलीं
जेथे बुल्बुलपङ्क्ति पाटलसुमाभावीं न अस्वस्थली;
द्याया मद्य पवित्र ओतुनि तिथे सौन्दर्यवान् भृत्य ते
लालित्यें पुरवूनि हौस तुमची होती कृतकृत्य ते. ७

मध्यस्थी तुमची करीलच नबी, शङ्का पहा यांत ना;
अल्ला फेकिल काफिरास तपनीं द्याया महा यातना;
सारासार तुम्ही विचार करितां अन् दावितां साहस,
शौर्यैं ‘ दीन् ’ म्हणतांच दीन दुनिया होअी तुम्हाला वश. ८

हिंदुस्थान न राष्ट्र, खास तुमची ही भोगभूमी असे,
अैशाराम मिळे अिथे खचित तो त्या शाम-रूमीं नसे;
कोणा क्षत्रिय-सुन्दरी नृपसुता मर्यम् झमानी वरी ?
— त्या श्रेष्ठासच जो स्वराज्य पसरी या हिन्दुभूमीवरी. ९

ता. १४ जुलै १९२५ ]

## ४६ मराठबाणा

महासिन्धु याला असे पाठिराखा, तसे साह्य सह्याचलाचे कडे,
खडे दुर्ग साल्हेर, फोण्डा, पराण्डा, अशेरी असे दक्ष चोहीकडे;
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणदेही, परी लोहपाणीहि अज्ञात या;
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा, मान्जरा, वैनगङ्गा तया. १

महात्मा खरा जो स्वधर्माभिमानी परी धर्मवेडास थारा न दे,
समत्वें गुणग्राहकत्वेंच योजी स्वकीयांस जो राष्ट्रकार्यामधें,
सदावन्द्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्रसम्राट् शिवाजी प्रभू
तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न का सन्तमाता महाराष्ट्रभू? २

जिचा 'अमृतातेंहि जिङ्कील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका,
पहा भिन्नजातीय पुष्पाकरांहीं दिसे गालिचा की हिची वाटिका,
मराठी अशी ज्ञानदेवी जयाची असे मायबोली मराठीच तो,
हृदीं रक्त दे साक्ष तो बन्धु माझा, कुठेही असो अुच्च वा नीच तो. ३

मराठीस अन्याय कोठेंहि झाला, स्वदेशीं विदेशीं कुणीं गाञ्जिलें
मराठी कसा मी न सन्ताप माझा धडाडे जरी तीव्र दुक्खानिलें?
मराठी जनांचेंच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशीं तरी—
प्रसादें तुझ्या कोणती व्यक्त आशा करू अन्य हे वन्द्य वागीश्वरी? ४

ता. ३१ डिसेम्बर १९२५]

## ४७ खरा शूर

[ओवी]

१ कुळवन्ताची हो पोर
शोभे शुक्लेन्दूची कोर!
चाले पहात समोर.
शाळेला ती.

२ अहो भर रस्त्यामाजी
बोले धटिङ्गण गाजी,
"मारू पाखरूं पहा जी
नवलाचें!"

३ घाली अुडी तो दाण्डगा,
धरी शेळीला लाण्डगा,
लोक गोळा झाले बघा,
मौजबघे.

४ होअी बाला ती बेशुद्ध,
लोक अुभे हतबुद्ध !
– मेल्या आअीचें का दूध
प्याले होते ?

५ दूध वाघिणीचें प्याले,
तरी शेळपट झाले !
मोठ्या व्यवस्थेने चाले
स्वत्वरक्षा !

६ तिची धोक्यामध्ये अब्रू
अेकाचीही चढे न भ्रू
अुभे सुसंस्कृत गब्रू
वेषवीर.

७ तों ये लङ्गोट्या अडाणी,
अशिक्षित कोणी प्राणी
परी डोळ्यामध्ये पाणी
पौरुषाचें.

८ अङ्गीं तारुण्याचा जोम,
प्याला सन्तापाचा सोम,
दीन शान्ततेचा होम
केला झणी –

९ येतां निर्वाणींचा क्षण
पाही कोण परिणाम ?
विसरावें देहभान
हाच धर्म.

१० गेला कापून कल्पान्त.
हाणी छातीवर लाथ
घाली नरडीला हात
त्या पशूच्या.

११ स्त्रीची रक्षायाला लाज
पुढे त्वेषाने ये आज
नरीं तोच नरराज,
धन्य तोच.

१२ अुडी सङ्कटीं घेअील
ठोसे खाअील देअील
वेळीं कामास येअील
तोच धन्य !

१३ आले कायद्याचे दूत,
आला अुद्वारांना अूत,
कोणी म्हणे, "खरा पूत
माय व्याली."

१४ पडे पुण्ड गतप्राण,
मुक्तिदाता बन्दीवान !
नरहत्या न लहान
गुन्हा जाणा.

१५ म्हणा पुरुषाला पुण्ड,
करा कैद किंवा दण्ड,
परी तुम्ही सारे षण्ढ
वीर तोच

१६ आता बालेला त्या टाका,
धर्म सनातन राखा!
काय धर्माची पताका
फडके वा!

१७ जा व्हा दुबळ्यांचे काळ
घोटा गुण्डांपुढे लाळ
कां न नरकाचा जाळ
जाळी तुम्हां?

१८ नाही अङ्गामध्ये राम,
रामासाठी कां सङ्ग्राम?
" राम बोला भाअी राम!
राम गेला!"

ता. २० ऑगस्ट १९२६ ]

## ४८ अैकव तव मधु बोल

[ जाति चन्द्रकान्त ]

अैकव तव मधु बोल कोकिळे, अैकव तव मधु बोल् ध्रु०

नकोत मजला मैना, राघू, साळुङ्की, चण्डोल्
नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम हे हिन्दोल् १

अेक तुझा स्वर आर्त खरोखर वाटे मज विनमोल्,
वसन्त नाही अजुनि सम्पला, कां झालीस अबोल्? २

सुखें वसन्तासङ्गे जा मग पहावया भूगोल्,
गा शेवटचा बोल लपूनहि पर्णामाजी खोल्. ३

पाहिन नन्तर वाट वर्षभर दाबुनि चित्त विलोल्,
नको करूं पण आस अेवढी जातां जातां फोल्! ४

ता. २४ ऑगस्ट १९२६ ]

# ४९ वृद्ध कवि

[जाति मुद्रिका]

कां अुठतां ? खाली बसा तरुण मण्डळी,
अुपचार ठेवितां कां हा ?
समताच योग्य या स्थळीं. १

लोचनांत आदर दिसे न हा थोडका,
स्तुतिहून नसे स्नेहाची
ही शान्त नजर गोड का ? २

म्हणण्याचा आग्रह नको, अहो वृद्ध मी;
नव कवनें अैकायाची
परि हौस न झाली कमी. ३

झोपली थकुनि अन्तरीं स्फूर्तिनन्दिनी,
जाहला पराक्रम मागे
जरि थोर आमुच्या दिनीं. ४

बदलली सृष्टि, सम्पले दिवस आमुचे,
ही समुद्धारिणी क्रान्ती
चालली प्रभूला रुचे. ५

मी झालों पिकलें पान आणखी तुम्ही
टवटवीत सुमनें नामी
काव्याच्या कल्पद्रुमीं. ६

वा क्षितिजीं तारे तुम्ही नवोदित पहा,
चालला लयाला माझा
क्षीणांशु काव्यदीप हा. ७

वा भाट अुषेचे तुम्ही, गीत गा नवें,
    –क्रान्तिचें पुढील तुम्हांला
सौन्दर्य दिसें, वानवें. ८

मज तुमचें आशागीत आज अैकुं द्या,
    नसणार कदाचित् येथे
मी अुषा पहाया अुद्या. ९

अन्धार कुन्द देवळांतुनी आमुच्या,
    कां पुराण अैका गातां
कवि मोकळिकीच्या ऋचा ? १०

ही जडता जडुं पाहते, न ही परिणती;
    वर्धिष्णु बाल्य मज लाभे
तुमच्याच पुन्हा सङ्गती. ११

शारदा दिव्य माअुली थोर आपुली,
    अन् बाळें आपण सारीं
सोनुलीं तिचीं सानुलीं. १२

नाचलों खेळलों पुरा, अता भागलों,
    मी माण्डीवर आअीच्या
हा पहुडाया चाललों. १३

परि दिन हा तुमचा, अुठा बागडा तुम्ही !
    तुमच्याच गोड खेळांचें
पाहिन स्वप्न चारु मी. १४

ता. ५ सप्टेंबर १९२६ ]

## ५० कलारहस्य

[ जाति मुद्रिका ]

“ कल्पना तरल किति ! ललित नादमाधुरी,
भूमिका अुदात्त अहा ही
अप्रतिम कलाचातुरी ! १

कवि कोण ? गूढ तच्चरित कळूं द्या जरा,
अन् कोण अहो व्यक्ती जी
वाहवी स्फूर्तिचा झरा ? ” २

कवि कुणी असो, तो मला वाटतो सखा,
फाडुनी हृदय बघण्याचा
पाहिजे क्रूर सोस कां ? ३

पडसाद गोड कविगीत अुमटवी हृदीं,
जवळीक अुपजवी न्यारी
जशि कुमुदमनीं कौमुदी. ४

अुद्दिष्ट असो ती कुणि पार्थिव अङ्गना,
रञ्जवी अधिक तिजहूनी
मम हृदयीं ही व्यञ्जना. ५

आदर्शभूत ती तया, मला कासया ?
हृत्तरलतरङ्गीं माझ्या
ही शोभे पद्मालया. ६

रेखीव अमुक ती असो कुणी कामिनी,
ही शाश्वत मम हृदयींची
मोहिनी कामरूपिणी. ७

हृत्पटावरिल भरकामचित्र टाकुनी
बघण्याला मागिल टाके
ठाकेल रसिक का कुणी ? ८

ता. १० सप्टेम्बर १९२६ ]

## ५१ वादळाची रात

[ ओवी ]

१ होती वादळाची रात
अवसेच्या अन्धारांत
वाट कोणाची पहात
बाला अुभी ?

२ होई विद्युल्लता वर,
खाली बेगम सुन्दर,
दिसे तिच्या मुखावर
काय भाव ?

३ यायचा का प्रेमी वीर
कोणी तरुण अमीर ?
दिसे भेटाया अधीर
कोणाला ही ?

४ परी लागतां चाहूल
फिकें पडावें कां फूल ?
हेरी कोणाचें पाअूल
कानोश्याने ?

५ वीर येतां तो जवळी
दोघें मिळालीं कवळीं
अबला ही आणि बळी
झुन्जार तो.

६ ओसरतां प्रेमपूर
होतीं दोघें पुन्हा दूर
माजे कोणतें काहूर
त्याच्या चित्तीं ?

७ चर्या जाहली भेसूर
जरी भरूनि ये अूर,
निघे निश्चयी निष्ठुर
स्वर त्याचा.

८ “ खालीं आअीबापें खन्त,
झाला अपमानें अन्त,
अन् तू शृङ्गारीं जिवन्त
ताअी केवी ?

९ तूज पळवूनि आणी
–कुळाची ती मानहानि ! –
अन् त्या चोराची तू राणी,
सौभाग्य हें ?

१० ज्यानें धर्म अुच्छेदावा,
ज्याचा घराण्याशी दावा,
त्याच्या प्रेमाचा पुरावा
तू करावा ?

११ नको सप्तसहस्री ती !
माझी मन्सबीं का प्रीती ?
नच स्वीकारी खत्री ती
दासदीक्षा.

१२ कुळ प्रेमाहून थोर
देश कुळाहून थोर
धर्म देशाहून थोर
केव्हाही गे !

१३ आअीबापें गेलीं जेथ
वैरी धाडिला मी तेथ
आता तू मी समवेत
जाअूं वर.

१४ घोर कर्माची ती वेळ
खत्री हत्यारी हटेल
रणीं काटील कटेल
जोहरी तो.

१५ ती घे आवळूनि दात
जातां कट्यार अुरांत !
त्याचा न चुकेच हात
निजवक्षीं.

१६ प्रेतें अेक झालीं तळीं,
होती जगती निजली,
वरी ओरडे विजली
मेघ रडे !

ता. १२ सप्टेम्बर १९२६ ]

# ५२ पोचवणूक

[ अभङ्ग ]

१ घरीं बैसतां का वाया ?
चला बाहेर हिण्डाया
खुल्या माळाला बाहेर
वारें चैतन्यमाहेर
सेवूं पश्चिमझुळूक
गाअूं अुजेडीं अन्धुक
चला करूं या बेडर
वाद प्रिय कलेवर —

कलेवर तोंच अेक
येअी समोरून देख.
कोणी म्हणे, " या साङ्गती
आटपले सारस्वती."
किती धन्दे ! काय अैट !
अन्तीं हीच वाट थेट.

२ फक्त पञ्चवीस जण
घेती अन्तींचें दर्शन
रूक्ष वाळुगोट्यांवरी
थाम्बे कुडी नदीतीरीं
नदीजळ झुळझूळ
हो न थोडेंही गढूळ
शेण्यालाकडांच्यासाठी
का हो साऱ्या खटपटी ?
धुन्दी डोळां, नसीं रग
तृणापरी तेव्हा जग
देह जळे तृणापरी
अुरे सारस्वत परी
प्रभो, कठिण समयीं
धरी सेवक हृदयीं !

३ होतां माझी हीच गती
कोण येअील सङ्गती ?
माझे कौतुकाचे बोल
शारदे, हे सारे फोल.
तुझा साधाया प्रसाद
देवी, केवी घालूं साद ?
ज्ञान माझें हें अैकीव,
जाणशी तू कर कीव.
वेडेंवाकुडें मी गातों
आणि तुझा म्हणवितों
कीर्तीची ही कावकाव
करी कर्णमूळीं घाव.
कोकिळाची आळवणी
याया हवी ती लागणी

ता. १५ सप्टेम्बर १९२६ ]

## ५३ महाराष्ट्र-गीत

[ छन्द ]

मराठीला सङ्गोपून वैभव दे ज्ञानेश
मराठ्यांना मेळवा हा समर्थाचा सन्देश
महाराष्ट्र जन्म पावे धन्य धन्य स्वदेश !
येअी शिव निवाराया सारे दास्याचे क्लेश. १

वतनाचे बन्दे खन्दे आपसांत लढले,
स्वामिभक्तीमध्ये राष्ट्र बुडवूनी चढले,
कुळ-वाडीपायी पहा कलमाही पढले,
परकीयदास्यपङ्कीं स्वस्थ झाले विशेष. २

भान्जलेल्या धर्ममूर्ती रानोमाळ पडती,
गान्जलेल्या हिन्दु देवी जनान्यांत कढती,
खेडवळ मुके जीव दारिद्र्यांत कुढती,
चाले परी अमीरांचा ऐशाराम हमेश ! ३

पण्ढरीचा सन्त तोही भक्तिभाव गौरवी,
आध्यात्मिक मुक्तींतच मानी सुखथोरवी,
राष्ट्रमुक्तीचाच परी अुदयाला ये रवी
योगी कर्म-कुशलाला कशाचें हो अपेश ? ४

मावळींचे प्रामाणिक मावळे हे बावळे,
त्यांच्या पुढे शिद्दी-तुरुकांची छवी मावळे,
नेता यांचा श्रीशिवाजी तेज याचें आगळें,
हर हर महादेव ! चिरञ्जीव स्वदेश ! ५

म्लेञ्छापुढे मराठ्यांनो, कां व्हा दीन, कां वाका ?
फडफडे भोसल्यांच्या प्रतापाची पताका !
अल्पसन्तुष्टता का रे ? ठेवा थोर आवाका !
पसरूं द्या हिन्दुस्थानभर नवा आवेश ! ६

ता. ९ ऑक्टोबर १९२६ ]

## ५४ पाहुं कुठे तुज राया ?

[ जाति साकी ]

पाहुं, कुठे तुज राया कनया, पाहुं कुठे तुज राया ? ध्रु०
मोहरली सहकार चहुकडे घमघमती या राया १
शीळ मात्र तव कुठुनि तरी ती परिचित ये अैकाया २
कोकिळ न दिसे, साद परि पिसें लावी तशि तव माया ३
जवळ बोलवुनि जाशी फसवुनि, कठिणच तव लीला या ४
प्रीति तुला ही मानसचन्द्रा, बिलगुं बघे पण वाया ! ५
मी तव छाया सुखप्रकाशीं बसुं दे मज तव पायां. ६

ता. १५ ऑक्टोबर १९२६ ]

## ५५ अजुनि किती छळतोस्

[ जाति चन्द्रकान्त ]

अजुनि किती छळतोस दैवा, अजुनि किती छळतोस् ? ध्रु०
हृदय करपलें, योग्य अता मज मरुभूमी ही ओस्,
गोड भास तों अिथेहि दावुनि देशी कटु सन्तोष्. १
“ अखेरचा क्षण, जीवन जीवन ! ” जीव करी आक्रोश्,
म्हणशि, “ मृगाक्षीनयनीं पाणी तरल, शमव जा शोष् ! ” २
गुप्त भुकेने मी झुरमुरतां करावया परिपोष्
नभीं कृत्तिका दावुनि म्हणशी, “ घे द्राक्षांचा घोस् ! ” ३
परिस्थितीने घट्ट जखडिशी, फोडूं का हा कोश् ?
क्षणभर झिङ्गुनि सुखप्रकाशीं नाचूं का बेहोश् ? ४

ता. ८ नोवेम्बर १९२६ ]

# ५६ अभिसारिका

नवतिच्या वहरामधि बालिका
करूनी साज तऱ्हेचा निका
चालली लगबगा कोठे अभिसारिका ? १

कोणता राजहंस मानसीं
हुरहुरे ज्यास बघाया अशी ?
किती डौलदार चापल्य हें तिच्या नसीं ! २

चोळी अङ्गामधि जरतारी,
पातळ निळें खडीचें भारी,
सन्ध्येची लाली तनुमन रङ्गविणारी. ३

पुढे तिज ओढी रम्यायती,
वायुच्या लहरीपरि जाय ती,
थबकती बघुनि तिज हरिणें, गति काय ती ! ४

भागुनी विकल होय तनुलता,
स्त्रीची कुसुमासम मृदुलता,
लागतां दृष्टि कोमेजे फुलतां फुलतां. ५

तोंच ये वंशततींतुनि शीळ
अुल्लसित हो युवती श्रमशील,
मनिं म्हणे, ‘ श्यामला, जवळच तू असशील.’ ६

जिवाला अतर्क्य ती लागणी,
मनाची तनूपुढे धावणी,
भेटला काय तिज कुठे जिवाचा धनी ? ७

दिसे तिज कोणाची साअुली ?
लागती कोणाच्या चाहुली ?
ती क्षितिजीं भासे जणु छायाबाहुली. ८

अैशी गूढरागरङ्गेली
नादें दूर कडेला गेली;
पडली का ? न दिसे, का कुणि तिजला झेली ? ९

‘ भेटी जिवाशिवांची घडली,
अवघी संसृतिचिन्ता झडली,
हा स्वभूंसङ्गम ! ’ सन्ध्या अस्फुट वदली. १०

ता. २८ जानेवारी १९२७ ]

## ५७ तूच निर्वाणींचा सखा

[ अभङ्ग ]

तूच निर्वाणींचा सखा
तरी तुला मी पारखा
कुणा कुणासाठी आणि
करीं जिवाचें मी पाणी !
वेड तुझें नाही कां बा ?
तूच सौन्दर्याचा गाभा
चाले रङ्गीत बाहुली
आणि जडे प्रीति खुळी.

मित्र तूच चिदानन्द
मन माझें परी अन्ध,
मित्र सुगीचे साङ्गाती
सुख माझें त्यांच्या हातीं
येतां दुर्दिनाची छाया
लागतों मी तुझ्या पायां
तूच सोडवी हें कोडें –
प्रेम तुझें केवी जोडे ?

ता. ६ फेब्रुवारी १९२७

## ५८ भुकेलें हृदय

[ अभङ्ग ]

१ हृदय अेकाकी
कळवळे भारी
कोकिळ शेजारीं
म्हणे, कूअू !

२ विचित्र स्वप्नांची
सम्पली रजनी
शान्तिलाभ मनीं
परी नाहीं

३ पडे गच्चीवर
गार दहिवर
आणि गहिवर
आंत दाटे.

४ जीव गोन्धळून
होतसे अुदास
म्लानता नभास
सकाळीं का ?

५ मित्र तो अुषेचा
धुक्यांत गवसे,
आशामुखीं हसें
म्लान म्लान.

६ खालती धावती
कामाचीं माणसें
विश्रान्तीच नसे
पोटाला या.

७ भुकेलें हृदय
धडधडे भारीं
कोकिळ शेजारीं
म्हणे, कूअू !

ता. २७ अेप्रिल १९२७ )

## ५९ बुल्बुलास

बुल्बुला, रडशि कां बसुनि दुरी ?
ही अशी प्रतीक्षा फोल पुरी ! ध्रु०
गुलाबकलिका ही बघ फुलली,
गन्धविभ्रमीं बाही जवळी—
अूठ, घाल झड, हृदयीं कवळी ! कण्टकभय का सले अुरीं ? १

कण्टक सन्तत मजही छळतो,
रुधिर न, हा हृद्रङ्ग अुधळतो,
अन्तरङ्गकल अुगिच न कळतो; मित्रच हा, कृति जरि असुरी. २

गुलाब कण्टकहीन असेना,
सुळाकडे ने वसन्तसेना,
श्रीहि साहसावीण हसेना, मर ! जाशिल मग अमरपुरीं ! ३

ता. २७ मे १९२७ ]

## ६० अनामिक वीराची समाधि

हें भव्य कुणाचें गे थडगें ?
वाहती नृपहि सुम-मण्डल गे. ध्रु०

कुठले कुठले येअुनि लढले,
वीर क्षेत्रीं अगणित पडले;
निवारशी जें शव सापडलें, अुचलुनि धरिलें त्यास जगें. १

पोटासाठी कुणी शिपाअी,
वा नैराश्यें यमास वाही,
प्राण घे नि दे, भाण्डण नाही, सत्य काय पण कोण बघे ? २

असेल अन्य क्षेत्रीं लढला,
परिस्थितीशी बिकट झगडला
न कळे जितला अथवा पडला, का चोरुनि कुणि तद्यश घे. ३

नांव कळेना त्या समराचें,
नांव कळेना या वीराचें,
स्मारक पण हें राष्ट्रनराचें !– झुके खरोखर जग अवघें ! ४

सहुनि अुपेक्षा, कहर अवास्तव
असेल झुरला प्रेमवचास्तव,
वाद्यसङ्घ गाजवी अता स्तव, औषध मेल्यावर नलगे. ५

अनामका, तव सरली धडपड
नीज तळीं, जरि वर ही गडबड—
जगच्छान्तिची पोकळ बडबड ! खणखणती कोषीं खड्गें ! ६

ता. २७ मे १९२७ ]

## ६१ अन्धारून आलें

[ अभङ्ग ]

१ अन्धारून आलें,
चिम्ब झालें जग,
स्तब्ध झाले खग
झाडांवरी.

२ पागोळ्या वाजती,
वरकड शान्त,
धुन्दता दिशांत
कोन्दाटली.

३ डोङ्गराची बाह्य-
रेषा लुप्त झाली,
त्यास कुरवाळी
मेघमाला.

४ म्लान या प्रकाशीं
अेकला घरांत
बसें मी पहात
वर्षा–लीला.

५ पाण्याची चादर
जमे क्रीडाङ्गणीं,
पावसाचे मणी
क्रीडतात.

६ काय बरें चुकें
माझ्या अन्तर्यामीं ?
पुढील दर्या मी
केवी तरूं ?

७ चोहीकडे पाणी
अथाङ्ग अफाट
नाही जरी लोट
भिववाया.

८ मागे वाहवेना
पुढे पोहवेना,
अिथे राहवेना,
काय तळीं ?

९ आलों मी अेकला,
जाणार अेकला,
अेकान्त अेथला
कां न साहे ?

[ ता. १४ जून १९२७ ]

## ६२ चन्द्रिका आणि प्रिया

[ वृत्त वियोगिनी ]

किति निर्मळ रम्य चन्द्रिका
तनुची कान्ति तुझ्या जशी गडे !
पडती बघ तारका फिक्या
रमणी अन्य जशा तुझ्या पुढे.
झुळुका मधु मन्द वाहती,
परि झाडी दिसते पहा स्थिर,
दिसशी मृदु भावनांप्रती
दडवूनी जशि शान्त बाहिर.
निशिगन्ध विकास पावती
गुण जैसे तव मोहकद्युती,
मधुगन्धतरङ्ग भावती
विरहीं गोड जशा तुझ्या स्मृती.
किति शान्त शशिप्रभा अगे
शुचि आशा तव जेवि मानसीं !
रजनी रमणीयताच घे !
तव चित्तामधि काळजी जशी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६३४८८ वि: काव्य
क्रमांक १९२६ नों. दि: २८।२।५९

स्वप्न-रञ्जन

सखये, विधु आणि कैरवी
न कधी दूर, परन्तु आपण
जर सन्निध मुग्ध शैशवीं
तर आताच वियुक्त कां पण ?

ता. १९ जून १९२७ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १९२६
संदर्भ शाखा (स्थळप्रत)

## ६३ केवढा अन्याय !

[ छन्द ]

१ प्रेम तुला कळविलें
माझा केवढा अन्याय !
तुझे अन्तरले पाय.

२ स्तुति काव्यदेवतेची
गातां ललित रागांत
झाला भलताच घात.

३ तुझ्या लावण्याला जणू
कवनाचा लागे डाग,
म्हणून का आला राग ?

४ तुला भाबड्या भक्तीचा
बोल अवघड वाटे –
स्त्रीचें मन अुफराटें !

५ भय प्रेमाचें वाटतें ?
वर कशास तू आन,
होवो तुला समाधान.

६ नाही समाधान मला,
नको नको असें यश
न करी जें तुला वश !

७ मिश्र धातूचें शिक्क्याचें
नाणें खणाखण वाजें,
होतीं त्यानें जगीं काजें.

८ नाही चलन तें माझ्या
दरिद्र्याच्या भाण्डारांत,
दीस म्हणून हो रात.

९ आलों अुपेक्षाव्यथित
हळू हळू दूर दूर –
शमेनाच हुरहूर.

१० कळवळून दुरून
घालतां मी तुला साद,
अरण्य दे पडसाद.

११ मज काळ्याभोर छाया
वेढितात बाहुपाशीं
राही हृदय अुपाशीं.

१२ वेङ्घ तोडाया तयांची
जीव कसा करी नेट,
जाया अुपेकडे थेट !

[ ता. १ जुलै १९२७ ]

## ६४ फेराचें गाणें

[ छन्द पादाकुलक ]

१ नागपञ्चमीच्या सणीं
अुठा अुठा साऱ्या जणी
हरपली तगमग
शान्त हिरवळे जग
श्रावणांत अैन वेळीं
मेघरायें कृपा केली
मेघराय काळा काळा
पोटीं अमृत-जिव्हाळा
वर झडे चौघडा का ?
लवे सोनेरी पताका
वाऱ्यावर धावे स्वारी
राअूताची दौड भारी

२ अुठा अुठा साऱ्या जणी
नागपञ्चमीच्या सणीं
स्वस्त झाली पाच रानीं
लोटें लाल नवें पाणी
जळें तुडुम्बल्या खाचा,
घोष अैका बेडकांचा
गेली भूमि गवतून
सोनियाचें वर अून
वर वारा येतां जातां
हेलावती तृणीं लाटा
पडे झिमझिम त्यांत
अूनपावसांची गाठ

३ नागपञ्चमीच्या सणीं
अुठा अुठा साऱ्या जणी
आज चला खेळूं खेळ
त्याला अेरव्ही न वेळ
साडी-चोळी नवी लेअूं
केस अुदवून घेअूं
सोनचाफा घालूं केशीं
कस्तूरीची जणू पेशी

वारुळाला जाअूं सङ्गें
गाणीं गात गात रङ्गें
झेली पृथ्वी नागराज
त्याची पूजा चाले आज.

४ अुठा अुठा साऱ्या जणी
नागपञ्चमीच्या सणीं
फान्दियांना बान्धा दोर
झोका मोठा घ्या समोर
अुत्सवाच्या झोल्यावर
घेअूं झोके दिनभर
तृणाङ्गणीं फुगड्यांत
पाहूं कोण टिकतात
सायङ्काळीं स्वस्थ बसूं
खेळीमेळीनें या हसूं
कोणी चतुर शहाणी
मग साङ्गेल कहाणी

५ नागपञ्चमीच्या सणीं
अुठा अुठा साऱ्या जणी
पञ्चमीची रुन्द कोर
दिसे, न दिसे समोर
कोणी म्हणे आकाशांत
तारा फेर धरितात.
चञ्चल या चान्दण्यांत
फेर धरूं गाणें गात
कोणी अेक साङ्गा आधी
नाचूं म्हणूं आम्ही नादीं
हेलावत लहरींत
नागपञ्चमीचें गीत.

ता. २ ऑगस्ट १९२७ ]

## ६५ तुझ्यावाचून

[ वृत्त वसन्ततिलका ]

येथे कला विकसुनी जरि मोद देअी
मोदामधे परि अुणीवच गे असे ही—
व्हायास रम्यतर रम्य कलाविकास
कोठे मनोज्ञ सहवास तुझा जिवास ?

ता. ३ ऑगस्ट १९२७ ]

## ६६ कीर्ति आणि कान्ता

[ जाति दिण्डी ]

पुरे ! लौकिक तो यापुढे नको गे,
बैस, सम्मुख अेकत्र बसूं दोघे;
धरुनि माझ्या हातांत तुझे हात
स्वस्थ बसतों मी तुजकडे पहात १

जरी नसले राहिले केस काळे,
जरी भाळीं ओढिले चरे काळें,
श्यामलारुण भोवती सान्ध्यराग,
अुषा फुलवी प्रीतिची हृदीं बाग २

प्रीतिकरुणादर मिळति तुझ्या नेत्रीं
म्हणुनि सुन्दर या पुण्यमधुक्षेत्रीं
शान्त व्हायाला आणखी पुनीत
स्नान करितों या नव त्रिवेणींत. ३

श्लोक म्हटला जो भीत तू विवाहीं
आज होअी तत्स्मरण अश्रुवाही;
सखे, योग्यांसहि गहन अन् अगम्य
धर्म केला तो तुवां सिद्ध रम्य ! ४

हेळसाण्डुनि तुज कष्टतां जनांत
पाहिली मी नाहीच दिवसरात;
लुब्ध होते जन फळावरच देख,
वृक्षचिन्ता वाहिली तूच अेक. ५

आणि खपतां मी अितर जनांसाठी
कधि न निढळीं तव आढळली आठी
स्वार्थसाधू वरवरच मानितात,
स्निग्ध निस्स्पृहता नित तुझ्या स्मितांत. ६

यत्न केला नच हृदय पारखाया,
सहज तरुपरि मज दिली फलच्छाया,
आणि विहगापरि ठेविलें स्वतन्त्र
गाअिले मी स्फूर्तिने कला-मन्त्र. ७

भूस भेटे मृगमेघबिन्दु जेवी
तसा आलों मीं तुझ्याकडे देवी,
घेअि गाढालिङ्गनीं त्यास भूमी,
तसें पावूंया अैक्य आज तू मी. ८

कीर्ति लाभे मज, हवी परि कशाला
गुलाबाची वा बकुळिचीहि माला ?
हृदय अपुलें हृदयास भिडे अन्तीं,
नको, असली तरि मधे वैजयन्ती ! ९

म्हणुनि कीर्तिस्रज धर शिरीं तुझ्याच,
तुझ्या प्रीतीसच शोभवील साच;
मला अद्वैतीं गमे बुडुनि जावें —
पुढें जाणें कुणि कुठे कुणा ठावें ? १०

ता. ५ ऑगस्ट १९२७ ]

# ६७ कशासाठी? पोटासाठी!

[ छन्द पादाकुलक ]

कशासाठी पोटासाठी
खण्डाळ्याच्या घाटासाठी ध्रु०

१ चला खेळूं आगगाडी,
झोका अुन्च कोण काढी?
बाळू, नीट कडी धर
झोका चाले खाली वर
अैका कूकुक्! शीट झाली
बोगद्यांत गाडी आली
खडखड भकभक
अन्धारांत लखलख
अेन्जिनाची बघा खोडी
बोगद्यांत धूर सोडी
नका भिअूं थोड्यासाठी
लागे कुत्रें भित्यापाठी.

२ अुजेड तो दूर कसा
अिवलासा कवडसा
नागफणी डावीकडे
कोकण तें तळीं पडे
पाठमोरी आता गाडी
वाट मुम्बअीची काढी
खोल दरी अुल्लासाची
दों डोक्याचा राजमाची
पडे खळाळत पाणी
फेसाळल्या दुधावाणी
आता जरा वाटे दाटी
थण्ड वारा वरघाटीं

३ डावलून माथेरान
धावे गाडी सुटे भान
तारखाम्ब हे वेगांत
मागे मागे धावतात
तार खाली वर डोले
तिच्यावर दोन होले
झाडी फिरे मण्डलांत
रूळ सङ्गें धावतात
आली मुम्बअी या जाअूं
राणीचा तो बाग पाहूं
गर्दी झगमग हाटीं –
कशासाठी? पोटासाठी!

ता. १८ ऑगस्ट १९२७ ]

# ६८ संवाद

[ अभङ्ग ]

१ जुनें झालें झालें फोल –
काय बोलशी तू बोल ?
रूप सुन्दर बरवें
तूज हवें नित्य नवें.
नव्या सोङ्गाचिया फक्त
पायीं लागणार भक्त
रूपें अनन्त सुन्दर –
बघशील नीट तर.
माझ्या ठायीं तिन्ही काळीं
नान्दे लावण्यनव्हाळी.
वर फेक दृष्टि क्षण
आकाश हें सनातन
भव्य सुन्दर नवता
देख विभूति तत्त्वतां
ऐसे सगुण निर्गुण
तू न पाहशी ढुङ्कून
ठेव श्रद्धा तू भाबडी
आहेच मी सवंगडी.

२ तुझा चातुरीचा बोल
भगवन्ता, पडे फोल
गप्प करिशी सम्प्रती
आहेच मी मन्दमती
अन्तरींची भूक माझी
गप्प राहीना देवाजी.
दोष मला कां रे आता
तूच जरी बुद्धिदाता ?
चित्र रङ्गतां आभाळीं
रङ्गतों मी सन्ध्याकाळीं
चित्रामागील नीलिमा
शान्त गाम्भीर्याची सीमा –
तेथ वेड्या या जीवाला
काही दिसेना जिव्हाळा.
पटे ओळख देखून
ऐशी काही दाव खूण.
तूच माझा सवंगडी,
गड्या, का रे देशी दडी ?

ता. १९ ऑगस्ट १९२७ ]

## ६९ भातुकलीचें गाणें

[ छन्द ]

पाहुं तुझें तान्हुलें
घरकूल सानुलें
कोपऱ्यांत अन्धार
त्यांत तुझा संसार
चिमुकला चाङ्गला
पाटाआड माण्डला
ठाकठीक रहाणी
पोर माझी शहाणी
बाहुलीचें लगीन
सजली ही चिहीण

खण घ्या हे तिकोनी
रुसूं नका हो कोणी
लाह्या पोहे खाऊस
पक्कान्नाचा पाऊस
हवें तें घ्या या काळीं
द्रौपदीची ही थाळी
बाळ माझी रमली
वाढतांना दमली
ताम्बूस ही गालाची
गुरोळी ग कोणाची ?

ता. २६ ऑगस्ट १९२७ ]

## ७० माझी बाहुली

[ छन्द ]

१ नाना, बाहुली माझी
बघा कोनाड्यामाजी
तिला पिसांची गादी
तिची रेशमी साडी
तिला जरीचा काठ
बघा राणीचा थाट
शोभे श्रीमन्ती हिला
रङ्ग महालीं निळा
नाही चढेल हट्टी
हिची कोणाशी गट्टी ?

२ तोण्ड पाहून लाजे
फूल गुलाबी ताजें
दात कुन्दाच्या कळ्या
गालीं सुन्दर खळ्या
काळे टपोर डोळे
भारी लाडिक भोळे
नाक चाफ्याची कळी
ओठ दोन पोवळीं
शब्द दिसती ओठीं
पण अबोल मोठी.

३ ठेवा अेकटी घरीं
धीट आनन्दी परी
थो थो काजळ घाला
नाही पाणी डोळ्याला
निजे पुढ्यांत माझ्या

कधी वाजेना बाजा
पोर गुणाची खाणी
व्हावी कुणाची राणी ?
हिला आणाना राजा –
नाना, हासतां का ? जा !

ता. २९ ऑगस्ट १९२७ ]

## ७१ अङ्गाअी

[ छन्द ]

१ कुणा नाही बघवलें
बाळ लुटुलुटू चालें
पडलें ग—काय झालें ?

२ कुठे लागलें नाही ना
चिमुकल्यास या माझ्या ?
अुगी अुगी माझ्या राजा.

३ पहा अुन्दिर पळाला,
देअूं त्याला असा मार
झाला खोडकर फार.

४ अुगी ! कोण पाडसाला
माझ्या बोललें रागाने ?
शहाणें गे माझें तान्हें !

५ अुद्या दुपारीं बान्धू हं
त्याचें अुन्हामध्यें घर,
बाळ माझें खेळकर !

६ केलें अड्गुलें मड्गुलें
तीट लाविली बाळास.
दृष्ट गेली, गडे हास.

७ चल बाहेर कसा तू,
बघ चान्दण्या हासती,
बाळ, तुला खुणाविती,

८ बाळ, खेळून खेळून
आता येशी झोपायला,
वर चान्दोबा भागला,

९ चान्द निम्बोणीच्या झाडा –
मागे निजायला गेला.
पाङ्घरून काळा शेला.

१० बाळ माझ्या ग पदरा –
खाली निजे माण्डीवर
रत्न माझें मनोहर !

११ काम राहिलें तुझ्याशी
खेळण्यांत नाना खेळ,
यायची ते झाली वेळ.

१२ बाळ, आहे मी येथेच,
अुठूं नको, कर गाअी –
सोनें कसें झोपीं जाअी !

ता. ८ सप्टेम्बर १९२७ ]

## ७२ आमचें घर

[ छन्द ओवी ]

१ आमुचें घर छान
शेजारीं वाहे ओढा
कागदी होडया सोडा
दूर जाती.

२ चतूर नव्हे, तर
अभ्रकी पङ्खांचें तें
विमान अुडे तेथे
अुन्हामाजी.

३ अुथळ वाहे पाणी
नितळ थण्डगार
नाचतां त्यांत फार
मौज वाटे.

४ पाहून अङ्ग ओलें
भरते रागें आअी
मागून देअी काही
खाअू गोड.

५ आमुचें घर छान
परसूं लाम्ब रुन्द
मोगरा जाअी कुन्द
फुलतात.

६ खोबरें झेण्डूंतील
मागतो सदा बाळ
झेण्डूंचा पहा काळ
खोडकर.

७ अडूळशाचीं फुलें
देठांत थेम्ब गोड
करितो गोड तोण्ड
मुलांचें तो.

८ सोलून कोरफड
पाण्यांत धुतां साफ
बर्फ हो आपोआप
काचेवाणी.

९ आमुचें घर छान,
म्हणती आम्हा द्वाड
करिती परी लाड
बाबा आअी.

१० अङ्गणीं सारवल्या
खडूने काढूं शिडी
लङ्गडी चढोवढी
खेळायला.

११ घरांत जिन्याखाली
ताईचें घरकूल
खड्यांची थण्ड चूल
पक्वान्नें दे.

१२ भाण्डून केव्हा केव्हा
म्हणतों जा ! फू गडी !
लागेना परी घडी
अेक व्हाया.

१३ आमुचें घर सान
आता तें कोठें गेलें ?
बाल्याचें हें भुकेलें
मन पुसे

ता. १४ सप्टेम्बर १९२७ ]

## ७३ आगगाडी

[ छन्द ]

धडाड धडाड
खडाड खडाड
धावते ही गाडी
केवढी धडाडी !
खाअून रगड
काजळी दगड
पाण्याचे रान्जण
घोटांत पिअून
फुरफुरे नागीण
वाऱ्याची बहीण
तोण्डाने जळते
सर्वाङ्ग वळतें
पाठीचे मणके
पोकळ टणके
टाकिते तोडून
घेतेहि जोडून

माणसें पोटांत
बसती थाटांत
धावे ही अगीन–
गाडीची नागीण

डोङ्गर-बिळांत
शिरून पळत
नदीला ओलाण्डी
न जाय झोकाण्डी
पुलाची घर्घर
टाकून सत्वर
खडाड खडाड
धडाड धडाड
दूर हो वाघीण
अशी ही नागीण

फोडून किञ्चाळी
बसवी काण्ठाळी;
धुराचा फवारा
झेण्डयाचा फरारा
काजळी हवेंत
प्रवाह समेत
दिवसां दुपारीं
रात्रीच्या अन्धारीं
थण्डींत वाऱ्यांत
पाऊस पाण्यांत.

करीत फुम्पाट
धावते अचाट
रात्रींच्या प्रहरीं.
शोभे ही सुन्दरी
खालती तुटला
तारा हा कुठला ?
राङ्गेने वाटती
काजवे धावती
डोळ्यांत या गोल
विजेचा कल्लोळ

ही आली थाम्बली
माणसें धावलीं
तांबडा तो दिवा
झालाच हिरवा
ऐटीने अञ्जीन
कधी मी हाकीन ?
वाटेंत फाटक
करितें अटक
वाजली ही शीट -
परन्तु तिकीट !

ता. १६ सप्टेम्बर १९२७ ]

# ७४ मेलों तरी मेलों

[ अभङ्ग ]

१ मेलों तरी मेलों
मरण न चुके
मन माझें झुके
ध्येयासाठी.

२ ध्येयाच्या कारणीं
श्रम आणि काळ
जाऊनिया फळ
नाहीं, बरें !

३ परी थेम्ब थेम्ब
माझिया रक्ताचा
शूर वीर साचा
होईल ना ?

४ लढूनि मरतां
मरे सैन्य सारें,
परी उरे वारें
वीरश्रीचें.

५ जीविताचें माझ्या
निघेल तें सार
होवो अनिवार
माझ्यामागे.

६ तेंहि न निघालें
तरी चिन्ता नाही
ध्येया, तुझ्यापायीं
देह पडो.

७ पावोत सामान्य
आशा माझ्या भङ्ग
दृढ अन्तरङ्ग
तुझ्या ठायीं.

ऑक्टोबर १९२७ ]

# ७५ माळ-वारा

करीत भिरभिर वाहे वारा अखण्ड त्या माळावरती,
मुरमाडांतिल खुरट चेपलीं गवतें तींही थरथरतीं.
जडभरत परी असङ्ख्य पडले अफाट माळावर गोटे,
त्यांस अुपाधि न बाह्य जगाची, जीवन्मुक्त पहा मोठे !

नागफणी निवडुङ्ग अेकटा घालुनि चिलखत काटेरी
ओसाडीचें राज्य चालवी मरुशान्तीच्या माहेरीं.
रानमाणिकें लेअुनि अङ्गीं आपुलेंच पुरवी कोड,
हिरव्यावर आरक्त छटा ती तेवढीच दुरुनी गोड !

अफाट माळावरी अेरव्ही अेक रङ्ग पिवळा करडा,
होअुनि मग तद्रूप विसावे दगडावर निर्भय सरडा.
माळावर त्या देखा कोठे जीवन मोहक नाहीच—
अफाट पसरे माळ अेकला दूरवरी अुन्नत नीच.

घालायाला शीळ मनोहर तिथे न बेटें बांसाचीं,
छायाकर तरुवेली कुठुनी ? कुठुनी सुमनें वासाचीं ?
न कुठे निर्झर वा पुष्करिणी साथ द्यावया सहकम्पें,
कुठुनि गारवा ? मळ-वाटहि नच कोठे, माळ न हा सम्पे.

चुकला रस्ता वाटसरू तर या माळावर यायाचा,
जगला तर मग विसरायाचा नाही तो अनुभव याचा.
भिरभिरतो परि सदैव वारा, वेडाला येअुनि भरती,
असे का कुठे भग्न-शून्य मग देअुळ त्या माळावरती ?

ता. ११ नोवेम्बर १९२७ ]

## ७६ उठा रे !

[ छन्द ]

अुठा रे ! चुलीशी का अशी दाटी ?
न्हाणींत जा निघा आङ्घोळीसाठी
घाअी गे कशाची आदित्यवारीं ?
थण्डीचा कडाका पडला भारी

हें पण सर्पण वाया जळतें
अङ्घोळीने थण्डी चट पळते
खाअून फुगीर आरोळी पोपी
अङ्गांत चढवा डगला टोपी

म्हणतें कुठे मी, ध्या बूक पाटी ?
जा खेळा, न करा चुलीशी दाटी.
कोवळें धुकट सोनेरी अून
बोलावी तुम्हाला करून खूण

पोपटी गवतीं पडून दंव
पाण्डुर पाण्डुर ये रङ्ग नव
वाहूं द्या पूर्वेचा चावरा वारा
खेळाच्या अुमेचा तडाका न्यारा

धुक्याची धावळी वेढून दूर
डोङ्गर आजोबा ध्यानांत चूर
खेळूं द्या मोकळा मुलांचा ताफा
नाकाने तोण्डाने निघूं द्या वाफा !

ता. २८ नोवेम्बर १९२७ ]

## ७७ नवीन भाऊ

[ छन्द चन्द्रकान्त ]

" बघूं आओ, कुठे माझा नवीन भाऊ
काळोखांत कुठे येऊं, कुठे मी पाहूं ? "
" समजीची वात थोडी करितें पुढे,
ही आहें मी, समोर ये माझें छबुडें ! "

" आळशी हा अजूनहि कसा निजला ?
आङ्घोळीला अुठविती मात्र मजला.
शेगडीची अूब याला, झोपे सारखा,
जागवाया गुदगुली याला करूं का ?

किलकिल्या डोळ्यांनी हा कुठे बघतो ?
बघ मला बघून हा कसा हसतो !
देअूं याला साञ्ज्यांतून थोडासा खाअू ?
दे ग माझ्या माण्डीवर धाकुला भाअू !

का नको ग ? चुरूचुरू तान्हुला पितो,
बाजेवर पाङ्घरुणामध्ये झोपतो.
गाल किती मअू, खाती का ग हे साय ?
नाकावर दिला काय म्हशीने पाय ?

गाजराच्या सारखा हा ताम्बडा छान
होतो का ग मीहि असा लाल लहान ?
तारा पडला सोनेरी दाखवी माओ
म्हणे असा घरीं आला आपुला भाओ.

जसा कवडसा पडे छपरांतून
अलगत येअी तसा बाळ वरून;
बाजेवर आअी त्याला झेलून घेअी,
माखूं न्हाअूं घाली मग प्यायाला देअी."

" नाही बाळ! गुलाबाला आपुल्या फूल
येअी तसें रात्रीं घरीं सोनुलें मूल.
परसांतल्या पेरूला ये जसें फळ
तसें भेटे आअीलाहि सानुलें बाळ.

भूक जशी लागूनहि नच दिसते
हृदयांत बाळ तसें माझें असतें.
आअीसारखें तें होअी म्हणूनी बाळ –
मग देव साऱ्यांचाच करी साम्भाळ."

" चिडविते ताअीटली कां मग मला?
म्हणे, चतकोरावारी तुला घेतला."
" नको अैकूं ताअीचें तू जा आता खेळ.
या बाळाची झोपायची झाली रे वेळ."

नोवेम्बर १९२७ ]

## ७८ देवळांत जाअूं

[ छन्द ]

देवळांत जाअूं
देवबाप्पा पाहूं
करूं नमस्कार
वाहूं फूलहार
आपुला कैवारी
सङ्कट निवारी

चोंहीकडे हात
त्याचे पोचतात
काळाचाहि काळ
होअी स्वतः बाळ
खोडकर तान्हा
यशोदेचा कान्हा !

डिसेम्बर १९२७ ]

## ७९ बाप्पा मोरया

[ छन्द ]

कशी मजेची वेळा
आला बाळांचा मेळा
गाणें म्हणत येती
ताल टिपऱ्या देती
बघा टिपरघाअी
गोफ गुम्फला जाअी १

नाना गुम्फून छन्द
केला अेक आनन्द
शुभ्र दिव्यांचा थाट
वर रङ्गाची लाट
या रे सान थोर या
म्हणा ‘ बाप्पा मोरया ! ’ २

डिसेम्बर १९२७ ]

## ८० काऊ काऊ गे !

[ छन्द ]

१ काऊ काऊ गे
ये हा खाऊ घे
काऊचा घास
नको बाळास

२ चिऊ मावशी
उडते कशी
उचली शीत
फारच धीट

३ माऊ लबाड
घालील धाड
माऊ गोरटी
दूध चोरटी

४ काऊ चिऊ खा
या भिऊं नका
दूधभात हा
उरला पहा.

बाळ जेवलें
गाढ झोपलें.

[डिसेम्बर १९२७]

## ८१ स्वप्नांची माला !

[ जाति चन्द्रकान्त ]

जीवित म्हणजे असे बापुडी स्वप्नांची माला—
स्वप्नहीन परि हाय न येअी झोपच जीवाला.
निमिषाचा लक्षांश टिको हें स्वप्न परि न खोटें,
त्यांतच हासे अन् वरणावे जीव, नवल मोठें.
ब्रह्मयाच्या त्या अेकच निमिषीं कितीक मनु होती,
जशा कदाचित् क्षणीं कुणाच्या ब्रह्मयाच्या कोटी !
आणि चिमुकलीं फुलें भूतलीं नक्षत्रापरि तीं
नसेतना दीर्घायु ! ! परन्तु स्मित गन्धित करिती.

अनाद्यनन्त प्रभु जो त्याला किती पुन्हा प्रिय तीं !
दुर्बल मानव, त्यास खरोखर अगम्य ही नियती.
म्हणून पुरवा आस अेवढी माझी देवा जी,
प्रीतिचारुता फुलवा माझ्या अुद्यानामाजी.
माळ सुगन्धी बकुळीच्यापरि कुतुकें ही घाला —
जीवित म्हणजे असो बापुडी स्वप्नांची माला !

ता. ४ जानेवारी १९२८ ]

## ८२ लेजीम

चला रे खेळूं लेजीम
म्हणाया जयजय बलभीम !
सम्पलें दिवसाचें काम
सान्जचा पुरतो आराम
सुगीचे त्यांतुनि हे दीस,
कशाची तोड न शेतीस
हरभरा शाळूचा हुरडा
मधूनी नित्याचा तुकडा
रसाने अूसहि भरलेला
चालतो भूकतहानेला
गुळाचा खमङ्ग हा वास
दरवळे खुलवित जीवास
अङ्गीं भर तारुण्याचा
कुणाला हिशेब कष्टांचा ?

काम्बळीवरती म्हातारे
विसावा घेअुं देत सारे
आपण परी बालभीम
खळाखळ खेळूं लेजीम
वाजतो धुडुम् धुडुम् ढोल
गड्यांनो अुठा धरा गोल
फुरफुरे ढणाढणा पोत
दाखवी वाऱ्याचा झोत
चान्दण्या पहातात मौज
कष्ट ते आहेतच रोज
पाहते पाण्ढर पोशाखी
खेळते काळी धौशा की !
धरा रे फेर कठिण बाका
पाअुलें तालावर टाका
खळाखळ लेजिम वाजूं द्या
अुभें हें शिवार गाजूं द्या
सरका अुठा बसा खाली
मागे पुढे भोवताली
खळाळुनि लेजिम फेरांत
दुमदुमे आनन्दे रात
स्फूर्तिचे अैका रे बोल
वाजे धुडुम् धुडुम् ढोल
चालुं द्या अेक धुमश्चक्री
चढूं द्या घोषें वीरश्री

दाखवा पायीं चपळाअी
होअुं द्या खूप हातघाअी
चालला घाअीचा ताल
चालला धुन्दींतच काळ
धुळोरा अुडला पायांनी
अुजेडीं पाण्डुरतो रानीं
लागती घामाच्या धारा
रानचा वरी गार वारा
जोम पण मराठबाण्याचा
मावळी जिवन्त पाण्याचा
खळाखळ वाजे लेजीम
दुमदुमे जयजय बलभीम

ता. ८ अेप्रिल १९२८]

## ८३ प्रार्थना

[ अभङ्ग ]

१ प्रभो, मज भेट
परन्तु अेकाच
मूर्तीमाजी साच
दिसूं नको.

२ अनन्त गोचरीं
भरली ही सृष्टि
प्रत्येकांत दृष्टि
तुज बघो.

३ लाटांच्या नर्तनीं
पाअूस झडींत
अैकूं दे सङ्गीत
प्रभो, तुझें.

४ भव्य हें गगन
क्षुद्र खालीं तृण
दोहींत करुण-
रस तुझा.

५ अणुरेणूंमाजी
तुझीच विभूती
याची अनुभूती
मला देई.

६ वियोगाची भीती
वैराग्याची नीती
काही नसो चित्तीं
प्रीतीवीण.

७ वाटे तुझ्यावीण
मज नाहीं बळ
अन्तरीं विव्हळ
सदैव मी.

ता. २७ जुलै १९२८ ]

## ८४ माझा व्याकुळतां जीव

[ अभङ्ग ]

माझा व्याकुळतां जीव
घेतों तुझ्याकडे धाव
घाव लागतां हृदयीं
येई ओठीं 'आई! आई!'
एकाकी मी हाय हाय!
वाटे जगीं असहाय.
सरे जग दूर दूर
भरे तुझ्या प्रेमें ऊर
मागूं तुझ्यापाशी काय
न कळे हें देवराय!
श्रेय माझें कशामाजी
तूच जाणशी देवाजी
राहो निकोप शरीर
राहो मनीं शान्ति धीर
घडो तुझ्यासाठी देवा
तुझ्या प्रपञ्चाची सेवा
पटो सदैव जीवास
असशी तू आसपास.

ता. २६ ऑगस्ट १९२८ ]

## ८५ सृष्टीचें ध्यान

[ जाति अञ्जनी ]

पहा सृष्टिचें ध्यान मनोरम, पहा सृष्टिचें ध्यान्! ध्रु०

मुकुलित हृदयीं तव तम वाढे,
ग्रन्थ फोल मग जाडे जाडे,
चल पड बाहिर, उघड कवाडें,
खुल्या मोकळया वातावरणीं जा कर अमृतपान्. १

वेस सम्पली, जा तू पुढती,
दृष्टि दूरवर फिरवी भवती,
जिकडे तिकडे हिरवी नवती,
प्रकाश पाडी प्रसन्न गाळुनि विरल श्याम वितान्. २

जळच सरीं का जिवन्त कळकळ ?
शमवी बाह्यान्तर हें जळजळ,
वळें वायुशी घाली खळखळ,
बन्धाऱ्याला छेडित कलरव काढुनि निववी कान्. ३

शेङ्गवलेले हे गुल्मोहर,
पल्लवभारें नम्र मनोहर,
विस्तृत छाया थरावरी थर
हिरवी हिरवी गार कशी ही नवस्नात अम्लान्! ४

निम्नोन्नत हे माळ पोपटी,
कुम्पणरेषा श्याम शोभती,
लवणोलवणीं श्याम तरुतती,
कमरेवर ये ऊस–जोन्धळा, गुडघ्यावर ये धान्. ५

तृण भिजुनी मधु सुटतो परिमळ,
पान्दीनें जळ येअी निर्मळ,
दिसे तरङ्गित वाळूचा तळ,
जळाकडे खळखळे पळे जळ द्याया जीवनदान्. ६

दूर पलिकडे त्या माळावर
नीलपटाच्या पुढे समान्तर
झाडांची ती राङ्ग पहा तर –
सडक जाय ती जोडित गांवें करुनि जिवाचें रान्. ७

फूलपाखरें पण पायाशी
मजा मारिती तृणांत खाशी,
अुडति यथाबळ हीं अवकाशीं –
नको अुद्या वा काल, आजचें अूनच यांस निधान् . ८

शान्त सुखद हें सृष्टितपोवन !
निरपेक्षपणें अिथे रमो मन,
अुपाधि करितिल चित्तीं क्षोभ न,
हवें कशाला स्वर्गीं चञ्चल जाया कल्पविमान् ? ९

दूर गडाचा शोभे डोङ्गर,
छातीवर जरि मेघाडम्बर,
धरी सावरुनि शीर्षीं अम्बर,
तो तर पावन नीळ मर्गजी गमे स्वर्गसोपान् १०

दृश्यें अन्धुकतीं या समयीं
विरे विविधता हळुहळु विलयीं
दिसे पसरली अफाट कढअी,
दुसरी तीवर अुपडी, मध्ये जीवन गूढ महान्. ११

ता. १ सप्टेम्बर १९२८ ]

## ८६ मुलांचा साङ्गाती

[ अभङ्ग ]

१ दुक्ख कधी तुला
होतें का प्रभो रे,
हट्टी तुझीं पोरें
पाहुनीया ?

२ हट्टाने अज्ञानें
सोडुनी तीं वाट
धावतीं सैराट
नादावून.

३ कुठे काटा बोचे,
कुठे जळे बोट,
कुठे कडेलोट
तोही होओ.

४ सारीं अल्पमती
नसे दूर-दृष्टि
मोहमयी सृष्टि
भव्य किती !

५ रडत हासत
जाती बाळें दुरीं,
प्रभो, तुझ्या उरीं,
शान्ति केवी ?

६ नियमाचें राज्य
तुवां चालू केलें,
स्वतन्त्र्य का गेलें
त्वदिच्छेचें ?

७ केशी म्हणे तुका,
तू माझा साङ्गाती
चालविशी हातीं
धरूनिया.

ता. १५ सप्टेम्बर १९२८ ]

## ८७ सर्वस्वाचा यज्ञयाग

अन्तरीं सारखी आग आग !
दे दैव त्यांतुनी वरुनि डाग. ध्रु०

जीवनाविना मत्स्य तडफडे,
काठावर बन्धनीं धडपडे,
ध्येय जवळ तो बघे चरफडे– स्फटिकशान्त हिमजलतडाग ! १

स्वैरालापी, प्रेमपरायण
पुष्पविलासी, कविताचारण
पडे तोच खग फशीं पहा पण दृष्टिपुढे जों अिन्द्रबाग ! २

प्रीतिशोधनीं थकुनी भागुनि
होतां संन्यासी वैतागुनि
येअि सुभद्रा भेटीलागुनि निषिद्ध ते जंव रङ्ग-राग. ३

ज्याच्यासाठी झुरतें अन्तर
येअि निराशोत्तर तें मन्थर,
विलम्ब निमिषाचाच निरन्तर ! अवेळींच ये त्यास जाग. ४

मृत जीवित हें, जिवन्त ही मृति !
टिकेल कुठवर मनुजाची धृति ?
अतर्क्य दैवा, काय तुझी कृति ? सर्वस्वाचा यज्ञयाग ! ५

ता. २२ सप्टेम्बर १९२८ ]

## ८८ पापाची चलती

का पापभीरुता हेंच पाप ?
का सहृदयांस हो नित्य ताप ? ध्रु०

राष्ट्राशीं राहूनि अभिमानी
चढला का हा पूज्य गुणांनी ?
प्रासादाच्या किती कमानी ! महाद्वार तर अिन्द्रचाप ! १

चुरडी जो बहु कलिका हुङ्गुनि
जाय न तद्रतिसमाधि भङ्गुनि,
अितर पडति त्यावरीच गुङ्गुनि भगिनींचे विसरूनि शाप ! २

चित्ता सुन्दर आणि भयङ्कर
ठार करी मृग सालस सुन्दर,
चोहिकडे मृगयाच निरन्तर ! प्रभु अवध्यासहि मायबाप ! ३

राज्य करी अनियन्त्रित राक्षस,
क्रान्तिदग्ध तर त्याचा वारस !
नच भरपाअी नसे जया यश, न्याय सबलतेविण दुराप. ४

विधिनिषेध परि ज्या दीनाशीं
प्राप्त लटकणें त्यासच फाशीं;
मरणोत्तर कां स्तुतिसुमराशी आणि सभ्य हे कां विलाप ? ५

कुणी पाहिले स्वर्गनरक ते ?
न त्या विचारें चित्त चरकतें
तेंच वस्तुसुख भोगूं शकतें, मरणोत्तर तर राख, वाफ ! ६

ता. २६ सप्टेम्बर १९२८ ]

## ८९ नावेंतील गाणें

[ जाति मोहनी ]

काय गाअुं ? कोठुनि आणूं तुझी रागदारी ?
तूच गा धरूनि सुकाणूं गीत कष्टहारी. ध्रु०

ललित तरल गीतें गाअी जिथे राग-राणी
तिथे काय विद्याजड मी बोलुं गे अडाणी ?
रहा गात वागीश्वरि, तू सान्ध्य-भाव-गाणीं –
सान्जदीप अुजळे गगनीं, मार वर भरारी ! १

स्वर्ण सलिल चुम्बित रङ्गे दूर ती प्रतीची,
लीन शान्त होअुनि जाती पहा सलिल-वीची,
लीन शान्त त्यांतच झाडी दाट दों तटींची,
तुझ्या मात्र वसनीं, गानीं लहर चमक मारी. २

सहज गान जीवन तूझें शान्त या दिनान्तीं
यदा वरुण फेकी वरुनी अरुणरागकान्ती,
कष्ट हेंच जीवन माझें, असो नसो शान्ती,–
धरीं ताल तुज वल्हवित मी, भाग्य हेंच भारी ! ३

ता. ७ नोवेम्बर १९२८ ]

# ९० काय अवेळीं साद ?

[ जाति चन्द्रकान्त ]

घालिशी, काय अवेळीं साद् ? ध्रु॰

पिका, निबिड अुत्तुङ्ग माजली अरण्यापरी बाग्,
आणि काय तुज होअुनि जाअी काही स्मरण अगाध् ? १

अुन्च नारळी, चिन्चा यांतुनि नान्दे मौन गभीर्,
वेड्या, हा पडसाद् अुठे तुज तोच गमे संवाद् ! २

आम्रमञ्जरीपरिमळ अुधळी तो रङ्गेल वसन्त्,
हा हिरवट हेमन्त, कुठे तो वासन्तिक आल्हाद् ? ३

शाळुहरभऱ्यावरुनि चावरा ये पूर्वेचा वात्,
कोठे ती मधुवायुलहर जी स्फुरवी हृदिं अुन्माद् ? ४

होय तुला भ्रम कसें म्हणावें ? सृष्टिसखा असशी.
करिती बघ निष्पर्ण शिरीषीं शेङ्गा खुळखुळ नाद्. ५

अुत्कण्ठेनें धीर सोडुनी का करिशी धावा ?
का हा टाहो ‘ कुठे कुठे ? ’चा मागे काही दाद् ? ६

अधीर पागल वेडा म्हणुनी जन हसतील तुला,
सहानुभूतीलाहि फुकट रे रङ्क नित्य मोताद् ! ७

पिका, तुझा स्वर अुठवी विलपित करुणोत्कट हृदयीं
ज्यास चाटुनी गेला पावक जितेपणीं क्रव्याद्. ८

ता. १ डिसेम्बर १९२८ ]

# ९१ वृद्ध भटजी

[ जाति मुद्रिका ]

कां अुठतां ? बैसा अहो रसिक मण्डळी !
नच कामाची ही घाअी,
होअुं द्या स्वस्थ या स्थळीं. १

सङ्कोच भोजनीं गोड परी थोडका;
थकलात तुम्ही पण आम्ही
अुठवूंच नये झोड का ? २

छे ! आग्रह मजला नको. अहो, वृद्ध मी;
पक्वान्नें पचवायाची
परि शक्ति न झाली कमी. ३

जीवन्त अजुनि पोटाग रसग्राहिणी,
किति करी पराक्रम मागे
ही रावबाजिच्या दिनीं ! ४

बदलली सृष्टि, सम्पले दिवस आमुचे;
ती षड्रसभक्ती गेली,
विरस हा कुणाला रुचे ? ५

मी चिवटच पिकलें पान चिकटतों द्रुमीं,
अन् सोडुनि भरलीं पानें
अुठतसां तरुण ना तुम्ही ? ६

मावळते तारे तुम्ही सकाळीं पहा,
अुजळतों परी गाभारा
मी घृतनन्दादीप हा ! ७

पाश्चात्य पाठ पढणारे राघू खरे !
हा निरशनमहिमा गातां
दुष्काळ म्हणुनि ये बरें. ८

श्लोकोत्तर ‘ हरहर महादेव ! ’ होअुं द्या,
ही पङ्क्ति-भेट मी माझी
नच चुकवायाचा अुद्या. ९

ते गृहस्थ जणु ओखटें घरिंच जेविती,
मज रुचे प्रयोजन जेथे
दक्षिणा पुढे ठेविती. १०

स्थूलता दिसे मजमधे जरी सम्प्रती,
जातांना तुळशीबागीं
परि पाय न हे कम्पती. ११

आमुची अन्नपूर्णाच माअुली मुळी,
रुचिवीर वाग्भटांच्या ती
पेटूं न दे घरीं चुली. १२

भूदेव किती जेवतों तरि न भागतों,
जेवूनि पुन्हा जेवाया
किति दाक्षिण्यें लागतों ! १३

आहलें अेकचित्त हां ! अुठा की तुम्ही !
पडतात कष्ट अुठतांना
तरि न धरीं मनिं किन्तु मी. १४

ता. २७ डिसेम्बर १९२८]

## ९२ सर्वां खल्वियं माया !

नादावुनि केलें मी भ्रमण किति अहो तें !
विश्रान्तिस्थल अन्तीं हेंच हाय होतें. ध्रु०

हमरस्त्याहूनि दूर चिमुकलाच गांव,
डाकघराचाहि जिथे नेणवे अभाव.
कष्टकरी दीनांचा मूठभर जमाव,—
जीवन अज्ञात तिथे वाटे मज कोतें. १

ते तिकडे पीत माळ पसरती अफाट,
हा अिकडे रम्य गार हरित नदीकाठ,
लवणांतुनि अूसगहूशाळुचाहि थाट !
स्वगृहांत परि गवसे सौन्दर्य न कोठे. २

हृद्वीणा अननुभूत सहजकम्प पावे,
सहकम्पें अतिकाङ्क्षा स्फुरित हो स्वभावें,
गमे रूढि भङ्गुनि मी ध्येय नवें गावें
की सीमोल्लङ्घनींच पौरुष तें मोठें ! ३

होतां वश वाग्देवी निघे प्रेमबोल,
हृदय हेंच मोल जया, न हो हेम मोल,
भावसिन्धुवर होती रसिक किति विलोल,
रिक्त-हस्त मी, जनता वेची मणिमोत्यें. ४

तो मीनाबाजार न, हसे रङ्ग-रात,
ज्योतींवर किति पतङ्ग झेप टाकितात !
मीहि मग्न मुक्तमधुपभावगुञ्जनांत –
मोहनलहरींत आणि जीव खाय गोते ! ५

भरतवाक्य सम्पुनि हो शान्त गानवीची,
काव्यदीप विझतां हो स्मृति खऱ्या भवींची,
तों न दिसे लोचनास शुक्र वा मरीची,
रङ्गसौध कोसळुनी अुरे भग्न जोतें. ६

दैव करी गुप्त पाठलाग, जीव धावे,
सावज हें मी धरीन, तो म्हणे प्रभावें,
टाकित धापाच पुन्हा प्रथम पदीं पावें,
अन्त्यक्षणिं वेडावी स्वप्न गत,—नको तें ! ७

ता. ६ जानेवारी १९२९ ]

## ९३ मधुसुन्दरीस

मोहीं मज कां आता पाडिशी कुमारी ?
टाक कुणा तरुणावर अरुण जादुगारी ! ध्रु०

खोल चरे हेंच दैवलिखित या कपाळीं,
श्वास जळुनि तीच राख जणु शिरीं अुडाली,
क्षारोदक अून गळुनि करपली नव्हाळी,
मरुभूवर काय बाग करिल तो फुलारी ? १

जाअुं कुठे ? चाललोंच खात रात-वारा,
ताराद्युति दूर, कुठे जवळ नच निवारा,
क्षुधित जीव देहभार वाहतो बिचारा,—
कधि विरामसूचक ती व्हायची तुतारी ? २

हो असाच आजवरी कितिदा मज भास,
अन् बघतां कवटाळुनि जाहलो निराश !
अदय भूत कां तें मम करी दुर्विलास ?
काय वञ्चनींच वसे प्रीतिची खुमारी ? ३

तू का क्षीराब्धिसुता ? येशि कुणिकडून ?
पथ चुकलिस का धुक्यांत तूहि सापडून ?
अन्तर्हित हो जा वा भेट कडकडून !
पुरे पुरे चेष्टा ही जरी चारु सारी ! ४

ता. १५ फेब्रुवारी १९२९ ]

## ९४ श्रान्त पान्थास

श्रान्त पान्थ, घडिभर तू ठेव ही हुशारी !
अिष्टस्थल हाकेवर—चल जरा पुढारीं ! ध्रु०

तूच अूठ, योग्य न मी देणें तुज हात;
द्युति होअिन तव नयनीं, स्फूर्ति अन्तरांत;
रम्यायति होअुनि मी तुज असें बहात;
चल सखया, निकट अलग सङ्गति मधु भारी. १

तिमिर विरुनि बघ धुकेंहि विरल होत जाअी,
खालीं खोऱ्यांत पहा श्याम दाट राअी,
दिनसम्राट् पूर्वेने करुनि ये चढाअी,
हर्षच हा की अशोक हेमरथगुढारीं ! २

धूसर गिरि, पीत माळ, नभीं रङ्ग लाल,
तरुशिखरीं सोनेरी स्मित करी सकाळ,
लागे पथ अुतरणीस अता सुकर चाल –
अेक शब्द अुत्तेजक भाट पिक पुकारी. ३

करवन्दीवर सुमें न, सूक्ष्मगन्धि तारा;
गलितपर्ण पळस फुले अरुणवर्ण सारा;
सहकारहि मोहरुनी मधुर दे अिशारा;
अब्दान्त न, ये वसन्त चेतनानुसारी. ४

सोडिन मी काय तूज ? गडे सोड भीती !
मी तुझी न झालें तरि काय नसे प्रीती ?
बद्ध करुनि मज व्हावी प्रगति तव कशी ती ?
अूठ, अुचल ओझें, चल, मार्ग निज सुधारी. ५

ता. १७ फेब्रुवारी १९२९ ]

## ९५ कवि भास्करास

तू प्रसाद, तू रस, खरा कवी !
गा, बुडव जगत हें सुखासवीं ! ध्रु०

तृणींहि तुज सौन्दर्य आढळे,
गळे अहन्ता, भाव अुचमळे,
आनन्दाचा गन्ध दरवळे, हठसमाधि कां वृथा हवी ? १

शोधाया जा शब्द कशाला ?
मोहुनि धावे प्रतिभाबाला,
सङ्गीताशी रङ्ग मिळाला, चित्रमालिका पहा नवी. २

तुझ्या दृष्टिने बघतां बघतां
जाअी काव्यांची कण्टकता;
सहानुभव जंव कवळी जगता, परन्धाम ही भवाटवी ! ३

तुझ्यापुढे कां व्हावी अरुचिर
रातकिड्यापरि माझी किरकिर ?
गाशी भुजळित तू भवमन्दिर, मूक मनें मी तुला श्रवीं. ४

ता. २२ मार्च १९२९ ]

## ९६ पुरुषाची छाती

विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती
गावया पुरुषाची छाती ? ध्रु०

प्रतिष्ठाच जी धर्माची ही स्त्री हिच्चियासाठी
स्फुरावी पुरुषाची छाती;
धन रक्षाया, धन वेचाया प्रिय तत्त्वासाठी
धजावी पुरुषाची छाती;
त्यास सिंहबळ येअी घेअी जो शिर तळहातीं,
दे पुढे पुरुषाची छाती !
रौरवीं पचत दैन्याच्या
जगतीं तें जीवन खोटें !
वाटून लाज जगण्याची
मरुनीच काज हो मोठें !
तत्त्वास्तव येणें कामीं
हौतात्म्य दिव्य तें कोठे !
मात करिल बन्दुकीवरीही वेताची काठी,
पाहिजे पुरुषाची छाती ! १

राजपथावर अुजळे विजली, सामसूम सारी,
क्वचित् त्या पळती मोटारी.

दूर चाळ वाडींत झोपली, डुलक्या घे माढ;
ओवती अन्धकार गाढ.

तों आले चालून दाण्डगे रात्रिञ्चर गुण्ड
मवाली धुन्द रक्ततुण्ड.

दरवडा घरीं धनिकाच्या
घातला दुष्ट गुण्डांनी –
बान्धिली मोट शेटाची,
किति मअू स्थूल तो प्राणी !
हतबुद्ध अुभी, रडवेना,
कोपऱ्यामधे शेटाणी –

जिकडे साहस तिकडे श्रीयश हीं होअुनि जाती,
पाहिजे पुरुषाची छाती ! २

शेजारी जागले परन्तू भयग्रस्त चित्तीं,
काळजें जणु हरिणांचीं तीं !

विश्वासुनि दुसऱ्यावर अपुलें रक्षण टाकून
पहुडती तोण्डें झाकून –

दागदागिने रोकड सगळी हो अिकडे गोळा,
जाय मग अबलेवर डोळा.

धमकीची सुटता आज्ञा
थरथरा कापते बाला;
लगबगा बघे काढाया
पायिंचा निघेना वाळा

तों अेक अधीर पुढे हो
तो पायच तोडायाला –
वाडीबाहिर मौजबघ्यांची जमे हळू दाटी –
पाहिजे पुरुषाची छाती ! ३

तों धावे, ये तरुण मराठी अबलांचा वाली,
सतीला पाठीशी घाली.
पट्टा कुठला ? वेत भिणभिणूं वेगाने लागे,
दचकले खल सरले मागे,
दूर दिसे तों अुजेड, गडबड ये काही कानीं
ठेपली आणि आणिबाणी.
कडकडाडली तों गोळी,
तो वीर तळीं कोसळला;
बोचकें उचलुनी पुण्ड
अेकेक तमीं मावळला.
वाचली मराठी कीर्ती,
वाचली सङ्कटीं अबला !
रक्तपात का अरुणोदय तो ? मृति न, चेतना ती !
धन्य ती पुरुषाची छाती ! ४

ता. १३ मार्च १९२९ ]

## ९७ जा स्वतन्त्रतेची मौज चाख !

जा, स्वतन्त्रतेची मौज चाख !
कां, तुला कुणाचा आज धाक ! ध्रु०

मोहरला सहकार तुझ्यास्तव,
पहा शिरीषींनूतन पल्लव,
गाजवील पिक अता मधूत्सव, अनुरागाची अेक हाक ! १

पञ्जरींच तुज चारा घालूं,
अन् सुखशब्दीं मी कुरवाळूं,
गमेन मग म्हणजेच दयाळू कातरुनिहि तव मञ्जू पांख ? २

छे ! प्रेम हवें मुक्त मनाचें,
रक्त नसांमधुनी जंव नाचे,
बन्धनीं जरी प्रथम रसाचें सार मानिती लोक लाख. ३

गारठल्या या हृदयीं माझ्या
अूब अुरे ती तुझीच राजा !
फीर ! सवंगडी योग्य पहा जा ! पङ्ख सुरक्षित मुक्त राख ! ४

ता. २० अेप्रिल १९२९ ]

## ९८ भ्रष्टा

[ जाति चन्द्रकान्त ]

देवा, तू का आम्ही क्रूर ? ध्रु०

कुणी अचानक अनाथ केलें सुन्दर तरुणीला ?
क्षण स्तिमित कां, केलें कां नच तनुमन दोन्ही चूर ? १

हाय जिवट तनु ! हाय जिवट मन ! लीला प्रकृतिची !
सुटे ग्रहण तों पूर्णशशिमुखीं ये पूर्वींचा नूर्. २

विरक्त ऋषिही सत्यवतीचा रसिक राहु जर हो,
काय बुभुक्षित न करिल दिसतां टन्च सरस अङ्गूर् ३

जरी बहात्तर हुरी प्रतीक्षा करिती बेहेस्तीं
गाजी घाली झडप भूवरहि कोठे दिसतां हूर् ! ४

अबला, मोहक, अजाण– छे ! हा जगीं त्रिदोषच की !
त्यांतुनि विधवा अपशकुनी– तिज पळवी शकुनी दूर् ! ५

रामराज्य तें, जनापवादें सती गृहास मुके,
भूशशिलक्ष्माविषयी काढी न कुणि ' मलिनमपि '–सूर्. ६

गोशांतच खितपणें अरींची वाढवीत सङ्ख्या--
लोकसङ्ग्रह क्षेत्रन्यायी व्यक्तींना न जरूर्. ७

कां नाजुक अन्याय चोरटा वेशीवर टाङ्गा ?
झाका, राखा अब्रु ! होउं द्या चोर थोर मग्रूर् ! ८

बडे शिष्ट कुणि देउंहि बघतिल आश्रय सोयीचा,
उद्धारक सहधर्मिणीत्व तें द्याया कोठे शूर् ? ९

परि नरजननी, तू् अेकाकी अनिकेत न राही,
परित्यक्त पोरका मीहि, धडधडे तुझ्यास्तव अूर् ! १०

प्रकाश शीतल वरसत राहीं, तापुनि शापुं नको;
बुडविशील तर बुडव वाहवुनि कारुण्याचा पूर् ! ११

ता. १२ आक्टोबर १९२९ ]

## ९९ दग्धपक्ष पतङ्ग

[ छन्द ]

अजूनही आशा वेड्या, ठेविशी का पोटीं ? ध्रु०

भव्य गौरीची आरास,
चलज्ज्योतींचा विलास,
स्मितें अहा दिव्य भास !
चटकाच लावी जीवा मोहिनी ही मोठी. १

वासन्तिक नृत्याङ्गण
हिरण्मयींसाठी जाण,
निर्धनांना कैचा सण ?
कुठे पोत, हिऱ्यांची त्या कुठे अुच्च कोटी ? २

भाळून रे आगन्तुका,
आंत झुकलास फुका !
जीव मीलनाचा भुका
दृष्टिसुखें धाअीना, घे उडी अुन्च खोटी ! ३

व्हावें ज्योतीशीं तन्मय
स्वर्गसुख तें अक्षय !
परी दैवीं हा निरय !
मूल्यहीन निर्धनाची या जगीं सचोटी ! ४

पङ्ख मात्र दग्ध झाले,
हाय मरण न आलें !
जीवीं तळमळ चाले,
जीवन्मृति हीच काय भक्तीची कसोटी ? ५

दीपोत्सव चोहीकडे,
कोण किडयासाठी रडे,
कां न शिरीं पाय पडे ?
कां न केरसुणी झणी दूर तरी लोटी ? ६

ता. ३० मे १९३१ ]

## १०० बरा सुटला बिचारा !

Peace ! Peace ! disturb him not
After life's fitful fever he sleeps well.

—*Shakespeare*

[ वृत्त वसन्ततिलका ]

कां सभ्य शोक जन हो करितां अकालीं ?
प्रत्यक्ष हानि तुमची किति काय झाली ?
मेला मयूर, उरलाच परी पिसारा—
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! १

मागे पुसे कुणि, "अहो, कविता नटी का ?"
"दुर्वृत्त साहजिक ही !" करि आन टीका.
सोसावया अजि नकोच दुरुक्ति-मारा—
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! २

आशाज्वरें विकल तप्त पडे, झुरे तो,
स्वप्नांत काव्य करुणोत्कट तें स्फुरे तों;
भिन्ती नसूनि जग त्या विहगास कारा—
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ३

टाकी कशावर तनू, कवि काय खाअी ?
काव्यात्मजीवित कसें असहाय जाअी ?
हे प्रश्न कां करिल काव्यसुधा पिणारा ?
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ४

गेला जरी न चरकांतुनि अिक्षुदण्ड,
वाहेल केवि रस गोड तरी अुदण्ड ?
घ्या शर्करा धवल, भाव हिचा विचारा –
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ५

काव्याहुनी खचित जीवित होय थोर,
पाही मजाच परि दैव कठोर घोर.
काव्यास थाम्बुनि तरी जग देअि थारा –
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ६

प्रीत्यर्थ तो तडफडे, झगडे जनांशीं,
प्रक्षुब्ध होय भवसागर सर्वनाशी;
आता असेल दिसला तळ वा किनारा –
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ७

हो आज शान्त कवि मारुनि आर्त हाका,
प्रेमप्रकोप मरणोत्तर हाय हा कां ?
कां तत्स्मृतीवर अता स्तुतिचा निखारा !
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ८

ता. १४ आक्टोबर १९३१ ]

# १०१ आत्मप्रतीति

" पशूनामस्मि गर्दभः " खरी गीता.

हें अेकुलतें अेक गूढगुञ्जित आहे. हें सुनीत नसेल, स्वनितक नसेल, निदान स्वनित – ज्यांत दुसरा चरण पुन्हा चौदावा असतो असें भूपतिजातीय चतुर्दशचरणी गीत तरी आहेच आहे. 'अेको देवः सर्वभूतान्तरात्मा' असें तें अनिर्वचनीय तत्त्व जसें पुरुषोत्तमांत तसेंच मानवादि सर्व पशूंत, व सर्व पशूंत अवधूत अशा त्या खरवरांतहि आहे हें पाहून त्याच्याशी क्षणभर तल्लीन होअूं पहाणाऱ्या साधकाची येथे भूमिका आहे, सिद्धाची नाही. विचारसरणी बहुतांशी औपनिषदिक आहे. सार्वत्रिक शहाणपणाच्या सुबत्तेच्या या काळांत हा 'गाढवपणा' योग्य तो रुचिपालट करील. तेव्हा ज्ञानेश्वर-रवीन्द्रनाथांच्या दायादांनी क्षमाच करावी. शेवटीं मराठीच्या परीक्षकांना विनन्ति हीच की, या कवितेंतील गूढार्थ प्रयत्नें सांपडेल या आशेने ही कविता प्रश्नपत्रिकेंत घालूं नये. हींत अर्थ नाही. अर्थप्राप्तीसाठी ही कविता नाही; परन्तु 'व्यर्थी अधिकची अर्थ असे' अशी आशा कोणी केल्यास त्यास कळावें की 'तो ज्यांस दिसे त्यां म्हणती पिसे!' यासाठी, झपूर्झा! जपून जा!

[ जाति भूपति ]

अवधूत खरा, तू खरा तू स्वयंमन्य !
पटविलें पूर्ण तू मज मी तूच अनन्य.
जागूनि जगाच्या निशीं[1] कम्बुवत् शब्द
करितां तू राही निजुनि हें जगत् स्तब्ध.

---

१ " या निशा सर्वभूतानां " |भि०

तें अस्फुट अव्यक्ताचें स्वनित[२] गभीर
मज चिदामृतास्तव टाकी करुनि अधीर.
तव तत्त्व चहुंकडे अनुस्यूत अविभाज्य
पटतांच लाभतें सदानन्दसाम्राज्य.
मी आत्मसुखी[३] समदर्शी[४] शून्यमनाने
जाणूनि गातसें नेणीवेचें[५] गाणें.
तिमिरांत तेज मी आणि तिमिर मी तेजीं
कीं गेलें मीपण पण तूपण उरलें जी.
आयतश्रुति[६] नसो अथवा कूर्च जघन्य[७] —
पटविलें पूर्ण तू मज मी तूच अनन्य.

ता. १६ सप्टेम्बर १९३२ ]

## १०२ सेवा-धर्म

[ जाति मुद्रिका ]

हें धनावलम्बन बघुनि जीव हा गळे,
मी बाणा स्वातन्त्र्याचा
चालवूं कशाच्या बळें ? १
दिडकीसहि किति लागती अर्ज-आर्जवें !
भागे न कष्टकामाने
आणखी स्वभावार्जवें. २

---

२ स्वनितं मेघगर्जितम्. ३ "आत्मन्येवात्मना तुष्टः" भ॰. ४ "पण्डिताः समदर्शिनः" भ॰. ५ "जाणोनि नेणतें करी माझें मन" तुकाराम. ६ लम्बकर्ण. ७ जघनस्थ.

निढळाच्या घामें मिळे सुका चौत हा,
अुपकार गणावा लागे
हा न्याय धन्याचा पहा ! ३

कष्टांची चिन्ता नसे; तपस्याच ही !
पण अेक तपें खितपे, तों
दुसराच भोगितो मही. ४

जाणूनि नेणतें परी व्हायला हवें,
भूपरी तप्त रस पोटीं
पचवाच जरि न साहवे. ५

माझेच हात पण त्यांस वळवितां धनी
खपुं कैसा पोटासाठी
मी नरकाच्या साधनीं ? ६

गेलाच आजचा दिवस, अुद्याचा पुढें,
हें निशीं परी न विसावें
कष्टलें हृदय बापुडें. ७

बाहेर चान्दणें पडे दुधासारखें,
परि भरेल का बाळाचें
पोट या दुधाने सखे ? ८

वाटतें नको हें पोट, नको हें जिणें !
ही पापभीरुता जाची
पैक्याच्या छत्राविणें ! ९

ता. ६ फेब्रुवारी १९३३ ]

# १०३ निर्झरास

[ छन्द ]

१ बाळ ! खळाळत जाशी,
तुझा खेळकर ध्वनी
स्निग्ध घुमे माझ्या मनीं.

२ अुषा करिते पाहून
तुझें रञ्जन समोर
होअी हृदय हें थोर.

३ तुझ्या हास्यांत चमके
साऱ्या विश्वाचें चैतन्य–
धन्य माझे डोळे धन्य !

४ तुझ्या मुखींच्या दर्पणीं
बघतां मी माझें मुख
वाटे अथाङ्ग कौतुक.

५ बाळ, तुझ्या रे वाचून
कळणार तरी कुणा
भग्न अन्तरींच्या खुणा ?

६ म्हणो पाषाण हृदय
कोणी घालो हृदीं घाव,
घेतला तू माझा ठाव.

७ भाव कित्येक वर्षांचे
साचलेले राजसा रे,
घेअीं तूच आज सारे !

८ माझ्या जीविताच्या आशा
तुझ्या मध्येच सकल
आता व्हायच्या सफल

९ दृष्टि पुढेच तुझी ही,
निजानन्द लहरींत
जाशी दुरी गात गीत.

१० अुरीं आडवूं कशाला ?
तुझा प्रवाह हा गोड
जावो जेथे जेथे ओढ.

११ तुला वाटेने भेटोत
सान थोर नवे स्नेही,
भेटी सुखें घेअीं देअीं.

१२ पृथ्वी विपुल पहा ही,
धाव कुठेहि जा स्वैर,
सृष्टि फुलव चौफेर,

१३ कर पराक्रम मोठा
पुढे सहस्र हातांनी
वसवुनी पुरें रानीं.

१४ लोकीं तुझिया नावाचा
होतां मोठा गाजावाजा
शोध निघेलच माझा.

१५ मग अज्ञात हें नाव
फैलावेल जगामधीं
दूर अैकेल जलधी.

ता. १२ मार्च १९३३ ]

## १०४ अेक कणिका

हें मचूळ पाणी गोड न लागे तुला,
कां रडुनि कोरडा घसा करिशि रे मुला?
घे तहान थोडी भागवूनि; जा पुढे–
तू रडुनि कसें मधुरत्व ये मला नवें?
करितील खारटच मला तुझीं आसवें.

ता. १३ एप्रिल १९३३ ]

## १०५ पापशङ्की

[ सुनीत वृत्त शार्दूलविक्रीडित ]

मी सन्ध्यासमयास कष्ट करुनी येतों घरासन्निध
तों येतात मनीं तशा झरझरा शङ्काहि नानाविध;
कानीं धावुनि जीव आतुर बसे घ्याया तुझी चाहुल,
अन् माझें थबकून जों जड पडे दारामधे पाउल,

तों येअी तव शब्द खोडकर तो खेळांत आअीसवें,
अन् तेथूनच पाडसा, तुज मुदें मी हाक मारीं जवें,

तू जों अर्पिशि पाहुनी वर मला नेत्रांतुनी माधुरी
तों चुम्बीं तुज मी झणी अुचलुनी दाबीत माझ्या उरीं !

मी कार्यीं गढतां कुठूनिहि जरी ये क्रन्दनाचा स्वर
दे धक्का हृदयास तो, दवडवी तूझ्याकडे सत्वर;
पाहीं मी तर पाळण्यांत दिसशी तू शान्त निद्रासुखें,
शीर्षीं टेवुनि हात खिन्न कुतुकें घेशीं तुझे मी मुके.

व्यापी बाहिर मेघराजि नभ हें, पाअूसही पाडिते -
बाळा, यांतुनि फाकतीं मधुर हीं तूझीं सुवर्ण-स्मितें !

ता. १७ जुलै १९३३ ]

## १०६ हरिताम्बरा

[ जाति केशवकरणी ]

विलसत जावी हिरवळींतुनी स्फटिकाची जशि झरी
तशी ही तव तनु हरिताम्बरीं.

शारदसन्ध्याराग ठसावा प्रशान्त सरसीहृदीं
छटा ती ये तव कान्तीमधी.

चित्रास्वाती जशा हसाव्या अथाङ्ग तम-सागरीं
चमक ती तव नेत्रीं सुन्दरी.

कुतुकद्युति वितरिशी किशोरी, अूनपावसापरी,
भरे तव माया हृदयान्तरीं.

ज्योत्स्नेपरि रमणीय गूढ तू अन् शारद केवल
— बघुनि परि का हृदयीं ये कळ ?

ता. १ ऑगस्ट १९३३ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३४८८...... वि: काव्य......
क्रमांक १०२६ ...... नों दि: २८।१२।६९



## १०७ चल अुडुनि पाखरा!

चल अुडुनि पाखरा, पहा जरा –
किति रम्य पसरली वसुन्धरा! ध्रु०

चोच तुझ्या चोचींत घालितां
गाढ अुरीं तुज धरुनि पाळितां
न हो काळ कधि सुखाचा रिता; स्वार्थच पण हा, न हा बरा! १

कोश फाडुनी कळ्या अुमलती,
खुल्या अङ्गणीं मुलें खिदळतीं,
खुल्या प्रकाशाकडे द्रुतगती पळे खळाळत कसा झरा? २

अूब अिथे तुज मअू पिसांची,
गोड ओढ जरि या घरिं साची,
पण ही छाया किती दिसांची? तुझें निळें नभ पक्षधरा! ३

विहङ्गमा रे, निज पङ्खांनी
अुडुनि विहर या जगदुद्यानीं –
सराग गाअुनि जीवन-गानीं अमृत हर रे मनोहरा! ४

ता. ६ ऑगस्ट १९३३ ]

## १०८ चन्दाराणी

[ ओवी ]

१ कोठे ती चन्दाराणी
राजस रूपखाणी,
गातात गोड गाणीं
कवि जिची!

२ श्यामल पटावरी
हिऱ्यांचा सडा पडे,
टपोरे त्यांत खडे
गुरु शुक्र.

३ असोत तेजोगिरि
परन्तु चन्द्रेपुढे
पडती ते बापुडे
मोलहीन.

४ साण्डतें तिचें तेज,
सुधेची होअी वृष्टि,
रञ्जवी स्वप्नसृष्टि
चन्द्राराणी.

५ ती का ही चन्द्राराणी
फिकट दीनवाणी ?
जीवाचें होअी पाणी
दिसतां ही.

६ ढगाची पाण्डुरक्या
फाटली दिसे चिन्धी,
नभःश्री लेअी बिन्दी
ही का भाळीं ?

७ पेठेंत दिनभर
सुवर्णव्यवहार;
डुङ्कून पाहणार
कोण हिला ?

८ सौभाग्यच्युत होतां
कोठून ती प्रतिष्ठा ?
अश्रूंनी माझी निष्ठा
हीस न्हाणी.

९ बोले तों चन्द्राराणी
‘गाशी तू योग-गाणीं,
अजाण परी प्राणी
दिसशी तू.

१० अशोकवनामध्ये
लङ्केचीं वैभवें तीं
जीवाला शान्ति देतीं
किमपि न.

११ त्याहून गोदातटीं
शीणल्या कष्टें देहीं
रुचतीं वल्कलेंही
सौभाग्याचीं.

१२ हृदयीं अेक ज्योति
भ्रमण दुज्याभोतीं;
आपत्ति हीच मोठी
दैव आणी.

१३ आमुची चन्द्राराणी
म्हणून गातां गाणीं;
स्वार्थच बघे वाणी
तुमची ही.

१४ भ्रमतां अन्तराळीं
निस्तेज होतें तेव्हा
असतें माझ्या देवा –
जवळ मी.

१५ चुकून कधी काळीं
मित्राशी तोण्डभेट
होतां तो काळ थेट
अशुभ का ?

१६ कणव नका करूं !
नादांत फिरतें मी
विलीन मित्रप्रेमीं
चन्द्राराणी.'

ता. ५ ऑगस्ट १९३३ ]

## १०९ गोड बाल्य

[ चाल " मशि बोलुं " ]

सर्वस्व सुखाचें वाटे न कुणाला बाल्य गोड् ? ध्रु०

काहीहि मिळो त्या सङ्गें
खेळांत कुतुकुनी रङ्गे;
मन भङ्गे नच जरि चाले संसारीं मोडतोड्. १

हट्टही करी परि माझा
चिमुकला घरींचा राजा,
सवंगडी हवा मी त्याला, नित त्याची अेक खोड्. २

किति लाडिक हाका मारी !
आर्तता मधुर ती न्यारी,
याचना करी कशि नेत्रीं मी म्हणतां ' सोड सोड् ! ' ३

निरुपायदूर मी होतां
हम्बरडा फोडी मोठा –
मज सहन न हो कळ त्याची, तळहातींचाच फोड् ! ४

बाल्यावर शोकच्छाया
न पडे हें म्हणणें वाया;
तीव्रतेस या शोकाच्या कोठे मी पाहुं जोड् ? ५

निमिषैक अश्रु चमकूनी
जरि जाती सहज सुकूनी,
घाहुलीसरशि परि घेअी चमकूनी बाळ ओढ्. ६

कालची खन्त ती नाही,
चिन्ता न अुद्याची काही,
मग आज निराशा कां ही ? नच पुरती सर्व कोड्. ७

प्राप्तस्थिति आणिक वाञ्छा
बाल्यांतहि कलहच यांचा –
गतबाल्य दुरूनि विराजे म्हणुनिच तें गोड गोड्. ८

ता. २९ सप्टेम्बर १९३३ ]

## ११० डोला बाअी, डोला !

[ छन्द ]

डोला बाअी डोला
हाताचा घ्या झोला
डोळा कां हो ओला ?
बोळकें हें खोला
गोड गोड बोला
कछा हवा नोला
नको काळा, गोला !

ता. ७ आक्टोबर १९३३ ]

# १११ राजभक्ति

[ जाति भूपति ]

कां हवा तमाशा असा राजभक्तीचा ? ध्रु०

लाविती तोरणें, चित्रें जन पुरवासी,
मण्डपास अुजळी बिजली होअुनि दासी,
जयघोषें शीण न ये पोकळ वाद्यांसी,
आक्रोश परि बुडे कष्टचूर जगतीचा. १

चालल्या काळचे अनुचर भूपवराचे
कारन्जें अुडवित गन्धोदकधारांचें
प्रतिमेस भार घालीत पुष्पहारांचे,
ही पोट-पुजा ! हा मान कसा व्यक्तीचा ? २

हें पोट गावविल त्याचेंही स्तुतिगीत
राष्ट्रीय दिव्य, हित जो राही न करीत,
हतबुद्ध मत्त जो जन्मदत्त मधु पीत—
कळसूत्री पुतळा वा बागुल सक्तीचा ! ३

जो जातां सिंहासनीं येअिलच कोणी,
घेअील सत्त्व जो कष्टकऱ्यांस पिळोनी,
देअील अुपाशी नृसिंहपाठीं गोणी,
श्वानांस आणखी लाभ खास-पङ्क्तीचा ! ४

परि 'चिरञ्जीव !' कां तुज न म्हणावें राजा ?
जनहितार्थ खपशी, न परी गाजावाजा;
कृति तुझी, स्मृति तुझी ठसे अन्तरीं माझ्या,
जनदास तू नृपा, वाट-करी प्रगतीचा ! ५

ता. ९ जानेवारी १९३४ ]

## ११२ बघें प्रथम मी बालवयीं

[ जाति दोहा ]

बघें प्रथम मी बालवयीं
पोर सतेज सुशील्,
जणू अुजळती अुषाच वा
हिम मधुमासांतील्. १

दिवसभर तिचे खेळगडी
गुलाब अन् गुल्बास्;
तिच्यामधे त्यांचाच दिसे
मुग्ध तरल अुल्लास्. २

मग ती अठरा वर्षांची
दिसली बाला गौर्,
मनोविकासें रूपभरें
चमके काही और्! ३

चन्द्रिकाच ती कान्ति तिची,
सङ्गीतच अुद्गार!
विफलाशा बहुतांची ती,
अेकाचें सुख-सार्! ४

बहु वर्षांनी ठेवीं मी
तिच्याजवळ पाअूल –
फूल कळीचें झालेलें,
दिसें स-फल तें फूल. ५

पोक्त माय ती अता दिसे,
धरी अुरीं निज बाळ्,
पूर्वींहूनहि सुन्दर ती
मला गमे तत्काळ्. ६

पुन्हा अेकदा मी पाहीं
अन्तर्दिनीं तें तीस्.
दिव्य द्युतिमण्डल भवती,
समीप राहे अीश्. ७

न वासनांचा ताप तदा
लवहि न भीति-विमर्श्,–
दिसला मज तेव्हाच तिचा
तो सौन्दर्योत्कर्ष ! ८

ता. २२ ऑगस्ट १९३४ ]

## ११३ सुप्रभात !

[ जाति दोहा ]

मुम्बअीमधे पहाल तो
आपुल्याच घाअींत्.
क्वचितच शेजाऱ्याचेंही
असे नाव माहीत्. १

दिल्यावीण परिचय करुनी
पुसे कुणी न कुणास्;
शिकलेले बैठकीमधे
बसती मूक अुदास्. २

माणुसघाणा हा कुठला
मुलांस शिष्टाचार् ?
हसुनि हसविती विश्वासें
फुलांपरी साचार्. ३

असा अेकदा जातांना
थबकें मी रस्त्यांत्
पाहुनि अेका पोरीने
केला पुढती हात्. ४

कन्या दिसली धनिकाची
खेळकर स्नेहाळ्;
क्षेत्र गमे सौभाग्याचें
अैसें विलसे भाळ्. ५

गुलाबापरी कान्ति तिची
अन् सोनेरी केस्;
वेषहि हलका फुगीर तो
जलावरिल जणु फेस्. ६

सुरगाडीवरती अुजवा,
डावा खाली पाय्;
करुनि हसतमुख वरी पुसे
मूकपणें जणु ‘काय् ?’ ७

विश्वासी कौतुकच्छटा
नील लोचनीं रम्य्;
दूर पळे पाहतां तिला
जगांतील वैषम्य्. ८

स्वीकारील न कोण बरें
अशा मुलीचा हात् ?
स्पर्शिल गाल न अङ्गुलिने
वात्सल्यें वाहात् ? ९

‘ सुप्रभात ’ ! मी जों वदलों
तीहि वदे तो बोल् ;
अन् सुरगाडीवर निसटे
सहज सावरित तोल्. १०

गुदमरल्या हृदयास मिळे
जणू सकाळ-झुळूक् ;
तळमळल्या हृदयाची ती
क्षणांत शमवी भूक्. ११

ता. १३ ऑगस्ट १९३४ ]

# कठिण शब्दांचे अर्थ

अल्हम्दु०, प्रभूची स्तुति असो.
अिन्शाल्ला, प्रभु अिच्छील तर.
अिरम, अिराणांतील प्रति-स्वर्ग.
अिल्लाह०, अल्लाच अनन्य प्रभु.
अुक्तुलू, ठार मारा.
कलन्दर, मुक्त भिक्षु.
गाथा, सूक्तिसंहिता.
गिरेबाज, गिरक्या घेत अुतरणारें.
चङ्ग-तम्बूर, वाद्यविशेष.
चन्दिरी, चान्दण्याचा.
चुकूर, चुकुल्यासारखें अस्थिर.
जङ्घा, पोटऱ्या.
टिपूर, ( ∠ त्रिपुरी ) स्वच्छ, शारद.
तपन, नरकविशेष.
ताळें, कुलूप.
धान, भात.
नबी, पैगम्बर.
नर्मद्युति, परिहासरसिकत्व.
निम्रूद्, एका राजाचें नांव.
पद्मराग, माणिक.
परिखा, चर, खन्दक.
पिङ्गल, पिङ्गळा.
भङ्गुर, निम्नोन्नत,
भावुक, रसिक,
मधुक्रम, मद्यबैठक.
मर्यम झमानी, अक्बरपत्नी.
रूप्य, रुप्याचें, सुन्दर.
रूरू, प्रमद्वरेचा प्रेमी पति.
वरणावणें, झोपेंत बडबडणें.
वेताळ, भाण्डारकरप्राच्यमन्दिरामागील टेकडीचें नांव.
शरपाण्डुर, सायीच्या रङ्गाचें.
शाद, हिरवें गवत.
शामी झेनोबिया, पामिराची रसिक शूर राणी.
हारीत, कबूतर.
हुर्मुजी, हुर्मुझ्दच्या आखातांतील.

# कठिण शब्दांचे अर्थ

अल्हम्दु०, प्रभूची स्तुति असो.
अिन्शाल्ला, प्रभु अिच्छील तर.
अिरम, अिराणांतील प्रति-स्वर्ग.
अिल्लल्लाह०, अल्लाच अनन्य प्रभु.
अुक्तुल्, ठार मारा.
कलन्दर, मुक्त भिक्षु.
गाथा, सूक्तिसंहिता.
गिरेबाज, गिरक्या घेत अुतरणारें.
चङ्ग-तम्बूर, वाद्यविशेष.
चन्दिरी, चान्दण्याचा.
चुकूर, चुकुल्यासारखें अस्थिर.
जङ्घा, पोटऱ्या.
टिपूर, ( ∠ त्रिपुरी ) स्वच्छ, शारद.
तपन, नरकविशेष.
ताळें, कुलूप.
धान, भात.
नबी, पैगम्बर.
नर्मद्युति, परिहासरसिकत्व.
निम्रूद्, एका राजाचें नांव.
पद्मराग, माणिक.
परिखा, चर, खन्दक.
पिङ्गल, पिङ्गळा.
भङ्गुर, निम्नोन्नत,
भावुक, रसिक,
मधुक्रम, मद्यबैठक.
मर्यम झमानी, अक्बरपत्नी.
रूप्य, रुप्याचें, सुन्दर.
रूरु, प्रमद्वरेचा प्रेमी पति.
वस्णावणें, झोपेंत बडबडणें.
वेताळ, भाण्डारकरप्राच्यमन्दिरामागील टेकडीचें नांव.
शरपाण्डुर, सायीच्या रङ्गाचें.
शाद, हिरवें गवत.
शामी झेनोबिया, पामिराची रसिक शूर राणी.
हारीत, कबूतर.
हुर्मुजी, हुर्मुझ्दच्या आखातांतील.

# टीपा

१. **मुरली :** मराठी वाङ्मयात 'मुरली' हा विषय आजवर अनेक कवींनी आळविला आहे. आधुनिक कवींतदेखील गोविंदाग्रज, टेकाडे, वगैरे कवींच्या मुरलीवरील कविता विशेष प्रसिद्ध आहेत. ही परंपरा भागवतापासून चालत आलेली आहे, व तिचा आविष्कार जुन्यानव्या मराठी कवींनी एका विशिष्ट पद्धतीने केला आहे. माधवरावांनी हा आविष्कार एका निराळ्याच भूमिकेवरून केला आहे, असे त्यांचे म्हणणे असे. अनयाशी विवाहबंधनांनी विधिपूर्वक बद्ध झालेली राधा, कृष्णावर अत्यंत शुद्ध प्रेम करी. वैवाहिक जीवनाने तिला 'सौभाग्य' लाभले असले व तिची सांसारिक भूक भागली असली, तरी तिच्या आत्म्याची–भक्तीची भूक शमली नव्हती. तिच्या आत्म्याला कृष्णाच्या भक्तीचे वेड लागले होते, आणि त्यासाठीच ती कृष्णाच्या विशुद्ध भक्तीत रमून एकीच्या मोक्षासाठीच आसावलेली होती. मनुष्य जीवनातील ही अवस्था चित्रित करण्यासाठीच माधवरावांनी ही कविता लिहिली आहे. या कवितेतील—

"सौभाग्य कुठें विधिसंमित अनयाचें,
अन् स्फुरण कुठें प्रणयाचें ?
हें हक्काचें चुंबन काल्यावाणी,
बधिरता अंतरीं आणी."

या ओळी विशेष साभिप्राय आहेत.

**कौमारस्वप्न** = तारुण्यात प्रवेशलेल्या व्यक्तीच्या मनावर तरंगणारी काव्यात्म ध्येये किंवा सृष्टी. **खेंव** = आलिंगन. '**हरिहृदयीं गेल्या झोंपी**' = हरीच्या हृदयाशी (भक्तीने) एकरूप झाल्या. **डहुळे** = ढवळून निघाले. **हृद्वैद्य** = हृदयात उठणाऱ्या मनोमय कळा नाहीशा करणारा वैद्य; अंतःकरणाची व्याकुळता नाहीशी करून त्याला शान्ति-सुख देणारा देव.

**२. पतंगाची आशा :** हे एक सुनीत असून ते हरिणी वृत्तात लिहिलेले आहे. हरिणी वृत्तात लिहिलेले सुनीत इतरत्र क्वचितच आढळते.

जगामध्ये माणसे पैसा बघतात पण प्रेम बघत नाहीत; आणि त्यामुळे ' हृद्रत्ना 'ची खरी पारख जगात होतेच असे नाही, हा कवीच्या म्हणण्याचा आशय आहे. इतरांनी कोणतीही दृष्टी ठेवली तरी निदान आपल्या दयितेने ती ठेवू नये असे सुनीतातील प्रेमिक म्हणताना माधवरावांनी दाखविले आहे.

**' सरसरमणीयार्थाचें......सिंचन '** = (पण हे प्रिये, तू लक्षात ठेव की ) जगाच्या दृष्टीने मोल नसलेले सरस व रमणीय अर्थाचे जे सुवर्ण ( काव्य–– हे एका अर्थाने सुवर्ण––सोने असते ) निर्माण करतो ते सुंदर स्त्रीच्या दृष्टीतील केवळ अमृताच्या सिंचनामुळेच.

**३. चिमुकली शान्ता :** ही कविता माधवरावांनी आपल्या एका जिवलग बाळमित्राच्या कन्येस उद्देशून लिहिलेली आहे. जीवनात आपण अत्यंत दुःखी झालो आहोत व आपली हृदयकवाडे उघडी झाली आहेत, अशा वेळी निर्व्याज व निर्मळ वृत्तीच्या लहान मुलांच्या दर्शनाने आपणास आनंद होतो; लहान मूल म्हणजे आपल्या जीवनरूपी जहाजाला तडीस नेणारी मार्गदर्शक चांदणीच होय, असे त्यांना म्हणावयाचे आहे.

**बेडर**= निर्भय. **कुर्रेबाज** = नखरेबाज. **'नेत्र न, शाळिग्राम साजिरे '** = ही उपमा रंग व आकार या दृष्टींनी लक्षात घेण्यासारखी आहे. आधुनिक कवितेत डोळ्याला दिलेली शाळिग्रामाची उपमा अभिनव असून ती पावित्र्याची दर्शक आहे. **गहिरे** = तेजस्वी. **शुचिरुचिर** = पावित्र्यामुळे गोड म्हणजे सुंदर वाटणारे.

**४. आत्मनिवेदन :** ( ही कविता १९१३ मध्ये लिहिली गेली व ती १९२३ मध्ये मुंबईच्या ' महाराष्ट्र साहित्य ' या श्री. विरकुड यांच्या मासिकात प्रसिद्ध झाली. परंतु दुर्दैव असे, की तिच्याखाली मुद्रण-दोषामुळे

१९१३ ऐवजी १९२३ असा सनाचा आकडा पडला. त्यामुळे माधव-रावांच्या जीवनातील याच वेळच्या एका दुर्दैवी घटनेशी तिचा अकारण संबंध लावला गेला ! पण कविता-लेखनाचा सन १९१३ हाच आहे.) प्रेम या विषयासंबंधी माधवरावांच्या पुढील भावना अवश्य लक्षात घेण्याजोग्या आहेत--

“ दूर राहुनी न कळत तुजला तुझीच करितां सेवा,
भाग्याचा तो कुणिहि निघेना ? मला न शिवता हेवा.
मला कल्पना-स्वर्गातिल तू तिलोत्तमा गमतीस,
कधीं न शिवती हीन भावना पार्थिव दुर्दम जीस.”

त्याचप्रमाणे प्रेमामध्ये ‘ कीव ’ किंवा ‘ भिक्षा ’ ही नकोत असेही त्यांचे म्हणणे होते. प्रेमाचे तत्त्वज्ञान या दृष्टीने ही कविता महत्त्वाची आहे.

५. **निसर्ग आणि मी :** या कवितेतील भाषाशैलीवर चंद्रशेखरांच्या भाषाशैलीची छाया पडली आहे. शिशिर ऋतूतील एका शान्त रात्री विरहव्याकुळ झालेल्या प्रेमिकाला निसर्ग व आपण यांमध्ये काय अंतर दिसते, याचे चित्रण या कवितेत आहे. आपण विरहार्त असून अशान्त आहोत, पण निसर्ग मात्र सुखमीलनात शान्त आहे, त्याला आपल्या-विषयी सहानुभूती वाटत नाही, ही विरही प्रेमिकाची तक्रार आहे.

६. **श्यामा रजनी :** माधवरावांचा ह्या कवितेतील प्रेमिक विरहार्त आहे. या प्रेमिकाची प्रिया बहुधा ‘ श्यामाङ्गिनी ’ असते. श्यामा म्हणजे रात्र किंवा काळसर वर्णाची स्त्री. माधवरावांच्या बहुतेक प्रेमिकांना ‘ श्यामा ’ आवडते. कदाचित या भावनेत “ शीते सुखोष्णसर्वाङ्गी ग्रीष्मे या सुखशीतला । तप्तकाञ्चनवर्णाभा सा स्त्री श्यामेति कथ्यते । ” या श्लोकातील कल्पनाही अभिप्रेत असेल.

या कवितेत प्रिया व रजनी यांच्यामध्ये दाखविलेले साम्य जितके स्वभावोक्त तितकेच हृद्य आहे. विशेषतः तारका, मिणमिण करणारा

दिवा, गवती टोळ व रात्रिकीटक यांचे उल्लेख विरहार्ताच्या मनातील हुरहूर वाढविणारे असल्याने कविता रसोत्कट झाली आहे व त्यात ‘वियोगिनी’ या समुचित वृत्तयोजनेने भर घातली आहे. रातकिड्याची एकटी एक सोबत व ‘सलतो संतत येथ कंटक’ यातील दुःख कवितेतील भावनेची आर्तता विशेष वाढवितात.

७. **स्वप्नयोग** : प्रिया झोपली असता प्रियकराने येऊन तिच्या गालाचे व नेत्राचे चुंबन घेतले व असे मीलन स्वप्नात झाले, हा या कवितेचा विषय आहे.

माधवरावांच्या या तऱ्हेच्या कवितेत कधी प्रियकर, कधी प्रेयसी आपल्या जोडीदाराचे झोपलेल्या स्थितीत चुंबन घेऊन जाताना दिसतात, आणि हा भास किंवा स्वप्न आहे असे त्या व्यक्तीला जेव्हा वाटते त्या वेळी ‘का ध्येय दूर गेलेलें परत ये गाढ झोपेंत’ असेही त्या व्यक्ती म्हणताना आढळतात. ही त्यांची विशेष आवडती भूमिका असावी असे वाटते. **स्वप्नयोग** = स्वप्नामध्ये झालेले मीलन.

८. **मुलाचा प्रश्न** : या कवितेचे पूर्वीचे नाव ‘विमला आणि अशोक’ असे होते. विधवा आईला मुलाने ‘मी कुठून आलो’ हा प्रश्न विचारला व त्यावर मायलेकरांची प्रश्नोत्तरे झाली, आणि आईच्या करुण विचारतरंगाला तोच संवाद कारणीभूत झाला. तिला आपला वैधव्याचा क्षण व त्याच क्षणी हृदयातून मिळालेला मूक दिलासा हे सर्व आठवले. बाळाने ‘चल चांदण्याशीं खेळावयास जाऊं’ असे म्हटल्यावर तिने उत्तर देण्याचे टाळले व त्याला ती झोपावयास घेऊन गेली; आणि त्याच तंद्रीत स्वप्नविमानात बसून ती आपल्या पतीचे दर्शन घेऊनही परत आली.

या कवितेचा विषय केशवसुतांच्या ‘दंवाचे थेंब’ या कवितेतील विषयासारखा आहे. दोहोंचे मानसशास्त्र एकच आहे, मांडणी फक्त निराळी आहे. केशवसुतांची मांडणी अधिक भावनोत्कट आहे तर माधवरावांची मांडणी अधिक कलात्मक आहे.

९. **प्रेमाची परीक्षा नको** : मीलनाभावी सुख जरी उणावले तरी चालेल, पण मी प्रेमाची परीक्षा बघणार नाही असे म्हणणाऱ्या प्रेमिकाचे उद्गार हा या कवितेचा विषय आहे.

माधवरावांची वर्णने रेखीव असतात, तशीच त्यांची विशेषणे-देखील साभिप्राय असतात. या दृष्टीने “ तव भावुक, मंद, मोजकें । मधु, निष्पाप, सलज्ज भाषण ” या ओळींतील विशेषणे पहा.

‘ श्यामा रजनी ’शी या कवितेची तुलना करून पाहण्यासारखी आहे.

१०. **स्वप्नांतील स्वप्न** : माधवरावांच्या प्रेमिकाला नव्हाळीच्या वयात जे अनेक स्वप्नाभास होतात त्यांतला हा एक आहे. त्याला आपली प्रिया भेटलीशी वाटते तोच हे स्वप्न आहे हे उलगडते. ‘ प्रेम कोणत्याही स्वरूपात दिसो, प्रेम ते प्रेम ’ हे त्याचे म्हणणे असते. ‘ वाफेच्या स्वरूपात दिसले काय किंवा बर्फाच्या स्वरूपात दिसले काय, पाणी ते पाणीच ’, हा दाखला तो देतो. हे स्वप्नरञ्जन करुणोत्कट तसेच हृद्य आहे.

११. **निशिगंधाचीं फुलें** : प्रियेने आवडत्या निशिगंधाची फुले भेट म्हणून दिली एवढे निमित्त झाले व विरहार्त प्रेमिकाला आपल्या भग्न प्रेमाचा सर्व कटुतर इतिहास आठवला, हा कवितेचा विषय आहे.

**कुटिलमुख** = वाकड्या तोंडाच्या. ‘ **रागरव काढुनि सौरभ-मिषें** ’ = सुगंधाच्या मिषाने जी फुले आपले रागदारीचेच स्वरालाप बाहेर टाकतात. ‘ **मी कान्तारीं ......** ’ = इथे ‘ गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते ’ हा भाव अभिप्रेत आहे. **अमरसुंदरी** = माधव-रावांचे प्रेमिक या स्वर्गीय व काव्यात्म भावनेने आपल्या प्रेयसीला संबोधतात. **पिङ्गलध्वनि** = पिंगळ्याचा म्हणजे घुबडाच्या एका जातीचा आवाज. हा अपशकुनी असतो व तीच अशुभ सूचना कवीला इथे द्यावयाची आहे. त्या दृष्टीने ‘ वठल्या गेल्या भावतरूच्या ’ हे शब्द साभि-प्राय आहेत. ‘ **अरुण राग** ’ = नव्हाळीतील गुलाबी प्रेम. **मधुदेवता** =

प्रेमदेवता. यातील रूपकात्मक ओळी विशेष करुणोत्कट आहेत. उदा०-- **‘ जिवंतपणिं मी समाधि... महाद्वार अंतरीं ’, ‘ संशयाभ्र... अमरसुंदरी ’, ‘ वठुनी गेल्या भावतरूच्या...ध्वनी उठे.’**

**१२. प्रेम कशावर :** ‘ प्रेम हे बाह्य उपाधीवर असले तर त्यापेक्षा ते नसलेले पुरवले, पण हृदयातल्या अनर्घ्य रत्नावर असले तरच ते खरे व टिकाऊ; तसे असले तरच त्याने हृदयात विहार करावा ’ हा या कवितेचा विषय आहे.

**अनर्घ्य :** ज्याचे मोल करता येत नाही असे. एका गुजराथी कवितेवर ही कविता आधारली असल्याचे माधवराव सांगतात. हे वृत्त माधवरावांनी फार सफाईदारपणे हाताळले आहे. मात्र यातील कल्पनेची व रचनेची धाटणी संस्कृत वाङ्मयातल्या रचनेसारखी अभिजात वाटते.

**१३. कुमारी पिरोजा :** माधवरावांच्या कवितांमधील ही एक उत्कृष्ट कविता आहे. तिचे वृत्त, विषय, रचना, कल्पना किंवा भाषा ही सर्व अस्सल ‘ माधवरावी छापा ’ची असून ती रसाला अत्यंत परिपोषक अशी आहेत. मुंबईस बॅकबेच्या वाळवंटात बागेशेजारी एकदा हे दृश्य माधवरावांना दिसले. आवडत्या दृश्यातील सूक्ष्म गोष्टीदेखील न्याहाळून लक्षात ठेवण्याच्या व त्या शब्दांत वठवण्याच्या कामात माधवरावांचा हातखंडा होता. या सर्वांचे प्रत्यंतर या कवितेत भरपूर येते.

पहिल्या श्लोकात माधवरावांनी एका कौमारकालीन निरागस मुलीचे सुंदर चित्र कसे उभे केले आहे ते पहा. यातील सुशुभ्र पाठ, सैल तिपेडी वेणी, लाल फीत, रुंद गाठ किंवा ‘ आगवळ ’ हा शब्द, हे किती साभिप्राय व प्रभावी आहेत ते पहा. माधवरावांच्या भाषेत अगदी शुद्ध संस्कृतपासून ( आजानु ) ते शुद्ध परकीय विशेषणापर्यंत ( मलमली ) सर्व प्रकारची विशेषणे येतात, व विशेषतः ती शेजारी शेजारी येतात. त्यामुळे पुष्कळ वेळा बेडौल रचना होते; पण या कवितेत या निरनिराळ्या सुंदर विशेषणांचाच उपयोग केलेला असूनही या कवितेचे सौंदर्य वाढले आहे.

या कवितेचा दुसरा विशेष हा आहे की, तीमधील कल्पनांची अभिव्यक्ती अतिशय उठावदार व प्रभावी शब्दांतच झाली आहे. उदा०-- " सुशुभ्र पाठ, सैल तिपेडी वेणी, तंग आजानु झगा, गोंडस बांधा, ऊर्ध्वसरलगति, हिमसित जंघा, गिरेबाज गुल्छबू कबूतर, उन्नत नासा आर्यत्वाची बोले भाषा, अर्धोन्नत वृक्ष, मधु प्रीति, कां ही गाथेमधली कविता, भारियलेला अनुक्त मंत्रें " हे शब्दप्रयोग पहा.

**सुरूतरू** = सुरूचे झाड सरळ असते व वाऱ्याने लवले तरी पुन्हा ते स्वाभाविकपणे सरळ होते हा भाव. **शाद्वल भूवर** = हिरव्या गवताने न्यहार दिसणाऱ्या भूमीवर. **गिरेबाज** = गिरक्या घेणारे. **गुल्छबू** = निशिगंधाप्रमाणे शुभ्र व सुंदर दिसणारे. **इरणबाग** = इराणातील प्रतिस्वर्गच अशी असलेली एक बाग.

आदचा पुत्र शेदाम याने एक ( terrestrial ) नंदनवन निर्माण करविले. त्यात रत्नांचे वृक्ष होते, आणि दूध, मध आणि मद्य यांच्या नद्या वाहात होत्या. हे नंदनवन त्याने एडनच्या वाळवंटात निर्माण केले, आणि त्यास इराणची बाग असे नाव दिले. कारण त्याच्या आजाचे नाव दूरम् असे होते. शेदाम स्वतःस परमेश्वर म्हणवीत असे. वरील उद्यानात प्रवेश करताक्षणीच शेदाम आणि त्याच्याबरोबरचे लोक यांना स्वर्गातून आणि त्या उद्यानातून एक आवाज ऐकू आला. त्या आवाजाने सर्व जागच्या जागी खिळून गेले.

या कवितेचे वैशिष्ट्य हे आहे की, तीमध्ये ज्या उच्च भावनेचे चित्र रेखाटावयाचे आहे तिचे दर्शन घडविण्यासाठी बाह्य गोष्टींचा कवीने साधन म्हणून उपयोग केला आहे. उदा०-पिरोजच्या स्वभावाची ' ऊर्ध्व-सरलगति ' दाखविण्यासाठी सुरूच्या वर्णनाचा भाग पहा; किंवा तिच्या सदभिरुचीची कल्पना सांगण्यासाठी तुरळक असलेल्या झालरीचे केलेले वर्णन पहा. तसेच डोळ्यांचा उल्लेख करताना ' निर्भयता, विश्वास, नसे प्राणहर ' ही विशेषणे पहा. याचप्रमाणे खेळाडूपण, मोकळिकीचा आनंद, वगैरेंचेही उल्लेख पहा.

कुमारी पिरोजा ही तारुण्याच्या सीमारेषेवर पण अलीकडे उभी आहे. तिला मूक संकुचित अशी मधुभीती अजून शिवली नाही; तिच्या

ठिकाणी अजून कौमारकालातील मुक्त मनाचे खेळाडूपण व मोकळिकीचा आनंद आहे. त्यामुळे ती निरागस बालवृत्तीची असून निजतंत्राने फिरते. माधवरावांना मुलांचे हे नैसर्गिक स्वरूप व ही सहज-सुंदर वृत्ती फार आवडत असे, व त्याच आवडीने हे चित्र त्यांनी रेखाटले आहे.

**१४. वाग्यत मोहिनी :**

**वाग्यत मोहिनी** = जिने आपल्या वाणीवर नियंत्रण घातले आहे पण जी आपल्या आकर्षकतेने मोहिनी घालते अशी प्रेयसी. **पद्मराग-गोपुर** = माणकांसारख्या लाल ओठांचे प्रवेशद्वार. **जिती** = जिवंत. **'शामी झेनोबियासारख्या दोन शामसुंदरी'** = पामिराच्या रसिक, शूर राणीप्रमाणे डोळ्यांत दिसणाऱ्या काळ्या सुंदर बाहुल्या. **नर्मद्युति** = थट्टा-विनोदाची किंवा आनंदाची चमक. **'मृगलोचन वर्षले...नक्त्र आला द्रव'** = मृगाचा पाऊस पडल्यानंतर आर्द्राचा ओलावाही यावयास हवा होता. **ध्येयकुमुदें** = ध्येयरूपी चंद्रविकासी कमळे. **सौष्ठवकौतुकी** = बांधेसूदपणाचे कौतुक करणारी. **'निळ्या घुमटावरचे लेख'** = आकाशातील ताऱ्यांचे ज्ञान.

या कवितेत माधवरावांनी आपल्या कल्पनेचे व भावनेचे सर्व वैभव ओतले आहे. आपल्याला मोहिनी घालणारी प्रिया 'वाग्यत' असल्या-मुळे प्रेमिक आकर्षित होऊनही स्तब्ध राहतो व तिच्या मौनावर आणि मोहिनीवर तो निरनिराळ्या 'कल्पना लढवितो. या कल्पनांतूनच त्याचे प्रेम व्यक्त होते, हा या कवितेचा विषय आहे.

यात माधवरावांनी अनेक रूपके व इतर अलंकारही योजले आहेत. अगदी पहिलीच उत्प्रेक्षा फार बहारीची आहे. मूर्ताला अमूर्ताची उपमा देऊन म्हणजे अंबाड्याला चिंतांच्या समूहाची उपमा देऊन माधवरावांनी आकर्षकता व अभिनवता हे दोन गुण साधले आहेत. तसेच पहिल्या कडव्यातील 'प्रसादपूर्णेन्दु व भावसिन्धु' किंवा दुसऱ्या कडव्यातील 'हृदयोद्यान व पद्मरागगोपुर', किंवा चौथ्या

कडव्यातील 'मृगलोचन, शुष्करंगलाघव' वगैरे शब्दांनी साधलेली रूपके, किंवा पाचव्या कडव्यातील विश्वसमाधीचे वर्णन, सहाव्या कडव्यातील निळ्या घुमटावरील लेखाचा दृष्टान्त, व शेवटच्या कडव्यातील प्रीतियोगसाधिकेचा समुचित उल्लेख यांनी ही कविता आमूलाग्र चढत गेली आहे.

ज्याप्रमाणे एखादा सजीव पुतळा समोर असावा, त्याचे दृश्य सुंदर दिसावे, पण त्याने काहीच बोलू नये व आपणाला मात्र त्याचे विलक्षण आकर्षण वाटावे, त्या मनःस्थितीची निदर्शक अशी ही कविता आहे. ही कविता म्हणजे प्रेमिकाने आपल्या मुग्ध प्रेयसीच्या ध्यानाचे काढलेले एक सुंदर शब्द-चित्र आहे. तिला आधुनिक मराठी कवितेत क्वचितच तोड सापडेल.

**१५. निराशेतील समाधान :**

ही कविता म्हणजे माधवरावांच्या प्रेमाच्या तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्यावर कुणाचे प्रेम नसावे ही जगातील एक खडतर आपत्तीच आहे; पण तीतही ते समाधानाची एक जागा मानतात. ती म्हणजे जरी आपल्यावर कुणाचे प्रेम नसले, तरी असे कोणी जगामध्ये आहेत की ज्यांवर आपले सर्वथैव प्रेम आहे. या भूमिकेवर उभे राहून त्यांचा प्रेमिक आपल्या 'हृदयजे'स उद्देशून हे निराशेतील समाधान व्यक्त करीत आहे.

हे समाधान व्यक्त करताना 'गारगोटी वर यावी व रत्न भूगर्भी अंधारात पडून राहावे हे साहजिक आहे' असे ते म्हणतात.

"**साधी वाङ्मोहनी सहज तो...उषावात**" या ओळींतील सर्व संदर्भ कै. कवी चंद्रशेखर यांना लागू आहेत. उत्कृष्ट 'वाङ्मोहन' साधूनदेखील शेवटी चंद्रशेखरांसारख्या कवीला अज्ञातात पडून रहावे लागले; (व इतरांना महत्त्व मिळाले असा भावार्थ.) पण खिस्त-शिरावर चढला म्हणून काट्यांच्या मुकुटाला सुमनगुच्छाची योग्यता येणार नाही हे तितकेच खरे आहे.

**निम्रूदाच्या भव्य अग्निकुंडीं** = ‘ मी सर्व जगाचा मालक आहे. जीवन आणि मरण माझ्या हाती आहे ’ अशी बढाई मारणारा निम्रूद हा एक मोठा अरेराव राजा होता. अब्राहिम या प्रवर्तकाने ( Prophet ) निम्रूदला विरोध केला म्हणून निम्रूदाने अब्राहिमाला पुढीलप्रमाणे कठोर शिक्षा केली. एका मोठ्या मैदानात लाकडांची रास करण्यात आली आणि ती रास पेटविल्यावर अब्राहिमाचे हातपाय बांधून त्याला त्या प्रचंड अग्निकुंडात टाकण्यात आले. ग्रॅब्रिल या देवदूताकडून देवाने त्या आगीतून अब्राहिमची सुटका केली. आगीत फक्त अब्राहिमच्या हातापायांस बांधलेले दोर जळाले. अब्राहिमच्या शरीरास अग्नी इजा करू शकला नाही, इतकेच नव्हे तर त्या लाकडांच्या राशीच्या जागी एक सुंदर उद्यान निर्माण झाले.

( पाहा : निर्मिली बाग थंडगार––**अदाह्य इब्राहिम** मघोमघ... संचार. ) या प्रसंगी ग्रॅब्रिल या देवदूताबरोबर इतरही अनेक देवदूत अब्राहिमच्या भोवती फेर धरून त्याचे आगीपासून रक्षण करीत होते, असा या ओळींतल्या उल्लेखाचा संदर्भ आहे.

देवाच्या आज्ञेने एका पिसूने निम्रूदाच्या नाकात प्रवेश केला आणि कडकडून चावा घेतला. त्यामुळे निम्रूद मरण पावला. अशा रीतीने अत्यंत क्षुद्र जंतूकडून स्वतःस सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या अरेरावाचा अंत केला.

## १६. चुकामूक :

माधवरावांच्या प्रेमिकाची प्रेयसी इथेही ‘ निःशब्द ’ असलेली दिसते. प्रेमिकाने तिचे ध्यान करताच ती उपस्थित झाली, पण त्याचे दार लावलेले पाहून ती मुकाटपणे निघून गेली. प्रेमिकाच्या हे लक्षात येताच त्याला आपली हानी झाली असे वाटते व तो ‘ भंगिलें दार, ये आता ! वा धाड मधुर संदेश ’ असे म्हणतो. विरहातील स्मृतीची ही एक निराळीच छटा या कवितेत आहे.

स्वरतरंगिणी व मधुललिता ही विशेषणे प्रियेस, तशीच प्रियेस लागू आहेत.

१७. गोड शेवट :

एका पुस्तकात दबून चुरलेला गुलाब कवीला दिसला व त्यावर त्याचे तर्कवितर्क चालू झाले. तो गुलाब झाडावरून कसा खुडला गेला, त्याला प्रेयसीच्या 'उत्तमाङ्गावर' स्थान कसे मिळाले, त्याने तेथे बसून काय नर्म शृंगार पाहिले व कोणती नर्म भाषणे ऐकली, व शेवटी दूर जाण्यास तो कसा तयार झाला याचा इतिहास त्याने कल्पनेने तर्किला आहे. हा इतिहास उद्बोधक व हृदयस्पर्शी वाटल्याने त्याने त्याला 'काव्यसरा' मध्ये गुंफले. शेवटी 'गुलाबाला जशी मुमुक्षूंची जोड लाभली तशी आपणांसही जीवनात लाभो' ही इच्छा त्याने व्यक्त केली.

यातील दिंडी जाती लिहिताना कवीने फक्त दुसरी व चौथी ओळ यांचेच यमक साधले आहे. त्यामुळे वाचताना साहजिकपणे ओळ (पहिली व दुसरी मिळून, किंवा तिसरी व चौथी मिळून) प्रदीर्घ होते व तीत भारदस्तपणा येतो.

कवीच्या मनात स्वताच्या जीवनातील जी हुरहूर खटकत आहे ती गुलाबाच्या उदाहरणावरून शान्त झाली आहे, व त्याची अभिव्यक्ती "**जवळ आहे तें कुठें कुणिंहि न्यावें......धूळींस मिळुनि जावें**" या १२ व्या श्लोकात व्यक्त झाली आहे.

१८. माझी इंदुबाला :

खऱ्या प्रेमिकाची प्रेमाकडे बघण्याची दृष्टी कशी असते हे या कवितेत कवीने व्यक्त केले आहे. आकाशात अनेक तारा असल्या तरी आपले चित्त मात्र इंदुबालाच (चंद्र) वेधून घेते असे त्याचे म्हणणे आहे. तिचे वैभव उसने आहे असे जे ज्योतिषी म्हणतात तो त्यांच्या अनुमानाचा दोष आहे असे कवी म्हणतो. त्यांना रुची प्रेममय दृष्टी नसते.

**निम्रूदाच्या भव्य अग्निकुंडीं** = ‘ मी सर्व जगाचा मालक आहे. जीवन आणि मरण माझ्या हाती आहे ’ अशी बढाई मारणारा निम्रूद हा एक मोठा अरेराव राजा होता. अब्राहिम या प्रवर्तकाने ( Prophet ) निम्रूदला विरोध केला म्हणून निम्रूदाने अब्राहिमाला पुढीलप्रमाणे कठोर शिक्षा केली. एका मोठ्या मैदानात लाकडांची रास करण्यात आली आणि ती रास पेटविल्यावर अब्राहिमाचे हातपाय बांधून त्याला त्या प्रचंड अग्निकुंडात टाकण्यात आले. ग्रॅब्रिल या देवदूताकडून देवाने त्या आगीतून अब्राहिमची सुटका केली. आगीत फक्त अब्राहिमच्या हातापायांस बांधलेले दोर जळाले. अब्राहिमच्या शरीरास अग्नी इजा करू शकला नाही, इतकेच नव्हे तर त्या लाकडांच्या राशीच्या जागी एक सुंदर उद्यान निर्माण झाले.

( पाहा : निर्मिली बाग थंडगार––**अदाह्य इब्राहिम** मधोमध... संचार. ) या प्रसंगी ग्रॅब्रिल या देवदूताबरोबर इतरही अनेक देवदूत अब्राहिमच्या भोवती फेर धरून त्याचे आगीपासून रक्षण करीत होते, असा या ओळींतल्या उल्लेखाचा संदर्भ आहे.

देवाच्या आज्ञेने एका पिसूने निम्रूदाच्या नाकात प्रवेश केला आणि कडकडून चावा घेतला. त्यामुळे निम्रूद मरण पावला. अशा रीतीने अत्यंत क्षुद्र जंतूकडून स्वतःस सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या अरेरावाचा अंत केला.

## १६. **चुकामूक** :

माधवरावांच्या प्रेमिकाची प्रेयसी इथेही ‘ निःशब्द ’ असलेली दिसते. प्रेमिकाने तिचे ध्यान करताच ती उपस्थित झाली, पण त्याचे दार लावलेले पाहून ती मुकाटपणे निघून गेली. प्रेमिकाच्या हे लक्षात येताच त्याला आपली हानी झाली असे वाटते व तो ‘ भंगिलें दार, ये आता ! वा धाड मधुर संदेश ’ असे म्हणतो. विरहातील स्मृतीची ही एक निराळीच छटा या कवितेत आहे.

स्वरतरंगिणी व मधुललिता ही विशेषणे कवितेस, तशीच प्रियेस लागू आहेत.

१७. गोड शेवट :

एका पुस्तकात दबून चुरलेला गुलाब कवीला दिसला व त्यावर त्याचे तर्कवितर्क चालू झाले. तो गुलाब झाडावरून कसा खुडला गेला, त्याला प्रेयसीच्या 'उत्तमाङ्गावर' स्थान कसे मिळाले, त्याने तेथे बसून काय नर्म शृंगार पाहिले व कोणती नर्म भाषणे ऐकली, व शेवटी दूर जाण्यास तो कसा तयार झाला याचा इतिहास त्याने कल्पनेने तर्किला आहे. हा इतिहास उद्बोधक व हृदयस्पर्शी वाटल्याने त्याने त्याला 'काव्यसरा' मध्ये गुंफले. शेवटी 'गुलाबाला जशी मुमुक्षूंची जोड लाभली तशी आपणांसही जीवनात लाभो' ही इच्छा त्याने व्यक्त केली.

यातील दिंडी जाती लिहिताना कवीने फक्त दुसरी व चौथी ओळ यांचेच यमक साधले आहे. त्यामुळे वाचताना साहजिकपणे ओळ (पहिली व दुसरी मिळून, किंवा तिसरी व चौथी मिळून) प्रदीर्घ होते व तीत भारदस्तपणा येतो.

कवीच्या मनात स्वताच्या जीवनातील जी हुरहूर खटकत आहे ती गुलाबाच्या उदाहरणावरून शान्त झाली आहे, व त्याची अभिव्यक्ती "**जवळ आहे तें कुठें कुणिंहि न्यावें......धूळीस मिळुनि जावें**" या १२ व्या श्लोकात व्यक्त झाली आहे.

१८. माझी इंदुबाला :

खऱ्या प्रेमिकाची प्रेमाकडे बघण्याची दृष्टी कशी असते हे या कवितेत कवीने व्यक्त केले आहे. आकाशात अनेक तारा असल्या तरी आपले चित्त मात्र इंदुबालाच (चंद्र) वेधून घेते असे त्याचे म्हणणे आहे. तिचे वैभव उसने आहे असे जे ज्योतिषी म्हणतात तो त्यांच्या अनुमानाचा दोष आहे असे कवी म्हणतो. त्यांना रसिकाची प्रेममय दृष्टी नसते.

रूरू = भृगुकुलोत्पन्न जो प्रमिती ऋषी त्याच्यापासून घृताची नावाच्या अप्सरेला झालेला पुत्र म्हणजे रूरू. **प्रमद्वरा** = विश्वावसू व मेनका यांची कन्या. रूरू व प्रमद्वरा यांचे निस्सीम प्रेम जडले. विवाहानंतर एक दिवस प्रमद्वरा सर्पदंशाने मृत झाली ! तेव्हा रूरूला फार दुःख झाले. पुढे कोणा ऋषीने त्याला सांगितले की, जर तू आपले निम्मे आयुष्य तिला द्यावयास तयार असशील तर ती उठेल. रूरूला ते मान्य झाले, व त्याने निम्म्या आयुष्याचे तिला दान केल्यावर प्रमद्वरा जिवंत झाली.

प्रेमाच्या अनन्यत्वाची कल्पना मांडताना माधवरावांनी हा 'रूरू–प्रमद्वरा' यांचा दाखला दिला आहे व तो अत्यंत समर्पक व प्रेमातील त्यागाचा निदर्शक आहे.

**१९. मधु मोहिनी :**

बगदाद शहरावर इंग्रजी अमल सुरू झाल्यावर मजा करण्याची वृत्ती नाहीशी झालेल्या एका कलंदरास (दारुड्यास किंवा बंधनातील साधूस) उद्देशून हे गीत लिहिले आहे. त्याला आज काहीही नकोसे वाटते आहे व त्याचे कारण कवी त्याला विचारीत आहे. यातूनच इस्लामी संस्कृतीचे दिग्दर्शन व कवितेतील विषयाचा विकास झाला आहे.

अशा कवितांत 'मधू' म्हणजे मद्याचा उल्लेख अनेकवार येतो. माधवरावांच्या 'उमरखय्यामच्या रुबाया', 'द्राक्षकन्या', 'मधुलहरी' या काव्यसंग्रहांतही या मद्याचे अनिवार उल्लेख आले आहेत. मग प्रश्न असा पडतो की, '**ही मदिरा वैषयिक की, अध्यात्मिक ?**' त्याला माधवरावांनी 'उमरखय्यामच्या रुबाया' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत उत्तर दिले आहे. सविस्तर उत्तर मुळातून वाचावे. ते सारांशाने द्यावयाचे म्हटल्यास माधवरावांचे म्हणणे असे आहे : "ज्या मदिरेत फार्सी कविता यथेच्छ विहार करताना आढळते ती मदिरा कोणती ? इस्लामाभिमानी लोकांचे म्हणणे असे की, ही मदिरा म्हणजे द्राक्षासव

नसून भक्ती होय. उलटपक्षी हेही खरे की, कुराणात मद्याचा स्पष्ट निषेध केला असूनही कवीत किती तरी दारू पिणारे होते. तेव्हा या मद्य-रुबायांचा अर्थ वैषयिक घ्यावयाचा की संकेताने अध्यात्मिक घ्यावयाचा ? उमर हा दारूबाज होता की सूफीभक्त होता ?

'बऱ्याच रुबायांचा अर्थ अध्यात्मिक घेतल्याखेरीज बोधच होत नाही, असे फिटझेरल्डचे मत होते. पण शब्दशः वाच्यार्थ घेतला तरी ज्या दुर्बोध राहतात अशा रुबाया त्यांच्याहून किती तरी अधिक आहेत.... परंतु अध्यात्मिक व वैषयिक यांचा संगम करणे कवीस फार सोयीचे असे. कारण लोक जितके संशय घेण्यास तयार तितकेच धर्मवेडे असत. त्यांस इंद्रियसंवेदना जितकी प्रिय तितकीच तर्काची सूक्ष्म भेदचिकित्सा प्रिय असे; आणि दोहोंचा गोंधळ करून, द्व्यर्थी काव्यभाषेचे पंख लेऊन स्वर्ग आणि पृथ्वी, परलोक आणि इहलोक यांत चैनीने तरंगत राहण्यास त्यास मोठा आनंद वाटे." ("उमरखय्यामच्या रुबाया" — प्रस्तावना, पृ. १०) सारांश, या कवितेच्या आधारे "भूतलीं मधुच अमृत रे। मधुरूपें ब्रह्मचि उतरे" हाच मधूचा अर्थ समजला पाहिजे.

**चंग** = मध्ये थोडा बाक असलेले एक वाद्य. इंग्रजीत त्याला हार्प (harp) म्हणतात. **तम्बूर** यालाच हिंदुस्थानात तंबोरा म्हणतात. हा शब्द तनपुरा असा मुळात असावा असे म्हणतात. परंतु अरब लोक त्याचा उच्चार तान + बूरा असा करीत. तान + बूरा = तम्बूर.

**बगदाद इंग्रजी झालें** = पहिल्या महायुद्धात ११ मार्च १९१७ रोजी ब्रिटिश सेनापती मॉड याने बगदाद जिंकले. त्या वेळीं पाचवा जॉर्ज इंग्लंडच्या गादीवर होता.

**पाचवा मुहम्मद तुर्की**— त्या वेळी बगदाद तुर्कांच्या ताब्यात होते. आणि पाचवा मुहम्मद तुर्की हा १९०८ पासून १९१७ च्या मध्यापर्यंत तुर्कस्तानवर राज्य करीत होता. त्याच्या कारकीर्दीत तुर्की लोकांत स्वदेशभक्ती प्रज्वलित झाली होती, आणि पाश्चात्य संस्कृतीशी

त्यांचा दृढ परिचय झाला होता. परंतु शस्त्रसंपन्न इंग्रज सैन्याने तुर्कांचा पराभव केला त्यामुळे पाचव्या मुहम्मदाची फार अपकीर्ती झाली. त्या वेळी पाचवा जॉर्ज राज्य करीत होता ( इ. स. १९१० ते १९३६ ).

**करीम** = उदार. परमेश्वरास उद्देशून हा शब्द योजिला आहे.

**गफ्फार** = थोर, क्षमाशील. ( परमेश्वरास उद्देशून योजिलेला शब्द ).

**पद्मरागरस** = तांबूस रंगाची छटा असलेले माणिक ( रूबी ). पर्शियन कवी मदिरेस पद्मरागरस म्हणत असत.

**पीर** = गुरू; अध्यात्मज्ञानदाता.

**हारीत-गमा** = कबुतराप्रमाणे मनोवेधक गती असणारी.

**हुरी** = नंदनवनातील कृष्णाक्षी सुंदरी. पुण्यवंतांची स्वर्गात सेवा करणाऱ्या.

**कलंदर** : ( १ ) ज्याने गृहदारादी सर्वांचा त्याग केला आहे असा मुंडन करणारा मुसलमान साधू. तो जगात संचार करीत असतो. उपासनेच्या बाह्यस्वरूपाची त्याला खंत वाटत नाही. बाह्यस्वरूपास तो मुळीच महत्त्व देत नाही.

( २ ) मद्यपी.

## २०. कुणी काय बांधलें :

शहाजहानने ताजमहाल बांधला; शिवाजीने रायगड बांधला; अहल्यादेवीने घाट, धर्मशाळा, वगैरे बांधल्या; आणि बाजीरावाने पर्वतीवर तुपाचे हौद बांधले, हा विरोध दाखविण्यासाठी ही कविता लिहिण्यात आली आहे.

**मंदारमंडपीं........वास्तुकला** = स्वर्गातल्या मंदार वृक्षाच्या मंडपाखाली वास्तुकला झोपली होती,– व हा ताजमहाल म्हणजे तिला पडलेले एक स्वप्न आहे. **कुराणवचनाक्षरी हार** = ताजमहालाच्या संगमरवरी दगडावर ठिकठिकाणी कुराणवचने लिहिलेली आहेत व ती अजून जशीच्या तशी अभंग आहेत असा भावार्थ. **बाह्योद्यान-**

**स्थितहरशिरश्चंद्रिका धौतकारी** = मेघदूतातील एका ओळीच्या संदर्भाने येथे जिकडे तिकडे रम्य चांदणे पडले आहे असा भाव व्यक्त केला आहे. **यवनीप्रियकवि** = जगन्नाथ पंडित हा कवी. **सुकाळले** = सुकाळ झाला, विपुलता झाली. **शिरीं घातले किरीट नूतन** = डोंगरांवर अनेक प्रकारचे किल्ले बांधले. **त्यांत रायगड राय गडांचा** = रायगड हा सर्व गडांचा राजा आहे असा भाव. या ओळीवर चंद्रशेखरांच्या भाषाशैलीची छाया पडली आहे. **राष्ट्रब्रह्म** = राष्ट्राचे सर्वस्व.

'अहल्यादेवी ही भोगपराङ्मुख पण कर्तव्याचा संन्यास न घेतलेली व सदा शिवाचा निदिध्यास घेणारी' अशी थोर स्त्री होती. हिने जनकाच्या राजयोगाची प्रचीती आणून दिली. आणि काञ्चनगंगा वाहवून यशाचा धवलगिरी काळापुढे उभा केला.

आणि कामान्धातुर, वाक्चतुर, लाडूबहाद्दर, महालगाजी अशा बाजीरावाने तुपाचे हौद बांधले. देशातील ऱ्हासाच्या क्रमाला हे अनुसरून असेच झाले!

**२१. असो स्थिर तुझा दृक्संदेश :**

हे एक विरहगीत आहे. आशानिराशांच्या झगड्यात मनाच्या झालेल्या आर्त ओढाताणीचे चित्रण या कवितेत आहे. प्रियेच्या पुण्यप्रीतिनिवासाने आपल्या जिवाचा विकास व्हावा ही यातील प्रेमिकाची तीव्र इच्छा आहे. शेवटच्या दोन कडव्यांतील तारू व ध्रुव या माधवरावांच्या आवडत्या कल्पना आहेत. या कवितेत एक गतिमानता आहे, आणि ती विरहाच्या तीव्रतेशी संवादी आहे. त्यामुळे वाचकाला ती शेवटपर्यंत पुढे पुढे खेचीत नेते.

**२२. भितों मी तुझ्या चुंबनातें :**

**२३. दिसण्यांत सुंदर ती नसे :**

या कविता गोल्डन ट्रेझरीतील कवितांची (स्व. रं. प्र. पहा) भाषान्तरे आहेत. भाषान्तर करणे हा माधवरावांच्या काव्यक्षेत्रातील महत्त्वाकांक्षेचा एक महत्त्वाचा भाग होता. 'उमरखय्यामच्या रुबाया', 'द्राक्षकन्या', किंवा 'मधुलहरी' ही तिचीच सुंदर फळे आहेत.

## २४. अंगाई :

मुलाला अंगाईगीत म्हणून निजवीत असता आईला आपल्या [ म्हणजे तिच्या ] आईने आपल्याला निजविण्यासाठी काय काय केले असेल ते आठवते व त्याचे शब्दचित्र ती ६ व्या कडव्यात काढते. नंतर तिला आईची तीव्र आठवण होते, व तिचा ऊर भरून येतो. तिच्या स्निग्ध ममतेची दृष्टी फिरल्यावर जीवनात उन्हाळा भासतच नाही, असे तिचे म्हणणे. चंद्र ज्याप्रमाणे सूर्याचा ताप गिळतो पण पृथ्वीला शीतलता देतो, तसेच आईचे असते. ती सांसारिक ताप गिळते व शीतल माया देते, ही तीमधील मध्यवर्ती कल्पना आहे. पण हा आईच्या प्रेमाचा अनुभव आई झाल्यावरच विशेष येतो– ही भूमिका कवीला विशेषत्वाने सांगावयाची आहे.

कवितेचा आरंभ जुन्या पद्धतीने केला आहे. सबंध चित्र मुंबई-सारख्या शहरातले आहे. निम्म्याच्या पुढील भागात आपल्या आईच्या आठवणी आहेत, व त्याचाच 'दायांश' मुलाला मिळो,या इच्छेने कवितेचा शेवट झाला आहे. शेवटच्या कडव्यातील " जडता ये पायाला " या ओळीतील अनुभव प्रत्येकाला आहे. त्याचप्रमाणे कवितेतील बाळाच्या आईचे मानसशास्त्र व त्या अनुरोधाने उठलेले विचारतरंग हे लौकिक जीवनातील हरघडीचे अनुभव आहेत.

## २५. तो क्षण :

प्रेमिकाला प्रीतीचे साक्षात्कार निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या रीतीने झाले. त्यातील ही एक आठवण आहे; प्रेयसीला तो त्याची स्मृती करून देत आहे. ' हीच स्मृती आपणांस प्रेमाच्या प्रलयकालातही तारते ' असे त्याचे म्हणणे.

## २६. एक घाव :

ही कविता हे कलापीच्या ' एक घा ' या कवितेचे भाषान्तर आहे. गेलेला किंवा घालविलेला विश्वास पुन्हा मिळत नाही, किंवा मिळविता येत नाही ही यातील मुख्य कल्पना कवीने एका पक्ष्याच्या

गोष्टीने विशद केली आहे. "गेली श्रद्धा पुनरपि न ये" हे त्यातील सार असून तो एक जीवनातला महत्त्वाचा अनुभव आहे.

**२७. कौमार्यस्मित :**

**पुलाजवळ** = हा संदर्भ व्यक्तिनिरपेक्ष असला तरी कवीच्या डोळ्यांपुढे पुण्यातील लकडीपूल असून त्याला उद्देशून तो निश्चित आहे. **विनोदी चमक खोडकर** = ही विशेषणे प्रथम माधवरावांनीच वापरली. **संध्याग्रहकौतुकमाधुरी** = शुक्राच्या कौतुकातील गोडवा. **डाव दोन खेळलों**– टेनिसचे डाव. **दुजें पण घोटाळे शैशवीं** : माधवरावांना शैशव व यौवन यांच्या सीमारेषेवरील कान्ती व वृत्ती आवडते याचे द्योतक आहे. '**अनुभूतीच्या भावचंदनी**'––जीवनातील झगड्याचे रणमैदान पुरे आहे. पण त्याच्या अलीकडे आशेचे नंदनवन आहे व तिथे भावरूप चंदनाने सुवासित झालेले वारे वाहात असतात; हा प्रान्त म्हणजेच शैशव व यौवन यांच्या सीमारेषेवरील भावमधुर काव्यात्म प्रान्त; यातच ती वावरत आहे, आणि म्हणून तिच्या कौमार्यस्मितात माधुर्य व आकर्षण ही आहेत.

ही कविता ज्या वेळी 'रविकिरणमंडळा'च्या पहिल्या 'किरण' या पुस्तकात प्रसिद्ध झाली त्या वेळी त्या पुस्तकावर अभिप्राय लिहिताना कै. बा. अ. भिडे यांनी वि. ज्ञा. विस्तारमध्ये माधवरावांना कडकडून चावा घेतला व हीच त्या वेळी र. कि. मं. च्या नव्या युगाची साक्ष होती. (माधवरावांच्या या कवितेबरोबर यशवन्तरावांच्या 'शीलवती सुंदरीस–' व गिरीशांच्या 'क्षण भेटलो' या कवितेवरही त्यांनी हल्ला केलेला होता.)

**२८. पोरक्या पोराचा धांवा :**

ही कविता जरी १९२१ मध्ये लिहिलेली असली तरी यातील भाव किंवा वृत्ती त्यापूर्वीच्या सातआठ वर्षांपासून माधवरावांच्या मनात वावरत होती. बडोद्यास असताना घरी काही मतभेद होऊन त्यांनी घर सोडले व एकटे देवांच्या चाळीत खोली घेऊन राहिले. पुण्यास

आल्यावर हाच एकटेपणा त्यांना जाचू लागला. त्यात त्यांची वृत्ती भाविक भक्ताची व अध्यात्मप्रवण होती. या दोन्हींचे मिश्रण होऊन त्यातून ही अत्यंत भावपूर्ण व करुणोत्कट अशी कविता निर्माण झाली.

**इयत्ता** = मर्यादा. **अनसूया** = हे विशेषण माधवरावांनी श्लेषाने पण साभिप्राय वापरले आहे. माता ही अनसूया ( निर्मत्सर ) असावी. ती तशी असतेच, पण क्वचित विपरीतही अनुभव येतो, नाही असे नाही; दुसरा अर्थ, दत्तात्रेयाची आई अनसूया हा होय.

शिक्षणाची 'चढण संपल्यावर' व जीवनाला थोडीशी स्थिरता आल्यावर ही अवस्थेची भावना निर्माण झाली आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांना आता बाल्यच बरे वाटते आहे. किंवा निदान प्रेमळ पण करड्या नजरेच्या गुरूच्या नजरेखाली राहावे असे वाटत आहे. अशा रीतीने देव, आई, गुरू यांच्या छायेखाली तरी राहावे किंवा भक्ताची भाविकता तरी प्राप्त व्हावी असे ते इच्छितात.

श्री. माधवरावांच्या जीवनातील निर्मळपणा, भाबडेपणा व सरळपणा सिद्ध करण्यास ही कविता पुरेशी आहे. त्यांच्या करुण तळमळीतून ती जन्माला आल्यामुळे त्यांच्या आन्तरजीवनाचे प्रतिबिंब तीत स्वच्छ पडले आहे.

**उपमन्यु** = वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपादाचा हा पुत्र. उदरनिर्वाहाची साधने बंद केल्यावर याने रुईचा चीक खाल्ला. त्याने अंधत्व आले व तो एका विहिरीत पडला. पुढे गुरू धौम्य यांनी शोध करून त्यास वर काढले व त्याला दिव्य दृष्टी मिळवून दिली.

**अफूबाजी** = धर्म ही कम्युनिस्ट पंथाला अफूची गोळी वाटते हा संदर्भ. **मिरा** = सुप्रसिद्ध संत कवियित्री मिराबाई. **नरसी** = नरसी मेहता हा सुप्रसिद्ध गुजराती संतकवी.

**२९. हास बालिके :**

या कवितेतील शेवटच्या कडव्यातील अर्थ कवीला विशेष अभिप्रेत आहे. बाल्यातील मुग्धपणाबरोबर बालिकेमध्ये प्रेमिक आपल्या प्रेयसीचे स्मारक कसे पाहतो ते यावरून दिसते.

### ३०. महात्मा काय करिल एकला :

या कवितेत १९२१ सालातील राजकीय वातावरणाचे प्रतिबिंब पडले आहे. महात्मा गांधींनी सत्याग्रहाची व असहकारितेची मोहीम सुरू केली व स्वातंत्र्ययुद्धाच्या एका नव्या युगाला सुरुवात केली. पण ही मोहीम यशस्वी झाली नाही. माधवरावांना ही मोहीम आवडली होती; पण लोकांची मनेच तयार नसल्याने हे अपयश आले असे त्यांचे म्हणणे. महात्माजी एकटे काय करणार ? लोकांची तयारी असली तर स्वराज्य व स्वातंत्र्य ही ताबडतोब मिळतील; पण लोकांची तयारी हवी ना ? महात्माजी एकटे काय करणार ? या मध्यवर्ती प्रश्ना-भोवती सर्व कविता गुंफली आहे.

साहजिकपणे कविता गुंफता गुंफता 'खरा पुढारी कोण' व 'नकली पुढारी कोण' याचेही त्यांनी मार्मिक चित्रण केले आहे. पहिल्या तीन कडव्यांत दिखाऊ, फांकड्या, द्विजिह्व व कुटिलगती पुढाऱ्याचे सुंदर वर्णन असून कडवे चारपासून महात्माजींचे म्हणजे खऱ्या पुढाऱ्याचे सुंदर चित्र रेखाटले आहे. ही दोन्ही चित्रे एक-मेकांशी तुलून पाहण्यासारखी आहेत.

### ३१. खुळी लाजरी पोर ! :

लहान असतानाच जिला अंगाखांद्यावर खेळविले ती एक मित्र-कन्या पुढे मोठी झालेली पाहून कवीला अपत्यनिर्विशेष प्रेमामुळे अधिक प्रिय वाटली. पण पूर्वी लाजत नसलेली पोर आता आपल्या-सारख्या जवळच्या व ओळखीच्या माणसालाही लाजू लागते, याचे त्याला नवल वाटते व अगदी वात्सल्यपूर्ण प्रेमाने तो म्हणतो, 'तुला कुणी प्रेमळ पण रसिक शिरजोर घेऊन जावो.' कवीच्या हृदयातील पितृवात्सल्याचा खरा आनंद तो हाच.

### ३२. मराठी असे आमुची मायबोली :

**श्रीमती इंग्रजी** = वैभवसंपन्न इंग्रजी भाषा. **मान्यता आज हिंदीस** = या कवितेच्या जन्मकाळी हिंदी ही राष्ट्रभाषा करावी ही

चळवळ सुरू झाली होती. **पेशावरीं – तंजावरीं** = यामध्ये भारताची जवळजवळ दोन टोके दाखवून मराठीचा विस्तार कोठपर्यंत झाला होता हे दाखविण्याचा हेतू आहे. **ज्ञानदेवी** = ज्ञानेश्वरीचे मूळ नाव ज्ञानदेवी हे आहे. या विशेषनामाचा विशेषणासारखा उपयोग केला आहे. कारण ज्ञानदेवीने बहुजनसमाजाला जागृत केले असे म्हणण्याचा त्यात भाव आहे. " **पुरी बाणली ......ताटांत आम्ही बसूं** " = संभाजी-बरोबर एका ताटांत एका ब्राह्मणाने भोजन करून त्याचा बचाव केला व आपले मराठेपण सिद्ध केले ही कथा येथे अभिप्रेत आहे. " **हिच्या लक्तरांची......लक्तरा** " = हिच्या दैन्यावस्थेबद्दल आम्हांला वाईट वाटते, पण ते दैन्य आम्ही आपल्या कर्तृत्वाने दूर करू असा भाव **रूपचापल्य** = हिचे देखणेपण व चपलता. **सुकार्याविणें** = प्रत्यक्ष भाषेची सेवा केल्याखेरीज बोलणे व्यर्थ असा भावार्थ. **पारतंत्र्यांत ही खंगली** = प्रथम मुसलमानी अमल व नंतर इंग्रजी अमल यांमध्ये तिची कुचंबणा झाली. **सिन्धु मन्थुनि** = हिच्यामधील उत्कृष्ट पण दडलेले वाङ्मय संशोधून व प्रकाशात आणून. **जगांतिल भाषा ......खंडणी** = कालान्तराने मराठीला असे अलौकिक वैभव प्राप्त होईल की, ती सम्राज्ञीपदावर बसेल व जगातील भाषा हिचे मांडलिकत्व पत्करतील. ही अनेक भाषांतून अनेक गोष्टी स्वीकारून त्या आत्मसात करील व स्वतः श्रेष्ठ होईल असा भाव.

### ३२. कवितेचें देणें :

आगगाडीतून प्रवास करीत असताना एका सुंदर स्त्रीचे जे एक सहजसुंदर दृश्य दिसले त्याचे कल्पनेने एक चित्र काढले व हेच कवितेचे शाश्वत देणे आहे असे कवीचे म्हणणे. अशी ध्येयभूत स्वप्ने कधी कधी दिसतात व त्याचेच आपण पूजन करतो हाही भाव त्यात आहे.

**तगरशुभ्र** = तगरीच्या फुलाप्रमाणे पांढरा (व पवित्र). **शेलाटा** = उंच, सडपातळ पण सुंदर. **बेतीव** = अंगासरशी असलेले. **कटउत्तर अंगीं** = कंबरेजवळच्या नेसणावर पडणारे. **पाटलच्छटा** = किंचित फिकया तांबूस वर्णाची. **परिखा** = खंदक, खळी. **उषःसखी ही**

**भाद्रपदींची वसुंधरा राणी** = भाद्रपदातील उषा व संध्या या ओल्सर परंतु आरक्त सुंदर असतात; ते रंगवैभव जिच्या ठिकाणी दिसते अशी. भाद्रपद महिना आकाशातील रंगवैभवाबद्दल प्रसिद्ध आहे. यात कवीची सूक्ष्म दृष्टी दिसते. **ताळे** = कुलूप. **कोन्दट** = गुदमरलेले.

यातील **तगरशुभ्र** व **बेतीव** हे अस्सल माधवरावी टाकसाळीतील शब्द आहेत. या कवितेत काढलेले स्मृतिचित्र अगदी नवीन पद्धतीचे नितान्त सुंदर व आकर्षक आहे. या शब्दचित्राच्या वर्णनातील रेषान् रेषा नवीन रंगाने नटल्या असून माधवरावांची रंगदृष्टी व कल्पनासृष्टी यांचा उत्कृष्ट नमुना यात दिसतो.

### ३४. सवत :

हे सुनीत म्हणजे Thomas Hardy च्या The Rival चे रूपान्तर आहे. यात मनुष्यस्वभावाच्या चित्रणाचा एक विशेष नमुना आहे. एका स्त्रीला आपला पती मेजाच्या खणात ठेवलेल्या एका स्त्री-प्रतिमेकडे पुनः पुनः इतका न्याहाळून एकाग्रतेने का पाहतो याचा हेवा वाटून तिच्या मनात सवतीमत्सर उत्पन्न झाला. म्हणून तिने एकदा त्याच्या अपरोक्ष ती प्रतिमा काढून पाहिली. तो ती तिचीच 'वासंतिक' म्हणजे ऐन तारुण्यातील प्रतिमा होती. मग ती आपल्या-शीच हसली. पण पुन्हा अन्य क्षणी तिला राग आला. कारण आपली पूर्वीची प्रतिमा ही आपली आजची सवतच आहे असे वाटून स्त्री-स्वभावानुसार तिने ती फाडून टाकली. स्त्रीच्या मनात झालेले हे आन्दोलन रमणीय, तितकेच स्त्रीस्वभाव दर्शविणारे आहे.

### ३५. राजकन्येस जोहार :

या कवितेतील प्रेयसी ही सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने उच्च पातळी-तील असून प्रेमिक हा त्याखालच्या पातळीतला आहे. मीलन शक्य नसले तरी निदान 'पुरें दुरुनि जरि असेल आश्रय' यावर तो संतुष्ट

आहे. भोगनिरपेक्ष प्रेमाचे हे चित्र असून 'मी भक्त भिकारी तर राणी कमला तू' यातील कल्पनेशी त्याचे साम्य आहे.

**३६. रागिणी विधवा :**

माधवरावांच्या जीवनकालात समाजात विधवांची संख्या वाढत होती व तो एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न होऊन बसला होता. 'पण लक्षात कोण घेतो ?', 'रागिणी' या कादंबऱ्या, प्रेमसंन्यासादी नाटके, व 'विरहतरंग', 'अभागी कमल' आदी करुण काव्ये ही त्याचीच द्योतक आहेत. या कवितेला दिलेले 'रागिणी' [प्रेम करणारी] हे नाव साभिप्राय आहे. ज्या समाजात दुर्दैवाने नशिबास आलेले वैधव्य म्हणजे कायमचीच आपत्ती आहे ही समजूत होती, व जिथे अशा स्त्रीला प्रेम करण्यालाही वाव नाही ही भावना प्रचलित होती तिथे माधवरावांनी उभारलेले हे बंड आहे. या बंडाचा उगम केशवसुतांच्या कवितेत व वा. म. जोशी यांच्या 'रागिणी' कादंबरीत आहे. 'रागिणी' हा शब्दही त्यांनी तेथूनच घेतला आहे.

सौभाग्य निमाल्यावर एक विधवा स्त्री-शिक्षणक्षेत्रात वावरू लागली. तिथे तिचे प्रेम एका खेळाडू, हुशार तरुणावर बसले. पण तिचे पूर्व-संस्कारयुक्त मन आपल्याशी लपंडाव खेळू लागले. पण अखेर त्या मनाने आपल्या अनुरक्तीची स्वतःला कबुली दिली. या लपंडावापासून तो अनुरक्तीच्या कबुलीपर्यंतची आन्दोलने या कवितेत सुंदर चित्रित झाली आहेत. शेवटच्या दिंडीतील संशय, संभ्रम व निश्चिती ही फारच परिणामकारक आहेत.

**रमाबाई** = कै. रमाबाई रानडे म्हणजे न्या. रानडे यांच्या पत्नी, व पुणे येथील 'सेवासदन'च्या संस्थापिका. '**बंडाची तुतारी**' = केशवसुतांनी तुतारी कवितेत पुकारा केल्याप्रमाणे विधवेला शिकण्याची प्रेरणा म्हणजे साक्षात पापच, यावर हा हल्ला आहे. '**परमिदम्**' = यातच सर्वस्व आहे असे वाटले नाही. पुरुषाच्या हाती स्त्रीचे जिणे निर्माल्यवत

कसे होते ते दिंडी १९ मध्ये पाहा. स्त्रीच्या मनात नव्याने प्रेमाचा होणारा उद्भव व समाजाची हिणकस दृष्टी यांची चित्रे दिंड्या २१ व २२ मध्ये पाहा. यातूनच तिला स्वतःच्या भावनेची व ध्येयमूर्तीची ओळख कशी पटत गेली आहे हे दिंड्या २३, २४, २५ व २६ मध्ये प्रत्ययास येते. मग प्रियकराचे वर्णन आहे. "आता त्याला आपल्या हृदयातील भाव कोण सांगणार? वायू? छे, तो तर सुगंधी पण मुका सोनचाफा. मेघ? छे, तो रडवा, नुसता गर्जणारा. उषेला चित्रलेखा मिळाली, मी तशी सखी कुठून आणू?" हे तिच्या मनातील विचार म्हणजे खरा रसोद्रेकच आहे.

'**नसे संशयसिंधूस तळ, न तीर...नीर**' या ओळीतील सौंदर्य अमर आहे. संशयसमुद्राचा तळ लागत नाही; त्याला शेवट नाही. समुद्राचे पाणी खारे व अश्रुही खारे. यामुळे या दृष्टान्तास सर्वतो-परी पूर्णता आली आहे. शेवटी 'तूच वेडी पण तुज न कळे कांहीं' यात प्रियकराकडून 'होकारच' येईल ही खात्री फार सुंदर तऱ्हेने सूचित केली आहे. माधवरावांच्या कवितांपैकी ही एक उत्कृष्ट कविता आहे.

**३७. प्रेमळे, जाशिल का सोडून? :**

प्रेमिकाला वाटणारी वियोगाची हुरहूर हा या कवितेचा विषय आहे. सहवासाने आपण एकमेकांचे पूरक कसे झालो, याचे विविध आठवणी सांगून तो चित्रण करीत आहे.

**३८. चांदण्यांतील हुरहूर :**

या कवितेचे मूळ शीर्षक '**सारंगीवाला**' असे होते. प्रथम गिरीश, नंतर यशवन्त, नंतर माधवराव यांनी या कविता एकापाठोपाठ लिहिल्या. त्या एकाच जातीत लिहिल्या. या जातीची नवीन घडण पहिल्याने गिरीशांनी केली, व तीत बाकीच्यांनी नंतर लिहिले. त्यांचे अत्रे यांनी विडंबनही केले. माधवरावांनी आपल्या कवितेतील भावनेला एका प्रसंगाची व स्थलविशेषाची जोड दिली आहे. कवी पुणे येथील

फर्ग्यूसन कॉलेजच्या टेकडीवर चांदण्या रात्री बसला आहे. दुरून वाहणाऱ्या 'मुठा' नदीच्या पात्रावर अधान्तरी 'पांडुरपूर' वाहात आहे; वर तारकासृष्टी आहे, व कवी 'कविकातळा'वर— या टेकडी-वरील र. कि. मं. च्या कवींची बसण्याची जागा-- पडला असून त्याने चांदणे पांघरले आहे. इतक्यात सारंगीवर वागीश्वरीचे (बागेसरीचे) सूर आले, तरंगले, व कुठे तरी दूर जाऊन लुप्त झाले. त्यामुळे कवीच्या मनातील हुरहूर फारच वाढली; व त्याला आपले ध्येय आले, तरंगले व निघून गेले असे वाटले. कवीला आपल्या ध्येयाशी पाहिजे असलेले 'निर्भर आलिंगन' मिळाले नाही म्हणून त्याच्या मनाची तीव्रता वाढली.

३९. कंचनी :

ही कविता माधवरावांनी सातारा मुक्कामी लिहिली. त्या वेळी तेथे श्री. विठ्ठलराव घाटे असि. डे. इन्स्पेक्टरच्या जागेवर होते. हे दोघे बाल-मित्र त्या दिवशी सार्वजनिकरीत्या झालेल्या एका नर्तकीचे नाच-गाणे ऐकण्यास गेले होते. नाचगाणे करणारी कंचनी अत्यंत सभ्य होती, व तिचे गाणे फारच चांगले होते. तिचे नर्तनकौशल्यही अपूर्व होते. या सर्वांचा माधवरावांच्या मनावर जो परिणाम झाला, त्याचे सुंदर शब्द-चित्र त्यांनी त्या रात्रीच घरी आल्यावर रेखाटले.

याचा बहुतेक भाग वर्णनाने व्यापलेला आहे. नाचगाण्याला सुरुवात केल्यापासून तो शेवटपर्यंत कोणकोणत्या गोष्टीचे कलात्मक दर्शन घडले हे माधवरावांनी अतिशय सुंदर व रेखीव शब्दांत चित्रित केले आहे. विशेषतः शेवटच्या कडव्यातील माधवरावांची 'कृतज्ञता बुद्धी' विशेष सहानुभूतीची द्योतक आहे. या ठिकाणी पूर्वीचे शेवटचे कडवे असे होते--

"वंद्य तू खचित सदां मजलागी
किति तुझी जात जगांत अभागी
घे कृतज्ञतेची अमोल तूज बिदागी." ('शलाका')

या ओळी अधिक करुणोत्कट आहेत, व त्यांत एका सामाजिक वृत्तीचा उल्लेख झाल्याने त्या अधिक हृदयस्पर्शी वाटतात.

या कवितेतील भाषेचा थाट ' मुक्तेश्वरी ' पद्धतीचा वाटतो. विशेषतः " संगीताच्या कळा, ' घवघवे सुरत पाक फाकडी ', झगमग, झळकती, नृत्यगानलाघवी, उजू कुरंगी, सुगर, सारजा, कोळपल्या " या शब्दांची तऱ्हा व आतील वर्णनाची पद्धती मुक्तेश्वरी थाटाची आहे.

यातील प्रत्येक कडवे रेखीवपणा, भावनोत्कटता, साक्षाद्दर्शन व समुचितता यांनी रसरसून भरलेले आहे. कविता वाचताना आपण साक्षात नृत्यगान पाहतो व ऐकतो आहो असे वाटते.

आणि दुर्दैव असे की, माधवरावांच्या शत्रूंनी त्यांच्यावर आरोपाची जी अनेक शस्त्रे उगारली त्यांत या कवितेचा आधार घेऊन " Look here, he has written a poem on a dancing girl " या शब्दांनी केलेल्या अधिक्षेपाचेही एक तीव्र शस्त्र होते !!

**हृत्संगी** = हृदयाला जाऊन भिडणारे. **तन्वंगी** = शेलाटी. **ध्वनि** = आवाज (गीतातील) सूचक अर्थ. स्मिताने ध्वनी व्यक्त करणाऱ्या कंचनीचे ' सुदती ' हे विशेषण किती साभिप्राय आहे ते पाहा. **गुल्छडी** = जीवर गुलाबाची फुले उमलली आहेत अशी छडीसारखी सडपातळ तनू. **घवघवे** = सुगंध दरवळणे, शोभून दिसणे. **सुरत** = सौंदर्य. **पाक** = शुद्ध, निर्मळ. **फाकडी** = ऐटबाज, डौलदार. **झगमग** = प्रकाशकिरणांची लहर, चमक. **साज** = पोशाक. **उर्वशी** = पुरूरव्याची प्रेयसी. **नृत्यगानलाघवी** = नाचणे व गायन यांतील भावलहरी. **समेवर** = सम म्हणजे चिजेच्या पालुपदातील एक विशिष्ट जोरकस जागा. **उजू** = सरळ. **कुरंगी** = हरिणीप्रमाणे. **पोरसवदा** = तारुण्यात जिने नुकताच प्रवेश केला आहे अशी.

४०. हाकाटी :

ही ' हाकाटी ' जीवनातील मित्रांचे व संस्था चालविणाऱ्या अधिकाऱ्यांचे कटू अनुभव घेतल्यावर माधवरावांनी लिहिली

आहे. विशेषतः पहिल्या अभंगातील ‘ हृदयींची आस आस । चूर झाली सावकाश ।। प्रीतिकीर्तीचे डोलारे । गेले कोसळून सारे । ’ या ओळींवरून ते कळून येण्यासारखे आहे. माधवराव हे खऱ्या ‘ लोकशाही ’चे विलक्षण भोक्ते होते. त्यासाठीच त्यांनी अनेक झगडे केले. पण ‘ जनतेचा जो भुकेला । तिनें केला अर्धामेला । ’ हाच कटू अनुभव त्यांना आला ! पुस्तकी ज्ञान व्यवहारात व्यर्थ होते. कल्पनेच्या स्वर्गातून अशा तरुणाला खाली आदळावे लागते. आणि ‘ सत्ता करी तेंच सत्य ’ हेही त्याला नाइलाजाने मान्य करावे लागते. कारण लोकांच्या ओठात ‘ लोकरावी ’ व पोटात ‘ सुल्तानी ’ची हाव असते. पण ‘ स्वत्वमणी ’ विकून ‘ साम्राज्यरमणी ’ मिळाली तरी आपणांस ती नको, असे त्यांचे म्हणणे आहे. आणि म्हणून माधवराव बोरीच्या काठी बसून पांडुरंगाला आपल्या हृदयाला शान्ती देण्याविषयी विनवितात.

**शहाजणें** = वाजंत्री.

**४१. माझी ताई :**

ही कविता एका छोट्या मुलीच्या निमित्ताने लिहिली गेली आहे. माधवरावांना बालपण विशेष आवडत असे. कारण मोठे होऊन दुःखे भोगण्यापेक्षा लहान होऊन निरागस राहणे त्यांना फार प्रिय असे, म्हणून आपल्या डोक्यावरचे केस जरी पांढरे झाले ( भस्म माझ्या डोक्यावरी ) तरी आपण बाळ होण्यास तयार आहो असे ते म्हणतात. कारण त्यातच त्यांना आपले वैकुंठ आहे असे वाटे.

**४२. रसिकास :**

या कवितेचा जन्म एका मजेदार परिस्थितीतून झाला आहे. एका आधुनिक कवीने यशवन्त व गिरीश यांची कविता बरीच लोकप्रिय होत आहे व त्यांना अमूप कीर्ती लाभत आहे हे पाहून मत्सरभावनेने ‘ यशोगिरीस ’ म्हणून एक कविता लिहिली, व तीत ‘ उगाच का

धडपडता कीर्ती ही मरणाच्या मोलाने मिळते' असे अनुदारपणाने लिहिले. माधवरावांना ते बरे वाटले नाही. श्री. माधवराव अमळनेरास होते व सदर कवी धुळ्यास होते. तेव्हा भेट झाल्यावर त्यांनी सदर कवीला त्याच्या अनुदारपणाबद्दल दोष दिला व म्हटले, "तुम्ही असे लिहावयास नको होते. जर कीर्ती व मरण यांचा संबंधच दाखवावयाचा होता तर तो निराळ्या तऱ्हेने तुम्हांला दाखविता आला असता." असे म्हणून त्यांनी 'रसिकास' ही कविता स्वतः लिहिली व ती त्याला दुसरे दिवशी वाचून दाखविली.

या कवितेत कवी रसिकाला उद्देशून बोलत आहे अशी भूमिका आहे. कवी म्हणतो, "हे रसिका, हे सर्व तुझेच आहे. काव्यसंपदा माझी नसून ही शारदेची कृपा आहे. तुझे हृदय माझ्याशी सहभावनेने कंप पावले तेव्हाच मला जे मिळावयाचे ते मिळाले. अनुभूती व वायवी कल्पना यांना कवी शब्दांनी बांधून ठेवतो; पण याची पडछाया तुझ्या अंतःकरणात दिसते. तुझे मौन तन्मयतेने डोलते तेव्हा मला सर्व काही मिळते. लोकांनी केलेल्या स्तुतीचा गलबला क्षणिक असतो. पण खऱ्या कीर्तीचा स्वर्ग मेल्याखेरीज कुणाला मिळाला ?"

यात "अनुभूती कल्पना क्षणिक तरल वायवी......कवी" यातील मूलभूत कल्पना शेक्स्पीअरच्या "As imagination bodies forth it gives to airy nothings a local habitation and a name." या कल्पनेशी पुष्कळ जुळते. **वायवी** = वायुमय. **तन्मयतेचे मौन** = न बोलता एकाग्रतेने डोलणे. "**कीर्तिचा स्वर्ग ......लाभला ?**" = मेल्यावर जी कीर्ती मिळते तीच खरी कीर्ती; इतर म्हणजे क्षणिक गलबला.

### ४३. संगमोत्सुक डोह :

ही माधवरावांच्या कवितांपैकी एक उत्कृष्ट कविता असून तीत प्रीति-जीवनातील व लौकिक जीवनातील एक अनुभव साठलेला आहे. समोरा-समोरून वाहात येणाऱ्या दोन प्रवाहांचा प्रीतिसंगम झाला आहे व त्या तन्मयतेत त्यांनी थोडा वेळ प्रीतीचे नर्तन केले आहे, पण उन्हाळ्यामुळे

दोन्ही प्रवाहांना खांडवे पडले आहेत व संगमस्थानचा डोह तेवढा ह्या रेताड व भयाण पात्रात एकाकी उभा आहे. अशा विरहाकुल स्थितीत तो आपली कहाणी सांगत आहे. तो म्हणतो–" माझ्या जीवनाचा प्रवाह खंडित झाला आहे व मला येऊन भेटणाऱ्या प्रियेच्या जीवनाचा प्रवाहही खंडित झाला आहे, आणि मी येथे एकाकी उभा आहे. प्रियेची प्रीती कशाने लोपली ? माझ्या हृदयात अथाङ्ग प्रीती असून तिचा उपयोग काय ? कोणी म्हणतात माझी भावना मेली आहे, पण खरे म्हणजे माझ्या अंतःकरणाला जडता आली आहे व ती काही केल्या जात नाही. माझ्या अंतरंगात सर्व अंधार आहे. माझा नाचाचा सर्व उत्साह मावळला आहे. माझ्याकडे माणसे व गुरे संध्याकाळीं येतात, क्षणभर विसावा घेतात, पण त्यांना घरेदारे आहेत तिकडे ती थोड्या वेळाने वळतात, आणि मी मात्र एकटा निःशब्द झुरत बसतो. आता मला एकच आशा आहे ती म्हणजे–आकाशात इंद्राची दुंदुभी वाजेल, वीज चमकेल, मेघ गडगडतील, व देवांचा ऊर भरून येऊन त्यातून सहस्र-धारा कोसळतील, मोर नाचतील, बेडूक स्तवने गातील त्या वेळीं हे प्रिये, तू मला गाढ आलिंगन देशील ना ? त्या आलिंगनाकडे पाहून आकाशात देव इंद्रधनुष्याचे तोरण बांधतील. आणि मग आपण मंगल जंगलगान म्हणत, कड्यावरून धडाधड उड्या घेत, काषायवस्त्रे धारण करून व संगामध्येदेखील विरक्त राहून एकतेच्या सागरात मिळून जाऊ.–पण अरेरे, हा वैशाख अजून संपत नाही ! तोपर्यंत या अज्ञातवासात मला राहिले पाहिजे ! " **मंडूक ते द्विज** = दोनदा जन्म झाल्यामुळे बेडकांना द्विजही संज्ञा आहे. **खेंव** = आलिंगन. **काषायरंग** = भगवा म्हणजे विरक्तीचा द्योतक रंग; पावसाळीं नदीचे पाणी गढूळ असते, त्यावर ही कल्पना रचिली आहे. **संगांत पूर्ण निस्संग** = मीलनातही त्यागाची किंवा विरक्तीची भावना असलेले आपण. **समाधिसागरीं** = एकरूपतेच्या, मीलनाच्या सागरात. अजून **संपेना वैशाख हंत !** = पण अरेरे ! हा उन्हाळा अजून संपत नाही; म्हणजे हा अज्ञातवास अजून सरत नाही त्याला काय करावे !

या शेवटच्या ओळीने या कवितेतील करुण रसाचा परमोत्कर्ष साधून माधवरावांनी जीवनाची शोकान्तिका कशात असते तिचे दर्शन घडविले आहे. आणि बरोबर याच ओळीमध्ये 'हंत!' या सुंदर समुचित शब्दाऐवजी केवळ दुष्ट चेष्टा करण्याच्या हीन भावनेने व पाणचट कोटी करण्याच्या मोहाने 'मंथ' हा अनुप्रासाचा इंग्रजी शब्द सुचवून माधवरावांचे कोल्हापूरचे टीकाकार डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांनी आपला कमालीचा अरसिकपणा दर्शविला आहे.

या कवितेचे वृत्त माधवरावांनी बंगाली वृत्तावरून घेतले आहे. ११ अक्षरांची ओळ, मधल्या छोट्या ओळी ८ अक्षरांच्या, व कडवे ६ ओळींचे अशी बांधणी मात्र माधवरावांनी केली.

**संगमोत्सुक** हा शब्द कदाचित त्यांना 'अयं स ते तिष्ठति संगमोत्सुकः' या शाकुंतल नाटकातील दुष्यंतवचनावरूनही सुचला असेल. जीवनप्रवाहात मागलेपुढले प्रेमाचे धागे खंडित होऊन ज्यांना ते पुन्हा पूर्ववत होईपर्यंत अज्ञातवासाचा काळ घालवावा लागतो त्यांना या कवितेत आपले जीवनदर्शन निश्चित घडेल व माधवरावांच्या कवित्वशक्तीची थोरवी पटेल.

**४४. माझें माहेर-सासर :**

कवितेत जीवनातले अनुभव बरोबर घेऊन व त्यांचे उदात्तीकरण करून माधवराव अध्यात्मिक भूमिकेवरून ईश्वराशी श्रद्धावंत अन्तःकरणाने बोलत आहेत. मागल्या आठवणी गोड असतात, तशीच पुढील ध्येयाची ओढही मधुरभावाची असते. हे मनात येऊन ते म्हणतात, 'हे विश्वंभरा, सासरी जाणारी कन्या ज्याप्रमाणे मागेपुढे पाहात जाते त्याप्रमाणे माझी अवस्था झाली आहे. तरी तूच आता माझे माहेर व सासर हो; मला सर्वस्वी पुढील--तुझी ओढ लागून तुझ्याशी एकरूप होऊ दे.'

**'कन्या सासऱ्यास जाई...पाही'** = या ओळीमध्ये तुकारामाच्या **"कन्या सासुऱ्यासी जाये। मागें परतोनि पाहे।"** या अभंगाचा

घागा घेऊन माधवरावांनी आपला अभंग पुढे रचला आहे. ‘**पाणी उल्लंघी शेवटीं**’ = या ओळीत वधूघरच्या माणसांनी ती सासरी जाताना तिला पाण्यापर्यंत (ओदकान्तम्) म्हणजे गावच्या नदीपर्यंतच पोचविण्यास जावे हा ‘शाकुंतल’ नाटकात उल्लेखिलेला दंडक अभिप्रेत आहे. या धोरणानेच पुढील “**आईबापें ऐल तटीं**” या ओळीचा व “**कां न होशी विश्वंभर। तूंच माहेरसासर**” या ओळींचा अर्थ लागेल. माधवरावांची ही अध्यात्मिक भूमिका किती उच्च आहे हे यावरून कळेल.

**४९. इन्शाल्ला :**

‘**इल्लल्लाहु इलाह ला**’ = अल्लाच अनन्य प्रभू. ‘**अल्लाहु अक्बर**’ = ईश्वर थोर आहे. **काबा** = मक्केच्या प्रार्थनामंदिरातील एक मुख्य दगड. **ऊर्जस्वल** = उदात्त, थोर. **बेलाग** = न चिकटलेला; तुटलेला. **काफीर** = मुसलमानेतर. **इन्शाल्ला** = प्रभू इच्छील तर. ‘**अल्हम्दु लिल्लाह**’ = प्रभूची स्तुती असो. **उक्तुलू** = ठार मारा. **तांबारे** = तांबरून जाणे. **तिखें** = पोलाद; धाडस. **बुत्शिकन्** = मूर्तिभंजक. **बेहेस्त** = स्वर्ग. ‘**बहात्तर हुरी**’ = बहात्तर पऱ्या. **रौप्यांगी** = चांदीसारखे ज्यांचे अंग नितळ आहे अशा. **कस्तूरिका-कुंतला** = कस्तुरीप्रमाणे ज्यांचे केस काळे आहेत अशा. **मत्ताक्षी** = ज्यांचे डोळे तारुण्यमदाने धुंद आहेत अशा. **सरुयष्टि** = सुरूच्या झाडाप्रमाणे सरळ ज्यांचे शरीर आहे अशा. **हारित-गति** = कबूतराप्रमाणे ज्यांचे पदन्यास आहेत अशा. **पेशला** = कोमल; मुलायम. **पाटस्थलीं** = नंदनवनात. **पाटलसुमें** = गुलाबाची फुले. **अवस्थली** = अस्वस्थ झाली, (विशेषण-क्रियापद). **नबी** = पैगंबर. **तपनीं** = नरकात. **दीन** = मुसल्मानांचा घोषशब्द, धर्म (इस्लाम धर्म). **भोगभूमि** = हिंदुस्थानात येऊन निरनिराळे भोग भोगावयाचे हीच कल्पना ठेवून तिला मुसलमानांनी भोगभूमी असे म्हटले आहे. **शामरूमीं** = रूमशामच्या राज्यात. ‘**मर्यम् झमानी**’ = अकबर-पत्नी.

या कवितेमध्ये हिंदुस्थानात राज्य स्थापण्यामध्ये मुसल्मानांचे कोण-कोणते हेतू होते व त्यांच्या धर्माची शिकवण काय आहे, हे माधव-

रावांनी एकत्र ग्रथित केले आहे. ते म्हणतात, "तुम्ही सर्व जग ऐक्य करा; काफिरांच्या जगात राज्य मिळवा; मूर्तिभंजक व्हा व मक्केची यात्रा करा. हिंदुस्थान ही तुमची भोगभूमी आहे. इथले ऐश्वर्य भोगल्या-वर नंदनवनातील पऱ्या तुमचे स्वर्गात स्वागत करतील व रूपसंपन्न अप्सरा तुम्हांला मद्याचे प्याले भरून देतील. तुम्ही 'दीन' असा जयघोष करताच सर्व दुनिया तुमच्या पायांशी दीन होईल. रूमशाममध्ये मिळणार नाही, असे ऐश्वर्य तुम्हाला येथे मिळेल व येथे स्वराज्य स्थापन करणाऱ्या श्रेष्ठ राजाच्या गळ्यात येथील स्त्रिया माळ घालतील." ही मुसलमानांची शिकवण होती.

**४६. मराठबाणा :**

मराठी बाण्याच्या अभिमानाने प्रेरित होऊन ही कविता माधव-रावांनी लिहिलेली आहे. पहिल्या श्लोकात महाराष्ट्राच्या मर्यादा सांगि-तल्या आहेत, व त्याच्या अंतरंगाचेही वर्णन केले आहे. दुसऱ्या श्लोकात महाराष्ट्र-सम्राट शिवाजीमहाराज यांच्या महात्मतेचे वर्णन आहे. तिसऱ्या श्लोकात मराठी भाषेचे व ती वाढविणाऱ्या ज्ञानेश्वर व ज्ञानदेवी यांचे वर्णन आहे. शेवटच्या श्लोकात 'मराठीला अन्याय झाला तर कोणाही मराठ्याला सात्त्विक संताप यावयास पाहिजे, व महाराष्ट्रात तरी महाराष्ट्रीयांचे वर्चस्व असले पाहिजे' अशी तीव्र आशा व्यक्त करून माधवरावांनी त्या 'वागीश्वरी'ला वंदन केले आहे.

'कृष्णपाषाण' व 'लोहपाणी' हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. तसेच 'धर्मवेड नको, पण समता व गुणग्राहकता यांनी युक्त असे राष्ट्रकार्य हवे' असेही त्यांनी म्हटले आहे. मराठी ही 'ज्ञानदेवी' आहे, व जो ती मायबोली असे समजतो तो मराठा, ही व्याख्या त्यांनी केली आहे.

**४७. खरा शूर :**

पुण्यात काही वर्षांमागे एका शालेय तरुण मुलीवर एका गुंडाने भर रस्त्यात हात टाकला. या वेळीं भोवताली अनेक लोक नुसते बघे

होते. पण एक शूर तालिमबाज तरुण पुढे झाला व त्याने त्य गुंडाचा चांगलाच समाचार घेऊन त्या मुलीला सोडविले.

त्या दिवशी संध्याकाळी मी व माधवराव नव्या पुलावरून पुणे स्टेशनकडे हिंडावयास गेलो होतो, व परत घराकडे येताना याच विषयावर बोलत होतो. बोलता बोलता माधवराव भयंकर तापले व एकदम गप्प झाले! सुमारे अर्ध्या तासाने आम्ही चकार शब्दही न बोलता घरी (४६१ शनवारमध्ये) पोचलो. ते सरळ माझ्या लिहिण्याच्या मेजाजवळ गेले व त्यांनी अगदी पाठ केल्याप्रमाणे ही कविता सुमारे १५ मिनिटांत लिहून काढली. दुसरे दिवशी त्या तरुणाला माधवरावांनी त्याच्या कर्तृत्वाबद्दल धन्यवाद दिले.

या कवितेतील "**पडे पुंड गतप्राण—गुन्हा जाणा**" हे सर्व माधवरावांनी कल्पनेने लिहिले आहे, त्यात घडलेल्या हकीकतीचे यथातथ्य चित्रण नाही. पण असे प्रकार त्या वेळी मुंबईत किंवा इतरत्र घडत त्याची कलात्मक जोड या मूळ चित्राला दिली आहे.

अशा रीतीने नैसर्गिक प्रेरणा मिळून मनुष्य सहजवृत्तीने जे कर्तृत्व दाखवितो त्याबद्दल माधवरावांना विशेष कौतुक वाटत असे. शिक्षणाने आपण हीन 'वेषवीर' होता कामा नये; आपल्या नैसर्गिक प्रवृत्ती सामर्थ्यसंपन्न झाल्या पाहिजेत, हे त्यांचे म्हणणे असे.

**मारु**=खूबसुरत. '**दूध वाघिणीचें प्याले**'=इंग्रजी शिक्षण घेतले. (कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर इंग्रजी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हणत असत.)

**वेषवीर**=पोशाकी. **सोम**=सोमरस.

अशा कृत्याची फलश्रुती काय तर 'मुक्तिदाता बंदीवान्' व 'आता बालेला त्या टाका' ही होय, व याचाच माधवरावांना संताप येई. म्हणून 'कां न नरकाचा जाळ जाळी तुम्हां!' असा शेवटी धिक्काराचा शब्द उच्चारल्याखेरीज त्यांना राहवले नाही.

### ४८. ऐकव तव मधु बोल :

वास्तविक कवितेचे मूळ शोधू नये; कारण एखाद्या वेळी एखाद्या अगदी वरून नीरस दिसणाऱ्या गोष्टीतूनही तिचा जन्म झालेला असतो. पण कवितेच्या जन्माविषयी अकारण चर्चा होऊ लागली व एखाद्या कवितेचा संबंध एखाद्या भलत्याच व्यक्तीकडे लोक लावू लागले म्हणजे तिच्या कुळकथेची जरूरी भासते, आणि मग ती रंजकही वाटते. या कवितेचे तसेच झाले आहे.

ही कविता माधवरावांनी आपल्या एका बालमित्रास उद्देशून लिहिली आहे. तो परदेशी जाणार होता, व माधवराव त्याला भेटण्यासाठी मुद्दाम मुंबईस गेले. पण त्याची बोट आधीच सुटली होती. माधवरावांना फार वाईट वाटले, व नंतर त्यांनी ही कविता लिहिली.

या क्षणिक प्रसंगाने माधवरावांच्या मनात जी दुःखभावना निर्माण झाली तिचे त्यांनी लौकिकीकरण केले; म्हणून या कवितेकडे वाचकांनी 'कला' या दृष्टीनेच पाहिले पाहिजे. पुढे कविता ५० मध्ये माधवरावांनी **'कलारहस्य'** या कवितेत **"हृत्पटावरिल भरकामचित्र टाकुनी। बघण्याला मागिल टाके ठाकेल रसिक का कुणी?"** या ओळी लिहिल्या आहेत त्या अवश्य पाहाव्यात.

**कृत्रिम हिन्दोल** = कृत्रिम झोपाळे. **'पाहिन नंतर वाट वर्षभर'** = कोकिळा परत वर्षाने वसंतामध्ये 'मधु बोल' बोलते हा भाव.

### ४९. वृद्ध कवि :

ही कविता लिहिताना भास्करराव ताम्बे, श्री. कृ. कोल्हटकर यांसारखी वडीलधारी, प्रेमळ व उदार लेखकमंडळी माधवरावांच्या डोळ्यांपुढे होती. ही मंडळी तरुण लेखकांत येऊन नेहमी बसत-उठत, व अगदी समवयस्क मित्रांप्रमाणे खेळीमेळीने राहात. अशा 'वृद्ध कवी'ला तरुणांसंबंधी खरोखरीच काय वाटत असेल याचे चित्रण या कवितेत आहे.

हे वृद्ध कवी 'मला कविता म्हणण्याचा आग्रह कशाला करता, तुम्हीच आता काही म्हणा, तुम्ही उद्यांचे कवी आहा, आमची स्फूर्ती

आता थकून झोपली आहे, आम्ही आता शारदेच्या मांडीवर झोपावयास चालल्लो आहो!' असे म्हणत आहेत. या कवितेचे प्रथम विडंबन गिरीशांनी ('वृद्ध भटजी') व नंतर स्वता माधवरावांनीच केले आहे ते पाहा.

**समुद्धारिणी**= उद्धार करणारी. **कल्पद्रुमीं** = कल्पवृक्षावर. **क्षीणांशु** = ज्याचे किरण मंद झाले आहेत असा. '**नसणार कदाचित्... उद्या**' = आमचे जीवन आता क्षणिक आहे असा भाव. **मोकळिकीच्या** = स्वातंत्र्याच्या.

**५०. कलारहस्य :**

माधवरावांच्या इतर कविता वाचण्याआधी वाचकांनी अगदी प्रथम ही कविता वाचली पाहिजे. कारण माधवरावांच्या कलादृष्टीचे सर्व रहस्य या कवितेत साठविलेले आहे. जीवनात एखादा प्रसंग अनुभवल्यावर त्याचा उपयोग काव्याकडे कसा करून घ्यावयाचा, याबाबत प्रत्येक कलावंताची काही एक विशेष पद्धत असते. ही समजली नाही तर कलेचे रहस्य त्यांच्या लक्षात येत नाही, व पुष्कळ वेळा काव्यविषयासंबंधी व कवीच्या भूमिकेविषयी गैरसमज होण्याचा संभव असतो.

माधवराव म्हणतात, अप्रतिम कलाचातुरी पाहिल्यावर 'कवी कोण व काव्यातील व्यक्ती कोण यांचे गूढ चरित्र तरी कळू द्या' असे वाचक विचारतात. यावर ते उत्तर देतात की, 'कवी कोणी का असेना, आणि आतील व्यक्ती कुठलीही का असेना, तिची व्यंजना आपल्या हृदयाला रंजविते. ती कोणीही असली तरी कवीच्या हृदयाला ती कामरूपिणी मोहिनी वाटते. हे रसिका, एखादे भरतकाम पाहताना त्या चित्रातील सौंदर्य व कला पाहण्याऐवजी तू मागील बाजूचे टाके कशाला पाहतोस?'

प्रसंगानुरूप हृदयात निर्माण झालेल्या भावकणाला कवी लौकिक स्वरूप देतो व त्याचे कलात्मक चित्र रेखाटतो. अशा वेळी वाचकाने त्या

चित्रातील कला पाहून भावनेचा निर्भेळ आनंद स्वीकारावा. हृदय फाडून बघण्याचा क्रूर सोस ठेवू नये.

**जवळीक** = आपुलकीची भावना. **पार्थिव** = पृथ्वीतलावरील हाडामांसाची असलेली. **कामरूपिणी** = इच्छेप्रमाणे वाटेल ते स्वरूप धारण करणारी, सुंदर. **भरकामचित्र** = भरतकाम केलेले चित्र.

**५१. बादळाची रात्र :**

एक बेगम प्रेयसी अवसेच्या अंधारात आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी उभी होती. प्रियकर येऊन तिला भेटला. इतक्यात हा आपल्या कुळाचा शत्रू आहे, व याने आपल्या बहिणीला पळवून आणून आपल्या अब्रूचा नाश केला आहे असे म्हणणाऱ्या भावाने तेथे येऊन त्याला यमसदनाला पाठविले व आपण आत्महत्येस प्रवृत्त झाला. आणि तिलाही तेच करण्याचे त्याने सुचविले. हे सुचविताना 'प्रेमाहून कुळ थोर आहे, कुळाहून देश थोर आहे, व देशाहून धर्म थोर आहे' हे तत्त्वज्ञानही त्याने सांगितले आहे. आणि एका क्षणात तेथे दोघांची प्रेते दिसली व बिजलीने वरून अश्रू ढाळले, असा या कवितेचा विषय आहे. विधर्मी प्रियकर व प्रेयसी यांचे तत्त्वज्ञान सर्व काळीच मान्य होईल असे नाही. पण 'मनसबी व बेगम' या शब्दांवरून हे चित्र पूर्वकालीन असावे असे वाटते.

**खंत** = हाय. '**खत्री हत्यारी हटेल**' = हत्यारबंद क्षत्रिय हटवादी असतो. **कटेल** = लढता लढता मरेल. **जोहरी** = जोहार करणारा; कुटुंबियांचा वध करून स्वतः रणात मरणारा.

**५२. पोचवणूक :**

एका प्रेताला पोचविण्यासाठी लोक चालले आहेत. हे दृश्य पाहून माधवरावांनी हा अभंग लिहिला आहे. यात जीवनाची क्षणभंगुरता व मागे ठेवलेल्या सारस्वताचे अमरत्व यांचा उल्लेख आला आहे. पण या सर्वसाधारण चित्रणावरून माधवराव जेव्हा शेवटच्या कडव्यात स्वतःविषयीची तळमळ व्यक्त करतात तेव्हा

ती आपल्याला फारच हृदयस्पर्शी वाटते. ते म्हणतात, 'या कलेवरा सारखी माझी गती झाल्यावर माझ्याबरोबर कोण येणार? माझे ज्ञान-ऐकीव आहे. म्हणून हे शारदे, तूच माझी कीव कर. कोकिळासारखे गावयास यायला कोकिळाचीच 'लागणी' म्हणजे जिवंत भावनोत्कटता हवी! **चैतन्यमाहेर** = चेतना देणारे स्थान. **कलेवर** = प्रेत. '**वेडें वांकुडें......म्हणवितों**' = तुकारामाच्या '**वेडा वांकुडा गाईन। परी तुझा म्हणवीन**' या संदर्भाने हे शब्द घातले आहेत.

**५३. महाराष्ट्रगीत :**

मराठी व मराठा यांप्रमाणेच महाराष्ट्राबद्दल माधवरावांना विलक्षण अभिमान वाटत असे. प्रस्तुत कवितेत माधवरावांनी महाराष्ट्राचे वैभव कोणकोणत्या गोष्टींत आहे हे सांगितले आहे.

"मराठी भाषेचे ज्ञानेश्वरांनी संगोपन केले व समर्थांनी मराठा मेळविण्याचा संदेश दिला. त्यातून महाराष्ट्राचा जन्म झाला व शिवरायांनी त्याचे दास्याचे क्लेश नाहीसे केले. वतनासाठी भांडणाऱ्या मराठ्यांनी स्वामिभक्ती सोडून परकीयांच्या मंदिरात कल्मा पढण्यास सुरवात केली. रानात भंगलेल्या धर्ममूर्ती, जनान्यात हिंदू स्त्रिया, दारिद्र्यात खेडूत व ऐषारामात अमीर असलेले आढळू लागले. पंढरीचा संत भक्तिभावात व मुक्तीत थोरवी मानू लागला. फक्त एका शिवरायांना राष्ट्रमुक्तीचा ध्यास लागला. त्यांनी मावळे गोळा केले व महाराष्ट्रात भोसल्यांच्या प्रतापाची पताका फडकविली. मराठ्यांनी अल्पसंतुष्ट न राहता थोर आवाका ठेवावा, व आपला नवा आवेश सर्व हिंदुस्थानभर पसरावा."

'**मराठ्यांना मेळवा**' = '**मराठा तितुका मेळवावा**' —**रामदास.** '**वतनाचे बंदे......लढले**' = शिवशाहीच्या सुमारास केवळ वतनासाठी मराठे आपआपसात लढत असत. '**कल्माही पढले**' = मुसलमानांचे सर्वतोपरी दास्य पत्करले; मुसलमानी धर्माची

दीक्षा घेतली. **भांजलेल्या** = फोडलेल्या. **जनान्यांत** = मुसलमानांच्या बंदीत. **अमीर** = सरदार. '**योगी कर्मकुशलाला**' = शिवाजीला. कारण शिवाजीने 'योगः कर्मसु कौशलम्' हे तत्त्व पाळले होते. **आवाका** = महत्त्वाकांक्षा.

प्रस्तुत कविता छंदात म्हणजे अक्षरवृत्तात लिहिली असल्याने तिचे मराठीपण विशेष ठळकदार व उठावदार झाले आहे.

### ५४. पाहु कुठें तुज राया :

या कवितेत प्रेयसी प्रेमिकाला आळविते आहे असा भाव आहे. काव्यात्मदर्शन पदोपदी होत आहे, पण तिचा लपंडाव चालला आहे अशी प्रेयसीची तक्रार आहे.

खरोखरी कोकिळ गातो; पण कोकिळा गाते असे म्हणण्याचा कवि-संकेत पडला आहे. एक दोन स्थळे खेरीजकरून माधवरावांनी बहुतेक ठिकाणी हा संकेत झुगारून दिला आहे. सहकाराच्या मोहराने घमघम-णारा परिमळ, शीळ व कोकिळाची साद ही सर्व या कवितेत काव्यात्म प्रीतीचे वातावरण निर्माण करतात.

### ५५. अजुनि किती छळतोस् :

परिस्थिती कधी कधी आपल्या कर्तृत्वावर मात ठरते. दैवाचा तिला पाठिंबा असतो म्हणूनच हे शक्य होते. अशा वेळी जिवाची मरुभूमी होते, त्याची वंचना होते व हे कवच फोडून बाहेर जावे का, असे वाटते. याचेच चित्रण या कवितेत आहे.

**मरुभूमि** = निर्जल प्रदेश. **कृत्तिका** = या नक्षत्रात सहा तारकांचा पुंज असतो. **कोश** = अंगाभोवतालचे कवच.

### ५६. अभिसारिका :

या 'अभिसारिका' पद्धतीच्या काही कविता 'स्वप्नरञ्जना'त आहेत. त्या प्रतीकात्मक असून त्यातून निरनिराळ्या गोष्टींची चित्रे दिसणे शक्य आहे. या 'अभिसारिके'मध्ये प्रियकरास भेटण्यास जाणारी 'स्त्री'

जशी दिसते, तसाच शिवाला भेटणारा ‘ जीव ’ किंवा ध्येयाला भेटणारी ‘ बुद्धी ’ही दिसते.

**निका** = पवित्र, योग्य. **अभिसारिका** = प्रियकरास ठरलेल्या वेळी भेटावयास जाणारी स्त्री. **रम्यायती** = उज्ज्वल भविष्यकाल. तर्कालाही न कळणारी ( प्रेमाची ) ओढ. **गूढरागरंगेली** = न कळणाऱ्या अशा प्रेमाने रंगलेली. **जीवशिव** = आत्मा व परमात्मा. **स्वर्भूसंगम** = स्वर्ग व पृथ्वी यांची भेट.

### ५७. तूच निर्वाणीचा सखा :

१९२४ ते १९२६ ही माधवरावांच्या जीवनातील अज्ञातवासाची व मनस्तापाची वर्षे आहेत. १९२७ हेही साल तर अतिशय मनस्तापात गेले. तेव्हा या सालांतील कविता या भूमिकेवरून वाचाव्यात.

‘ आध्यात्मिक प्रवृत्ती ’ व ‘ अंतर्मुख होऊन ईश्वराला शरण जाणे ’ हा माधवरावांच्या वृत्तीचा एक विशेष आहे. अशा वेळीं त्यांच्या मनाला जगाचा उबग येऊन ईश्वरी प्रेमाची ओढ कशी लागली होती ते या कवितेवरून समजेल.

### ५८. भुकेलें हृदय :

आपणांस अन्याय झाला आहे या मनःस्थितीत असताना जी मनाची तीव्र तळमळ झाली तीमधून ही कविता निर्माण झाली आहे. वर ‘ गार दहिंवर व आंत ( उष्ण ) गहिंवर ’ अशी स्थिती झाली असताना हृदय भुकेले राहिल्यास नवल काय ?

### ५९ बुल्बुलास :

बुल्बुल हा गुलाबासाठी आसावलेला असतो. त्या दृष्टीने ही कविता प्रतीकात्मक आहे. काटे आहेत म्हणून गुलाब जवळ करण्यास भिण्याचे कारण नाही. कंटक हा रक्त काढीत नाही, तो हृद्रंग उधळतो; त्याची कृती असुरी असली तरी तो मित्रच असतो. आणि कंटकहीन गुलाब असला तरी तो दुःखोत्पादक नसतो, असे थोडेच आहे ! वसंतसेनेमुळे

चारुदत्ताला सूळ पाहावा लागलाच की नाही ! आणि श्रीदेखील साहसातच नसते का ? 'साहसे श्रीः प्रतिवसति स्म' या तत्त्वाचा अंगीकार करणारा शेवटी अमरपद पावतो.

**६०. अनामिक वीराची समाधि :**

पुण्यातील होळकर पुलापलीकडे पूर्वीच्या डेक्कन कॉलेजच्या बाजूला अशी अनामक वीरांची अनेक थडगी आहेत. ती पाहिल्यावर माधवरावांना ही कविता सुचलेली आहे. हा अनामक वीर कुणासाठी मरतो कुणास ठाऊक ! आम्ही मात्र जगच्छान्तीची पोकळ बडबड करतो आणि दुसरे दिवशीच आमची खड्गे कोषात खणखणू लागतात ! बिचारे शूर शिपाई मात्र त्यात मरतात. अशाच रीतीने वंचना होऊन धारातीर्थी मेलेल्या एका शूर शिपायावरील हे शोकगीत आहे.

**६१. अंधारून आलें :**

ही कविता मधून मधून मनास वेढणाऱ्या उद्विग्नतेमध्ये लिहिली गेली आहे. माधवरावांच्या जीवनात या वेळी अगतिकता उत्पन्न झाली होती. त्यामुळे 'मागें वाहवेना । पुढें पोहवेना । इथें राहवेना' अशी त्यांची मनःस्थिती झाली. अशा वेळी बाह्य सृष्टीशी समरस झाल्यावर अंतर्मुख होऊन ते स्वतःची स्थिती चिंतनशीलतेने नीट न्याहाळून पाहात, व राहवेनासे झाले की तिचे शब्दचित्र काढीत. अशाच एका आर्त मनःस्थितीतील हे उद्गार आहेत.

**६२. चंद्रिका आणि प्रिया :**

ही कविता माधवरावांनी अत्यंत कलात्मकतेने लिहिली आहे. वियोगाला अनुकूल असे 'वियोगिनी' वृत्त समर्पकपणे योजून प्रत्येक दोन ओळींपैकी पहिल्या ओळीत बाह्यसृष्टीचे वर्णन व दुसऱ्या ओळीत अन्तःसृष्टीतील प्रियेच्या स्मृतीची एखादी उपमा याप्रमाणे वर्णनाची गुंफण करीत कवितेची रचना केली आहे. आणि शेवटी 'विधु आणि करवी' यांचा मीलन-योग, पण आपला मात्र वियोग हे वैचित्र्य (दैवदुर्विलसित) दाखविले आहे. प्रत्येक दुसऱ्या व चौथ्या ओळीत

दिलेल्या गोड उपमांनी कवितेचा रसपरिपोष सुंदर साधला आहे. शैशव व तारुण्य यांमध्ये वृत्तीत नैसर्गिक निरागसपणा असावा हेच माधवरावांना म्हणावयाचे आहे.

**६३. केवढा अन्याय :**

प्रेयसीला आपले प्रेम विदित केल्यामुळे आपल्याला तिचे पाय कायमचे अंतरले ही तक्रार व तीमुळे झालेली तळमळ या कवितेत व्यक्त झाली आहे. यातील प्रेमिकाला ‘ स्त्रीचे मन उफराटे आहे काय ’ असे वाटते आणि तो कळवळून ‘ उपेकडे ’ जाण्याचा मार्ग शोधतो. दरिद्री माणसाला जगामध्ये प्रेमाची प्राप्ती होणे जवळजवळ अशक्य असा सूर या कवितेत वाहात आहे.

**६४. फेराचें गाणें :**

हे गाणे नागपंचमीच्या सणावर लिहिले आहे. या दिवशी खेडूत स्त्रिया अंगणात फेर धरतात, व वारुळांची गाणी म्हणतात. या गाण्यांत बाह्यसृष्टीचे वर्णन व अंतःसृष्टीतील निर्मळ आनंद व्यक्त झालेला असतो. त्याला अनुसरूनच ‘ श्रावण महिना, मेघ, लाल पाणी, पाचूची राने, बेडकांचा आवाज, नवी साडीचोळी व चांदण्यातील फेर ’ यांची वर्णने यात आली आहेत. या दृष्टीने कै. विष्णुपंत सरवटे यांचे ‘ कामिनी हंसगामिनी किं सौदामिनी चमकति व्योमीं । सखिवृंद जात वारुळा गात आरामीं ’ हे गाणे ‘ वाग्विहार ’ किंवा ‘ अरुणवाचन, पु. ६ ’ यातून वाचा.

**६५. तुझ्यावांचून :**

ही कविता ‘ रविकिरणमंडळा ’ने आपले १० वे पुस्तक ‘ प्रभा ’ जेव्हा प्रसिद्ध केले तेव्हा त्यावर घालण्यासाठी माधवरावांनी चटकन लिहून दिली. मंडळाच्या कलात्मक दृष्टीचा उल्लेख करून तिला मानवी जीवनाच्या साचात कल्पनेने पात्रे उभारून कसे बसविले आहे हे पाहण्यासारखे आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...०३४६७...... वि: ...काव्य...
क्रमांक ...१९२६...... नों: दि: २८।१२।७१


### ६६. कीर्ति आणि कान्ता :

माधवराव आपले 'ध्येयचित्र' कधी कधी आपल्या मनाशी रेखाटतात. त्यातलेच हे एक चित्र आहे. अन्तःकरणात खरी प्रीती असल्यावर इतर कशाचीही कमतरता आली असली तरी ती भासत नाही. या प्रीतीच्या मीलनात खरे अद्वैतसुख असते. कारण प्रीती, करुणा आणि आदर यांचा त्रिवेणीसंगम प्रियेच्या नेत्रांत झाल्यावर प्रेमिकाला तिथेच पुण्य-क्षेत्राचा लाभ होतो.

'लोक फळाकडे पाहतात; पण वृक्षचिंता वाहणारी संसारात एक प्रियाच असते. तिच्या स्मितात स्निग्ध निःस्पृहता असते. अशा प्रियेशी मीलन होणे म्हणजे पृथ्वी व मृगमेघबिंदू यांचे जणू काही ऐक्यच. अशा मीलनापेक्षा कीर्तीदेखील मोठी वाटत नाही', ही कवितेची भूमिका आहे.

### ६७. कशासाठीं पोटासाठीं :

माधवरावांनी जी शिशुगीते लिहिली आहेत त्यांपैकी काही म्हणजे साक्षात त्यांच्या लहानपणीच्या स्मृतीच आहेत. त्यांचे मूळ गाव आवळस. हे मुळशी पेट्यात होते. याच्या आसपासची भौगोलिक स्थिती लक्षात घेऊन हे गाणे लिहिलेले आहे. हे 'नागफणी डावीकडे । **कोंकण** तें तळीं पडे । पाठमोरी आतां गाडी । वाट **मुंबईची** काढी । खोल दरी **उल्हासाची** । दो डोक्यांचा **राजमाची** । डावलून **माथेरान** । धांवे गाडी, सुटे भान' यातील मोठ्या अक्षरांतील नावांच्या उल्लेखावरून ध्यानी येईल.

लहानपणी 'झुण्झुण् पांखुरा । जा माझ्या माहेरा' या गाण्याबरोबर आगगाडीच्या प्रवासाची गाणी झोपाळ्यावर बसून म्हणावयाचा प्रघात माधवरावांच्या बाल्यकाली होता. त्याचे प्रतिबिंब या काव्यात पडले आहे.

छंद पादाकुलक झोक्याला अनुकूल असल्यामुळे आन्दोलनाची प्रतीती चार अक्षरांवर शब्द तोडताना येते.

**६८. संवाद :**

ही कविता म्हणजे देवाशी त्याची ओळख पटण्यासाठी अन्तर्मनाने केलेला एक संवाद होय. ईश्वराने ' माझ्या ठायीं तिन्ही काळीं नांदे लावण्य नव्हाळी ' असे म्हणावे व भक्ताने ' पटे ओळख देखून । ऐशी कांहीं दाव खूण ' असे म्हणावे, यातच दोघांच्या स्थितीचे वर्णन आहे. मनाला आलेल्या शंकास्थानावरून ही कविता लिहिली गेली आहे.

**६९ ते ७३. भातुकलीचें गाणें......आगगाडी :**

या कवितांतून लहान मुलांच्या अनेक प्रकारच्या लीलांची चित्रे काढलेली आहेत. त्यांत ' भातुकलीच्या निमित्ताने मांडलेला संसार आहे. बाहुलीचा – राणीचा – थाट आहे, चालता चालता पडलेल्या बाळाला उद्देशून आईने म्हटलेले गाणे आहे, आपल्या ( माधवरावांच्या ) घराचा परिसर आहे, व आगगाडीचा प्रवास आहे.' यांतील 'माझी बाहुली' ही स्मृती बहुधा ' सुधा रानडे ' हिची असावी. बाकीची चित्रे माधवरावांच्या मनातूनच निर्माण झालेली आहेत. आई किंवा बाप किंवा मोठी माणसे आपल्या लहानपणाकडे ज्या कौतुकगर्भ औत्सुक्याने वळून पाहतात, त्याच भूमिकेवरून हे चित्रण केलेले आहे. प्रत्येक कवितेत शेवटच्या एकदोन ओळींत आलेली प्रश्नार्थक वाक्ये मुलांच्या किंवा थोरांच्या जिज्ञासेची, तशीच उदासीनतेचीही द्योतक आहेत.

**७४. मेलों तरी मेलों :**

आध्यात्मिक वृत्तीपेक्षा ' ध्येयाचे चित्रण ' व आत्मनिवेदन ' या दोन दृष्टींनी हे अभंग महत्त्वाचे आहेत. यांना माधवरावांच्या जीवनात एक विशेष स्थान आहे. ' मन माझें भुके ध्येयासाठीं ' आणि ' ध्येया, तुझ्यापायीं देह पडो ' या दोन ओळींवरून माधवरावांची तीव्र ध्येयासक्ती दिसून येते. आपले ध्येय कधी ना कधी जवळ येईल ही माधवरावांना आशा होती व त्यासाठी लागेल तेवढा त्याग करण्याची त्यांची तयारी होती. ' माधवराव, ध्येयवादी व्हा ! ' असे कै. भास्करराव ताम्बे त्यांना म्हणत असत त्याचे प्रत्यंतर या ध्येयासक्तीत दिसते.

### ७५. माळवारा :

या कवितेतील लेखनचातुर्य व भावशीलता बघण्यासारखी आहेत. पाच कडव्यांपैकी चार कडवी माळाच्या वर्णनात म्हणजे बाह्यसृष्टीच्या वर्णनात खर्चलेली आहेत व शेवटच्या कडव्यात अंतःसृष्टीचे वर्णन दिले आहे. त्यामुळे बाह्य व आन्तर–सृष्टींचा यात सुंदर मिलाफ झाला आहे. बाह्य-सृष्टीच्या वर्णनातही स्वाभाविकता व अभिनवता आहे. माळावरील जडभरत गोटे, नागफणी, त्यांची रानमाणके, माळाचा पिवळा करडा रंग, त्यावरील निर्भय सरडा, माळाची उंचसखलता, निर्झर, पुष्करिणी, फुले यांचा अभाव या सर्वांचे कसे अचूक शब्दात वर्णन करून माधव-रावांनी वाचकांच्या मनात भयानक रस निर्माण केला आहे; आणि शेवटच्या कडव्यातील चुकलेल्या वाटसरूचा उल्लेख करून, भिरभिरणाऱ्या वाऱ्याच्या वेडाला भरती कशी येते ते सांगून व 'भग्नशून्य' देवळाचा शोध घेऊन वाचकाला एकदम अंतःसृष्टीत नेले आहे. त्यामुळेच आधीच भकासलेले मन अधिक व्याकुळ होते व आपले मन त्या भग्नशून्य देवळावर केन्द्रित होते. भग्न हृदयातून निघालेले दुःखोद्गार याप्रमाणेच भेसूर असतात. हे ओसाड माळाचे सौंदर्य मराठीत तरी अपूर्व आहे.

**मुरमाड** = मुरूम. **जडभरत** = एका ऋषीचे नाव; आळशी. **उपाधि** = त्रास, संस्कार. **मरुशांती** = निर्जल प्रदेशावर असलेली शान्तता. **रानमाणिके** = निवडुंगाची बोंडे. (ही माणकांच्या आकाराची व तशाच रंगाची असतात). **वांस** = कळक, बांबू. **पुष्करिणी** = विहिरी. **मळवाट** = पायवाट. **भग्नशून्य** = भंगल्यामुळे शून्य म्हणजे भकास झालेले.

### ७६ ते ८०. उठा रे.........काऊ काऊ गे ! :

या कविता म्हणजे माधवरावांच्या बालपणीच्या आठवणी होत.

'**उठा रे**' या कवितेत लहानपणी थंडीच्या दिवसांत चुलीजवळ शेकण्यासाठी मुलांची दाटी कशी होते व रविवारीदेखील मुलांना थोर

माणसे तेथून घालवून कशी देतात, याचे सुंदर चित्र आहे. यातील ' हें पण सर्पण वायां जळतें ' आणि ' धुक्याची घावळीं वेढून दूर। डोंगर आजोबा ध्यानांत चूर ' या कल्पना सुंदर व परिचित आहेत.

'**नवीन भाऊ**' या कवितेत आपल्या आईला झालेले मूल म्हणजे आपला नवीन भाऊ कसा आहे, हे जाणण्याची जिज्ञासा एका मुलाच्या मनात उत्पन्न झाली आहे. ही त्याची जिज्ञासा आईशी झालेल्या संवादाने तृप्त झाली आहे.

या कवितेबद्दल बोलताना माधवराव म्हणत, "मुलांना ' सेक्स 'बद्दल एक विशेष कुतूहल असते. त्याची पूर्ती शक्य तो सुलभ मार्गाने करणे हे आपले कर्तव्य आहे. मूल जन्माला कसे येते ही मुलाची जिज्ञासा जागृत होणे हा याचाच एक भाग आहे. ती तृप्त होण्यासाठी त्याला काही तरी खोटे सांगण्यापेक्षा अप्रत्यक्ष रीतीने वस्तुस्थितीचे ज्ञान करून देणेच योग्य. हा प्रयत्न मी या कवितेत केला आहे." वाचकांनी या दृष्टीने ही कविता पाहावी, म्हणजे कवितेत ' ताई ' काय म्हणते व ' आई ' काय सांगते यांतील अंतर व रहस्य त्यांना कळेल.

यातील ' नाकावर दिला काय म्हशीनें पाय ' या ओळीतील विनोद व ' भूक जशी लागूनहि नच दिसते। हृदयांत बाळ तसें माझें असतें ' यातील भावगर्भता ही विशेष उल्लेखनीय आहेत.

'**देवळांत जाऊं**' ही कविता लहान मुलाला अगदी सोप्या भाषेत देवाची ओळख करून देण्यासाठी लिहिलेली आहे.

'**काऊ, काऊ गे!**' यात बारीकसारीक गोष्टींबद्दलचे मुलाचे कुतूहल व त्याचा निर्मळ निरागसपणा ही व्यक्त झाली आहेत.

## ८१. स्वप्नांची माला :

"जीवित म्हणजे एक स्वप्नांची माला आहे, आणि स्वप्न खोटे नसते. पण तीत प्रीतीची बाग फुलली तर जीवन सफल झालेसे वाटते." या विषयावरील हे सुनीत आहे.

**८२. लेजीम :**

ही कविता सर्वस्वी वस्तुनिष्ठ असून तीत मराठी बाण्यातील वीर-रसाचा उठाव करण्यात आलेला आहे. लेजीमच्या खेळाशी सुसंगत असलेल्या 'सुगीचे दिवस, हुरडा, चांदणे, तालावर पडणारी पाउले, धुडुम् धुडुम् वाजणारा ढोल, श्रमाने आलेल्या घामाच्या धारा, मावळीं जिवंत पाणी व बलभीमाचा जयजयकार' या गोष्टींचे उल्लेख साभिप्राय आले आहेत.

**८३. प्रार्थना :**

माधवरावांच्या आध्यात्मिक वृत्तीची व व्यापक सहानुभूतीची द्योतक अशी ही 'प्रार्थना' आहे. 'अणूअणूत ईश्वर दिसावा, अंतरंगात प्रेम दाटावे व ईश्वराच्या कृपेचे बळ मिळावे', हाच ही प्रार्थना लिहिण्यातला त्यांचा भाव आहे.

**८४. माझा व्याकुळाचा जीव :**

वरील कवितेप्रमाणेच हीही एक आध्यात्मिक कविता आहे. 'तुझ्या प्रपंचाची सेवा घडो' असे कवितेत माधवराव ईश्वराला विनवून लिहितात.

**८५. सृष्टीचें ध्यान :**

या कवितेत कोल्हापूरच्या रंकाळ्याकडील परिसरातील सृष्टीचे वर्णन आहे. माधवराव नेहमी म्हणत, "साताऱ्यापेक्षादेखील कोल्हापूर प्रान्त अधिक सुंदर आहे." येथील सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी माधवराव निरनिराळ्या ऋतूंत या परिसरात नेहमी भटकत असत. याच भटकण्यातून निर्माण झालेले हे एक वस्तुनिष्ठ चित्र आहे.

**मुकुलित** = मिटलेले. **हिरवी नवती** = हिरवळ. **कलरव** = गोड आवाज. **अम्लान** = ताजी. **निम्नोन्नत** = उंचसखल. **धान** = भाताची रोपटी. **पांद** = दोन कुंपणांमधील अरुंद वाट. **निधान** = भांडार.

या कवितेचा शेवट करताना 'खाली पृथ्वीची अफाट कढई व वरती आकाशाचे पालथे झाकण आणि या दोन संपुष्टांमध्ये गूढ महान

जीवन आहे ' अशी भव्य कल्पना मांडून माधवरावांनी मनातील तळमळ व्यक्त केली आहे.

८६. **मुलांचा सांगाती :**

सर्व लोक ईश्वराची लेकरे, हे जर खरे असले तर या लेकरांनी हट्ट केल्यावर ईश्वराची शान्ती कशी टिकत असेल, या कल्पनेने हा अभंग लिहिला गेलेला आहे. ' नियमांचे राज्य चालू केल्यावर ईश्वराच्या इच्छेचे स्वातंत्र्य गेले असेल का ? ' ही शंकाही कवीच्या मनात आल्यावाचून राहिली नाही. अर्थात हे सर्व प्रश्न शंकित मनानेच केलेले आहेत.

८७. **सर्वस्वाचा यज्ञयाग :**

वैवाहिक जीवनाच्या बाबतीत माधवरावांची एक विशेष काव्यात्म आकांक्षा होती. ही आकांक्षा सर्वस्वी तृप्त होण्यासारखी एक अनुपम संधी त्यांच्या जीवनात एकदा आली. पण ती केव्हा ? त्यांचा विवाह झाल्यावर सुमारे चारपाच महिन्यांनी ! या दुर्दैवी घटनेमुळे ते अत्यंत बेचैन झाले ! पण आत्मसंयमनाने त्यांनी आपले मन स्थिर करून चालू वैवाहिक जीवनाशी ते समरस झाले. या नवीन घटनेने त्यांच्या जीवनात क्षणभर विलक्षण अस्वस्थता उत्पन्न केली. तीवर मात करून आपले मन जिंकण्यास त्यांना जवळजवळ आठ दिवस एक विलक्षण मानसिक झगडा करावा लागला. आठवे दिवशी मन शान्त होण्याच्या वेळी प्रस्तुत कवितेचा जन्म झाला.

" आपल्या अन्तःकरणात आग आग होते, व दैव वरून डाग देत असते ! अशा दुहेरी अग्नीत जीवन भाजून निघते ! तडफडणाऱ्या माशाला शेजारीच सरोवर असलेले दिसते, पण त्याला चरफडण्यावाचून गत्यंतर नसते ! स्वैरालापी, प्रेमपरायण, पुष्पविलासी व कविताचारण असलेला विहंगम इंद्रबाग दृष्टीस पडण्यापूर्वीच फशी पडलेला असतो ! प्रीतीच्या शोधात संन्यासी झाल्यावर व जेव्हा रंगराग निषिद्ध असतात तेव्हा सुभद्रा येते ! ज्याच्यासाठी अन्तःकरण झुरते ते नेहमी मंद

पावलांनी पण निराशोत्तर येते! आणि त्याला नेहमी क्षणाचाच विलंब लागतो! अशी त्याला अवेळींच जाग का येते? असले हे जीवन म्हणजे मेलेले जीवन आहे किंवा ही मनुष्याची जिवंत समाधिच आहे! अशा वेळीं मानवी धैर्य कुठवर टिकाव धरील? 'हे दैवा, काय तुझी ही अतर्क्य लीला! आता मला सर्वस्वाच्या यज्ञयागाचेच व्रत स्वीकारले पाहिजे!' "

**हिमजलतडाग** = थंड पाण्याचे सरोवर. **स्वैरालापी** = आपल्या मनाला योग्य वाटेल तेच बोलणारा. **प्रेमपरायण** = प्रेमासाठी आसावलेला. **पुष्पविलासी** = काव्यात्म जीवनावर जगणारा, सौंदर्यजीवी (रोमॅन्टिक वृत्तीचा). **कविताचारण** = काव्यशाहीर, कवितेचा भोक्ता. (कडवे दोनमधील ही चारी विशेषणे माधवरावांच्या जीवनाचे उत्तम वर्णन करणारी आहेत.) **सुभद्रा** = जिचा अर्जुनाशी प्रीतिविवाह झाला अशी साध्वी. **सर्वस्वाचा यज्ञयाग** = जिला आपण जीवनात महत्त्वाचे स्थान दिले अशा काव्यात्म प्रीतीचा त्याग.

### ८८. पापाची चलती :

" जगात पापाची चलती होताना दिसते व सरळ मार्गाने चालणाऱ्या निःस्पृह सहृदयास उत्कर्षाचा लाभ होताना आढळत नाही. असे अनेक कटु अनुभव आल्यावर ही कविता लिहिली गेली आहे. थोर पदावरील राजकारणी पुरुष, भगिनींचे शाप घेणारी विलासी माणसे यांची चरित्रे कोणी पाहतो का? सर्वत्र निरुपद्रवी हरिणाचीच शिकार होत असते,-आणि ज्याला विधिनिषेध वाटतो त्याला फाशी लटकावे लागते! स्वर्ग आणि नरक कोणी पाहिले! आणि मेल्यावर तर काय! राख आणि वाफ!! हे का जीवन?" ज्यांनी साक्षात पापे केली त्यांची चलती झालेली पाहून व त्यांना शिक्षा करण्यास कोणीही धजावत नाही, असे पाहून तडफडून तडफडून माधवरावांनी ही कविता लिहिली आहे.

**८९. नावेतील गाणे :**

' रविकिरणमंडळा 'चे सदस्य पुण्यातील ' डेक्कन कॉलेज 'जवळील ' बंड गार्डन 'च्या धरणावर कॉलेजच्या काही तरुण उत्साही मित्रांच्या निमंत्रणावरून संध्याकाळीं वा चांदण्या रात्री नौकाविहारास जात असत. नौकाविहार चालला असता निरनिराळ्या गाण्यांच्या तबकड्या ध्वनियंत्रावर लावणे, गाणी म्हणणे वा कविता म्हणणे हे प्रकार नित्य घडत. या प्रसंगाची पार्श्वभूमी म्हणून मंडळाच्या सदस्यांनी काही कवितांत उपयोग केला आहे. यशवन्त यांची ' नौकाविहार ', गिरीशांची ' बकुळा ', व माधवरावांची ' नावेतील गाणे ' या कविता या पार्श्वभूमीवर प्रसंगानुरोधाने रेखाटल्या गेल्या आहेत. माधवरावांच्या ' नावेतील गाणे ' या कवितेची पार्श्वभूमी फक्त या ठिकाणची आहे, परंतु कवितेतील व्यक्ती सर्वस्वी काल्पनिक आहेत.

' आपण कष्ट करून नौका हाकावी व प्रियेने सुकाणू चालवीत गोड रागदारी आळवावी व आपल्या श्रमाचा परिहार करावा ' ही अत्यंत सुंदर व काव्यात्म कल्पना रेखाटण्यासाठी या कवितेचा जन्म झाला आहे. अशा जीवनात कष्ट करून नौका वल्हविताना प्रियेच्या गाण्याला वल्ह्यांनी आपण जो ताल देतो ते भाग्य श्रेष्ठ होय. ही भाग्याची गोष्ट प्रतीकात्मक आहे.

**ललित** = गोड. **विद्याजड** = विद्येच्या भाराने अधिक व्यावहारिक झालेला. **वागीश्वरी** = बागेश्री ही रागिणी. **सान्ध्यभावगाणीं** = संध्याकाळची ( जीवनाच्या उत्तरकालीन भावनेची ) भावगीते. **सांजदीप** = चंद्र. **प्रतीची** = पश्चिम दिशा.

**९०. काय अवेळीं साद :**

गोविंदाग्रजांनी ' अवेळ तरिही बोल ' अशी कोकिळेला आळवणी केली; उलट अवेळी साद घालणाऱ्या कोकिळाला माधवरावांनी ' हेमंतामध्ये नारळीचिंचांच्या बागेत ही अवेळी साद कशाला ? ' असा प्रश्न केला. या दोन्ही कविता निरनिराळ्या वृत्तीच्या निदर्शक

आहेत. प्रस्तुत कविता वस्तुस्थिती दर्शविणारी, तशीच प्रतीकात्मक आहे. जीवनातील वसंत निघून गेल्यावर हेमंतात साद घालणाऱ्या पिकाची आळवणी अवेळींच नाही तर काय ?

"ही चिंचा-नारळींची बाग अरण्यासारखी आहे. इथे वसंताने उधळलेला आम्रमंजिरीचा धुंद करणारा परिमळ नाही. शाळू हरभऱ्यावरून चावरा वारा वाहात आहे. मग उगाच 'कुठे कुठे' असे का म्हणतोस ? तुला लोक पागल म्हणतील. ज्याच्या अन्तःकरणाला जिवंतपणी जाळणारा अग्नी चाटून गेला आहे त्या मला तुझा स्वर फार करुणोत्कट वाटतो !" हा या कवितेतील भावार्थ आहे.

**वासंतिक आल्हाद** = तारुण्यातील आनंद. **निष्पर्ण शिरीषीं** = पाने झडून गेलेल्या शिरीष वृक्षावर ( शिरीषाची पाने शिशिर संपताना गळतात, हेमंतात नाही ). **मोताद** = महाग. **क्रव्याद** = हिरवे कच्चे मांस खाणारा.

**९१. वृद्ध भटजी :**

हे माधवरावांनी आपल्याच 'वृद्ध कवि' या कवितेचे केलेले विडंबन होय. माधवरावांनी 'वृद्ध कवि' ही कविता लिहिल्यावर तिचे विडंबन प्रथम कवी **गिरीश** यांनी केले ( पाहा—'काञ्चनगङ्गा'— 'वृद्ध भटजी', पान ८७ ). यानंतर माधवरावांनी आपणच आपले विडंबन केले. ही दोन्ही विडंबने एकमेकांशी व मूळ कवितेशी तुलून पाहण्यासारखी आहेत. माधवरावांची खिलाडू वृत्ती व विनोदशीलता त्यांच्या या कवितेत भरपूर दिसून येते.

**९२. सर्वा खल्वियं माया ! :**

या कवितेला एक मोठा इतिहास आहे. कोल्हापुरास असताना माधवरावांना एकदा कै. कविवर्य रेंदाळकरांचे 'रेन्दाळ' गाव पाहण्याची इच्छा झाली. म्हणून ते प्रो. गणपतराव हुपरीकर यांच्यासह रेन्दाळला गेले. तेथे रेंदाळकरांचे घर पाहिल्यावर त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले व डोळ्यांसमोर

‘ अजुनि चालतोचि वाट माळ हा सरेना,
विश्रान्तिस्थळ केव्हां यायचें कळेना !
त्राण न देहांत लेश, पाय टाकवेना;
गरगर शिर फिरत अजी होय पुरी दैना !

* * *

काय निरुद्देश सर्व जीवन मम होतें.
मरु-सरितेपरि अवचित झरुनि जायचें तें ! ’

ही रेंदाळकरांची कविता उभी राहिली. आणि लगेच माधवरावांचे मन रेंदाळकरांच्या भूमिकेशी समरस होऊन खालील ओळी घुमू लागले—

‘ नादावुनि केलें मीं भ्रमण किति अहो तें !
विश्रान्तिस्थल अंतीं हेंच हाय होतें ! ! ’

रेंदाळकर हे कोल्हापूर, मुंबई, पुणे, हिंगणे अशा अनेक ठिकाणी हिंडून परत स्वस्थळीं आले व तेच त्यांचे अंतिम विश्रान्तिस्थळ होते. ‘ महत्त्वाकांक्षेची ओढ लागून ते ध्येयामागे हिंडले, त्यांच्या भावसिंधूवर रसिक संतुष्ट झाले. पण त्यांचे जीवन म्हणजे ध्येयासाठी केलेला एक महान त्याग होता. आणि काव्यदीप विझल्यावर रंगसौध कोसळावा व जोते मात्र उरावे तसे झाले ! दैवाने त्यांचा गुप्त पाठलाग केला आणि शेवटच्या क्षणाला गतस्वप्न वेडावू लागले ! ’ अरेरे ! किती शोचनीय हे मरण !

**डाकघर** = पोस्ट ऑफिस. **अतिकांक्षा** = महत्त्वाकांक्षा. ‘ **गमे रूढि...गावें** ’ = रूढीचा भंग करून नवजीवनाचा मार्ग चोखाळावा हे रेंदाळकरांचे म्हणणे असे. **मीनाबाजार** = नकली बाजार. **मुक्त मधुप भावगुंजनांत** = मोकळ्या भुंग्याप्रमाणे आपलेच भाव गुणगुणण्यात. **रंगसौध** = रंगभूमीची भव्य इमारत. **सर्वा खल्विदं माया** = हे सर्व जीवन म्हणजे खरोखर मायाच आहे. ( कवि गिरीश यांनी या कवितेवर लिहिलेले रसग्रहण ‘ सह्याद्रि ’ जानेवारी १९४०, या अंकातून वाचा ).

९३. मधु सुन्दरीस :

एका प्रौढाने आपल्या जीवनाच्या उत्तरकाली आपणांवर प्रेमाची मोहिनी टाकणाऱ्या एका 'मधु सुन्दरीस' उद्देशून लिहिलेले हे भाव-गीत आहे.

'तुझी अरुण जादुगारी कोणा तरुणासाठी राखून ठेव, माझ्या कपाळी खोल चरे पडले असून माझी नव्हाळी करपली आहे व त्याची राख माझ्या डोक्यावर उडाली आहे. आता मी विरामसूचक तुतारीची वाट पाहात आहे. तू कोण? क्षीराब्धिसुता? असाच भास आजवर मला अनेक वेळा झाला! वंचनेतच प्रीतीची खुमारी असते काय! आता कडकडून भेट वा एकदम गुप्त होऊन जा.' ही या कवितेतील भूमिका आहे.

माधवरावांच्या प्रेमिकांना अशी स्वप्ने वरचेवर दिसतात.

९४. श्रान्त पान्थास :

हे गीत म्हणजे जीवनाचा मार्ग चालून थकलेल्या एका पान्थास त्याच्या प्रेयसीने दिलेली हाक आहे. ती म्हणते, श्रान्त पान्था, हुशारी ठेवून पुढे चल. मी तुझी द्युती, स्फूर्ती व रम्यायती होईन. इष्ट स्थल हाकेवर आहे. दरीत सूर्य उगवत आहे, व तरुशिखरावर सोनेरी स्मित झळकू लागले आहे. वसंत जवळ येत आहे. तुला मी सोडीन का? तुजवर माझी प्रीती आहे. पण पाशाने बद्ध केल्यावर तुझी प्रगती कशी होईल! ऊठ, ओझे उचल व आपला मार्ग सुधार.'

या गीतात श्रमलेल्या पान्थास दिलेला उत्साह आहे. अन्तःकरणातील प्रेम व निसर्गातील चैतन्य यांनी प्रेरणा दिलेले असे हे एक उत्साह-गीत आहे.

**द्युति** = तेज. **रम्यायति** = उज्ज्वल भविष्यकाळ. **अशोक** = सम्राट अशोक. **हेमरथगुढारीं** = सोन्याच्या रथाच्या अंबारीत (बसून). **सूक्ष्मगंधी** = ज्यांचा वास दरवळत नाही, पण सूक्ष्म असतो अशी. **चेतनानुसारी** = प्रेरणा देणारी.

**९५. कवि भास्करास :**

ही कविता कै. कविवर्य भास्करराव ताम्बे यांस उद्देशून लिहिलेली आहे. अर्थात ‘ कवि भास्कर ’ या शब्दामध्ये ‘ कवींमध्ये सूर्यासारखा ’ हा भाव अभिप्रेत आहेच. श्री. ताम्ब्यांचे श्रेष्ठत्व स्वयंसिद्ध आहे. ‘ त्यांना ‘ तृणाच्या पात्यांतही ’ सौंदर्य आढळले, प्रतिभा त्यांना शोधीत आली, संगीताशी त्यांचा भाव एकरूप झाला, त्यांनी नवीन प्रतिमा निर्माण केल्या. त्यांचा दृष्टिक्षेप झाल्यावर काटे बोथट झाले व भवसंसार हे परंधाम झाले. त्यांच्यापुढे आपली किरकीर कशाला ? त्यापेक्षा आपण त्यांची गीते ऐकणे हेच बरे ’, हा या कवितेचा आशय आहे.

**९६. पुरुषाची छाती :**

या कवितेतील प्रसंग मुंबईस काही दिवसांपूर्वी साक्षात घडलेला आहे. पहिल्या कडव्यात असले कवन गावयाला ‘ विनायका ’ची रसरसलेली प्रतिभा पाहिजे वगैरे प्रास्ताविक भाग आहे, व पुढील तीन कडव्यांत पुंडांचा दरवडा, पाय तोडण्याची धमकी, व प्रभाकर सुळे या शूर तरुणाचे धाडस यांचे वर्णन आहे. प्रस्तुत कविता तरुणांना प्रेरक आहे.

**९७. जा स्वतंत्रतेची मौज चाख !**

ही कविता एका मृत बालकास उद्देशून लिहिलेली आहे. देहाच्या पिंजऱ्यातून उडून गेलेल्या आत्म्याला माधवराव म्हणतात, ‘ जा; स्वतंत्रतेची मौज चाख ! लोकांना बंधनात प्रेम वाटत असले तरी मला मुक्त मनाचे प्रेम आवडते. मात्र आपले पंख तू सुरक्षित व मुक्त राख ऐवढेच माझे म्हणणे आहे.’

**९८. भ्रष्टा :**

एका सुंदर तरुणीला कोणी अधमाने भ्रष्ट केली व तिला सोडून देऊन आपण कुठे निघून गेला ! या दुर्दैवी घटनेचे वृत्त माधवरावांच्या कानी आल्यावर त्यांच्या मनाची विलक्षण तडफड झाली व त्यातून ही कविता निर्माण झाली.

'देवा, तू का आम्ही क्रूर?' असा प्रश्न विचारताना 'आम्हीच वाईट आहोत, आम्हीच क्रूर आहोत' असे माधवरावांना म्हणावयाचे आहे. बेजबाबदार समाजातील असहाय अबला व दुष्ट पुरुष यांचे यात चित्रण आहे. समाजात चाललेल्या अधम व्यवहारांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावर जो त्वेष माधवरावांच्या मनात साठला होता त्याला 'भ्रष्टा' कवितेच्या रूपाने वाट मिळून तो उफाळला आहे.

**विरक्त ऋषि** = पराशर. **सत्यवती** = पराशराची पत्नी व व्यासाची आई. **अंगुर** = द्राक्ष. **टंच** = रसाने टचटचून भरलेले. **शकुनि** = दुष्ट, अधम. '**भूशशिलक्ष्माविषयीं............ सूर**'= शाकुंतलातील 'मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति' या ओळींच्या आधारे माधवरावांनी आपली कल्पना मांडली आहे. चंद्रावर डाग असला तरी तो त्याची शोभा वाढवतो, असे आपण मोठ्या गौरवपूर्ण औदार्याने आकाशातील चंद्रासंबंधी म्हणतो. परंतु पृथ्वीवरील चंद्रा-विषयी (स्त्रीविषयी) बोलताना आपण हे औदार्य दाखवीत नाही असे म्हणण्याचा भाव. **लोकसंग्रह क्षेत्रन्यायी** = लोकसंग्रहाची मोजदाद आईच्या धर्मावरून (क्षेत्रन्यायी) केली जाते. **सोयीचा आश्रय** = भ्रष्ट स्त्रियांना गुप्त रखेली म्हणून जवळ ठेवण्याची बड्या लोकांची पद्धत. **उद्धारकसहधार्मिणीत्व** = उद्धार करणारे पत्नीपद.

### ९९. दग्धपक्ष पतंग :

माधवरावांच्या ध्येयवादाची द्योतक अशी ही एक प्रतीकात्मक सुंदर कविता आहे. या ठिकाणी एका पंख जळलेल्या पतंगाचे प्रतीक घेऊन ध्येयासाठी आसावलेल्या व त्यातच आपले सामर्थ्य खर्ची टाकणाऱ्या त्यागी महत्त्वाकांक्षी वृत्तीचे चित्रण माधवरावांनी केले आहे.

हा दग्धपक्ष पतंग एका कोपऱ्यात बसून तळमळताना स्वतःला म्हणतो, 'वेड्या, अजूनही तुला आशा आहे? या मोहिनीने तुला केवढा चटका लावला? गरिबी आणि श्रीमंती यांत केवढे अंतर असते! तुला

वाटले, या गौरीच्या आराशीतील ज्योतीशी तन्मय व्हावे व अक्षय स्वर्गसुख घ्यावे. पण तुझ्या नशिबी हा नरकच आला! पंख जळाले, पण मरण आले नाही! उलट या जीवन्मृतीने तुला गाठले! तुझ्यासारख्या यःकश्चित किडयासाठी कोण रडतो? अरे रे! तुझ्या डोक्यावर कुणाचा पाय पडला किंवा केरसुणीने तुला कुणी झाडले तर किती बरे होईल!'

यांतील पतंगाची अवदशा व त्याची महत्त्वाकांक्षा आपणास ध्येयवादी माणसाच्या जीवनात पदोपदी प्रत्ययास येते. गरिबी-श्रीमंतीच्या भूमिकेवरून जेव्हा एखाद्या व्यक्तीची पारख केली जाते, तेव्हा ध्येयवादी माणसाला आपणांस झालेल्या अन्यायाबद्दल अतिशय वाईट वाटते. आणि मग या अवदशेपेक्षा मरण बरे असे त्याला वाटते. पण ते येत नाही, ही पुढली शोकान्तिका! अशा वेळी शेक्स्पिअरच्या 'किंग लिअर' नाटकातील पुढील ओळी सार्थ वाटतात. 'किंग लिअर' म्हणतो—

The usurer hangs the Cozener.
Through tatter'd clothes small vices do appear.
Robes and furr'd, gowns hide all. Plate sin with gold;
And the strong lance of justice hurtless breaks;
Arm it in rags, a pigmy's straw does pierce it.

## १००. बरा सुटला बिचारा!

ही कविता माधवरावांनी नाट्यछटाकार दिवाकर यांच्या मृत्यूने विव्हल होऊन लिहिली आहे. जन्मभर ज्याने कष्ट केले, अपमान सोसले, हीन दशेत व दुःखात जिणे घालविले, त्याच्या यातनांस पार नसतो. मृत्यूनंतर त्याच्यावर कितीही स्तुतिसुमने वाहिली वा त्याची स्मारके उभारली तरी त्याच्या दुःखाचे परिमार्जन होत नाही. जीवित हे काव्याहून खचित थोर आहे. पण दैवच कठोर असते. अशा वेळी 'बरे झाले, सुटला बिचारा!' असे म्हटल्यास त्यात नवल काय? कवी, लेखक, नाटककार, कादंबरीकार, गायक, चित्रकार किंवा कोणीही कलावंत याचे जीवन असेच असते.

**सभ्य** = लौकिकरीत्या करावयाचा ( माधवराव याचा अर्थ चेष्टेने ‘ सभेतील ’ असा सांगत असत ). **दुर्वृत्त** = जिचे छंद वाईट आहेत अशी. **आशाज्वरें** = महत्त्वाकांक्षारूपी तापाने. **प्रेमप्रकोप** = प्रेमाच्या पोटी केलेला आक्रोश.

१०१. **आत्मप्रतीति :**

ही कविता ज्या वेळी माधवरावांनी लिहिली त्या वेळी मराठी काव्य-वाङ्मयात गूढगुंजनपर कवितेला ऊत आला होता. तिचे वृत्तही ठरल्या-सारखेच होते. तीमधील शब्द, रूपके, संकेत हेही ठरलेलेच येत. ही कविता खऱ्या अनुभवावाचून लिहिलेली असे, असे माधवरावांचे म्हणणे असे. म्हणून त्यांनी अशा कवितेची टर उडविण्यासाठी त्यांच्याच पद्धतीने हे सुनीत लिहिले आहे. यातील ‘ अवधूत, निशी, कंबुवत, अव्यक्ताचे स्वनीत, समदर्शी, नेणिवेचे गाणे, तिमिरात तेज, तिमिर मी तेजी, मीपण तूपण, आयतश्रुती, कूर्च जघन्य ’ हे वेदान्ती शब्द किंवा दुसऱ्या ओळीची चौदाव्या ओळीत झालेली पुनरुक्ती या सर्व गोष्टी विडंबनासाठीच येथे आलेल्या आहेत.

१०२. **सेवा-धर्म :**

पैशासाठी नोकरी करावी लागते, कारण पोट हे पैशानेच जाळा-वयाचे असते. ही गोष्ट माधवरावांच्या मनाला फार लागून राहिली होती. एका अधिकाऱ्याने नोकरीबाबत काही उपकाराची भाषा वापरल्यामुळे माधवरावांना वाईट वाटून त्यांनी ही कविता लिहिली. पहिल्या ओळीत “ हे धनावलंबन बघुनि जीव हा गळे ” याऐवजी पूर्वीचा श्लिष्ट पाठ “ हातीं न छत्रपति म्हणुनि जीव हा गळे ” हा चिंत्य आहे.

शेवटच्या कडव्यातील माधवरावांचा उद्वेग पाहण्यासारखा आहे.

१०३. **निर्झरास :**

ही कविता प्रतीकात्मक आहे. मुलांची दृष्टी पुढे पुढे धावते, पण वडिलांची दृष्टी मुलाकडे असते. मुलाने आपणांकडे वळून पाहावे असे, बापाला वाटते; पण मुलाला पुढल्या जीवनाची ओढ लागलेली असते,

व तो मागे वळूनही पाहात नाही, असा कधी कधी अनुभव येतो. हे कटू सत्य सांगण्यासाठी डोंगर (वडील), व निर्झर (डोंगराचा पुत्र) याचे प्रतीक घेऊन माधवरावांनी आपले चित्र रंगविले आहे. यात बापाच्या व मुलाच्या स्वभावाचे यथार्थ व समर्पक वर्णन केले आहे. माधवरावांच्या कवितांमधील ही एक उत्कृष्ट कविता आहे.

**१०४. एक कणिका :**

हा एक काव्य-वाङ्मयात उदयास आलेला नवीन लेखनप्रकार आहे. चार किंवा पाच ओळींत मनातील छोटासा तात्त्विक विचार यात मांडण्याची पद्धत आहे. हा लेखनप्रकार जपानमधून आपलेकडे आला व याचे श्रेय श्री. गोपीनाथ तळवलकर यांस आहे.

**१०५. पापशंकी :**

'अतिस्नेहः पापशंकी' या म्हणीला साजेशी या कवितेतील भावना आहे. आईबाप दूर असताना त्यांच्या मनात आपल्या मुलासंबंधी भलभलत्या शंका कशा येतात? पण खरोखरी प्रत्यक्षात तसे काही नसते याचे चित्रण या सुनीतात केलेले आहे. बाहेर मेघराजी असली तरी घरात सुवर्णस्मिते झळकतात, हाच अनुभव यात रेखाटला आहे.

**१०६. हरिताम्बरा :**

या कवितेत शारदीय ज्योत्स्नेप्रमाणे स्मरणीय व गूढ असणाऱ्या प्रियेची स्मृती प्रेमिकाला होत आहे, हा भाव नैसर्गिक दृश्यांच्या विविध प्रतिमा रेखाटून कवीने रंगविला आहे.

**१०७. चल उडुनि पांखरा :**

या कवितेतील भावना 'निर्झरास' या कवितेच्या अगदी उलट आहे. 'निर्झरास'मध्ये मुलगा दूर जातो पण मागे वळून पाहात नाही, म्हणून वडिलांची तक्रार आहे, तर या कवितेत पाखराने घरी राहू नये, इतकेच नव्हे तर त्याच्या मातापितरांनी त्याला केवळ स्वार्थी प्रेमाने संकुचित जागेत ठेवून घेऊ नये, असे कवीला म्हणावयाचे आहे. 'त्याने

जगदुद्यानात विहार करावा, जीवन-गाणी गावी व अमृत हरण करून आणावे; आई-बापांची छाया ही केवळ दोन दिवसांची असते. हा कवीचा अभिप्राय आहे.

**१०८. चंदाराणी :**

या कवितेत चंद्राला स्त्री कल्पून तिचे सूर्यावर म्हणजे मित्रावर प्रेम आहे, व त्या नादात ती मित्रप्रेमात विलीन होऊन फिरते आहे, तिचे लक्ष पेठेतील सुवर्ण-व्यवहाराकडे मुळीच नाही किंवा ती दुःखीही नाही, हा भावार्थ कवी व चंदाराणी यांमधील संवादरूपाने रेखाटला आहे.

**१०९. गोड बाल्य :**

या कवितेत बाल्याचा गोडवा गाइला असून त्यात कालची खंत नाही, उद्यांची चिंता नाही, व ते दूरतेमुळे साजरे दिसते हीच कल्पना प्रामुख्याने मांडलेली आहे.

**११०. डोला, बाई डोला ! :**

हे छोटे पण सुंदर शिशुगीत लहान मुलाला खेळविणाऱ्या आईच्या तोंडी शोभण्यासारखे असून बालकवीच्या ' अंगाई गीता 'शी ( बोल बाई बोल ग । तुझ्या बोलाचे काय वाणुं मोल ग ) तुलून पाहण्या-सारखे आहे.

**१११. राजभक्ति :**

या कवितेत राजभक्तीचे प्रदर्शन करणाऱ्या लोकांचे चित्र आधी रेखाटले असून नंतर तोंडपुजा स्तुतिपाठकांना फटके मारीत मारीत खऱ्या राजाचे वर्णन करण्यात आले आहे. ' तोरणे, चित्रे, प्रतिमा-पूजा हा सर्व देखावा असून ही सर्व पोटपूजा आहे. खरा राजा हा गाजावाजा न करता जनहितार्थ खपतो ; तो जनदास असतो व प्रगतीचा वाटेकरी असतो.' असे म्हणून कवी त्याला ' चिरं जीव ' ही शुभेच्छा अर्पण करतो.

**११२. बघें प्रथम मी बालचर्यीं :**

ही कविता सुवर्णनिधीतील एका इंग्रजी कवितेचे भाषान्तर आहे हे माधवरावांनी प्रस्तावनेत सांगितलेच आहे. तसेच या इंग्रजी कवितेचे त्यांनी प्रथम केलेले भाषान्तरही प्रस्तावनेत दिले आहे. वृत्त व भाषान्तर या दोन्ही दृष्टींनी या दोन कविता तुलून पाहण्याजोग्या आहेत. पहिल्या भाषान्तरापेक्षा दुसरे भाषान्तर निश्चित सरस आहे. वृत्ताची ओळ लहान म्हणजे 'दोह्या'ची असल्याने तिच्यात एक ठसका आला आहे व तो इंग्रजीचा पडसाद उठविण्यास पोषक झालेला आहे.

कवीने एका स्त्रीला निरनिराळ्या काळात पाहिले. प्रथम बालवयात, पुढे तारुण्यात, पुढे ती माता झाल्यावर, नंतर ती पोक्त माय झाल्यावर, व पुढे अंतदिनी. या प्रत्येक वेळी त्याला ती सुंदर दिसली. पण प्रत्येक वेळीं तिचे सौंदर्य वाढते होते, असे कवीला वाटले. याचा अर्थ सौंदर्यासंबंधाची कवीची दृष्टी बदलत बदलत म्हणजे निवळत निवळत कशी गेली व शेवटच्या अवस्थेत जे दृश्य त्याला दिसले तो 'सौंदर्योत्कर्ष' कसा व का होता हे पाहण्यासारखे आहे. माधवरावांच्या भाषान्तरातील हे एक अत्यंत सरस भाषान्तर आहे.

पुष्कळ वेळा काव्यपंक्तीतील शेवटच्या अक्षराचे पाय मोडल्याबद्दल टीकाकारांनी तक्रार केली आहे. पण ती अनाठायी आहे. भावगीतात किंवा 'दोह्या'सारख्या वृत्तात कित्येक ठिकाणी शेवटच्या अक्षराचा पाय मोडल्याखेरीज गत्यंतर नसते. उलट कविता वाचण्याच्या दृष्टीने व भाषासौंदर्याच्या दृष्टीने त्यात एक प्रकारचे माधुर्यच आलेले असते. केवळ पाय मोडला म्हणून 'भाषा भ्रष्ट झाली' हे म्हणणे बरोबर नाही. हा नियम सर्वांनाच लावल्यास जुन्यापैकी "संतपदाची जोड् हरि दे" या किंवा "कृष्णा, माझा पदर धरूं नको सोड्" यासारख्या किती सुंदर तरी पदांवर अन्याय केल्यासारखे होईल.

**११३. सुप्रभात :**

या कवितेत लहान मुलांचा निरागस धीटपणा कसा असतो याचे नितान्तसुंदर चित्रण आहे.

पहिल्या तीन कडव्यांत शहरातील लोकांच्या औपचारिक राहणीचे वर्णन करून, चौथ्या कडव्यात एकदम एक लहान मुलगी सुरगाडीवरून आली असा नाट्यमय प्रसंग निर्माण केला आहे. आणि पुढील चार कडव्यांत ती कोणाची होती, तिचे कपाळ, तिची कान्ती, तिचे केस, तिचा वेष, सुरगाडीवर उभे राहण्याची तिची ऐट, व डोळ्यांतील कौतुकछटा यांचे रसाळ व समर्पक वर्णन आहे. यापुढील कडव्यात कवीच्या मनातील तरंग दिग्दर्शित करून त्याच्या तोंडातून स्वाभाविकपणे निघालेला 'सुप्रभात्' (Good morning!) हा उद्गार दिला आहे. नंतर त्या मुलीनेही त्याचा स्वीकार करून 'सुप्रभात्' हे प्रत्युत्तर दिले व ती सुरगाडीवर आपला तोल सहज सावरीत निघून गेली, असे वर्णन आहे. आणि शेवटी कवी तिथेच त्या दृश्याचा व घटनेचा आस्वाद घेत मंत्रमुग्ध झाल्यासारखा उभा राहिला. त्या दृश्याने आपली भूक शमली असे माधवरावांनी म्हटले आहे. यावरून त्यांच्या गुदमरत्या हृदयाला कोणती निर्मळ तळमळ लागली होती व ती कशाने शमत होती हे कळेल. या कवितेची 'कुमारी पिरोजा' या कवितेशी तुलना करून पाहण्यासारखी आहे. ती केली म्हणजे 'भारियलेला अनुक्त मंत्रें' असा कवी उभा का राहिला, ते कळेल.

## ११२. बघें प्रथम मी बालवयीं :

ही कविता सुवर्णनिधीतील एका इंग्रजी कवितेचे भाषान्तर आहे हे माधवरावांनी प्रस्तावनेत सांगितलेच आहे. तसेच या इंग्रजी कवितेचे त्यांनी प्रथम केलेले भाषान्तरही प्रस्तावनेत दिले आहे. वृत्त व भाषान्तर या दोन्ही दृष्टींनी या दोन कविता तुलून पाहण्याजोग्या आहेत. पहिल्या भाषान्तरापेक्षा दुसरे भाषान्तर निश्चित सरस आहे. वृत्ताची ओळ लहान म्हणजे 'दोह्या'ची असल्याने तिच्यात एक ठसका आला आहे व तो इंग्रजीचा पडसाद उठविण्यास पोषक झालेला आहे.

कवीने एका स्त्रीला निरनिराळ्या काळात पाहिले. प्रथम बालवयात, पुढे तारुण्यात, पुढे ती माता झाल्यावर, नंतर ती पोक्त माय झाल्यावर, व पुढे अंतदिनी. या प्रत्येक वेळीं त्याला ती सुंदर दिसली. पण प्रत्येक वेळीं तिचे सौंदर्य वाढते होते, असे कवीला वाटले. याचा अर्थ सौंदर्यासंबंधाची कवीची दृष्टी बदलत बदलत म्हणजे निवळत निवळत कशी गेली व शेवटच्या अवस्थेत जे दृश्य त्याला दिसले तो 'सौंदर्योत्कर्ष' कसा व का होता हे पाहण्यासारखे आहे. माधवरावांच्या भाषान्तरातील हे एक अत्यंत सरस भाषान्तर आहे.

पुष्कळ वेळा काव्यपंक्तीतील शेवटच्या अक्षराचे पाय मोडल्याबद्दल टीकाकारांनी तक्रार केली आहे. पण ती अनाठायी आहे. भावगीतात किंवा 'दोह्या'सारख्या वृत्तात कित्येक ठिकाणी शेवटच्या अक्षराचा पाय मोडल्याखेरीज गत्यंतर नसते. उलट कविता वाचण्याच्या दृष्टीने व भाषासौंदर्याच्या दृष्टीने त्यात एक प्रकारचे माधुर्यच आलेले असते. केवळ पाय मोडला म्हणून 'भाषा भ्रष्ट झाली' हे म्हणणे बरोबर नाही. हा नियम सर्वांनाच लावल्यास जुन्यापैकी "संतपदाची जोड् हरि दे" या किंवा "कृष्णा, माझा पदर धरूं नको सोड्" या-सारख्या किती सुंदर तरी पदांवर अन्याय केल्यासारखे होईल.

## ११३. सुप्रभात :

या कवितेत लहान मुलांचा निरागस धीटपणा कसा असतो याचे नितान्तसुंदर चित्रण आहे.

पहिल्या तीन कडव्यांत शहरातील लोकांच्या औपचारिक राहणीचे वर्णन करून, चौथ्या कडव्यात एकदम एक लहान मुलगी सुरगाडीवरून आली असा नाट्यमय प्रसंग निर्माण केला आहे. आणि पुढील चार कडव्यांत ती कोणाची होती, तिचे कपाळ, तिची कान्ती, तिचे केस, तिचा वेष, सुरगाडीवर उभे राहण्याची तिची ऐट, व डोळयांतील कौतुकछटा यांचे रसाळ व समर्पक वर्णन आहे. यापुढील कडव्यात कवीच्या मनातील तरंग दिग्दर्शित करून त्याच्या तोंडातून स्वाभाविकपणे निघालेला ‘ सुप्रभात् ’ ( Good morning ! ) हा उद्गार दिला आहे. नंतर त्या मुलीनेही त्याचा स्वीकार करून ‘ सुप्रभात् ’ हे प्रत्युत्तर दिले व ती सुरगाडीवर आपला तोल सहज सावरीत निघून गेली, असे वर्णन आहे. आणि शेवटी कवी तिथेच त्या दृश्याचा व घटनेचा आस्वाद घेत मंत्रमुग्ध झाल्यासारखा उभा राहिला. त्या दृश्याने आपली भूक शमली असे माधवरावांनी म्हटले आहे. यावरून त्यांच्या गुदमरत्या हृदयाला कोणती निर्मळ तळमळ लागली होती व ती कशाने शमत होती हे कळेल. या कवितेची ‘ कुमारी पिरोजा ’ या कवितेशी तुलना करून पाहण्यासारखी आहे. ती केली म्हणजे ‘ भारियलेला अनुक्त मंत्रें ’ असा कवी उभा का राहिला, ते कळेल.

# परिशिष्ट - १

## (१)

'भितों मी तुझ्या चुंबनाला, सुशीले' या २२ व्या कवितेचे मूळ इंग्रजी.

I fear thy kisses, gentle maiden ;
Thou needest not fear mine,
My spirit is too deeply laden
Ever to burthen thine.
I fear thy mien, thy tones, thy motion ;
Thou needest not fear mine ;
Innocent is the heart's devotion
With which I worship thine.

— **P. B. Shelley**

## (२)

'दिसण्यांत सुंदर ती नसे' या २३ व्या कवितेचे मूळ इंग्रजी.

She is not fair to outward view
As many maidens be ;
Her loveliness I never knew
Until she smiled on me.
O then I saw her eye was bright,
A well of love, a spring of light.
But now her looks are coy and cold,
To mine they ne'er reply,
And yet I cease not to behold
The love-light in her eye :
Her very frowns are fairer far
Than smiles of other maidens are.

— **H. Coleridge**

(३)

'**सवत**' या ३४ व्या कवितेचे मूळ इंग्रजी.

I determined to find out whose it was —
The portrait he looked at so, and sighed;
Bitterly have I rued my meanness
And wept for it since he died.
I searched his desk when he was away,
And there was the likeness–yes, my own!
Taken when I was the seasons fairest,
And time–lines all unknown.
I smiled at my image, and put it back,
And he went on cherishing it, until
I was chafed that he loved not the then living,
But that past woman still.
Well such was my jealousy at last,
I destroyed that face of the former me;
Could you ever have dreamed the heart of woman
Would work so foolishly!

— **Thomas Hardy**

(४)

'**बघें प्रथम मी बालवयीं**' या ११२ व्या कवितेचे मूळ इंग्रजी.

**Agnes**

I saw her in childhood —
A bright, gentle thing,
Like the dawn of the morn,
Or the dews of the spring:
The daisies and the hare–bells
Her playmates all day;

Herself as light-hearted
And artless as they. 1
I saw her again —
A fair girl of eighteen,
Fresh glittering with graces
Of mind and of mien.
Her speech was all music ;
Like moonlight she shone ;
The envy of many,
The glory of one. 2
Years, years fleeted over —
I stood at her foot :
The bud had grown blossom,
The blossom was fruit.
A dignified mother
Her infant she bore ;
And look'd, I thought, fairer
Than ever before. 3
I saw her once more—
'T was the day that she died ;
Heaven's light was around her
And God at her side ;
No wants to distress her,
No fears to appal—
O then, I felt, then
She was fairest of all ! 4

— H. F. Lyte

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 43846 वि: काव्य
क्रमांक 9826 नों दि 26/2/67

# परिशिष्ट - २

## छंदोरचना

माधवरावांनी 'स्वप्नरञ्जना'तील भावगीते 'वृत्त, जाती व छंद' यांमध्ये लिहिली आहेत. आपल्या 'छंदोरचना' किंवा 'पद्यप्रकाश' या ग्रंथांत त्यांनी वृत्त, जाती व छंद यांचा सविस्तर ऊहापोह करून त्यांचे व्यवस्थापन व नामकरण केले आहे. सविस्तर अभ्यासासाठी '**पद्य-प्रकाश**' हे पुस्तक पाहावे. वृत्त, जाती व छंद याचे सामान्य स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

| नाव | अक्षरे | मात्रा | गण | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| वृत्त (गणवृत्त) | नियमित | नियमित | नियमित | 'वियोगिनी', पा. १४ |
| जाती (मात्रावृत्त) | अनियमित | नियमित | नाहीत | 'अङ्कुर', पा. १ |
| छंद (अक्षरवृत्त) | नियमित | नाहीत | नाहीत | 'अभंग', पा. ११३ |

छंदात प्रसंगोपात्त ऱ्हस्वाचे दीर्घ वा दीर्घाचे ऱ्हस्व उच्चार करण्यास परवानगी असते.

मराठी वृत्तशास्त्रात एकूण गण आठ आहेत, व त्यांचे वर्णन माधवराव '**यमाताराजभानसलगम्**' या स्वरचित सूत्राने करीत. ते म्हणत, एकूण गण आठ म्हणजे '**य**, म, त, र, ज, भ, न, स' हे होत. तीन अक्षरांचा एक गण ही कल्पना घेतली की, '**य**' म्हणजे '**यमाता**' (⏑ – –), 'म' म्हणजे 'मातारा' (– – –) याप्रमाणे गणाच्या आद्य अक्षरापासून तीन अक्षरे वरील सूत्रात मोजली की तो गण व त्याचे ऱ्हस्व-दीर्घ सिद्ध होतात. उदा०– 'स' गण म्हणजे 'सलगम्' (⏑ ⏑ –). याप्रमाणे आठी गणांची लक्षणे वरील एक सूत्र पाठ केल्यास कळतील. वृत्त, जाती व छंद यांची नावे व उदाहरणे '**पद्यप्रकाश**' या पुस्तकात पाहावी.

# प्रथम-चरणांची सूची


| | |
|---|---|
| अजुनि किती छळतोस देवा, अजुनि किती छळतोस् ? | ९४ |
| अजुनि युवती-गालास लाजवील | २९ |
| अजूनहि आशा वेड्या, ठेविशी का पोटीं ? | १४२ |
| अन्तरीं सारखी आग आग ! | १२७ |
| अन्धारून आलें, | ९९ |
| अल्लाच्या मुलखांत अेकच करा अिस्लाम भूमीवर | ८२ |
| अवधूत खरा, तू खरा तू स्वयम्मन्य | १४५ |
| आमुचें घर छान | ११० |
| अुठा रे ! चुलीशी का अशी दाटी ? | ११५ |
| अेकत्र गुम्फून जीवित-धागे | ७९ |
| अैकव तव मधु बोल कोकिळे, अैकव तव मधु बोल् | ८६ |
| कञ्चनी रसरङ्गाची खाणी | ७२ |
| कन्या सासऱ्यास जाअी | ८१ |
| करीत भिरभिर वाहे वारा अखण्ड त्या माळावरती | ११४ |
| कल्पना तरल किति ललित नादमाधुरी ! | ८९ |
| कशासाठी ? कोणासाठी ? | ७४ |
| कशासाठी, पोटासाठी | १०६ |
| कशी मजेची वेळा | ११८ |
| कां अुठतां ? खाली बसा तरुण मण्डळी, | ८७ |
| कां अुठतां ? बैसा अहो रसिक मण्डळी, | १३१ |
| काअू काअू गे | ११९ |
| कां नको मधुक्रम आज ? | ३२ |
| कां पापभीरुता हेंच पाप | १२८ |
| काय गाअुं ? कोठुनि आणूं तुझी रागदारी ? | १२९ |
| काय लाजरी पोर ! खरोखर खुळी लाजरी पोर ! | ५७ |
| कां सभ्य शोक जन हो करितां अकालीं ? | १४३ |
| कां हवा तमाशा असा राजभक्तीचा ? | १५५ |
| किति निर्मळ रम्य चन्द्रिका | १०० |

| | |
|---|---|
| कुणा नाही बघवलें | १०९ |
| कुळवन्ताची हो पोर | ८४ |
| केला निश्चय की बघेनच छबी आहे कुणाची अशी | ६१ |
| कोठे ती चन्दा राणी | १५१ |
| कोणत्या स्वरूपीं प्रभो, तुला मी पाहूं ? | ५० |
| क्षण आहे का तो तव हृदयीं ? | ४७ |
| घरीं बैसतां कां वाया ? | ९१ |
| घालिशी काय अवेळीं साद् ? | १३० |
| चल अुडुनि पाखरा, पहा जरा | १५१ |
| चला रे खेळूं लेजीम | १२० |
| जणुं चिन्तांचा समूह सारुनि मागे तू बान्धिला | २२ |
| जा ! स्वतन्त्रतेची मौज चाख ! | १४० |
| जिकडे तिकडे देशभक्त हे आणि पुढारी किती ! | ५४ |
| जीव तळमळतो, कुठे खरी प्रीती ? | ६३ |
| जीवित म्हणजे असे बापुडी स्वप्नांची माला | ११९ |
| जुनें झालें झालें फोल | १०७ |
| ज्या निशिगन्धीं जीव लोभती दोघांचे आपुले | १७ |
| झोपेंत कधी असतां मी | १० |
| डोला बाअी, डोला | १५४ |
| तुजपासुनि मी असतां दूर् | ३९ |
| तूच निर्वाणींचा सखा | ९६ |
| तू प्रसाद ! तू रस, खरा कवी ! | १३६ |
| तेज पाहतां याचें दिपते होअुनि जाते मूक गिरा | ३७ |
| दिसण्यांत सुन्दर ती नसे बाला जशा बहु बाह्यता | ४२ |
| दुक्ख कधी तुला | १२६ |
| देवळांत जाअूं | ११८ |
| देवा, तू का आम्ही क्रूर् ? | १४० |
| धडाड धडाड | १११ |

ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र.
(स्थळ प्रत)

ध्यानाचा भङ्ग न व्हावा २७
नवतिच्या बहरामधि बालिका ९५
नागपञ्चमीच्या सणीं १०२
नादावुनि केलें मी भ्रमण कितिं अहो लोका १३३
नाना बाहुली माझी १०८
निज नीज अता आनन्दा लडिवाळा ४३
निशा दशदिशांत या भरुनि शान्तता राहिली ७
पहा वर नभीं स्वयम्प्रकाशी निश्चळ तारा किती ३१
पहा सृष्टिचें ध्यान मनोरम, पहा सृष्टिचें ध्यान् १२४
पाहुं कुठे तुज राया कनया, पाहुं कुठे तुज राया ? ९४
पाहूं तुझें तान्हुलें, १०८
पुरे ! लौकिक तो यापुढे नको गे १०४
पुलाजवळ वळणावर चमकुनि चपलेपरि सुन्दरी ४९.
प्रभो मज भेट १२२
प्रेम कुणाचें मजवर नाही हें खडतर दैव २५
प्रेम तुला कळविलें १०१
प्रेमळे, जाशिल का सोडून् ? ७०
बघ बाळ, चन्द्र वर येअी ११
बघूं आअी कुठे माझा नवीन भाअू ११६
बघें प्रथम मी बाल-वयीं १५६
बाळ, खळाळत जाशी १४८
बुल्बुला, रडशि कां बसुनि दुरी ? ९७
भलत्या वेळीं कोण वाजवुनि पाही टिचकी दारीं ? १५
भितों मी तुझ्या चुम्बनांते सुशीले, परी भ्यावयाला नको तूज गे ४२
मणिकाञ्चनयोग बरा म्हणुनी १८
मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे ५८
मराठीला सञ्जोपून वैभव दे ज्ञानेश ९२
मला अेकदा चित्र काढुनी दिलें कल्पनेने ५९

| | |
|---|---|
| महासिन्धु याला असे पाठिराखा, तसे साह्य सह्याचलाचे कडे | ८४ |
| माझा व्याकुळतां जीव | १२३ |
| माझी ताअी, हिरकणी | ७६ |
| मी सन्ध्यासमयास कष्ट करुनी येतों घरासन्निध | १४९ |
| मुम्बअीमधे पहाल तो | १५७ |
| मेलों तरी मेलों | ११३ |
| मोहीं मज कां आता पाडिशी कुमारी ? | १३४ |
| या वेड्या तेढ्या मनीं माझिया कहर करी हुरहूर् | ७० |
| येथें कला विकसुनी जरि मोद देअी | १०३ |
| रे त्या पक्ष्यावर दगड मी फेकितां फेकिला की ! | ४८ |
| लावण्यमञ्जरी दिव्य परी ! | ६२ |
| विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती | १३७ |
| विलसत जावी हिरवळींतुनी स्फटिकाची जशि झरी | १५० |
| श्रान्त पान्थ, घडिभर तू ठेव ही हुशारी | १३५ |
| श्रीकृष्णा रे, आस न दुसरी अुरली | १ |
| सखये, तुजपासुनी दुरी | १४ |
| सखये, रजनी तुझ्यापरी | ८ |
| सखे, बरें जर नसती झाली ओळख अपुली दाट | ६ |
| सर्वस्व सुखाचें वाटे न कुणाला बाल्य गोड् ? | १५३ |
| सुशुभ्र पाठीवरुनी लोम्बे | १९ |
| सोड अकालिक लाज सोनुले, सोड अकालिक लाज् | ५ |
| हास बालिके, गडे अुधळ सुख निकें | ५० |
| हृदय अेकाकीं | ९७ |
| हृदय मम हें कोणी नाही अजनिहि जाणिलें | ४ |
| हें घनावलम्बन बघुनि जीव हा गळे | १४६ |
| हें भव्य कुणाचें गे थडगें ? | ९८ |
| हें मचूळ पाणी गोड न लागे तुला | १४९ |
| हें साधें भोळें गीत आवडे तुला | ७७ |
| होती वादळाची रात | ९० |


REFBK-0016286

— REFBK-0016286

## आमचे काही काव्य-संग्रह

| | | |
|---|---|---|
| सामराज : रुक्मिणीहरण | : | गो. वि. तुळपुळे |
| अनुबंध | : | कृ. ब. निकुंब |
| ताम्बे : समग्र कविता | : | भा. रा. ताम्बे |
| विरहतरङ्ग | : | माधव जूलियन् |
| निवडक नवनीत | : | द. के. बर्वे |
| पेर्ते व्हा | : | कवि अनिल |
| आराधना | : | वा. ना. देशपांडे |
| अनामिका | : | वा. ना. देशपांडे |
| आश्विनी | : | वि. म. कुलकर्णी |
| काञ्चनमेघ | : | कवि गिरीश |
| सुवास आणि रस | : | भ. श्री. पंडित |
| सोनेरी चांदणें | : | कवि गिरीश |
| सुधारक | : | माधव जूलियन् |
| झोळणा | : | सरोजिनी बाबर |
| टिळकांची कविता, भाग १ व ४ | | ना. वा. टिळक |
| झुकलेलं चांदणं | : | वसंत दीक्षित |
| काहीतरी | : | ह. स. गोखले |
| समग्र केशवसुत | : | भ. श्री. पंडित |
| भग्नमूर्ती | : | कवि अनिल |
| पाऊलखुणा | : | वि. म. कुलकर्णी |
| रेघा | : | राम शेवाळकर |


व्हीनस प्रकाशन

'तपश्चर्या'

३८१ क, शनिवार पेठ : पुणें २